९०३९
म. ग्रं. मं. ठाणें
विषय चरित्र
क्र. नं. ३९८

# मोहन मालवीय.



REFBK-0004384

रामकृष्ण गोपाळ भिडे

# पंडित मदनमोहन मालवीय.

प्रस्तावनाकार

श्री. नरसिंह चिंतामण केळकर

लेखक

रामकृष्ण गोपाळ भिडे

[ निकोलाय लेनिन, स्वातंत्र्यदीप, सुभाषचंद्र बोस, पं. जवाहरलाल नेहरू, इ. पुस्तकांचा कर्ता ]

REFBK-0004384

सन १९३१ ]

[ किं. ८ आणे

प्रकाशक व मुद्रक—
शंकर नरहर जोशी
' चित्रशाळा ' प्रेस १०२६
सदाशिव पेठ, पुणें शहर.

सर्व हक्क स्वाधीन

तीर्थरूप रा. रा. श्री.

## गोपाळ कृष्ण भिडे

यांचे चरणसेवेशीं

# अनुक्रमणिका.


प्रस्तावना

आभार

| | |
|---|---|
| १ विषयोद्घाटन | पृ. १ |
| २ जन्म व कुलवृत्तांत | पृ. ७ |
| ३ हिंदुविश्वविद्यालयाची स्थापना | पृ. १३ |
| ४ हिंदु संघटन | पृ. २८ |
| ५ स्वराज्यार्थ प्रयत्न | पृ. ५१ |
| ६ कायदेमंडळांतील लोकसेवा | पृ. १०० |
| ७ कमिशनांपुढील साक्षी व काम | पृ. १२२ |
| ८ पंडितजी व कायदेभंग | पृ. १४८ |
| ९ उपसंहार | पृ. १६९ |
| १० परिशिष्टें | |
| १ सुधाबिन्दु | पृ. १७५ |
| २ पं. मालवीय व महाराष्ट्र | पृ. १८५ |

# प्रस्तावना.

हल्लीं निरनिराळ्या प्रांतांतील पुढाऱ्यांचीं चरित्रें प्रसिद्ध होऊन तीं ज्या त्या प्रांतांतील लोकांना त्या त्या भाषेंतून वाचावयास मिळत आहेत ही फार आनंदाची गोष्ट होय. **लाला लजपतराय** यांचें चारित्र मराठींत **रा. बाबासाहेब फडके**, वकील पनवेल, यांनीं नुकतेंच लिहून प्रसिद्ध केलें आहे. आणि त्यानंतर आतां सुप्रसिद्ध **पं. मदन मोहन मालवीय** यांचें चरित्र **रा. रामकृष्ण गोपाळ भिडे** यांचेकडून मराठींत प्रसिद्ध होत आहे.

**पं. मदन मोहन** हे **लालाजी**प्रमाणें आपल्या प्रांताचे निदान कांहीं वर्षांपूर्वीपर्यंत तरी मूर्धाभिषिक्त पुढारी होते. ते **लालाजी**प्रमाणें जहाल नव्हते व हल्लींच्या चळवळींत जरी ते पूर्वींहून अधिक धीटपणानें व तडफेनें पुढें आलेले दिसले तरी आजहि त्यांना कोणी जहाल असें म्हणणार नाहीं. अलाहाबाद प्रांतांतील नेमस्तपक्षाचे ते कमींतकमी ३० वर्षें पुढारी होते. तथापि हें पुढारीपण हातीं असतांहि त्यांनीं ज्या कायदे–कौन्सिलांत कै. **गोखले** यांनीं ज्या प्रेसबिलाला संमति दिली, त्याच कौन्सिलांत त्याचवेळीं **पं. मदन मोहन मालवीय** यांनीं प्रेसबिलाला विरोध केला. १९१९ सालीं दिल्ली येथील वरिष्ठ कौन्सिलमध्यें रौलेट बिल सरकारनें पुढें आणलें, तेव्हां **पं. मदन मोहन** यांनीं केलेली कामगिरी सर्वश्रुत आहे. किंबहुना **म. गांधी** यांनीं पुढें सुरू केलेल्या सत्याग्रहाच्या चळवळीची प्रस्तावना म्हणजेच त्यांचें त्यावेळचें भाषण होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. तथापि त्यांना जहाल हें नांव लोकांनीं किंवा सरकारनें केव्हांहि दिलें नाहीं.

एकच काम दोन किंवा अनेक तऱ्हांनीं माणसें कशीं करतात याचीं इतर प्रांतांतील उदाहरणाप्रमाणें अलाहाबाद प्रांतांतहि उदाहरणें होतींच. **पं. मदन मोहन** यांच्यापूर्वी **पं. अयोध्यानाथ, पं. बिशन नारायण धार, पं. गंगाप्रसाद वर्मा** वगैरे पुढारी हे त्याच प्रांतांतील; **डॉ. तेज-बहादूर सप्रू** यांच्या मानानें अधिक स्पष्टवक्ते व तडफदार असले तरी त्यांनाहि कोणी जहालपक्षांत गणलेले नव्हते. **पं. अयोध्यानाथ** यांचे चिरंजीव **पं. हृदयनाथ कुंझरू** हे हल्लीं ' सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीचे ' उपाध्यक्ष आहेत. खुद्द **पं. मोतिलाल नेहरू** घेतले तरी ते १९१९ पर्यंत नेमस्तांचेच पुढारी होते. परंतु ते व त्यांचे चिरंजीव **पं. जवाहरलाल**

नेहरू हे सन १९२० सालापासून जहाल पुढारी म्हणून पुढें आल्यापासून जहाल व नेमस्त हा भेद अलाहाबाद प्रांतांत अगदीं स्पष्ट झाला आहे, गतवर्षी **पं. मदन मोहन मालवीय** हे मुंबईस कांहीं कारणानें सत्याग्रहाच्या चळवळींत तुरुंगांत गेले, तरी आजहि त्यांना कांग्रेसचे पुढारी म्हणून कोणी विशेषसें मानीत नाहींत. पण हे सर्व सांगण्याचा उद्देश इतकाच कीं पं. **मदन मोहन मालवीय** यांना केव्हां कोणी जहाल म्हणो, नेमस्त म्हणो, त्यांना देशाचे अनहित करणारे असें मात्र कोणी कधींच म्हटलें नाहीं. आणि त्यांच्या सौम्य वृत्तीवर कांहीं लोक नाखूष असले तरी त्यांना शेवटीं हें कबूल करावेंच लागतें कीं, राष्ट्रकार्यांत जन्मभर झिजलेला असा **पंडितजींसारखा** मनुष्य निदान त्यांच्या प्रांतांत तरी दुसरा नाहीं. याचें कारण असें कीं, त्या प्रांतांत गेल्या ३० वर्षांत विधायक स्वरूपाचें असें कोणतेंहि राजकारण किंवा समाजकारण निघालें नाहीं कीं ज्यांत **पंडितजींनीं** पुढाकार घेतला नाहीं व कष्ट केले नाहींत. त्यांतून विशेष हें कीं ते आपल्या राष्ट्रीय वृत्तीमुळें धर्माला किंवा समाजसंस्कृतीला कमीपणा आणीत नाहींत किंवा अवगणीतहि नाहींत; पण उलट शक्य तर त्याचा पुरस्कारच करतात. यामुळें केवळ अत्यंतिक सुधारक अशांच्याशिवाय बाकी सर्व लोक त्यांना एकसारखाच मान देतात. हें राजकारणाविषयीं झालें. परंतु आदर्शभूत हिंदू व्यक्ति, हिंदुसभेचे कट्टे पुरस्कर्ते व सर्वांत विशेष म्हटलें म्हणजे बनारस हिंदू युनिव्हर्सिटीचे संस्थापक, या दृष्टीनें पाहतां **पंडितजींचा** हात कोणीहि धरूं शकेल असें वाटत नाहीं. आज ३५ वर्षांत त्यांनीं केलेलीं कार्यें व त्यांनीं प्रगट केलेलीं मतें हा एक मोठाच राष्ट्रीय निधी होय व रा. **भिडे** यांनीं तो मराठी वाचकाला पुष्कळसा **पंडितजींच्या** शब्दांनींच मिळवून दिलेला आहे. आतां चरित्र म्हटलें म्हणजे व्यक्तीसंबंधीं अनेक प्रकारची खाजगी माहिती पुस्तकांत असावी अशी अपेक्षा वाचकांची सहजच असते. आणि त्या दृष्टीनें पाहतां तशी माहिती या पुस्तकांत फारच थोडी आहे, असें म्हणणें प्राप्त होतें. पण अशा बाबतींत खुद्द चरित्रविषयाच्या प्रांतांतच जर अशीं चरित्रें कोणीं लिहिलीं नाहींत तर परप्रांतांत तशी माहिती मिळणें अधिकच दुरापास्त होय. तथापि, पुस्तकाला नांव देतांना मात्र लेखकानें याविषयीं खबरदारी घेतलेली बरी.

पुणें ता. १-११-३१ **न. चिं. केळकर.**

# आभार

सुप्रसिद्ध देशभक्त पं. मदन मोहन मालवीय यांचें जीवनचरित्र वाचकांस सादर करण्यास अत्यंत आनंद वाटत आहे. या चरित्रांत पंडितजींचें केवळ सार्वजनिक जीवनचरित्र देण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच्या जोडीला त्यांचें खाजगी चरित्र देतां आलें असतें तर लेखकांस तेंहि याबरोबर सादर करण्यास परमाल्हाद वाटला असता. कारण थोर पुरुषांचें खासगी चरित्र न्याहाळण्याची वाचकांस नेहमींच जास्त उत्कंठा असते. तें लेखकास देतां आलें नाहीं याला अनेक कारणें आहेत. एकतर पंडितजींचा बराच सहवास घडावयास पाहिजे तसा लाभला नाहीं, त्यांच्या अनेक चिरपरिचितांकडे पत्रव्यवहार करूनहि अवश्य ती माहिती मिळाली नाहीं व पंडितजींचा सार्वजनिक कार्याचा व्याप अत्यंत अफाट, त्यांच्या चाहत्यांची संख्याहि अमर्याद असून त्यांचें इंग्रजींत वा हिंदींत एकहि विस्तृत चरित्र उपलब्ध नाहीं. त्यामुळें मिळाल्या त्या सामुग्रीवरच लेखकास अवलंबून राहावें लागलें.

परंतु ही बाव दुसऱ्या रूपानें भरून निघाली व ती म्हणजे श्री. तात्यासाहेब केळकरांच्या प्रस्तावनेनें. पंडितजींचा व तात्यासाहेबांचा लोभ फार. श्री. तात्यासाहेब गुणज्ञ व रसज्ञ असल्यानें आणि सार्वजनिक कार्यक्षेत्रांत उभयतांहि जुने सहकारी असल्यानें पंडितजींबद्दल अधिकारानें दोन शब्द लिहिणारा महाराष्ट्रांत श्री. तात्यासाहेबांखेरिज अन्य कोणीहि नाहीं. त्यांना विनंति करतांच त्यांनीं ती तत्क्षणीं मान्य केली. त्यांचे आभार मी काय मानावयाचे! कारण 'आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरं' अशी या चरित्रग्रंथाचीच जिथें स्थिति तिथें प्रस्तावनेबद्दल वेगळे आभार मानायला जागाच कोठें आहे!

हें चरित्र लिहिण्याचें ठरविलें तेव्हां त्याच्या साधनसामुग्रीची मोठी अडचण उत्पन्न झाली. व त्या बाबतींत अनेकांची मदत झाली; परंतु विशेष उल्लेखनीय मदत हिंदुमहासभेचे मुख्यमंत्री कै. पं. देवरत्नशर्मा व काशी

हिंदुविश्वविद्यायलाचे प्रो. पुणतांबेकर यांनीं मला शक्य ती मदत केली त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

चित्रशाळेचे मॅनेजर श्री. शंकरराव जोशी यांनीं पुस्तकाबद्दल तगादा लावला नसतां तर पुस्तक लिहून झालें असतें कीं नाहीं याची शंकाच आहे. अर्थात पुस्तकप्रकाशनाचें सर्व श्रेय त्यांनाच आहे. त्याप्रमाणें श्री. दत्तोपंत [illegible]ांडेकर यांनीं पुस्तकाची मांडणी नीट केली याबद्दल त्यांचाहि मी आभारी आहे.

परिशिष्ट २, 'पं. मालवीय व महाराष्ट्र' हा केसरींत प्रकाशित झालेला लेख यांत छापण्यास मला परवानगी दिल्याबद्दल मी त्या संस्थेच्या चालकांचा आभारी आहे.

पुणें ता. २।११।१९३१

स. मो. भिडे

# पंडित मदनमोहन मालवीय.

## विषयोद्घाटन

संघे शक्तिः कलौ युगे ।

हिताय सर्व लोकानां निग्रहाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय प्रणम्य परमेश्वरम् ॥ १ ॥
ग्रामे ग्रामे सभा कार्या ग्रामे ग्रामे कथा शुभा ।
पाठशाला मल्लशाला प्रतिपर्वमहोत्सवः ॥ २ ॥
अनाथा विधवा रक्ष्या मंदिराणि तथा च गौः ।
धर्म्यं संघटनं कृत्वा देयं दानं च तद्धितम् ॥ ३ ॥
स्त्रीणां समादरः कार्यो दुःखितेषु दया तथा ।
अहिंसका न हन्तव्या आततायी वधार्हणः ॥ ४ ॥
अभयं सत्यमस्तेयं ब्रह्मचर्यं धृतिः क्षमा ।
सेव्यां सदाऽमृतमिव स्त्रीभिश्च पुरुषैस्तथा ॥ ५ ॥
कर्मणां फलमस्तीति विस्मर्तव्यं न जातु चित् ।
भवेत्पुनः पुनर्जन्म मोक्षस्तदनुसारतः ॥ ६ ॥
स्मर्तव्यः सततं विष्णुः सर्वभूतेष्ववस्थितः ।
एक एवाऽद्वितीयो यः शोकपापहरः शिवः ॥ ७ ॥
पवित्राणां पवित्रं यो मंगलानां च मंगलम् ।
दैवतं देवतानां च लोकानां योऽव्ययःपिता ॥ ८ ॥
सनातनीयाः सामाजाः सिक्खाः जैनाश्च सौगताः ।
स्वे स्वे कर्मण्यभिरतः भावयेयु परस्परम् ॥ ९ ॥
विश्वासे दृढता स्वीये परनिंदाविवर्जनम् ।

तितिक्षा मतभेदेषु प्राणिमात्रेषु मित्रता ॥ १० ॥
श्रूयतां धर्मसर्वस्वं श्रुत्वा चाप्यवधार्यताम् ।
आत्मनः प्रतिकूलानि परेषां न समाचरेत् ॥ ११ ॥
यदन्यैर्विहितं नेच्छेदात्मनः कर्म पूरुषः ।
न तत्परस्य कुर्वीत जानन्नप्रियमात्मनः ॥ १२ ॥
न कदाचिद्बिभेत्वन्यान्न कंचन विभीषयेत् ।
आर्यवृत्तिं समालंब्य जीवेत्सज्जनजीवनम् ॥ १३ ॥
सर्वे च सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद् दुःखभाग् भवेत् ॥१४॥
इत्युक्तलक्षणा प्राणि दुःखध्वंसनतत्परा ।
दया बलवतां शोभा न त्याज्या धर्मचारिभिः ॥१५॥
पारसीयैर्मुसल्मानैरिसाईयैर्यहूदिभिः ।
देशभक्तैर्मिलित्वा च कार्या देशसमुन्नतिः ॥ १६ ॥
पुण्योऽयं भारतो वर्षो हिन्दुस्थानः प्रकीर्तितः ।
वरिष्ठः सर्वदेशानां धनधर्मसुखप्रदः ॥ १७ ॥
गायन्ति देवाः किल गीतकानि
धन्यास्तु ये भारत भूमि भागे ।
स्वर्गापवर्गस्य च हेतुभूते
भवन्ति भूयः पुरुषः सुरत्वात् ॥ १८ ॥
मातृभूमिः पितृभूमिः कर्मभूमिः सुजन्मनाम् ।
भक्तिमर्हति देशोऽयं सेव्यः प्राणैर्धनैरपि ॥ १९ ॥
चातुर्वर्ण्यं यत्र सृष्टं गुणकर्मविभागशः ।
चत्वार आश्रमाः पुण्याः चतुर्वर्गस्य साधकाः ॥२०॥
उत्तमः सर्वधर्माणां हिंदुधर्मोऽयमुच्यते ।
रक्ष्यः प्रचारणीयश्च सर्वलोकहितैषिभिः ॥ २१ ॥

( मालवीय कृतः )

# कलियुगांत ऐक्य हेंच बल आहे.

[ अखिल प्राणिमात्रावर उपकार करण्यासाठीं, दुष्टांना धाक दाखविण्यासाठीं, धर्मस्थापनेसाठीं व शासन करण्यासाठीं, धर्मानुसार संघटना करून गांवोगांव हिंदुसभा स्थापन केली पाहिजे, उपदेश केला पाहिजे· व गांवोगांव पाठशाळा व तालिमी स्थापन केल्या पाहिजेत.

पर्वांच्या दिवशीं एकत्र जमून सर्वांनीं उत्सव करावा.

सर्वांनीं एकजूट करून अनाथांचें, विधवांचें,मंदिरांचें, व गोमातेचें रक्षण केलें पाहिजे. आणि या कामासाठीं द्रव्यसाहाय्य केलें पाहिजे.

स्त्रियांचा योग्य मान राखला पाहिजे. दुःखितांवर दया केली पाहिजे.

जो दुसऱ्यास त्रास देत नाहीं त्याला मारतां कामा नये, परंतु आततायी असेल त्याचा योग्य समाचार घेतला पाहिजे. जो स्त्रियांवर, परवित्तावर व दुसऱ्याच्या प्राणावर उठतो किंवा कोणाच्या घराला आग लावतो. त्याला मारल्याखेरिज आपला अगर दुसऱ्याचा प्राण व धन वांचत नसेल तर त्याला मारणें हा धर्म ठरतो.

स्त्रिया व पुरुष यांनीं धैर्य, सत्य, आस्तेय, ब्रह्मचर्य व क्षमा या गुणांचें अमृताप्रमाणें सदा सेवन केलें पाहिजे.

चांगल्या कर्माचें फल चांगलें व वाईटाचें वाईट मिळतें व कर्मानुसार प्राण्याला वारंवार जन्म घ्यावा लागतो अगर मोक्ष प्राप्त होतो ही गोष्ट कोणी विसरतां कामा नये.

प्रत्येक प्राणिमात्रांत ईश्वर वास करतो-ईश्वर सर्वव्यापी आहे-त्याचें सदैव स्मरण केलें पाहिजे. त्याच्याएवढा महान् कोणी नाहीं. तो अद्वितीय आहे. तो दुःख व पाप यांचें हरण करणारा शिवस्वरूप आहे. तो पवित्रतम, मंगलस्वरूप आहे. तो सर्व देवतांची देवता आहे. तो अनादि असून अखिल विश्वाचा अविनाशी पिता आहे.

सनातनधर्मी, आर्यसमाजी, ब्रह्मसमाजी, शीख, जैन, बुद्धादि सर्व हिंदूंनीं आपल्या विशेषधर्माचें परिपालन करावें: परंतु परस्परांनीं परस्पराशीं प्रेमानें व आदरानें वागावें.

# पंडित मदनमोहन मालवीय.

आपल्या स्वतःचा विश्वास दृढ असावा; दुसऱ्याची निंदा करूं नये; मतभेद सहन करावा व प्रणिमात्राशीं मित्रता ठेवावी.

धर्मानुसार वर्तन करा व जें काम आपणाला त्रासदायक व दुःखदायी वाटेल तें दुसऱ्यावर लोटूं नका.

सर्व लोक सुखी, निरोगी असावेत, सर्वांचें कल्याण असावें अशी बुद्धि सर्वांत असली पाहिजे. कोणाला दुःख होतां कामा नये; प्राणिमात्राचें दुःख दूर करण्यास तत्पर असणें हीच बलवानाची खरी शोभा आहे. धर्मप्रमाणें वागणारानें अशी बुद्धि बाळगावयास पाहिजे.

देशोन्नतीचें कार्य पारशी, मुसलमान, ख्रिस्ती, यहुदी यांच्या सहकार्यानें केलें पाहिजे.

हिंदुस्थान या नांवानें प्रसिद्ध असलेला हा भारतवर्ष अत्यंत पवित्र देश आहे. धन, धर्म व सुख देणारा पृथ्वीतलावर हाच देश सर्वोत्तम आहे.

ज्या लोकांचा जन्म या भारतभूमींत होतो ते लोक धन्य धन्य असल्याबद्दल देवता गीत गात असल्याचें सांगतात. या भूमींत जन्म घेतल्यानें मनुष्याला स्वर्गसुख व मोक्ष दोन्ही प्राप्त होतात.

ही आमची मातृभूमि, आमची पितृभूमि आहे. रामकृष्ण व बुद्धादि महापुरुषांची, महात्म्यांची, आचार्यांची, ब्रह्मर्षींची व राजर्षींची, गुरूंची, धर्मवीरांची, शूरवीरांची, स्वातंत्र्यप्रेमी देशभक्तांची, ही कर्मभूमि आहे. या देशांची आपण परमभक्ति केली पाहिजे; वित्त व जीवितानिशीं तिची सेवा केली पाहिजे.

या धर्मांत परमेश्वरानें गुण व कर्म याप्रमाणें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ण निर्माण केले. ते धर्म, अर्थ, काम, व मोक्ष या चार पुरुषार्थ, साधनाला अत्यावश्य आहेत आणि मानवी जीवित पवित्र होण्याला जरूर अशा ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ व संन्यास अशा चार आश्रमांची स्थापना केली.

सर्व धर्मांत या हिंदुधर्माला उत्तम म्हणतात. ज्यांना जगाकडून धन्यवाद मिळवावयाचे आहेत त्यांनीं या धर्माचें रक्षण व प्रचार करणें अवश्य आहे. ]

## विषयोद्घाटन.

**पंडित मदनमोहन मालवीयजी** यांचें स्मरण होतांच पुराणकालीन ब्रह्मर्षींची सौम्य मूर्ति डोळ्यासमोर उभी रहाते. ती तेजस्वी मुद्रा, त्यांच्या नेत्रांतील ते तेजस्वी तेजकिरण, ललाटावर लावलेला चंदनाचा तो आत्मालंकार, ओंठावर सहज खेळणारी हास्यरेषा, नेत्रांतील चांचल्ययुक्त निगूढता, इत्यादि सर्व गोष्टींनीं **पंडितजींची** मूर्ति आकर्षक तर दिसतेच परंतु त्याबरोबरच त्यांजविषयींचा आदर सहज वृद्धिंगत होतो.

आज हिंदुस्थानांत जे राष्ट्रपुरुष विद्यमान आहेत त्यांत भारतीय संस्कृतीचा आदर्श म्हणून कोणी गणला जात असेल तर ते **पंडित मदनमोहन** हेच आहेत. हिंदी लोकांचें तर असोच पण **मि. मॉंटेग्यु** यांजवरहि **मदनमोहनांनीं** आपली मोहनी घातली. **पंडितजी**संबंधानें ते लिहितात, " **पंडित मालवीय** हे हुशार मुत्सद्दी असून रुबाबदार आहेत. त्यांचा आवाज मधुर, चालीरीति भारदस्त, पोषाख साधा असून त्यांची महत्त्वाकांक्षा अपुरी राहिलेली आहे असें वाटतें. "

**पं. मालवीयजी** यांच्या हृदयांत एकच महत्त्वाकांक्षा प्रज्वलित झालेली आहे व ती म्हणजे भारतवर्षाच्या उत्कर्षासंबंधींची. यासंबंधाने त्यांचे प्रयत्नहि विविध व दीर्घ असून हिंदुस्थानवासीयांनीं विशेषतः हिंदू समाजानें या कामीं कसा हातभार लावावा याचें विवेचन या प्रकरणाच्या प्रारंभीं **पंडितजींच्याच** सूत्रमयभाषेंत केलें आहे. वरील उपदेश सर्वांनींच हृदयस्थ करून नित्य पठन करावा असा आहे.

**पंडितजी** सार्वजनिक कार्यक्षेत्रांत उतरल्यापासून त्यांनीं देशसेवेचें व्रत स्वीकारलें त्यांत आजतागायत निरलसपणें ते भाग घेत आहेत. सार्वजनिक कार्यांत त्यागी लोक कांहीं कमी नाहींत परंतु पूज्य **मालवीयजी** यांचा त्याग फारच श्रेष्ठ प्रतीचा आहे. त्यांनीं देशसेवेसाठीं आपलें सर्वस्वच अर्पण केलें आहे. कॉंग्रेसच्या जन्मापासून तिचे ते एकनिष्ठ भक्त आहेत. शिक्षक, संपादक, वकील इत्यादि अनेक व्यवसायांत ते शिरले परंतु अशा एकांगी व्यवसायासाठीं त्यांचा जन्मच नसल्यानें व देशसेवेपुढें इतर व्यवसाय त्यांस रुचेनासे झाल्यानें त्यांनीं हे सर्व व्यवसाय सोडले. शिक्षक असतांना त्यांना प्रचलित शिक्षणपद्धति सुधा-

रून तींत राष्ट्रीय भावना उत्पन्न होईल असेंच शिक्षण राष्ट्राच्या भावी नागरिकांना पाहिजे अशी खात्री पटली व पुढें त्यांनीं तो हेतूहि तडीस नेला. हिंदु विश्वविद्यालय हें त्यांच्या हेतूंचें मूर्तमंत प्रतीक आहे. संपादक असतांना देशी पत्रांची दुर्दशा कां उडत आहे, याची त्यांना कल्पना आली. व वकीली करूं लागल्यावर तर भारतवर्षाला स्वराज्य मिळाल्याखेरीज तरणोपाय नाहीं अशी त्यांची खात्री पटली व या सर्वांचें पर्यवसान म्हणजे ते तनमनधनेंकरून राष्ट्रकार्यांत पडले, हें होय.

**पंडितजींचें** कार्यक्षेत्र अत्यंत विशाल आहे. कधीं विद्यार्थ्यांचा गराडा पडला आहे व त्यांना इतिहास अगर तत्त्वज्ञानाचें रहस्य समजावून सांगतांना दिसतात, कधीं सभांतून सनातन धर्माची महती वर्णन करतांना दिसतील. कधीं राष्ट्रीय महासभेच्या मंडपांत तर कधीं वरिष्ठ कायदेमंडळांत हिंदुस्थानच्या राजनैतिक प्रश्नांची छाननी करण्यांत गर्क झालेले आढळतील तर कधीं एखाद्या राजा महाराजाला आशिर्वाद देत असतांना दृष्टीस पडतील.

**पंडितजी** शांततावादी व ऐक्याचे पुरस्कर्ते आहेत. कोठेंहि अशांति झाल्यास **पंडितजी** तेथें जातांच तेथें ते शांतताच प्रस्थापित करतात. दोन पक्षांत वाद पडला कीं तो मिटविण्यांत **पंडितजींचा** हातखंडा. कधीं कधीं विद्यार्थीवर्गहि आपल्या फिर्याद घेऊन **पंडितजींकडे** येतात. राष्ट्राचे तंटे सोडवणाऱ्या या श्रेष्ठ पुरुषाकडे असे तंटे आल्याचें पाहून सहज कोणास आश्चर्य वाटेल परंतु सर्वांना संतुष्ट राखणें हा **पंडितजींचा** स्वभावच असल्यानें ते लहानमोठ्या गोष्टी सारख्याच भावनेनें करीत असतात.

**पंडितजींच्या** वाणींत अपूर्व शक्ति आहे. त्यांचा गोड व जोरदार आवाज एकदां सभागृहांत घुमूं लागला म्हणजे गंगौघाप्रमाणें त्यांच्या वाक्प्रवाहांत श्रोतृगण मुग्ध होऊन आपोआपच ओढला जातो व हिंदुधर्माच्या प्राचीन आदर्शांचा महिमा देशदेशांतरीं पोहोंचतो.

आदर्श हिंदू, थोर मुत्सद्दी, नमुनेदार अध्यापक, उत्कृष्ट, व तेजस्वी वक्ता, अशा अनेक गुणांनीं **पं. मदनमोहन मालवीयजी** हे मंडित असल्यानें त्यांचें जीवनचरित्र अखिल हिंदुमात्रास वंदनीय, स्मरणीय व अनुकरणीय, वाटेल अशा कल्पनेनें तें येथें देण्याचें योजिलें आहे!

---

# जन्म व कुलवृत्तांत.

**मालवीय** या घराण्याचें नांव उत्तरहिंदुस्थानांतच नव्हे तर अखिल भारतवर्षांत सर्वतोमुखीं झालें आहे. हें घराणें मूळ मालव प्रांतांतील, माळव्यांतील, हें त्या नांवरूनच उघड होत आहे. परंतु आज हें सर्वतोमुखीं झालेलें **मालवीय** घराणें माळवा सोडल्यानंतरच विशेष प्रसिद्धीस आलें. माळवा सोडल्यानंतर त्रिवेणीसंगमानें पुण्यक्षेत्र बनलेल्या प्रयागराज या ठिकाणीं त्यांनीं आपलें स्थायिक घर केलें. व तेव्हांपासून **मालवीय** व प्रयाग यांचा संबंध जडला तो आजतागायत कायम आहे.

या घराण्यांतील सर्व पुरुष एकापेक्षां एक विद्वान्, उदारचरित, धर्माचे कट्टे अभिमानी असे होऊन गेले. संस्कृत भाषा तर या घराण्यानें मातृभाषेसारखी आत्मसात करून घेतली आहे. चरित्रनायक **पंडित मदनमोहन मालवीय** यांचे आजे. **पं० प्रेमधर मालवीय** हे आपल्या काळांत संस्कृत विद्येंत अत्यंत पारंगत असून प्रयाग व त्याच्या आसमंतात् त्यांचा मोटा नांवलौकिक होता. त्यांचे चिरंजीव **पंडित वृजनाथ मालवीय** हेहि आपल्या वडिलार्जित विद्येंत अत्यंत विद्वान् म्हणून गाजले होते. यांची अध्यापक कला नांव घेण्यासारखी होती. व त्यांच्या हातचे शिक्षण घेतलेलें अनेक विद्वान काशी प्रयागच्या भागांत आज विद्यमान आहेत. श्रीमद्भागवतावर यांनीं लिहिलेला टीकाग्रंथ विद्वन्मान्य झालेला आहे. संस्कृतप्रमाणें हिंदी भाषेवरहि त्यांचें प्रभुत्व असे. **पंडित वृजनाथ** यांच्या विद्वत्तेवर व गाढ ज्ञानावर दरभंग्याच्या हल्लींच्या महाराजांचे आजे व बनारसचे माजी महाराज हे अत्यंत लुब्ध असून **पं० वृजनाथ** यांना ते आपल्या गुरुस्थानीं मानीत. यांनीं संस्कृतमध्यें पुष्कळ ग्रंथसंपत्ति निर्माण केली आहे. व त्यापैकीं बरेच ग्रंथ **पं० मदनमोहन** यांनीं प्रसिद्धहि केले आहेत. परंतु सरस्वतीनें अशा रीतीनें त्यांजवर

वरदहस्त ठेविला असला तरी श्री व सरस्वती यांचें साहचर्य नसतें हा नेहमींचा अनुभव येथें तरी खोटा कसा ठरावा! **पंडित वृजनाथ** यांची सांपत्तिक स्थिति फारशी चांगली नव्हती. तरी पण व त्यांतच मोठ्या अपत्यपरिवाराच्या शिक्षणादि गोष्टी त्यांनीं बिनकसूर आणि मोठ्या दक्षतेनें केल्या व त्याचेंच उत्कृष्ट फळ म्हणजे **पंडित मदनमोहन मालवीय** हे होत.

**पं० मदनमोहन** हे आपल्या वडिलांचे तृतीय पुत्र होत. त्यांचा जन्म श्रीक्षेत्र प्रयाग येथें ता. २५ डिसेंबर स. १८६१ रोजीं झाला. त्यांचें प्राथमिक शिक्षण, प्रथम बरेंचसें घरींच झालें. नंतर धर्मज्ञानोपदेश पाठशाळा व विद्याधर्मवर्धिनी सभा यांत झालें. **पंडितजींना** बालपणीं जें धर्मशिक्षण मिळालें त्यावेळीं त्यांचे मनावर जे संस्कार झाले ते किती तेजस्वी व हितप्रद झाले हें त्यांच्या विद्यमान चरित्रावरून सहज लक्षांत येण्यासारखें आहे. व **पंडित वृजनाथ** यांनीं **मदनमोहन** यांना शिक्षण देण्यांत किती दक्षता घेतली आणि वडिलांचा हेतूहि **मदनमोहन** यांनीं किती निष्ठेनें पाळला ही गोष्ट यावरून ध्यानीं येईल. प्राथमिक अभ्यासानंतर **पं० मदनमोहन** इंग्रजी शिकूं लागले, व "अलाहाबाद जिल्हा स्कूल" मधून त्यांची प्रवेशपरीक्षा झाल्यानंतर उच्च शिक्षणासाठीं ते म्यूर सेंट्रल कॉलेजमध्यें शिरले. व १८८४ मध्यें ते बी. ए झाले.

**मदनमोहन** हे कॉलेजमध्यें विद्यार्जन करीत असल्यापासून सार्वजनिक कार्याकडे त्यांचें विशेष लक्ष असे. तेथें व त्यांच्या बुद्धींतील चमक पाहून कॉलेजचे प्रिन्सिपॉल **मि. हॅरिसन** यांनीं त्यांच्या उज्वल भविष्याचें भाकित वर्तवून ठेवलें होतें. धर्मकारण व शिक्षण हे त्यांच्या आवडीचे विषय असत. अलाहाबाद लिटररी इंस्टिट्यूट, व हिंदुसमाज या संस्थांचे ते एक संस्थापक होते. विद्यार्थी या नात्याचा त्यांचा लौकिक मोठा यशस्वी होता, त्यावेळीं अलाहाबाद येथें विश्वविद्यालय नसल्यानें त्यांची प्रवेशपरीक्षा कलकत्ता युनिव्हर्सिटीखालीं स. १८७९ सालीं झाली. एफ्. ए. ची परीक्षा स. १८८१ सालीं झाली व बी. ए. ची पदवी १८८४ मध्यें घेतली. बी. ए. ची पदवी घेतल्यानंतर कांहीं दिवस त्यांनीं एम्. ए. चा अभ्यास केला. परंतु त्या परीक्षेला ते अखेर बसले नाहींतच.

हिंदुस्थान हा देशच दरिद्री. बुद्धिवान माणसाला बुद्धिविकसनाच्या मार्गांत अनेक विघ्नें यावयाचींच व त्यांतून धडाडीनें एखादाच यशस्वी होऊन बाहेर पडावयाचा. **पं मदनमोहन** यांचीहि अशीच स्थिति झाली. त्यांचा विवाह

स. १८८१ सालींच झाला होता. व पदवी घेतल्याबरोबर त्यांना प्रापंचिक अडचणीमुळें शिक्षकाचें काम पत्करावें लागलें. स. १८८४ सालअखेर त्यांनीं तेथील सरकारी हायस्कूलमध्यें दुय्यम शिक्षक म्हणून नोकरी धरली. याच शाळेंत ते एका काळीं विद्यार्थी होते. या शाळेंत स. १८८७ पर्यंत दरमहा ५० ते ७५ रुपयांवर त्यांनीं नोकरी केली.

हिंदुस्थानांत जे अनेक देशभक्त व पुढारी होऊन गेले त्या बहुतेकांना वरील-प्रमाणेंच अध्यापकाचें काम करावें लागलें आहे. देशांतील जनतेला त्यांनीं आपल्या पुढील आयुष्यांत ज्या गोष्टींचें शिक्षण दिलें त्याचा जणू मूळ पायाच अशारीतीनें रचला गेला असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. **लोकमान्य टिळक** यांना प्रत्यक्ष शाळांतून अध्यापकाचें काम करावें लागलें व पुढेंहि अन्यप्रकारें त्यांनीं देशाला शिक्षणच देण्याचें कार्य केलें. **लाला लजपतराय** यांचीहि अशीच गोष्ट. **कै. ना. गो. कृ. गोखले** यांनाहि शिक्षक व्हावें लागलेंच होतें, व आज विद्यमान पुढाऱ्यांत **नामदार शास्त्री** हेहि एकाकाळीं शिक्षक म्हणून नांवाजले होते. **बाबू विपिनचंद्र पाल** यांचीहि गोष्ट अशीच आहे. यावरून विद्यार्थ्यांचा शिक्षक हा राष्ट्राचाहि शिक्षक होऊ शकतो असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. व वरील मालिकेंतच **पं० मदनमोहन** यांची गणना झाली यांतहि गैर असें कांहींच नाहीं.

**पं. मदनमोहन** यानीं वरीलप्रमाणें सरकारी नौकरी पत्करली तरी आज सरकारी नोकर ज्या अनेक प्रकारच्या बंधनांनीं जखडले गेले आहेत तशी स्थिति त्या वेळीं नव्हती. सरकारी नोकरांसहि सार्वजनिक कार्यांत उघडपणें पडतां येत असे. **पं. मदनमोहन** यांनीं तर कलकत्ता येथें भरलेल्या पहि-ल्याच राष्ट्रीय सभेंत भाषणहि केलें. व पंडितजींचें राजकीय गुरु **पंडित आदित्य नारायण** हे त्यावेळीं म्युर सेंट्रल कॉलेज मध्यें प्रोफेसर असतांहि प्रतिनिधी नात्यानें १८८६ च्या कलकत्ता कॉंग्रेसला उपस्थित होते.

कलकत्याच्या कॉंग्रेसला जाण्यांत **पं. मालवीय** यांचा एक मोठा फायदा झाला व भावी उत्कर्षाच्या दृष्टीनें त्यांना कलकत्ता कॉंग्रेस लाभली असेंहि म्हणण्यास हरकत नाहीं. कालाकंकरचे राजे **रामपालसिंह** यांचा व पंडितजींचा तेथें विशेष परिचय झाला. राजा रामपालसिंग यांनीं त्या वेळीं ‘ हिंदुस्थान’ नांवाचें एक दैनिक नुकतेंच सुरू केलें होतें त्यांचा **मदनमोहन** यांच्याशीं विशेष

परिचय होतांच पंडितजींमधील गुणांची त्यांना योग्य कल्पना येऊन पंडितजींची स्वातंत्र्यवृत्ति व उत्साह इत्यादि गुणांचा त्यांजवर विशेष परिणाम झाला व त्यांनीं पंडितजींना आपल्या पत्राचें संपादकत्व देऊं केलें. त्यावेळीं पंडितजींचें वय अवघें २५ वर्षांचें होतें. राजेसाहेबांकडून अशी सुचना होतांच पंडितजींनीं तावडतोब आपल्या नोकरीचा राजिनामा दिला. व सदर पत्राचें संपादकत्व त्यांनीं स्वीकारलें. अशा रितीनें सरकारी नोकरींतून काढून पंडितजींना राष्ट्र-सेवेस जुंपण्याचें श्रेय राजा **रामपालसिंह** यांनीं घेतलें हें राष्ट्रावर त्यांचे महद् उपकारच झाले असें म्हणण्यास हरकत नाहीं.

**पंडितजींना** शिक्षकाच्या कामाची मोठी हौस; तें काम त्यांना अत्यंत पवित्र वाटे. परंतु वृत्तपत्राचा संपादक हाहि एकप्रकारें शिक्षकच असल्यानें त्यांनीं हें काम पत्करलें.सुमारें अडीच वर्षें त्यांनीं संपादकाचें काम केलें.व हें कामहि त्यांनीं इतक्या उत्कृष्टपणें बजावलें कीं, सरकारी अहवालांतहि पंडितजींच्या कामाचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यांत आला. अडीच वर्षांनंतर **पंडितजींनीं** ' हिंदुस्थान ' चें संपादकत्व सोडलें तरी वृत्तपत्राच्या धंद्याशीं जो संबंध एकदां जडला तो कायमचाच. कारण त्यानंतर त्यांनीं ' इंडियन ओपिनियन ' या पत्राचें संपादकत्व पत्करलें. हिंदी लोकमत सडेतोडपणें मांडण्यांत हें पत्र त्या काळीं प्रमुख गणलें जात असे. या पत्राशीं सुप्रसिद्ध हिंदी पुढारी **पं० अयोध्यानाथ** यांचा निकट संबंध होता. पुढें या पत्रांतच लखनौ येथील 'अॅडव्होकेट' या पत्राचा समावेश करण्यांत आला. **बाबू ब्रह्मानंद सिंह** हेहि या पत्राचें कांहीं दिवस संपादक होते.

राजकारणांत वृत्तपत्राला केवढें मोठें सामर्थ्य आहे, वृत्तपत्रांची शक्ति केवढी अमर्याद असते ही गोष्ट **पंडितजींस** पुरापुर पटल्यानें व हिंदी तरुणांच्या आकांक्षांना हिंदी हितविरोधी लोक भलतीच दिशा दाखवीत आहेत, असें आढळून आल्यामुळें त्यांनीं 'अभ्युदय' नांवाचें स्वतःचें पत्र काढलें व आजतगायत हिंदी भाषा बोलणारांत या पत्रांचें स्थान श्रेष्ठ प्रकारचें आहे. या पत्रांत ते नेहमीं उत्तमोत्तम लेख लिहून तरुणांच्या आकांक्षांना योग्य मार्ग दाखवीत. ' अभ्युदय 'चा जन्म झाल्यानंतर लोकांच्या तक्रारी निर्भीडपणें मांडणारें एकादें इंग्लिश दैनिक काढण्याची अवश्यकता त्यांस वाटूं लागली व त्याचें पर्यवसान म्हणजे ' लीडर ' पत्राचा जन्म होय इतकें सांगितलें असतां पुरें.

**पंडितजींच्या** मनाच्या विशेष कल धर्मकारण व शिक्षण यांकडे होता हें मागें एकदां सांगितलेंच आहे. परंतु पंडितजींसारख्या बुद्धिवन्तानें आपलें कार्यक्षेत्र इतक्यापुरतेंच मर्यादित करून घेऊं नये व त्यासाठीं वकिलीची परीक्षा द्यावी असा त्यांच्या मित्रमंडळींचा त्यांना अत्याग्रह झाला. मि. ए. ओ. ह्यूम यांना **पंडितजींच्या** कर्तृत्वाबद्दल कौतुक वाटे. **पं० अयोध्यानाथ, राजारामपालसिंह, पंडित सुंदरलाल** हे तर **पंडितजींचे** स्नेहीच होते. यांनीं **मदनमोहन** यांस वकिलीची परीक्षा देण्यास उद्युक्त केलें व हिंदुस्थानचे संपादक असतांनाच त्यांनीं वकिलीच्या अभ्यासाला सुरुवात केली. आणि १८९१सालीं ते एल्. एल्. बी. झाले. आणि १८९३त त्यांनीं वकिलीला सुरवात केली,

एकदां **पं. अयोध्यानाथ** व **पं. मदनमोहन** हे मि. ए. ओ. ह्यूम यांजशीं बोलत असतां **पं० अयोध्यानाथ ह्यूमसाहेबांना** म्हणाले, '**मदनमोहन** कायद्याचा अभ्यास करूं लागल्यापासून त्यांचे काँग्रेसच्या कामाकडे असावें तसें लक्ष नाहीं" ह्यूम—"ठीक आहे, त्यांनीं आपलें सर्व लक्ष तूर्त कायद्यावरच दिलें पाहिजे' नंतर **मदनमोहन** यांजकडे वळून ते म्हणाले, '**मदनमोहन** ईश्वरानें तुम्हाला अपूर्व बुद्धिमत्ता दिली आहे. दहा वर्षें वकिली मनःपूर्वक करा. तुम्हाला वरचें स्थान खात्रीनें मिळेल, मग तुमच्या सार्वजनिक कामाला खरें महत्त्व मग येईल आणि नंतर तुम्हांला जो दर्जा प्राप्त होईल त्यामुळें तुम्ही देशाचें पुष्कळच काम करूं शकाल."

परंतु **मि. ह्यूम** यांच्या वरील उपदेशाप्रमाणें वागण्याचें **पंडितजींच्यानें** मुळींच जमलें नाहीं, कारण त्यांच्यावर सार्वजनिक कामाचा भार बराच मोठा पडे व त्यांतच त्यांचा बहुतेक वेळ मोडे. तरीहि वकील म्हणून त्यांचा लौकिक कांहीं कमी झाला नाहीं. व लवकरच प्रयागमधील प्रमुख कायदेपंडितांत त्यांची गणना होऊं लागली. तेथील एक प्रमुख वकील **मालवीयासंबंधानें** असें म्हणे, कीं '**मालवीयांच्या** पायाजवळ नेहमीं चेंडू पडे पण ते तो उडवीत मात्र नव्हते.'

अशा रीतीनें सार्वजनिक कामांत ते अल्प वयापासून पडूं लागले. त्यांच्या वाढत्या वयोमानाबरोबर त्यांचें कार्यक्षेत्रहि वाढूं लागलें. त्यांचें कार्यक्षेत्र अत्यंत विविध प्रकारचें आहे. त्यांची शिक्षणविषयक कामगिरी, हिंदुसंघटनेची चळवळ,


कॉंग्रेसमधील कामगिरी व कायदेमंडळांतून केलेली देशसेवा हीं सर्व कामें अत्यंत अपूर्व व त्यांच्या उज्वल बुद्धिवैभवाची साक्ष पटविणारीं आहेत. म्हणून त्यांचें क्रमानें विभागशः पुढें वर्णन करण्यांत येणार आहे. **पंडित-जींच्या** उपरिनिर्दिष्ट विविध कार्याचें बीजारोपण त्यांच्या तरुणपणींच झालें होतें. आणि त्यांच्या अपूर्व चिकाटीनें, त्यागबुद्धीनें व बुद्धिप्रभावानें त्यांचे आज विशाल वृक्ष झालेले दिसत आहेत. किंबहुना **पंडितजींचें** चरित्र म्हणजे संयुक्त प्रांताच्या राजकीय घडामोडीचा सुमारें ४५ वर्षांचा इतिहासच होय, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

**पंडितजींनीं** राजकारणांत प्रवेश केला त्या वेळीं पंडित **अयोध्यानाथ** हे संयुक्त प्रांतांतील प्रमुख पुढारी होते. दुसरे पुढारी पं. **विश्वंभरनाथ** हे होते. यांच्याशीं **मदनमोहन** यांचा स्नेह व परिचय वाढत गेला, तस-तसा त्यांच्या कार्यनिष्ठेचा **पंडित मालवीयांवर** विशेष प्रभाव पडून त्यांची उपजत कार्यशीलता जास्त प्रभावी झाली.

स. १८८० सालींच **पंडितजींनीं** प्रयागास 'हिंदुसमाज' नांवाची एक संस्था स्थापन केली होती. हिंदु समाजांतील निरनिराळ्या जातींत व परप्रांतां-तील हिंदूमध्यें प्रेम उत्पन्न होऊन त्यांचें संघटन व्हावें हा या समाजाचा हेतु होता. व आश्चर्य वाटण्यासारखी गोष्ट कीं, कॉंग्रेसचा जन्म होण्यापूर्वींच कांहीं महिने आधीं स.१८८५मध्यें त्यांनीं या समाजामार्फत एक हिंदु परिषद भरविली होती. त्यानंतर प्रथमतः म्यु० तहि ते शिरले. व म्यु० च्याद्वारें ते कायदेमंडळांत शिरले.

**पंडितजींच्या** आवडीचें मुख्य विषय म्हणजे शिक्षण व धर्मकारण अस-ल्यानें प्रथम त्यांनीं शैक्षणिक क्षेत्रांत काय कामगिरी केली हें पुढील प्रकरणांत निवेदन करून नंतर त्यांच्या इतर कार्याकडे वळूं.

---



हिंदु विश्वविद्यालय ( आर्ट्स् कॉलेज वसतिगृह )

# हिंदुविश्वविद्यालयाची स्थापना.

## राष्ट्रीय शिक्षणाची आवश्यकता.

हिंदुस्थानांतील शिक्षणपद्धति राष्ट्रीय गुणसंवर्धनास सर्वस्वीं अनिष्ट असल्यानें तींत आमूलाग्र बदल झाला पाहिजे, याबद्दल सर्वच राष्ट्रहितचिंतकांचें एकमत आहे. या पद्धतीविरुद्ध ओरडहि कांहीं कमी झालेली नाहीं. **लो टिळकांनीं** स. १९०६ सालीं राष्ट्रीय शिक्षणा-संबंधानें प्रस्तुतचें परकीय सरकार या अत्युपकारी कार्या-विषयीं कसें उदासीन आहे याचें उत्कर्ष विवेचन केलें होतें. राष्ट्रीय शिक्षणासंबंधानें ते म्हणतात, " देशांतील तरुण पिढी देशाचें राजकीय, औद्योगिक, आणि सामाजिक वैभव राखण्यास किंवा वाढविण्यास समर्थ होईल, अशा प्रकारें त्यांस शिक्षण देणें हें देशांतील विद्याखात्याचें कर्तव्य आहे; आणि त्यासच राष्ट्रीय शिक्षण म्हणतात. आपल्या आसपासचीं राष्ट्रें काय करीत आहेत, कोणत्या बाबतींत अगर विषयांत त्यांनीं पुढें सरसावण्याचा उद्योग चालविला आहे, याचा या देशांतील विद्याखात्यानें नीट विचार केला पाहिजे व त्याप्रमाणें आपल्या देशांतील शिक्षणक्रमांत हरवख्त सुधारणा केली पाहिजे. सर्व राष्ट्र किंवा सर्व प्रजा आहे त्यापेक्षां अधिक सुखी कशानें होईल, त्यांस मिळत आहे त्यापेक्षां अधिक अन्न कशानें मिळेल, ते स्वाभिमानी निश्चयी करारी व तेजस्वी कशानें होतील, हें सरकारनें पाहिलें पाहिजे. आणि जें सरकार या गोष्टींकडे लक्ष देत नाहीं तें भाडोत्री व अपमतलबी समजलें पाहिजे. "

**लोकमान्यांची** ही विचारणी त्यावेळच्या सर्वच राष्ट्रहितचिंतकांच्या मनांत वावरत होती. **पं. मदनमोहन** हे शिक्षक होते, तेव्हांपासून व पुढें राजकारणांत पडल्यानंतरहि या गोष्टीवर ते विशेष भर देत. देशाचें राजकीय पुन-रुत्थान व्हावयाला व देशांतील वाढत्या दारिद्र्याला आळा पडण्याला बौद्धिक शिक्षणाबरोबरीनें शास्त्रीय व यांत्रिक शिक्षणाची वाढ झाली पाहिजे. सरकारनेंच

आपलें या बावतींत कर्तव्य करावयास पाहिजे. परंतु येथील सरकार परकीय असल्यानें येथील प्रजाजनांची त्याला थोडीच पर्वा असणार. व शिक्षणाच्या बाबतींत तर त्यांची हेळसांड अत्यंत उपेक्षणीय आहे.

## हिंदु विश्वविद्यालयाची कल्पना.

**पंडीतजींचें** प्रारंभापासूनच विद्यार्थ्यांकडे लक्ष. प्रयाग हें शिक्षणकेंद्र असल्यानें तेथें नाना ठिकाणाचे विद्यार्थी विद्यार्जनासाठीं येत. परंतु त्यांची राहण्याची वगैरे सोय अगदीं नसे. त्यांची कांहीं तरी व्यवस्था लावली पाहिजे हें जाणून त्यांनीं ना. **पं. सुंदरलाल** यांच्या सहाय्यानें एक हिंदू बोर्डींग हौस काढलें. त्यासाठीं फंड जमविणें वगैरे खटपटीची सर्व कामें **पं. मदनमोहन** यांनीं स्वतः अंग मोडून केलीं. याखेरीज अनेक शिक्षणसंस्थाशीं त्यांचा संबंध होताच.

**लोकमान्य टिळकांनीं** राष्ट्रीय शिक्षणासंबंधानें जे उद्गार काढल्याचें वर दाखविले आहे तसेच उद्गार **पंडित मालवीयजी** यांनीं १९०२ च्या काँग्रेसमध्यें काढलें आहेत. त्या भाषणांत पंडितनी म्हणतात, शिक्षण देणें हें वस्तुतः सरकारचें कर्तव्य आहे. उच्च शिक्षण, विशेषतः यांत्रिक व औद्योगिक शिक्षण देण्याकडे जगांतील सर्व प्रमुख राष्ट्रांचा भर आहे. व तो यथायोग्यच आहे. खुद्द इंग्लंड आपल्या देशांतील तरुणांना तसें शिक्षण देत आहे. सृष्टीच्या पोटांत जी विविध संपत्ति लपली आहे, ती धुंडाळून उपयोगाला आणतां येईल असें शिक्षण सर्व राष्ट्रें आपल्या तरुणांना देत आहेत. जर्मनीनें या कामीं आघाडी मारली आहे. जपानहि मागें नाहीं. परंतु हिंदुस्थानांतील कोट्यावधी लोकांना मात्र आपल्या नित्युपयोगी वस्तूंसाठीं परकीयांच्या तोंडाकडे पाहावें लागत आहे. आमच्या देशांत कच्चा माल मुबलक आहे; त्याचा पक्का माल करण्याचें ज्ञान व कौशल्य पाहिजे. हें कौशल्य व ज्ञान आपल्या तरुणांना मिळाल्यास परदेशीं जो द्रव्याचा अफाट लोंढा जातो तो खास जाणार नाहीं. औद्योगिक प्रगती झाल्याखेरीज व कच्या मालाचें पक्कया मालांत येथें रूपांतर झाल्याखेरीज लोकांचें दारिद्र्य टळणार नाहीं. व ते असेच दुष्काळांनीं गांजून गांजून जाणार ”

## योजनेचा आराखडा.

अशा प्रकारची तळमळ रात्रंदिवस त्यांच्या अंतःकरणांत सुरू होती व तिचें

गोड फळ म्हणजे हिंदु विश्वविद्यालयाची संस्थापना हें होय! अशा प्रकारचें शिक्षण देणारें एकादें विश्वविद्यालय असावें ही **पंडितजींची** कल्पना फार जुनी आहे. स. १९०५ सालीं त्यांनीं प्रथम विश्वविद्यालयाची एक रूपरेखा जाहीर केली. पुढें स. १९११ सालीं त्या योजनेंत आणखी दुरुस्ती करून दुसऱ्यांदा आपली योजना त्यांनीं लोकांपुढें मांडली याकामीं त्यांचे मित्र **ना. मुन्शी माधोलाल** यांनीं पुष्कळच आर्थिक साह्य केलें, त्यांची सूचना अशी कीं, **मोक्ष मुल्लर साहेबांना** या विश्वविद्यालयाचे पहिले मुख्याध्यापक करावेत. दरम्यानच्या काळांत **बेझन्टबाईंनीं** सेंट्रल हिंदू कॉलेज काढलें. पुढें स. १९०४ च्या प्रारंभीं बनारसच्या महाराजांच्या अध्यक्षतेखालीं बनारस येथील मिंटो हौसमध्यें जाहीर सभा झाली. तींत ना. **माधोलाल** यांनीं विश्वविद्यालयाची योजना मांडली व ती सर्वसंमत झाल्यानंतर वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करण्यांत आली. हा सर्व प्रकार बंगालमध्यें स्वदेशी बहिष्काराची चळवळ सुरू होण्यापूर्वीचा होता ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे **पंडितजींच्या** दूरदर्शित्वाची व राष्ट्रहितबुद्धीची योग्य कल्पना येईल. सरकारच्या हीनवृत्तीच्या निषेधार्थ म्हणून बंगालमध्यें स्वदेशी-बहिष्काराबरोबर राष्ट्रीय शिक्षणाचीहि चळवळ सुरू झाली. स्वदेशी बहिष्कार हें राजकीय शस्त्र होऊं शकतें. परंतु शिक्षणाचा हेतू त्यापेक्षांहि श्रेष्ठ व उच्च असतो. पं. **मालवीय** यांनीं केवळ राजकिय शस्त्र म्हणून ही चळवळ हातीं घेतली असें नाहीं. जगांतलि सुधारलेल्या देशांतलि विद्यार्थी व हिंदी विद्यार्थी यांची तुलना डोळ्यापुढें येतांच तिनें कोणाचेंहि हृदय विदारण होईल. एकंदर देशाची औद्योगिक, आर्थिक व राजकीय स्थिति सुधारणें असेल तर तरुणांना तेजस्वी व राष्ट्राला अत्यावश्य अशा गुणांचा विकास होईल असेंच शिक्षण मिळालें पाहिजे, ही खूणगांठ पडल्यानेंच त्यानीं राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न हातीं घेतला.

ही गोष्ट स्पष्ट सांगण्याचें कारण असें कीं, **मालवीयजी** यांची विश्वविद्यालयाची योजना प्रसिद्ध होतांच हिंदीहितविरोधी लोकांकडून तिजवर टीकेचा भडिमार झाला. तिचा व बंगालच्या चळवळीशी बादरायण संबंध जोडण्याचाहि कांहीं अँग्लोइंडियन पत्रांनीं प्रयत्न केला. पंडितजींनींहि असल्या कडु टीकांस तात्काल खरमरीत उत्तर देऊन त्यांची विचारसरणी खोडून काढली.

प्रथम या युनिव्हर्सिटीची रूपरेषा प्रसिद्ध झाली ती पुढीलप्रमाणें होती. १संस्कृत कॉलेजची संस्थापना-यांत वेद, वेदांग, स्मृति, दर्शनादि शास्त्रांचें शिक्षण देणें, २ आयुर्वेदिक अगर मेडिकल कॉलेज काढणें, त्यास प्रयोगशाळा, दवाखाने, इत्यादि जोडणें. ३ सायन्स कॉलेज काढणें; त्यांत फिजिक्स, केमिस्ट्री व टेक्नॉलॉजीचें शिक्षण देणें, ४ शेतकी कॉलेज,५कलाकौशल्याचें शिक्षण देणारें कॉलेज, त्यांत संगीत, नाट्य, चित्रकला, शिल्पकला यांचें शिक्षण देणें, ६भाषा कॉलेज, यांत आंग्लभाषा व हिंदी भाषा, ज्या भाषांच्या योगानें देशी भाषा समृद्ध होईल अशा भाषांचें शिक्षण देणें.

## धर्मशिक्षण हा पाया.

या विश्वविद्यालयांत उपनयन झाल्यानंतर विद्यार्थ्यांस प्रवेश मिळावयाचा, विद्यार्थ्यानें अभ्यासक्रम संपेपर्यंत तेथेंच वास्तव्य करावयाचें, अशी योजना होती. अभ्यासक्रमहि अशा बेतानें आखावयाचा कीं, विद्यार्थ्याला विशेष ताण न पडतां सामान्य बुद्धीचा विद्यार्थीहि बारा वर्षांत संस्कृतमध्यें पारंगत होऊन इतरहि द्रव्योपार्जनाचा एकादा धंदा हस्तगत करूं शकेल. धर्मशास्त्राबरोबरच शास्त्रीय ज्ञान हिंदू तरुणांना मिळावें व हिंदुधर्मशास्त्रांत जी चतुर्विध कर्तव्यें धर्म, अर्थ, काम व मोक्ष सांगितलीं आहेत तीं यथोचितपणें पाळण्यास हिंदु तरुण समर्थ व्हावा, हा या शिक्षणाचा मुख्य हेतु होता.

श्रीक्षेत्र काशीसारख्या प्राचीन काळच्या एका नांवाजलेल्या विद्यापीठाच्या ठिकाणीं असें विद्यापीठ स्थापन व्हावें याबद्दल कोणाचाच मतभेद नव्हता. सरकारनें त्याला अंशतः मान्यताहि दिली.परंतु पुढें योजनेंतील धर्मशिक्षणाचा भाग गाळण्यांत आला.

## दुरुस्त योजना.

स. १९११ सालीं पुनः दुरुस्त योजना प्रसिद्ध झाली. तींत पुढील हेतू नमूद होते.

( १ ) हिंदु शास्त्रांच्या व संस्कृत भाषेच्या अभ्यासाचा पुरस्कार करून हिंदू संस्कृति व विचार यांतील जें उत्कृष्ट गुण असतील त्यांचा प्रसार करणें व प्राचीन हिंदु सुधारणांतील जें योग्य व श्रेष्ठ असेल त्यांचें रक्षण करणें.

( २ ) कला व शास्त्र यांचें सर्व शाखांसह अध्ययन करणें.

( ३ ) देशांतील उद्योगधंदे वाढण्याला जें जें म्हणून शास्त्रीय ज्ञान आवश्यक आहे तें तें शिकविणें.

( ४ ) धर्म व व्यवहार हें शिक्षणांतील प्रमुख अंग समजून तरुणांचें चारित्र्य बनविणें.

पंडितजी काशी हिंदु विश्वविद्यालयासंबंधानें थोडक्यांत पुढीलप्रमाणें म्हणतात.

**प्रसादाद्विश्वनाथस्य काश्यां भागीरथीतटे ।**
**विश्वविद्यालयः श्रेष्ठो हिंदूनां मानवर्धनः ॥**
**हिंदुराज्याधिपतिभिर्धनिकैर्धार्मिकैस्तथा ।**
**मिलित्वा स्थापितः सद्भिर्विद्याधर्मविवृद्धये ॥**
**यत्र वेदाः सवेदांगाः धर्मशास्त्रं च पावनम् ।**
**इतिहासः पुराणश्च मीमांसान्यायविस्तरः ॥**
**सांख्ययोगौच वेदान्त आयुर्वेदः सुखावहः ।**
**गांधर्ववेदो मधुरो धनुर्वेदश्चनूतनः ॥**
**आग्लं दण्डविधानश्च दायभागादि संयुतम् ।**
**पाश्चात्या विविधा विद्यास्तथा लोकहिताः कलाः ॥**
**पाठ्यन्ते विधिवत्प्रेम्णा विज्ञानानि बहूनि च ।**
**साहाय्यार्थं च छात्राणां दीयन्ते वृत्तयस्तथा ॥**
**सर्वप्रान्तसमायाताश्छात्रा·विद्याभिलाषिणः।**
**वसन्ति सुखिनो यत्र पुरा कुरुकुले यथा ॥**
**नित्यं निषेव्यते यत्र व्यायामः शक्तिवर्धनः ।**
**व्याख्यानैश्च कथाभिश्च धर्मो यत्रोपदिश्यते ॥**

हिंदू विश्वविद्यालयाची योजना प्रसिद्ध होतांच सर्वांकडून तिला प्रोत्साहन मिळू लागलें. डॉ. जी. सुब्रह्मण्यम अय्यर यांनीं ही योजना प्रसिद्ध झाली तेव्हां या योजनेचें मनःपूर्वक अभिनंदन केलें व एकाकाळीं ज्या पायोनिअर पत्रानें या विद्यापीठाच्या योजनेसंबंधानें संशय प्रगट करून त्यावर अवास्तव टीका केली, त्याच पत्रानें पुनः योजना प्रसिद्ध होतांच त्या योजनेचें सुस्वागतच केलें.

## फंड कसा जमविला.

अशा रीतीनें योजनेचा सर्वांकडून सत्कार होऊं लागतांच, विश्वविद्यालयासाठीं फंड जमविण्याकरितां शिष्टमंडळें बाहेर पडलीं व अल्पावधींतच बंगाल,

बिहार, संयुक्त प्रांत व पंजाब या प्रांतांतून ३० लक्ष रुपयांचीं अभिवचनें मिळालीं. यानंतर राजेरजवाड्यांकडे मदत मागण्यांत आली, तेव्हां बिकानेरचे महाराज **सर गंगासिंग बहादुर** यांनीं या योजनेचा पुरस्कार केला. पुढें **लॉर्ड हार्डिंज, सर हारकोर्ट बटलर,** यांनाहि ही योजना मान्य झाली. दरभंगयाच्या महाराजांनीं स्वतः पांच हजार रुपये दिले व स्वतः अनेक संस्थानिकांकडे शिष्टमंडळ घेऊन गेले. सर्वांकडून मदत होऊं लागली. स. १९१५ सालीं कायदेमंडळांत हिंदु युनिव्हर्सिटी बिल येऊन तें पासहि झालें. त्यावेळीं भाषण करतांना **पंडित मालवीय** म्हणाले, "धर्माच्या चैतन्ययुक्त सामर्थ्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. आजच्या शिक्षणसंस्थांतून धार्मिक शिक्षणाची फार आबाळ झालेली आढळते. व हिंदूंच्या अत्यंत पवित्र व विद्यादेवीचें निवास असलेल्या ठिकाणीं अशी संस्था काढण्यास सरकारनें मान्यता दिली, याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. माझी अशी खात्री आहे कीं, इतर संस्थांतून केव्हां तरी लवकरच धर्मशिक्षणाची आवश्यकता भासूं लागेल." विश्वविद्यालयाचें कार्य हातीं घेतांच पंडितजींनीं आपली अत्यंत किफायतशीर अशी वकिली सोडून दिली व आपलें सर्व आयुष्य विद्यालयाच्या सेवेंत खर्च करण्याचा कृतसंकल्प त्यांनीं केला. त्यासाठीं त्यांनीं सर्व देश पालथा घातला; शेंकडों व्याख्यानें दिलीं; आपली योजना लोकांस समजावून दिली; जनतेची सहानुभूती मिळविली; व अल्पा-वधींतच सुमारें कोट रुपयांचा प्रचंड द्रव्यनिधि जमा केला. आतांपर्यंत एकंदर निधि दीड कोटींवर गेला आहे.

## सरकारनें मान्यता दिली.

या विश्वविद्यालयाला रीतसर सरकाची मान्यता १९१५ च्या १६ व्या काय-द्यानें देण्यांत आली. या कायद्यान्वयें देशांतील इतर विश्वविद्यालयाप्रमाणेंच याहि विश्वविद्यालयाचा दर्जा सरकारनें मान्य करून या युनिव्हर्सिटीनें दिलेल्या पदव्या, सरकारनें मानण्याचें कबूल केलें. वरिष्ठ कायदेमंडळांत हिंदू युनिव्हर्सि-टीचें बिल आलें त्यावेळीं शिक्षण मंत्री सर हारकोर्ट बटलर म्हणाले, आजचा हा सामान्य प्रसंग नाहीं. आपण एक नव्या व चांगल्या विश्वविद्यालयाला जन्म देत आहों. या विश्वविद्यालयाचा विषेश हा कीं, हें विश्वविद्यालय टीचिंग व रेसिडेन्शल राहील. ज्या ठिकाणीं विश्वविद्यालयाचीं मंदिरें होणार तेथून जवळच भागीरथी

च्या तटाकाच्या घाटाकडे डौलानें पाहणारीं तीं विश्वविद्यालयीनें मंदिरें दृष्टीं पडणार, ही कल्पना मनांत येऊन मी हिंदू असतों तर किती बरें झालें असतें. असें मनांत आल्याखेरीज रहात नाहीं. तथापि प्राचीन व वंदनीय अशा हिंदु संस्कृतीचा व अर्वाचीन पाश्चात्य संस्कृतीचा संयोग घडवून आणण्यास मदत करणाऱ्या सरकारचा मी एक नोकर असल्याचा अभिमान मला सहजच वाटला."

## कोनशिला स्थापनसमारंभ.

पुढें फेब्रुआरी १९१६त **लॉर्ड हार्डिंज** यांनीं विद्यालयाची कोनशिला बसविली. इमारतीचीं कामें झपाट्यानें सुरू झाली व अनेक उत्साही कार्यकर्त्यांनीं वेगळींवेगळीं कामें वांटून घेऊन विश्वविद्यालयाची उभारणी केली. विश्वविद्यालयाचे पहिले व्हाईस चान्सेलर पं. **सर सुंदरलाल** (१९१६–१८); नंतर सर **शिवस्वामी अय्यर** (१९१८–१९) व नंतर तेव्हांपासून पं. **मदनमोहन मालवीयजी** आहेत.

विश्वविद्यालयाच्या मदतीसाठीं पहिलें विनंतिपत्र कोटी रुपयांचें काढलें. तेव्हां १ कोटी १० लक्ष रोख जमा झाले. त्यांपैकीं १ कोटी ५ लक्ष राजे रजवाड्यांनीं व लोकांनीं दिले. व पांच लक्ष सरकारनें दिले. त्यांत जोधपूर व पतियाळा यांनीं रोख दोन व पांच लक्ष रुपये देऊन प्रतिवर्षी २४ हजार रुपये देण्याचें आश्वासन दिलें. त्याचप्रमाणें विकानेर व व काश्मीरच्या महाराजांनीं प्रतिवर्षी बारा हजार रुपये देण्याचें आश्वासन दिलें.

या रकमेंतून इमारतीसाठीं जागा १३०० एकर ५९२१५२ रुपयांस घेतली व त्यावर इमारती ४७५६८६६ रुपयांच्या बांधल्या आणि इतर सामानसुमानासाठीं २३५८८१५ रु. खर्च झाले. असें एकंदर ७६७७८३३ रुपये खर्च झाले. विश्वविद्यालयाच्या पुढील इमारती आहेत, आर्टस् कॉलेज, फिजिकल लायबोरेटरी, केमिकल लायबोरेटरी, सायन्ससाठीं व्यास व विद्युत्संग्रह, इंजिनियरिंग कॉलेज, हॉस्पिटल, ११०० विद्यार्थ्यांचें वसतीगृह, १०० स्त्री विद्यार्थीनींसाठीं वसती गृह, प्रोफेसरांना राहण्याच्या जागा, इत्यादि.

## व्यापक शिक्षणक्रम.

श्रीक्षेत्र काशीपासून सुमारें ४ मैलांवर हें विश्वविद्यालय वसविण्यांत आलें

आहे. या जागेवर सुमारें वीस मैल लांबीचें सुंदर रस्ते केलें असून सुमारें वीस हजार वृक्षांची लागवड करण्यांत आली आहे. १६०० व विद्यार्थ्यांची व युनिव्हर्सिटीतील ८० प्रोफेसरांची राहण्याची सोय तेथेंच करण्यांत आली आहे. हल्लीं विश्वविद्यालयांत विद्यार्थी खालील विषयांचा अभ्यास करीत असतात.

१ थिऑलॉजी.

२ प्राचीन विद्या (वेद, वेदांग, व्याकरण, साहित्य, न्याय, वेदांत, मीमांसा, सांख्य, ज्योतिष, पुराण व धर्मशास्त्र)

३ धर्म.

४ हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास.

५ संस्कृत. ६ हिंदी. ७ मराठी. ८ बंगाली. ९ अरबी आणि पर्शियन, १० उर्दू. ११ इंग्रजी. १२ इतिहास व राजकारण. १३ फिलॉसॉफी व सायकॉलॉजी. १४ अर्थशास्त्र व राजकारणशास्त्र. १५ कायदा. १६ शिक्षण. १७ फिजिक्स, १८ गणित व ज्योतिष. १९ केमिस्ट्री. २० बॉटनी. २१ झुलॉजी. २२ मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल इंजिनियरिंग. २३ जिऑलॉजी. २४ मायनिंग, २५ इंडस्ट्रियल केमिस्ट्रि. २६ आयुर्वेद व अर्वाचीन शस्त्रक्रिया. २७ संगीत. २८ शारीरिक शिक्षण. व २९ लष्करी शिक्षण. याखेरीज युनिव्हर्सिटीच्या तीन शाळा आहेत. १ मुलांचें हायस्कूल २ एक मुलींची शाळा व ३ रणवीर संस्कृत पाठशाळाखेरीज व एक महिला-विद्यापीठ.

## विश्वविद्यालयाची कामगिरी.

विश्वविद्यालय स्थापन झाल्यास बारा वर्षें होऊन गेलीं. आज विद्यालयांत वेगवेगळ्या ३२ शाखांचें शिक्षण देण्यांत येतें. व त्यासाठीं १५० शिक्षक शिक्षणाचें काम करीत आहेत. यापैकीं बरेच युनिव्हर्सिटीमध्येंच राहतात. एकंदर २६०० विद्यार्थी विद्या संपादन करीत असून १६०० वसतीगृहांत राहतात. व या सर्वांसाठीं सुमारें दोन मैलांच्या विस्तृत क्षेत्रावर १७३ प्रशस्त व सुंदर अशा इमारती बांधण्यांत आल्या आहेत. वाचनमंदिरांत ६० हजारांवर ग्रंथ आहेत. प्रयोगशाळा सुमारें ६ व वर्कशाप्स सुमारें ६ असून त्यावर २५ लक्षांवर खर्च करण्यांत आला आहे, ३८० वर शिष्यवृत्ती देण्यांत येतात व ४०० नादार व अर्धनादार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांना खेळण्यासाठीं, क्रिकेट, फुटबॉल, हॉकी,



हिंदु विश्वविद्यालय (सर्व कॉलेजांचें दर्शन)

टेनिस, यासाठीं विस्तृत मैदानें असून युनिव्हर्सिटी ट्रेनिंग कोअरमध्यें ३०० विद्यार्थी निशाणबाजीचें शिक्षण घेत असतात. याखेरीज,१०० रोग्यांचें हॉस्पिटल, एक बॉटॅनिकल गार्डन, आयुर्वेदीय औषधासाठीं एक फार्मसी असून शारीरिक शिक्षणासाठीं एक विशाल हॉल बांधण्यांत आला आहे.

या कालावधींत २९५४ पदवीधर बाहेर पडले. त्यांत ४ डॉक्टर ऑफ सायन्स, १८९ थिऑलॉजी व प्राचीन विद्या, १७६३ आर्टस् पदवीधर, ७४०सायन्स, २६२ कायदा, ३८४ शिक्षणांतील पदवीवाले. २०० मेकॅनिक व इलेक्ट्रिक व १४ मायनिंग असे पदवीधर बाहेर पडले.

## सर्व हिंदुस्थानांतील विद्यार्थी.

या विश्वविद्यालयाचें स्वरूप अखिल भारतीय आहे. प्रत्येक प्रांतांतले विद्यार्थी त्यांत आहेत. १९२९ सालीं येथें पुढील प्रमाणें विद्यार्थी होते. आसाम २८,बिहार. ओरिसा १७६, बंगाल २४३,मुंबई१०५, ब्रह्मदेश ५,मध्यभारत ३९, मध्यप्रांत २३१, वऱ्हाड १०, मद्रास १३७, वायव्यसरहद्दप्रांत२८, पंजाब १४३, उदयपूर, जोधपूर, जयपूर, बिकानेर, अलवार, कोटा, पतियाळा वगैरे १०५, द. हैद्राबाद ६, नेपाळ६, काश्मीर१५, म्हैसूर ३, सं. प्रान्त १११३, त्रावणकोर १७,बलुचिस्थान २, द. कानडा १, कोचीन १, आंध्र ३१, दिल्ली ३, मॉरिशस १, हे सर्व विद्यार्थी २२२, जिल्ह्यांतून आले आहेत.

स. १९२९, सालअखेर विश्वविद्यालयानें १, कोटी २५. लक्ष जमा केले. पैकीं १, कोटी सोळा लक्ष राजे रजवाडे व इतर हिंदु धनिकांनीं दिले. ९, लक्ष सरकारनें दिले.हिंदुस्थान सरकार ३, लक्षांची ग्रँट देत असतें व संस्थानिकांकडून वर्षाचे ८०, हजार रु. मिळतात, याखेरीज फी व इतर देणग्या यांतून खर्च चालतो.संस्थेचें एकंदर उत्पन्न दहा लक्ष रुपयांचें असून खर्च मात्र बारा लक्षांचा आहे.

संस्था सर्व दृष्टींनीं परिपूर्ण व्हावयाची तर त्याला आणखीहि चार कोटी रुपये लागतील असें **पंडितजींचें** म्हणणें आहे,परंतु ही रक्कम फार मोठी दिसेल म्हणून **पंडितजींनीं** आणखी एक कोटी रुपयांची मागणी १९२९ सालीं केली. ही रक्कम जमतांच टेक्नॉलॉजी, शेतकी, कॉमर्स व संगीत यांचीं कॉलेजें सुरू करण्यांत येणार आहेत.

## स्वसंस्कृतीचें पोषण.

संस्कृत वाङ्मयांत भांडार अमूल्य व अत्यंत अफाट असून सांस्कृतिक दृष्ट्या त्यानें जगाला अत्यंत उज्वल अशी संस्कृति समर्पण केली. परंतु या गोष्टीचा आपणास विसर पडु लागला व आपलें तें त्याज्य व परकीयांचें तेवढें अनुकरणीय हीं धृत्ति लोकांत उत्पन्न होऊं लागली. स्वाभिमानाच्या व संस्कृती रक्षणाच्या दृष्टीनें ही राष्ट्रावर मोठीच आपत्ती आहे असें वाटुन पंडीतजींनीं संस्कृत वाङ्मय व हिंदू शास्त्र यांचा आभ्यासक्रमांत प्रथम समावेश केला. या विधविद्यालयांतील दुसरा विशेष हा कीं तेथें शास्त्रीय संशोधनाचें अध्ययन व अध्यापन करण्यांत येत असतें.

## शास्त्रीय संशोधन.

हिंदुस्थानांत आज अनेक विश्वविद्यालयें आहेत. परंतु त्यांची पुस्तकी ज्ञाना-पलीकडे अद्यापिहि मजल नाहीं. हिंदुस्थान पूर्व कालाप्रमाणें आज जरी सुवर्ण भूमी नसला तरी तींत भूमिगत द्रव्यें आजहि अपार आहेत. परंतु त्यांचें संशोधन करण्याचें ज्ञान हिंदी तरुणांना येथें देण्यांतच येत नाहीं. अर्थात् या सर्व द्रव्यांचा फायदा परकीय लोकांना मिळतो व हिंदी तरुण बुद्धिवान् व कर्तबगारीचा असूनहि त्याच्या बुद्धिविकासाला योग्य वाव नसल्यानें तो आपल्या घरीं भुकेनें उपाशीं मरतो ही स्थिति अत्यंत कटु नव्हे काय? हिंदुविश्वविद्यालयाचा कांहीं विशेष असेल तर तो या संशोधन शिक्षणांत आहे व म्हणून येथील विद्यार्थी बाहेर पडल्यावर ‘ मी आतां पुढें काय करूं,’ असा प्रश्नच त्याच्या पुढें येत नाहीं. तो स्वावलंबी स्वतःच्या पायावर उभा राहूं शकतो ही एक एवढीच गोष्ट नाहीं यापेक्षांहि यांत मोठा व्यापक हेतु आहे. हिंदुस्थान आज दरिद्री कां आहे तर त्याला उद्योगधंदे नाहींत म्हणून देशांत, अमूप माल कच्चा असूनहि पक्का माल सर्वस्वीं परदेशांतून येतो. तेव्हां संशोधनद्वारां कच्चा माल पृथ्वीच्या पोटांतून बाहेर आणावयाचा व त्यावर अनेक धंदे काढून उपाशी मरणाऱ्या हजारों देशबांधवांना धंदा पुरवावयाचा असा या शिक्षणां-तील प्रमुख हेतु आहे. विश्वविद्यालयाजवळ आज उपलब्ध असलेल्या साधनबळावर तें शक्य ते प्रयत्न या दिशेनें करीत आहे. तें परिपूर्ण होण्याला द्रव्यसहाय्याची आवश्यकता असल्यानें तें भरपूर मिळाल्यास पंडितजींच्या या बाबतींतील कल्पनाहि सत्यसृष्टींत उतरल्याखेरीज राहणार नाहींत.

## मातृभाषा हें माध्यम.

देशांतील इतर विश्वविद्यालयांत शिक्षणाचें माध्यम इंग्रजीच सुरू असून तें बदलावें कीं न बदलावें याबद्दल वाद आहेत. परंतु या विश्वविद्यालयाच्या चालकांचा प्रारंभापासूनच मातृभाषेंतून शिक्षण देणें हा हेतू असल्यानें मातृभाषेंतून शिक्षण देण्याचा उपक्रम प्रथम या विश्वविद्यालयानें केला. व विश्वविद्यालयाला जोडलेल्या शाळांतून मातृभाषा हेंच माध्यम असून प्रवेश परीक्षेचीं उत्तरें मातृभाषेंतून दिल्यास चालतात. कॉलेज शिक्षणाच्या अभ्यासक्रमासाठीं हिंदी भाषेंतून वाङ्मय, शास्त्र, वैद्यक या विषयांवर पुस्तकें तयार झालेलीं असून बी. ए. साठींहि क्रमिक पुस्तकें हिंदींतच तयार करण्याचें काम सुरू आहे. एम्. ए. च्या पदवीसाठीं हिंदी भाषा घेण्यांत येते व लवकरच एम्. ए. परीक्षेचीं उत्तरेंहि हिंदींतून दिलीं जातील.

शास्त्रीय शिक्षणांतील औद्योगिक दृष्ट्या उपयोगी पडेल असें शास्त्रीय ज्ञान इंजिनियरिंग ( मेकॅनिकल व विद्युत् ) मायानिंग यांचेंहि शिक्षण देण्यांत येतें.

## धर्म व राजकारण

अलीकडच्या तरुणांत धर्माविषयीं औदासिन्यच केवळ आहे असें नसून कित्येक प्रसंगीं अवहेलना करण्यापर्यंत मजल जाते. ही गोष्ट सांस्कृतिक दृष्ट्या बरोबर नाहीं हें जाणून या विश्वविद्यालयांत विद्यार्थ्यांचें चारित्र्य उत्कृष्ट बनेल असें शिक्षण देण्यांत फार दक्षता घेण्यांत येते. त्यासाठीं धर्मशिक्षण अवश्य केलें आहे. धर्मावर वारंवार व्याख्यानें करविण्यांत येतात. प्रति एकादशीच्या दिवशीं कथा असते. त्यावेळीं विद्यार्थी व शिक्षक यांना उपस्थित असावेंच लागते. याखेरीज धर्मावर वादसंवाद मधून मधून होत असतातच. जेणेंकरून विद्यार्थ्याला धर्माचें मूल स्वरूप समजून येऊन धर्म व व्यवहार यांची उत्कृष्ट सांगड घालतां येईल असें शिक्षण देण्यांत येतें. मानवी सौख्याला व चारित्र्यसंवर्धनाला धर्मशिक्षण अत्यावश्य आहे असाच विश्वविद्यालयाच्या चालकांचा ठाम सिद्धांत असल्यानें धर्मशिक्षणावर जास्त भर आहे. मनुष्यांत उच्च प्रकारचा स्वार्थत्याग उत्पन्न होण्यास त्यांच्यांत देशाभिमानाची ज्योतहि तेवत असली पाहिजे हें जाणून व उत्कृष्ट चारित्र्याला आणि शीलसंवर्धनाला देशाभिमानहि प्रखर असावयास पाहिजे म्हणून विद्यार्थ्यांत देशाभिमान उत्पन्न होईल असेंहि शिक्षण देण्यांत येतें, व

ही गोष्ट कितपत साध्य झाली आहे हें दाखविण्यासाठीं येथें एक दोन गोष्टींचा उल्लेख करणें अप्रासंगिक होणार नाहीं.

## विद्यालय राजकारणापासून अलिप्त नाहीं.

विश्वविद्यालय केवळ परीक्षा घेणारें नसून आपल्या हेतूप्रमाणें त्यामार्फत शिक्षणहि देतां यावें हा **पंडितजींचा** उद्देश त्यांनीं यांत सफल करून दाखविला आहे. विद्यालयांतून बाहेर पडणारा विद्यार्थी केवळ पोटार्थी म्हणून न हिंडतां तो स्वतंत्र वृत्तीनें राहून यथाशक्ति देशसेवाहि करील अशाच तऱ्हेचा शिक्षणक्रम विद्यालयानें आंखला आहे. याशिवाय विद्यालयाचा विशेष हा कीं, विद्यार्थीस राजकारणांपासून शक्य तितक्या दूर राखण्याचा जो अन्यत्र प्रयत्न केला जातो तसा येथें केला जात नाहीं. असहकारितेच्या काळांत विद्यार्थांनीं शाळा-कॉलेजें सोडावीं म्हणून पुढाऱ्याचें प्रयत्न चाललें असतां या विद्यालयांतील विद्यार्थीहि बाहेर पडावे असे दुरून दुरून बरेच प्रयत्न करण्यांत आले. ही गोष्ट **पंडितजींस** समजतांच त्यांनीं महात्मा गांधीस निमंत्रण करून आपल्या समक्ष काय सांगावयाचें असेल तें विद्यार्थ्यांस सांगण्याविषयीं त्यांस विनंती केली.

सन १९३० सालच्या सविनय कायदेभंगाच्या चळवळींत विश्वविद्यालयांतील बऱ्याच अध्यापकांनीं व विद्यार्थ्यांनीं चळवळींत आणि भाग घेतला तेव्हां सरकारनें विद्यालयाची ग्रँटच बंद केली. अशा अध्यापकांना व विद्यार्थांना पुनः विद्यालयांत घेणार नसल्यास ग्रँट देण्याचा विचार करूं अशा अटी घालण्यांत आल्या तेव्हां सर्व अध्यापकांनीं अर्ध्या पगारावर काम करण्याचें ठरविलें. परंतु सरकारनें घातलेल्या अपमानास्पद अटी पाळण्याचें नाकारलें. या एकाच गोष्टीवरून काय मोलाची मंडळी विश्वविद्यालयांत आहेत याची कल्पना येईल. **पं. मदनमोहन** यांस मुंबईस अटक झाली अशी वार्ता पसरतांच विश्वविद्यालयांतून शंभर विद्यार्थ्यांचा एक जथा मुंबईस कायदेभंगासाठीं आला या गोष्टीवरून विद्यार्थ्यांना राजकारणापासून अलिप्त राखण्याचें धोरण या विश्वविद्यालयांत नाहीं हें स्पष्ट दिसून येईल.

## बलसंवर्धन.

'**शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्**' ही उक्ति सर्वमान्य असली तरी ती व्यवहारांत मात्र क्वचितच आचरली जाते. विशेषतः शाळासारख्या

ठिकाणीं शारीरिक शिक्षण सक्तीचें केलें पाहिजे; तें केलें जात नाहीं! या विश्वविद्यालयाचें विद्यार्थ्यांच्या शारीरिक शिक्षणाकडेहि पूर्ण लक्ष आहे. चारित्र्य संवर्धनाइतकीच बलसंवर्धनाची आवश्यकता आहे हें येथील चालकांनीं पुरापूर जाणलें असून सर्व प्रकारचा व्यायाम, लष्करी शिक्षण यांची व्यवस्था तेथें करण्यांत आली आहे.

**पं.मालवीय** यांचा शिक्षण प्रसाराविषयींचा हव्यास इतका दांडगा आहे कीं त्यांना सर्व जनता साक्षर व्हावयास पाहिजे. यासाठीं त्यांनीं १९२९ सालीं पदवीदानप्रसंगीं पदवीधरांना केलेल्या भाषणांत ते म्हणाले,

" हें सर्व विश्व एका चिर, सर्वव्यापी अशा शक्तीनें चाललें आहे. त्या चित्शक्तीखेरीज प्राणी जगूंच शकणार नाहीं, जें सर्व दृश्य व अदृश्य आहे त्याचा नियंता एक असून त्याच्या इच्छामात्रेंकरून हें विश्व चाललें आहे असें उपनिषदें सांगतात. अशी जी शक्ति-तिला ब्रह्म म्हणा, ईश्वर म्हणा, ती अनादि व अविनाशी आहे. यासंबंधानें तुमच्या मनांत आशंका उत्पन्न झाली तर वर आकाशाकडे पाहा. तें कसें अनंत तारका व नक्षत्रांनीं भरून गेलें आहे! अत्यंत दूर अशा सूर्याचा प्रकाश या जगावर येऊन त्यांत जीवनकला घालतो. याचा विचार करा. तुम्ही आपल्या आश्चर्यकारक अशा शरीरयंत्राकडे पाहा. आपल्या सभोंवार आनंदानें, उत्साहानें बागडणाऱ्या पशुपक्ष्यांकडे दृष्टि टाका. त्या फलपुष्पांनीं नटलेल्या वृक्षराजी पाहा. ज्याला आपण ब्रह्म अगर ईश्वर म्हणतो तो या सर्व ठिकाणीं नांदत आहे. आपल्या धर्मशिक्षणाचें सारसर्वस्व हें आहे.

**स्मर्तव्यः सततं विष्णुर्विस्मर्तव्यो न जातु चित् ।**
**सर्वे विधिनिषेधाः स्युरेतयोरेव किंकराः ॥**

ईश्वर आहे व तो सर्व प्राणिमात्रांत वास करतो या दोन मूलभूत गोष्टी तुम्हांस पटल्या म्हणजे ईश्वर व अखिल प्राणी यांच्यांशीं तुम्ही योग्यपणें वागाली

**आत्मनः प्रतिकूलानि परेषां न समाचरेत्**

आपणाशीं दुसऱ्यांनीं वागलेलें जसें आवडणार नाहीं तसें तुम्हीं दुसऱ्याशीं वागूं नका. व

**यद्यदात्मनि चेच्छेत तत्परस्यापि चिन्तयेत् ।**

मनुष्यानें कसें वागावें याचे आपल्या पूर्वजांनीं घालून दिलेले हे दोन सर्वोत्कृष्ट नियम आहेत.

हे दोन नियम सर्व धर्मांत मान्य आहेत. ख्रिस्ती धर्माच्या जन्मापूर्वी हजारों वर्षें महाभारतानें ही शिकवण दिली आहे. यावरून आपला धर्म किती उज्वल व श्रेष्ठ आहे याची तुम्हांस कल्पना येईल.

## लोकशिक्षासमिति काढा.

परंतु हें स्वकर्तव्य बजावीत असतांना तुम्हीं आपल्या मातृभूमीविषयींच्या कर्तव्याकडे लक्ष दिलें पाहिजे. आपला हा देश अत्यंत थोर आहे. याप्रमाणें अखिल भूतलावर दुसरा देश नाहीं. त्याविषयीं तुमचें एक विशिष्ट कर्तव्य आहे. तुमचा जन्म या मातृभूमीच्या अंकावर झाला. तिनें तुम्हांला अन्नवस्त्र पुरविलें. तुमचें संगोपन केलें. तुमच्या सुखाचें व मानाचें हें निधान आहे. अवश्यकता उत्पन्न होईल तेव्हां तुम्हीं आपल्या मातृभूमीचें कर्तव्य करण्यास सिद्ध असलें पाहिजे. आपल्या देशबांधवावर प्रेम करून त्यांच्यांत ऐक्य वाढवा. आपल्या गरीब बांधवांचा उद्धार करण्याची खटपट करा. त्यांच्यांत मिसळा. त्यांच्या सुखदुःखाचा अनुभव घ्या. त्यांचें जीवित शक्य तितकें सुखकर करा.

देशांत अज्ञान राक्षस थैमान घालीत आहे. स्वराज्य आल्यावर त्याला हद्दपार करूं असें म्हणत बसूं नका. तुम्ही यापुढें निरक्षरत्व नाहींसें करण्यासाठीं कमर कसा. लोकांना लिहिणें, वाचणें, गणित व धर्म यांचें शिक्षण द्या. प्रत्येक मुलामुलीला, स्त्रीपुरुषाला हें शिक्षण द्या. त्यांना आरोग्याचें शिक्षण द्या. त्यांच्यांत एकोपा नांदेल असे प्रयत्न करा. ते पूर्ण सुखी, निरोगी व आनंदी होतील असें करा. तर येथें या विश्वविद्यालयांत शिक्षण घेतल्याचें चीज होणार आहे. यासाठीं एक 'लोकशिक्षासमिति' काढा. या सत्कार्यांत ईश्वर तुमचा पाठीराखा आहे.

अशा रीतीनें लोकसेवा करणें म्हणजेच परमेश्वरसेवा करणें आहे. देशाचें आपण कर्तव्य करीत आहों याचें सतत स्मरण असलें म्हणजे त्यासाठीं पडेल तो त्याग करण्याची तयारी आपोआप होत असते. अशा प्रकारचा त्याग करण्याची संधी येईल तेव्हां सज्ज असा. तुम्हीं नवा जुना इतिहास शिकला आहां. त्यांत स्वातंत्र्यासाठीं कसकसें प्रयत्न करण्यांत आले, त्यांचा त्याग व शौर्य कशा मोलाचें होतें हें तुम्हीं जाणतां. ती स्वातंत्र्यप्रीति, तो स्वातंत्र्याबद्दल दुर्दमनीय उत्साह व मातृभूमीचा गौरव वाढविण्यासाठीं आत्मोत्सर्ग करण्याची बुद्धि तुमच्यांत असली तरच इतिहास वाचल्याचें खरें सार्थक. मातृ-

भूमीच्या मानरक्षणासाठीं प्रसंग पडल्यास आत्मदान करणें हेंच नागरिकांचें खरें कर्तव्य आहे. परंतु गैरभावनेच्या भरांत जीवाचा उगाच फुकट त्याग करूं नका. तो सत्कार्यासाठीं राखून ठेवा.''

## विश्वविद्यालयाची योग्यता.

**पंडितजींनीं** केलेला हा अमूल्य उपदेश प्रत्येक मनुष्यानें अंतःकरणावर कोरून ठेवण्यासारखा आहे. व यावरून काशी विश्वविद्यालयापुढें कोणत्या प्रकारचें ध्येय आहे याची योग्य कल्पना येईल.

सजीव, तेजस्वी, राष्ट्रकार्यदक्ष, असे विद्यार्थी निर्माण करणें हा राष्ट्रीय शिक्षणाचा प्रधान हेतू तो या विश्वविद्यालयांत किती उत्कृष्टपणें पाळला जातो हें वरील उद्गारांवरून ध्यानीं येईल. विद्यालयांतून स्वाभिमानी विद्यार्थी निपजविणें हें चालकांचें मुख्य ध्येय आहे. हिंदु संस्कृतीचा जाज्वल अभिमान विद्यार्थ्यांत उत्पन्न व्हावा ही पंडितजींची कामना विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमांवरून स्पष्ट नजरेस येईल. ही गोष्ट न सांगताहि समजण्यासारखी आहे. विश्वविद्यालयाची जीं प्रचंड व भव्य मंदिरें उभारलीं आहेत तीं पाहतांच हिंदी संस्कृतीचें चित्र मूर्तिमंत चित्र डोळ्यापुढें उभें राहतें. त्या तीन तीन मजली सुविशाल इमारती,त्यांवर झळकत असलेलीं तीं सुवर्णशिखरें, हींच हीं सरस्वतीचीं उपास्य मंदिरें हें न सांगताहि कोणास सहज समजून येईल. विश्वविद्यालयांत अंतर्बाह्य स्वाभिमान, तेज, ओज प्रतीत होतें.

हिंदु विश्वविद्यालयाची स्थापना हें **पंडित मदनमोहन मालवीयजी** यांच्या अविश्रान्त परिश्रमाचें फल आहे हें तर खरेंच. पंडितजींनीं स्वहस्तानें निर्माण केलेलें व चिरस्वरूपाचें असें हें स्मारक आहे हेंहि खरें. परंतु हें विश्वविद्यालय स्थापन करून पंडितजींनीं अपूर्व अशी देशसेवा केली आहे. व त्याबद्दल अखिल हिंदुमात्र त्यांचा सदैव ऋणीच राहील. हिंदु संस्कृतीच्या पुनरुद्धाराचें असामान्य काम या विश्वविद्यालयामार्फत होत आहे. हिंदू जातीचा गौरव विश्वविद्यालय वाढवीत आहे. येथील संशोधनाबद्दल जगांतील मोटमोठे विद्वान माना डोलवीत आहेत. अशाप्रकारें त्रिखंडांत हिंदुजातीचा यशोगौरव दुमदुमविण्याचें काम विश्वविद्यालयानें अंगीकारलें आहे. ही हिंदुसमाजाची केवढी अफाट व भव्य सेवा पंडितजींनीं केली आहे! **पंडितजींच्या** या एकाच कृत्यामुळें त्यांचें नांव सदैव झळकत राहणार ही गोष्ट निर्विवाद आहे.

# हिंदु-संघटन.

एका काळीं त्रिखण्डावर ज्या हिंदु संस्कृतीची छाप पडली होती, अखिल जगतांतील मानव जात ज्या एक श्रेष्ठ संस्कृतीवर मोहून गेले होते ज्या संस्कृतींतील श्रेष्ठ तत्त्वज्ञानांतील रहस्य समजावून घेण्यासाठीं अखिल जगांतून विद्यार्थ्यांच्या झुंडीच्या झुंडी या भारतवर्षाकडे धांवा घेत; रामकृष्णादि महान्वीर ज्या भूमींत निर्माण झाले. महान् महान् तत्त्ववेत्त्यांनीं ज्या भूमीची महत्तमता वाढविली, ज्या भूमींत जन्म घेण्याबद्दल देवादिकांनाहि मोह उत्पन्न व्हावा. त्या भूमीचें तें गतकालीन वैभव, ती महत्तमता, तें अलोट बुद्धिसामर्थ्य, ते तेजस्वी वीर पुरुष आज कोठें गेले ? एका काळीं जगावर प्रभुत्व गाजविणाऱ्या त्या तेजस्वी संस्कृतीला आज ओहोटी लागलेली पाहून कोणा स्वाभिमानी भारतवर्षीयाच्या अंतःकरणांत वेदना उत्पन्न होणार नाहींत ! हूण, शकांसारख्या परसंस्कृतीला आत्मसात् करून त्यांची नांवनिशींहि उरू न देणाऱ्या त्या तेजस्वी भारतीय संस्कृतीवर आज असें कोणतें दीर्घ पटल आलें कीं, जगावर असोच पण स्वस्थानीं ती मोठ्या मुष्किलीनें काळ कंठीत आहे !

या गोष्टीचा विचार करूं लागल्यास कोणाच्याहि मनांत कालवाकालव उत्पन्न झाल्याखेरीज राहणार नाहीं. हिंदुस्थानच्या मानचित्राकडे नुसता दृष्टीक्षेप केला तरी किती विपरीत देखावा दृष्टीं पडतो ! अनादिकाळीं असो, परंतु इतिहासकाळीं सुमारें हजार वर्षांपूर्वीची गोष्ट, उत्तरेस हिंदुकुशापर्यंत व दक्षिणेस जावा, सुमात्रा-पर्यंत सर्व भूप्रदेश हिंदु संस्कृतीखालीं नांदत होता. तें त्याचें स्थान आज हिरावलें गेलें व अन्य संस्कृतीला आत्मसात करण्याइतकी जी प्रबल संस्कृति होती तेथें दुसऱ्याच एका प्रबल संस्कृतीचा वाढ व विस्तार होऊन ती हिंदु संस्कृतीला कोपरखळ्या देऊं लागली असें दृश्य प्रत्यक्ष दिसू लागलें !

## यावर उपाय काय ?

अर्थात् या गोष्टीवर वेळींच कांहीं उपाय न केल्यास आत्मघात होईल अशी भीति राष्ट्रहितचिंतकांस वाटूं लागल्यास आश्चर्य नाहीं. यावर कांहीं उपाययोजना

केल्याखेरीज गत्यंतर नाहीं असें वाटून उत्तर हिंदुस्थानांत आर्यसमाजानें अनेक वर्षांपूर्वीपासून काम सुरू केलें होतें. परंतु अगदीं अलीकडे असे प्रयत्न जास्त व्यापक प्रमाणांत व सुसंघटितपणें केल्याखेरीज गत्यंतर नाहींसें झालें. विशेषतः हिंदु मुसलमान यांचे दंगे वाढूं लागून प्रत्येक ठिकाणीं हिंदुसमाज असंघटित असल्या-कारणानें त्यालाच मार खावा लागे. हिंदूंच्या स्त्रिया पळवून नेणें, अनाथ हिंदू दिसतांच त्यास धर्मभ्रष्ट करणें इत्यादि प्रकार जास्त जास्त सुरू झाले. यावर उपाय हिंदुसंघटन हेंच होतें.

हिंदुस्थानांत हिंदु-मुसलमान आज शेंकडों वर्षें एकत्र नांदत आहेत. परंतु अली-कडे १०।१५ वर्षांत या उभय ज्ञातींत वारंवार जो कलहाग्नि पेटतो तो कां ? शेंकडों वर्षें गुण्यागोविंदानें शेजारीं शेजारीं राहणारे अकस्मात् एकमेकांचा गळा चिर-ण्यास प्रवृत्त कां होतात ! याचें कारण कांहींही असलें तरी सूक्ष्मपणें अवलोकन करणाराच्या एक गोष्ट सहज लक्षांत येईल ती अशी कीं, देशांतील राजकार-णांत कांहीं विशेष घडामोडी होण्याचा प्रसंग आला कीं नेमके त्याच वेळीं हे दंगे उद्भवतात. मॉंटफर्ड सुधारणा आल्या व त्यांच्या आगमनाबरोबर उत्तर हिंदुस्थानांत हिंदु-मुसलमानांच्या दंग्यांनीं पेट घेतली. व हीच स्थिति अद्यापपर्यंत कायम आहे. या दंग्याच्या बुडाशीं फोडा व झोडा ही नीतीच आहे हें कोणास उमगत नाहीं असें नाहीं. परंतु अशी कुटिल नीति न फैलावून देण्याचें जनतेच्या हातीं नसल्यानें त्यावर लोकांच्या हातीं असलेला एकच प्रतिबंधक उपाय म्हणजे आपलें बल संवर्धन व संघटन करणें हाच होय. अर्थात् या स्वावलंबी मार्गाकडे राष्ट्रकल्याणेच्छु पुढाऱ्यांचें सहजच लक्ष गेलें. व या कामीं **पं. मदनमोहन** यांच्या बरोबरीनें कार्य करणारे दुसरे श्रद्धेय राष्ट्रपुरुष लाला मुन्शीलाल-स्वामी श्रद्धानंदजी-हे होत. **स्वामी श्रद्धानंदजी** यांनीं यासंबंधांत किती अमूल्य व अफाट कामगिरी केलें हें सर्वश्रुत आहे व त्यांची कामगिरी इतकी उत्कृष्ट झाली कीं, केवळ ज्ञातिविशिष्ट भावना ठेवणाऱ्या परसंस्कृतीच्या लोकांस ती दुस्सह होऊन त्यांतील एका आततायी अधमानें स्वामीजींचा वध केला ही गोष्ट सर्वश्रुत आहे. उत्तर हिंदुस्थानांत हिंदुसमाजांत ज्या दोन विभूतींनीं प्रचंड आत्मविश्वास उत्पन्न करून त्यांस संघटित केलें. त्या दोन विभूति म्हणजे **स्वामी श्रद्धानंदजी** व चरित्रनायक **पंडित मालवीयजी** या होत.

## संघटन.

हिंदुसंघटन स्वराज्योपकारी आहे. हिंदु-मुसलमानामध्यें खरें ऐक्य उत्पन्न व्हावयाचें तर त्यासाठीं हिंदूंचें संघटनच व्हावयास पाहिजे. आज या देशांतील मुसलमानांची स्थिति अशी आहे कीं, त्यांची मातृभूमि ही हिंदभूमि असली तरी त्यांचें सर्व लक्ष तुर्क, अफगाण असें बाह्यांकडे लागलेलें असतें. मुसलमानांत अशी वृत्ती उत्पन्न होण्याला कारण हिंदूंमधील संघटनेचा अभाव हें आहे,या देशांत मुसलमान व ख्रिस्ती अल्पसंख्य आहेत त्यांच्यापुढें मुख्य प्रश्न आहे आत्मरक्षणाचा. परंतु देशांतील बहुसंख्य जो हिंदुसमाज तोच विस्कळीत संघटनाशून्य असल्यानें त्यांना परस्थांच्या तोंडाकडे पाहावें लागतें. व मुसलमानलोक मुसलमानी राष्ट्रांशीं व ख्रिस्ती लोक इंग्लंडशीं नातें जोडूं पाहतात. जगांत दुर्बलाला कोणी विचारीत नाहीं. बलवान् सर्वत्र प्रभाशाली ठरतो. यासाठीं स्वराज्याचा प्रश्न सोडविण्याची जबाबदारी मुख्यतः हिंदूवर आहे. व त्यांनीं आपणांत संघटना केल्यास ही गोष्ट सहजसाध्य होणारी आहे. हिंदूंच्या दुर्बलतेमुळें आजची पराधीनता देशाच्या माथीं पडली आहे. व दुर्बलाच्या दुर्बलपणाचा कोण फायदा घेत नाहीं. ? आज नोकरशाही तसा कायदा घेत आहे.हिंदूंमध्यें ही दुर्बलता, दुर्बलता आहे तरी कोणती ? त्यांजजवळ थोडेंफार द्रव्य आहे. बुद्धि आहे. मनुष्यबळ आहे. कमी आहे फक्त संघटन.

## राष्ट्रधर्माचा विकास पाहिजे.

आज युरोपांतील देशांत जें एक सामुदायिक बल विकास पावलेलें दिसतें याचें कारण त्यामध्यें राष्ट्रधर्माचा उदय झाला हें आहे. सामाजिक जीवन यशस्वीपणें काढावयाचें तर समाजांतील उच्चनीच भाव नष्ट झाले पाहिजेत व तसे ते नष्ट झाले म्हणजेच समाजसंघटन सुलभपणें साधतें. आज हिंदुस्थानांत आहे तशीच स्थिति एका काळीं युरोपांत होती. तेथेंहि हिंदुस्थानाप्रमाणें उच्च-नीच भाव होते. परंतु राष्ट्रधर्माचा उदय होतांच ते पार नष्ट झाले व म्हणून आज युरोप वैभवगिरीवर आरूढ झालेला दिसतो. त्याचें सर्व रहस्य आहे संघटनेंत. एका यंत्राच्या सर्व चक्रांना सारखी गती मिळाली म्हणजे तें यंत्र उत्कृष्ट रीतीनें चालतें तसें संघटनेचें आहे. जगांत आज गुलामगिरीचा जो इतिहास उपलब्ध आहे त्याकडे पाहिलें म्हणजे एकच गोष्ट लक्षांत येतें कीं, तो गुलामगिरीचा इतिहास म्हणजे आपसांतील फुटीचा इतिहास आहे. आजच्या

युगांत संघ. ऐक्य. हेंच बल आहे. हाच शक्तीचा खरा झरा आहे. म्हणून स्वराज्यप्राप्तिच्छु हिंदूंनीं स्वतःकरितां तर असोच पण इतरांच्या कल्याणासाठींहि संघटन करावयास पाहिजे. अशा पवित्र व उदात्त ध्येयानें प्रेरित होऊन हिंदु संघटनेची चळवळ निघाली. परंतु अशा उदात्त हेतूनें ही चळवळ निघाली तरीहि कांहीं वावदुकांनीं तिजविरुद्ध ओरडा करण्यास सुरवात केली. यांना हिंदुस्थानावर हिंदूंचें राज्य पाहिजे म्हणून मुसलमान ओरडू लागले. व हिंदु-सभेसारखी ज्ञातिविशिष्ट संस्था निघाल्यानें कॅांग्रेसवाले रागावून उठले. व हा गैरसमज अद्यापिहि कमी झालेला नाहीं. **पं. मालवीय** यांनीं हिंदु सभेच्या हेतूंची फोड करून सांगतांना अनेक वेळां या आक्षेपांचें निरसन केलें आहे. हिंदु सभेचे जे हेतू आहेत त्यांतहि असें स्पष्ट म्हटलें आहे कीं:—

## हिंदसभेचे उद्देश

( १ ) हिंदुसमाजांतील सर्वपंथानुयायी व वर्गीयांचें परस्परप्रेम संवर्धित करून एकीकरणानें ह्या आपल्या महान् समाजाला सुसंघटित, प्रबल व उत्कर्षोन्मुख करून त्याची सर्वांगीण प्रगति करणें हा हिंदुसभेचा उद्देश आहे.

( २ ) संघटित हिंदु जाती व भारतांतील इतर परधर्मीय जाती यांचा परस्परांत सद्भाव उत्पन्न करून तद्द्वारां या आपल्या भारतभूला स्वयंशासित स्वराज्ययुक्त एक महान् राष्ट्र बनविण्याचा प्रयत्न करण्यासाठीं त्यांच्याशीं मित्रता वाढविणें.

( ३ ) हिंदुजातींतील कनिष्ठ वर्गांसह सर्व वर्गांची उन्नति करून त्यांना उच्चावस्था प्राप्त करून देणें.

( ४ ) हिंदूंच्या हितसंबंधाचें जेथें आवश्यकता पडेल तेथें रक्षण करणें.

( ५ ) हिंदूंचें संख्याबल कायम ठेवणें व तें वाढविणें.

( ६ ) हिंदू स्त्रियांची स्थिति सुधारणें.

( ७ ) गोरक्षण व गोसंवर्धन करणें.

( ८ ) हिंदु जातींतील लोकांचा धर्म, सदाचार, शिक्षण आणि सामाजिक, राजकीय व आर्थिक उन्नति यांसाठीं प्रयत्न करणें.

**टीप**—हिंदु सभा हिंदु जातींतील कोणत्याहि विशेष पंथाचा, राजनैतिक पक्षाचा, पक्षपात वा विरोध करणार नाहीं, किंवा कोणत्याहि पंथांच्या मतांत ढवळाढवळ करणार नाहीं.

हिंदु महासभेचे उद्देश किती व्यापक आहेत हें यावरून दिसून येईल. परधर्मीयांशीं सलोख्यानें, स्नेहभावानें वागावें असा सभेचा मुख्य उद्देश असतांहि मुसलमानांविरुद्ध ही चळवळ असल्याचा डांगोरा कांहीं स्वार्थसाधु संधी सांपडेल तेव्हां पिटीत असतात. **पं. मालवीयजी** यांनींहि या आक्षेपास वेळोवेळीं उत्तरें देऊन गैरसमज दूर करण्याचा मनस्वी प्रयत्न केला आहे.

## हिंदुमुसलमानी ऐक्यासाठीं.

ता. २८ जून १९२३ रोजीं लाहोर येथें भाषण करतांना ते वरील आक्षेपाला उत्तर देतांना म्हणतात.

"हिंदू बलवान् होऊन मुसलमानांना त्यांनीं त्रास द्यावा अशी माझी स्वप्नांतहि कल्पना नाहीं. माझ्या अंतःकरणांत असा विचार आला कीं मी धर्मच्युत झालों असें समजा. माझी मनःपूर्वक अशी इच्छा कीं हिंदु व मुसलमान या दोघांनींहि शक्तिवान् व्हावें व जगांतील इतर लोकांबरोबरीनें उभे राहण्यास लायक व्हावें. हिंदु व मुसलमान यांनीं एकजूट व्हावें, त्यांचे आखाडेहि एकत्र असावेत अशी माझी फार फार मनीषा आहे. गामा व गुलाम यांनीं परदेशीय मल्लांना चीत केल्याचा आनंद हिंदूंना झाला नाहीं असें तर कोणी म्हणणार नाहीं ना? कां हिंदूंपेक्षां मुसलमानांना जास्त हर्ष झाला?

स्वराज्यसोपान चढण्याची पहिली पायरी ऐक्यस्थापन करणें ही आहे. उभयतांचे संबंध इतके दृढ झाले पाहिजेत कीं, ते कोणासहि तोडतां येतां कामा नयेत. या भारतवर्षाचा नागरिक होणें ही फार भाग्याची गोष्ट आहे. या भारतवर्षासाठीं तरी आपण हिंदू मुसलमानांनीं असा निश्चय केला पाहिजे कीं कांहींहि प्रसंग आला तरी धर्माच्या अगर मताच्या बाबतींत आपण तंटा करणार नाहीं. भगिनी, कन्या व माता यांजकडे सन्मानानें पाहिलें पाहिजे. व आज जी आपली दुर्दशा चालली आहे तशी न होऊं देण्याबद्दल आपण जास्त दक्ष राहिलें पाहिजे. दुसऱ्याचें वाईट चिंतणार नाहीं. व दुसऱ्याचें अकल्याण करणार नाहीं, या गोष्टींचा निश्चय केला कीं ऐक्य स्थापन झालेंच म्हणून समजा.

माझा आपल्या धर्मावर दृढ विश्वास आहे. परंतु परधर्माचा अपमान करण्याची कल्पनाहि माझ्या मनाला शिवली नाहीं. एखाद्या चर्चवरून अगर मशिदीवरून मी जातों तेव्हां माझें मस्तक आपोआप नम्र होतें. परमेश्वर एक असतांना आपसांत लढण्याचें कारण काय? भूमि एक, देश एक, वायु एक,

अशी वस्तुस्थिति असतां आपसांत दंगे तंटे असणें यापरती आश्चर्याची गोष्ट कोणती नाहीं. आमचें रक्षण विदेशी सैन्यानें करावें ही मोठी लाजिरवाणी गोष्ट आहे. पाठशाळांतून सैनिक शिक्षण दिलें पाहिजे व गांवोगांव आणि पेठापेठांतून नगररक्षणाची सोय झाली पाहिजे.

बेळगांव येथें ता. २७।२८ डिसेंबर १९२४ रोजीं **पंडितजींच्या** अध्यक्षतेखालीं हिंदुमहासभेचें अधिवेशन झालें त्यावेळीं त्यांनीं पुढील आशयाचें भाषण केलें.

## संघटना कां पाहिजे ?

हिंदुमहासभा ही संस्था जरी अलीकडे निघालेली आहे तरी तिला महत्त्व अतिशय आहे. सर्व हिंदु एकत्र जमतील व आपल्या हिताहिताचा विचार करतील अशी ही एकच संस्था आहे. कॉंग्रेस देखील आपल्या हिताहिताचा विचार करीत नाहीं असें नाहीं, पण ती एकट्या हिंदूंची संस्था नाहीं, तिच्यांत मुसलमानहि आहेत. परधर्मीयांचाहि तींत भाग आहे. हिंदूंची, केवळ हिंदूसाठीं अशी ती संस्था नाहीं, ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. आज हिंदुस्थानांत ज्यांना हिंदु म्हणतात अशा लोकांची संख्या तेवीस कोटी आहे, पण आज सर्वत्र त्यांच्यावरच अत्याचार होत आहेत ! हिंदूंची एवढी मोठी संख्या, मग ते इतके दुबळे कां ? या प्रश्नाचा आपण विचार करा म्हणजे त्याचें उत्तर तुम्हांला समजेल. आपल्यांत संघटन नाहीं व इतर धर्मांच्या अनुयायांत तें आहे. आम्ही मुसलमान किंवा ख्रिस्ती यांचा द्वेष बिलकुल करीत नाहीं. पण आम्ही स्वतःचें संरक्षण करीत आहों. हिंदुस्थानला जर स्वराज्य पाहिजे असेल, तर मुसलमान जसे सुसंघटित व सामर्थ्यवान् झाले आहेत, तसेंच हिंदूंनीं व्हावयास पाहिजे व हें सामर्थ्य संघटनेंत आहे, एकींत आहे. हिंदुसमाजांतील सर्व जातींनीं एक झालें पाहिजे. इतर धर्मांच्या लोकांना जसा आपला इतिहास, आपली संस्कृति, आपला धर्म सर्वांत प्रिय आहे, त्यांचा जसा त्यांना अभिमान वाटतो, तसा अभिमान वाटावा इतक्या उच्च दर्जाचें आमचें वाङ्मय आहे. आमची संस्कृति व धर्महि तसाच श्रेष्ठ आहे. याचा आम्हास अभिमान वाटतो व तसा प्रत्येक हिंदूस वाटला पाहिजे. आज हिंदु लोक बलवान् असूनहि बलहीन आहेत; धनवान् असूनहि निर्धन आहेत. याचें कारण ते धर्मनिष्ठ नाहींत; धर्म आम्हाला समजत नाहीं; याकरितां गांवोगांव, तालुक्यातालुक्यांतून, जिल्हानिहाय हिंदु–

सभा स्थापन झाल्या पाहिजेत व त्यांच्या वारंवार सभा भरविल्या पाहिजेत. लोकांत सामर्थ्य उत्पन्न होण्यासाठीं **ब्रह्मचर्यप्रतिपालनाची आवश्यकता** फार आहे. आजची आपली जी तरुण पिढी आहे व जी नवीन निर्माण होत आहे ती अत्यंत दुर्बल होत चालली आहे. याचें कारण ब्रह्मचर्याचा अभाव. ब्रह्मचर्यानें युक्त असे पुत्र व कन्या यांची संख्या घटत आहे. ती वाढविली पाहिजे. मुलीचें लग्न बारा वर्षांच्या आंत व मुलाचें अठरा वर्षांच्या आंत नाहींच करावयाचें असा सर्वांनीं निश्चय केला पाहिजे.

## दलितांचा उद्धार करा.

दलित जातीचा उद्धार करणें हें आपलें सर्वांत मोठें काम आहे. सर्वांनीं उचल केली तर तें सुकर होईल. त्यांना आपल्या विहिरीवर पाणी भरण्यास मोकळीक द्या, त्यांच्यासाठीं निदान दुसऱ्या विहिरी तरी तयार करा, पण त्यांच्यांत आपल्याविषयीं आपलेपणा उत्पन्न करा. त्यांच्यांत हिंदुधर्माचा जिवंत अभिमान उत्पन्न करा. त्यांना देवळांचे मार्ग मोकळे करा. त्यांना देवदर्शन घेऊं द्या. चतुर्भुज नारायणाची, विष्णूची, मूर्ति त्यांना अवलोकन करूं द्या. त्यांना शाळेंत आपल्या मुलांशेजारीं बसून शिकूं द्या. असें केल्यानें त्यांना आपल्याविषयीं प्रेम वाटेल, हिंदु धर्मावरील श्रद्धा दृढावेल, व धर्मकार्य आणि देशकार्य घडेल.

परधर्मांतील जे लोक आपल्या धर्मांत खुषीनें येतील त्यांना आपल्या धर्मांत घ्या. मलकाना रजपुतांची हकीकत सर्वप्रसिद्ध आहे. ते मूळचे हिंदु असून बाटवून मुसलमान केलेले, नव्हे हिंदुधर्मीयांनीं त्यांना मुसलमान समजून दूर ठेवलेले! ते मुसलमान झाले हा अपराध त्यांचा नसून आपल्या समाजाचा आहे. त्यांना शुद्ध करून घेणें हें आपलें कर्तव्य आहे. ज्या कोणास स्वखुषीनें हिंदुधर्मांत यावयाचें असेल, त्यांस हिंदु करून घेणें आपलें काम आहे. यांत आपण परधर्मीयांचा द्वेष करीत नसून, आपल्या धर्माची महती गात आहों. आपला धर्म हजारों वर्षांचा जुना आहे. वेद, पुराणें, उपनिषदें, यांचा आपणास अभिमान वाटला पाहिजे. तो वाटेल तर सर्वांचा एकजीव होईल, संघटन होईल, सामर्थ्य वाढेल, धर्म समजेल, व आपल्याला अभ्युदय व निःश्रेयस दोनहि प्राप्त होतील.

बेळगांव येथें भरलेल्या हिंदुसभेचें अधिवेशन आटोपून **पंडितजी** परत जात असतां पुण्यास त्यांचें हिंदुसभेमार्फत व्याख्यान झालें, त्यांत ते म्हणाले:—

# हिंदुधर्माची आजची स्थिति.

ज्या श्रीशिवाजीमहाराजांनीं रामदासस्वामींच्या उपदेशानें हिंदुधर्माचें रक्षण केलें त्यांच्या मूर्तीची येथें स्थापना झाली आहे हें पुणेंकरांचें महद्भाग्य होय. पण शिवाजीनें रक्षण केलेल्या या हिंदुधर्माची आज स्थिति काय आहे ? तत्त्वज्ञान-दृष्ट्या आपला धर्म जगांतलि सर्व धर्मांत अत्यंत श्रेष्ठ असा असून या तत्त्वज्ञानानें पाश्चात्य पंडितांनाहि मोहित केलें आहे. अशा धर्माचीं मूलतत्त्वें काय आहेत एवढें देखील प्रत्येक हिंदुधर्मीयास अवगत असूं नये ही स्थिति शोचनीय नव्हे काय ? मुसलमान व ख्रिस्ती लोक आपल्या धर्माचा प्रसार करण्याकरितां आटो-काट प्रयत्न करीत असतां आपण मात्र एकमेकांत झगडत आहों ! राष्ट्रपुरुषाचे अवयव एकमेकांत कलह करूं लागल्यास त्या राष्ट्रपुरुषाची अवस्था कशी होते हें निराळें सांगावयास नको. हिंदु मुलांना आपल्या धर्माचीं मुख्य तत्त्वें देखील माहित नाहींतशीं झालीं आहेत; मग आचार तर दूरच राहिला. प्रातःसंध्या, सायंसंध्या नित्य वेळेवर करणारे किती इसम सांपडतील याची शंकाच आहे. ब्रह्मचर्याचें महत्त्वहि आजच्या तरुण पिढीस समजून देण्यांत न आल्यानें ब्रह्म-चर्याचा ऱ्हास होऊन जिकडे तिकडे दुबळे व निराशावादी तरुण दिसत आहेत.

ही दुरवस्था नष्ट करण्याकरितां हिंदुधर्मसभेची शाखा प्रत्येक मोठमोठ्या गांवीं स्थापन झाली पाहिजे. या सभेमार्फत नित्य तास अर्धातास सार्वजनिक भजन अगर पुराण व्हावें. दरएकादशीस कीर्तन व्हावें व त्याकरितां एक तास इतर सर्व व्यवहार बंद ठेवून सर्व हिंदुमात्रांनीं कीर्तनश्रवणास यावें. दर पौर्णिमेस व अमावास्येस प्रत्येक गांवीं आळोआळींत हिंदुधर्मांतलि अस्पृश्यांसुद्धां सर्वांची एकत्र सभा होऊन सामाजिक गोष्टींची चर्चा व्हावी आणि या बैठकींतच पतितपरावर्तन, अनाथसंरक्षण, अस्पृश्योद्धार इत्यादि प्रश्नांचा खल व्हावा; शारी-रिक बलाला प्रोत्साहन देण्याकरितां कुस्त्या, खेळांचे सामने वगैरे प्रकारहि याच वेळीं घडवून आणून बक्षिसें वांटण्यांत यावीं.

## संघटन कसें होईल ?

आपल्या येथें श्रीशिवाजीमहाराजांच्या समोर दररोज अर्धा तास भजन, प्रव-चन, कीर्तन वगैरे प्रकार चालू केल्यास आपली आत्मिक शक्ति वृद्धिंगत होऊन आपला हिंदुधर्माचा अभिमानहि वाढूं लागेल. दररोज पांच मिनिटें कोणत्याहि

रूपानें एकाग्र मनानें ईश्वराची उपासना केल्यास आपल्या मानसिक शक्तींत आणि शीलांत केवढें अंतर पडतें याचा स्वतः अनुभव घेऊन पाहा. चहापाना-सारखीं शरीराचा ऱ्हास करणारीं व्यसनें सोडून व ब्रह्मचर्य पाळून शरीरसंपत्ति कमवा, अस्पृश्यांचा उद्धार करून त्यांच्यांत उद्भवणारी हिंदुधर्मांतून बाहेर जाण्याची प्रवृत्ति नष्ट करा, पतितपरावर्तन करून आपल्या धर्माची महती वाढवा, वेद, उपनिषदें, भारत, भागवत, रामायण, गीता, भीष्मस्तवराज, विष्णुसहस्र-नाम, दासबोध, तुकारामाचे अभंग यांतून जो कोणता ग्रंथ तुम्हांस प्रिय असेल त्याचें स्वाध्याय म्हणून नित्य थोडा वेळ तरी मननपूर्वक पारायण करा. बायबल सोसायटी ज्याप्रमाणें आपल्या धर्मग्रंथाचा प्रसार करिते त्याप्रमाणें हिंदुधर्माचीं मुख्य लक्षणें आणि आवश्यक आचार यांसह गीतेच्या भाषांतराचें पुस्तक प्रत्येक भाषेंत छापवून तें गोरगरिबांना फुकट वांटा. अशा रीतीनें आपल्या धर्माची आपण जोपासना केली तरच सध्यांच्या कलहयुगांत आपला धर्म टिकाव करूं शकेल आणि तो आपलें ऐहिक व पारलौकिक कल्याण करील.''

ता. १४ माहे एप्रिल १९२६ रोजीं लखनौ येथें अयोध्या हिंदु परिषदेचें अधि-वेशन **भाई परमानन्द** यांचे अध्यक्षतेखालीं भरलें होतें. त्यावेळीं कौन्सिल निवडणुकीचा ठराव पुढें आला. त्याला **पं० मदनमोहन मालवीय** यांनीं दुजोरा दिला. दुजोरा देतांना त्यांनीं जातवार प्रतिनिधित्वाचें तत्त्व कसें उत्पन्न झालें व हें जातवारीचें भूत सर्वत्र कसें थैमान घालूं लागलें आहे याचा इतिहास सांगितला व ते म्हणाले, ' हिंदुसभांनीं निवडणुकी लढविण्याची परिस्थिति सरकारनें निर्माण केली आहे. कॉंग्रेसमध्यें बहुतेकांना आपणास हिंदु म्हणवून घेण्याची लाज वाटते. कॉंग्रेस ही मूठभर लोकांची नाहीं. हल्लीं तींत स्वराज्यपक्षाचे प्राबल्य असून सुबुद्ध माणसाला पटण्यासारखें तिचें धोरण नाहीं. ते अडवणुक करण्याच्या गोष्टी करीत कौन्सिलांत शिरले. परंतु क्रमानें अडवणुकी करून शक्य तेथें विरोधावर घसरले. **पटेल** यांनीं अध्यक्षपद स्वीकारल्यावर व **नेहरूंनीं** स्कीनकमिटीवरील जागा घेतल्यावर तर विरोध अजिबात नष्टच झाला. **पं० नेहरूंनीं** एकदां कमिटीवरील जागा पत्करल्यावर मध्येंच ती सोडण्यांत अत्यंत अदूरदर्शीपणा झाला. व असेंब्लींतील स्वराज्यपक्षाचें धोरण निरर्थक असेंच ठरलें. ' जे प्रतिनिधी कौन्सिलांतून हिंदुहितरक्षण करतील त्यांसच निवडून द्या. '

मार्च १९३१ मध्यें कानपुरास हिंदु-मुसलमानांत मोठा दंगा झाला. त्यानंतर लागलीच म्हणजे ता. ११ एप्रील १९३१ रोजीं कानपुरांत हिंदु-मुसलमानांची जंगी जाहीरसभा झाली. तींत भाषण करतानां **पंडितजी** म्हणाले,

" मी मनुष्यतेचा पूजक आहे. मनुष्यत्वापुढें मी जात पात मानीत नाहीं. कानपुरांत जो दंगा झाला त्याला हिंदु अगर मुसलमान यांपैकीं एकच जात जबाबदार नाहीं. जबाबदारी दोन्ही जातींवर सारखी आहे. माझें आपणास आग्रहपूर्वक असें सांगणें आहे कीं, ज्या हिंदूंनीं मुसलमानांना व मुसलमानांनीं हिंदूंना ठार केलें त्यांच्या पवित्र नांवाला साक्षी ठेऊन अशी प्रतिज्ञा करा कीं यापुढें भावाभावाशीं असें युद्ध करणार नाहीं. वृद्ध, बाल, व स्त्रिया यांवर हात टाकणार नाहीं. मंदिरें व मशिदी भंग केल्यानें धर्माची श्रेष्ठता वाढत नाहीं. अशा दुष्कर्मानें परमेश्वर प्रसन्न होत नसतो. आज तुम्हीं आपसांत लढून जे अत्याचार केले त्याचा जाब तुम्हांस परमेश्वरापुढें द्यावा लागणार आहे, हें ध्यानीं ठेवा. हिंदु व मुसलमान या दोघांत जोंपर्यन्त प्रेमभाव उत्पन्न होणार नाहीं, तोंपर्यंत कोणाचेंहि कल्याण होणार नाहीं. एकमेकांचे अपराध विसरा व एकमेकांना क्षमा करा. परस्परांविषयीं सद्भाव व विश्वास वाढवा. गोरगरिबांची सेवा करा, त्यांना प्रेमानें मिठ्या मारा व आपल्या कृत्यांचा पश्चात्ताप करा."

या प्रकारचा अनेक वेळां स्पष्ट खुलासा केला असला तरीहि मुसलमानी समाजाचा हिंदुसभेवर रोष आहे तो कायमच. याचें कारण त्यांना यावी तशी राष्ट्रीय दृष्टि आली नाहीं हेंच होय. हिंदुसभेवर जातिविशिष्ट संस्था म्हणून गहजब करणारांनीं उभय जातींची राष्ट्रीय भूमिका काय आहे ती प्रथम पाहावी. दिल्ली येथें डिसेंबर १९२८ मध्यें भरलेल्या मुसलमानांच्या सभेंत त्यांनीं अशा मागण्या केल्याः—

## मुसलमानांच्या अराष्ट्रीय मागण्या.

( १ ) हिंदुस्थानमध्यें यापुढें राज्यघटना ही ' फेडरल ' असावी, ' युनिटरी ' असू नये. म्हणजे सत्तेच्या दृष्टीनें मध्यवर्ती हिंदुस्थानसरकार हें सर्वश्रेष्ठ असें मानलें न जातां, स्वायत्त अशा निरनिराळ्या प्रांतांच्या एका ' संघाच्या ' हातीं ही मुख्य सत्ता असावी.

( २ ) प्रत्येक प्रांत आपापल्या कारभारामध्यें सर्वसत्ताधीश असावा.

( ३ ) कांहीं विशिष्ट मोजक्या नेमक्या शब्दांनीं उल्लेखिलेल्या अशा विषया-संबंधाची सत्ता मध्यवर्ती सरकारच्या हातीं राहावी.

( ४ ) अशा रीतीनें वांटून दिल्यावर उरतील ते शेषाधिकार, म्हणजे जे अधिकारघटनेंत अनुल्लेखित राहतील किंवा ज्यांच्या वाटणीसंबंधानें संशय उत्पन्न होईल. असे अधिकार प्रांतिक सरकारचे हातीं रहावेत.

( ५ ) वरिष्ठ किंवा प्रांतिक कायदेमंडळांत हिंदु व मुसलमान या दोनहि समाजांचा संबंध येईल तेथें, कोणत्याहि समाजाच्या प्रतिनिधींपैकीं ¾ प्रतिनिधी हरकत घेतील तेथें त्या विषयाची चर्चा होऊं नये.

( ६ ) जातवार वेगळे मुसलमान मतदारसंघ आज इतकीं वर्षे अमलांत राहिल्याकारणानें, तो या देशांतील एक सुप्रतिष्ठित असा कायदाच बनून गेला आहे. याकरितां ती स्थिति बदलण्याचा कोणासहि अधिकार नसावा.

( ७ ) निरनिराळ्या कायदेमंडळांतून किंवा प्रातिनिधिक संस्थांतून मुसल-मानांच्या प्रतिनिधींची संख्या म्हणजे हिस्सा आहे तसाच तो अबाधित रहावा. म्हणजे ज्या प्रांतांत मुसलमान हे संख्येनें अधिक असतील तेथें त्यांच्या प्रतिनिधींची संख्या इतर कोणतेंहि तत्त्व लावलें तरी, हल्लींहून कमी होऊं नये. आणि ज्या प्रांतांत मुसलमान हे संख्येनें थोडे आहेत तेथेंहि त्यांना लोकसंख्येच्या प्रमाणाबाहेर अशी प्रतिनिधी-संख्या दिली आहे ती अशीच कायम राहिली पाहिजे.

( ८ ) वरिष्ठ कायदेमंडळामध्यें मुसलमान प्रतिनिधींची संख्या कमींत कमी ⅓ असली पाहिजे.

( ९ ) सिंध प्रांताचा मुंबई इलाख्याशीं वास्तविक कांहींच संबंध नसल्या-कारणानें, सिंध हा एक स्वतंत्र प्रांत बनविण्यांत यावा. मात्र तेथेंहि हिंदू हे संख्येनें थोडे म्हणून, इतर प्रांतांत अल्पसंख्यांक मुसलमानांना ज्या सवलती मिळतील त्या सिंध प्रांतांत हिंदूंना देण्यांत याव्या

( १० ) बलुचिस्थान, वायव्य सरहद्दीचा प्रांत हे कारभाराच्या दृष्टीनें स्वतंत्र प्रांत बनविण्यांत यावेत व तेथेंहि हिंदू लोक संख्येनें थोडे म्हणून त्यांना वरीलप्रमा-णेंच सवलती देण्यांत याव्या.

( ११ ) प्रत्येक प्रांतांत सरकारी नोकरी वगैरे बाबतींत मुसलमानांना लोक-संख्येप्रमाणें योग्य हिस्सा असेल तो द्यावा.

( १२ ) अशा रीतीनें स्वराज्याची घटना एकदां ठरल्यावर त्या घटनेंत समाविष्ट असलेल्या सर्व घटकांची संमति असल्याशिवाय तिच्यांत कोणतेहि फेरफार करण्यांत येऊं नयेत.

( १३ ) मुसलमान समाजानें ही मागणी निश्चित केलेली असल्यामुळें दुसऱ्या कोणीहि कोणतीहि घटना किंवा योजना निराळी सुचविली व तींत वरील तत्त्व ग्रथित केलें गेलें नाहीं, तर ती घटना किंवा योजना मुसलमान समाजाला केव्हांहि मान्य होणार नाहीं.

वरील मागण्यांची भाषा वाचणारांच्या लक्षांत हें तेव्हांच येईल कीं मुसलमानांना खरा ' सवता सुभा ' म्हणून जो हिंदुस्थानांत पाहिजे तो यांत आहे. पण यांत याहूनहि थोडा खोल अर्थ आहे.

प्रथम एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे ती ही कीं, हिंदुस्थानाबाहेर हिंदु लोकांचा ऋणानुबंध कोणाशींहि नाहीं. त्यांच्या जातीचे लोक किंवा धर्माचे लोक बाहेर कोठेंहि नाहींत. यामुळें त्यांना बाहेरून कोठूनहि सहानुभूति, मदत किंवा बळ केव्हांहि मिळणार नाहीं. याच्या अगदीं उलट मुसलमानांची स्थिति आहे. आणि ही गोष्ट डोळ्यापुढें ठेवून मुसलमानांनीं आपलें धोरण आंखलें आहे. हिंदुस्थानांत मुसलमान संख्येनें थोडे, पण त्यांच्या भरतीला बाहेरचे जमेस धरले म्हणजे हिंदूंपेक्षां मुसलमानांची लोकसंख्या एकंदर अधिक आहे. जोंपर्यंत हिंदुस्थानांत इंग्रजांचें राज्य आहे व तें सुरळीत चालू आहे तोंपर्यंत गोष्ट वेगळी, पण उद्यां बंड झालें, युद्ध उभें राहिलें म्हणजे ' अंगोरापासून सहारापर्यंत ' एकजिनसी मुसलमानांचा मुलूख होईल. आणि एवढ्या मोठ्या क्षेत्रांतील एकजिनसी धर्मवाल्यांचें बळ संघटित झालें असतां हिंदूसमाजावर तें एक मोठें संकटच कोसळेल. असो.

याच्या उलट हिंदुसभेनें आपली राष्ट्रीय भूमिका अनेक वेळां स्पष्ट केली आहे. यासंबंधानें हिंदुसभेनें आपली भूमिका स्पष्ट शब्दांत पुढीलप्रमाणें मांडली आहे.

## हिंदुमहासभेची राष्ट्रीय भूमिका.

जातिविषयक गोष्टींत आजपावेतों हिंदुमहासभेनें अव्याहतपणें राष्ट्रीय भूमिकाच स्वीकारली आहे. अखिल राष्ट्राच्या कल्याणासाठीं प्रस्थापित होणाऱ्या

विधिमंडळांतून जातवारीचें तत्त्व घुसडून जातिप्रधान मतदारसंघ स्थापणें हें जबाबदारराज्यपद्धतीला अगदींच विसंगत आहे. जबाबदार राज्यघटना निर्माण करण्यासाठीं सर्व जातींनीं स्वार्थत्याग केला पाहिजे असें हिंदुमहासभेचें प्रथमपासून मत आहे व तदनरूप तिनें आपलें प्रत्यक्ष आचरणहि ठेवलें आहे. जातिजातींमधील विश्वासाची आणि सहकार्याची उभारणी आर्थिक, सामाजिक व राजकीय प्रश्नांवरच झाली पाहिजे. हिंदुमहासभेची राष्ट्रिय भूमिका खालील ठरावानें व्यक्त झाली आहे.

( १ ) एकाच राष्ट्राचे नागरिक व घटकावयव म्हणून सर्व जातींच्या मतदारांचा एक सामान्य मतदारसंघ असावा.

( २ ) जातिप्रधान व विभक्त असे मतदारसंघ स्थापण्यांत येऊं नयेत.

( ३ ) कोणत्याहि विधिमंडळांत एकाद्या जातीसाठीं जागा राखून ठेवण्यांत येऊं नयेत.

( ४ ) कोणत्याहि जातीला संख्याप्राधान्य ( वेटेज ) देण्यांत येऊं नये.

( ५ ) प्रांतांतील मतदानपद्धति सर्व जातींसाठीं एकसारखी ( युनिफॉर्म ) असावी.

( ६ ) वरिष्ठ विधिमंडळासाठीं किंवा संयुक्त राज्यपद्धतीसाठीं सर्व जातींकरितां एकमुखी मतदानपद्धति असावी.

( ७ ) राष्ट्रसंघानें ठरविल्याप्रमाणें भाषा, धर्म, आणि वर्णाचार एतत्संबंधीं राज्यघटनेंतच अल्पसंख्यांकांना रक्षण देण्यांत यावें.

( ८ ) बहुसंख्याकांना कोणत्याहि सबबीवर ( राखीव जागा वगैरेसंबंधीं ) संरक्षण देण्यांत येऊं नये.

( ९ ) भाषा, राज्यघटना, आर्थिक प्रश्न वगैरे बाबींचा बारकाईनें विचार केल्याशिवाय सध्यां असलेल्या प्रांतमर्यादा बदलण्यांत येऊं नयेत.

( १० ) अवघ्या हिंदुस्थानचें एकराष्ट्रीयत्व व हित साधण्यासाठीं अवशिष्ट अधिकार ( रेसीड्युअरी पॉवर्स ) मध्यवर्ती विधिमंडळालाच देण्यांत यावेत.

( ११ ) सरकारी नोकऱ्या, मानसन्मान वगैरेसारखे सामाजिक व राजकीय हक्क उपभोगण्यास कोणत्याहि हिंदी नागरिकाला प्रतिबंध करण्यांत येऊं नये.

## सबल व्हा.

हिंदुसभेनें आपली राष्ट्रीय भावना अशी स्पष्ट केली असतांनाहि उभय ज्ञातींत ऐक्य कां होत नाहीं ? या गोष्टीच्यामागें एखादें राजनैतिक कारस्थान नसेल असें नाहीं. असेलहि. ही गोष्ट लक्षांत घेऊन सुद्धां ऐक्यसाधनासाठीं हिंदूंनीं आपले प्रयत्न सोडतां कामा नयेत. व त्यावर स्वावलंबनाचा उपाय म्हणजेच हिंदुसंघटन होय ! हें साध्य केव्हां होईल ? मुसलमानांच्या अंतः-करणांत हिंदूंशीं प्रेमानें वागण्याची बुद्धि केव्हां होईल ? याचें उत्तर असें कीं मनुष्याचा आपल्या बरोबरीच्याशीं नेहमीं स्नेह जडत असतो. आज मुसलमान समाज संघटित आहे व हिंदुसमाज मोठा असून विस्कळित असल्यानें तो दुर्बल आहे व अशा दुर्बलाशीं मैत्री कोण करणार ! कमजोर व शिरजोर यांच्यांत सख्य कसें उत्पन्न होईल ! यासंबंधानें **पंडितजी** म्हणतात, 'आमच्या अप-मानाचें कारण मुसलमान नाहींत; आमची दुर्बलता कारण आहे; ही दुर्बलता काढून टाका. ज्या दिवशीं मुसलमानांना समजून येईल कीं मुसलमानांच्या एका प्रहारास हिंदूंचे दोन टोले बसल्याखेरीज राहणार नाहींत त्याचवेळीं खरी एकी होईल. परंतु आपल्या बलसंवर्धनाचा उपयोग आपणास राष्ट्रकार्यासाठीं करावयाचा आहे. आम्हांला कोणावर प्रभुत्व गाजवावयाचें नाहीं, परंतु आपला मान व धर्मरक्षण करण्यासाठीं प्राण देण्यास सज्ज असलें पाहिजे. आम्हीं आपल्या कर्तव्यापासून च्युत झालों आहों, राष्ट्रीय धर्म डोळ्यासमोर ठेऊन जीं कामें हिंदु व मुसलमानांनीं एकत्र करतां येण्यासारखीं आहेत तीं एकजुटीनें करा. नगररक्षण, नागरिकदलांत, उभयतांनीं एकोप्यानें काम केलें पाहिजे. वाटेल ते प्रयत्न करून मुसलमानांशीं मिळतें घेतलें तर सर्वांचेंच हितसाधन होणार आहे. मुसल-मानांनीं हिंदूवर अत्याचार केले तर ज्या वेदना माझ्या अंतःकरणाला होतात त्यावर उपाय एकीखेरीज नाहीं. या ज्वरावर संघटन हेंच एक औषध आहे."

परंतु शरीरांत बल असेल तर या सर्व गोष्टी साध्य होणार हें उघड आहे. म्हणून **पंडितजींचा** ब्रह्मचर्यावर अत्यंत भरंवसा आहे. तरुणांनीं ब्रह्मचर्याचें यथोचित पालन करावें, शरीरसंपत्ति वाढवावी, वरि हनुमंताचें चरित्र डोळ्यापुढें ठेवावें. भीष्मचरित्र हृदयस्थ करावें, असा विद्यार्थ्यांना, तरुणांना त्यांचा नेहमीं उपदेश असतो. गांवोगांव मल्लशाळा घाला, तरुण शक्तिवान् धीमन्त होतील असें शिक्षण द्या असा टाहो फोडून ते उपदेश करीत असतात. बडोदा येथें तरुणांना उपदेश करतांना ते म्हणाले,

**सत्येन ब्रह्मचर्येण व्यायामेनाथ विद्यया**
**देशभक्त्या त्यागेन मानवः सततं रह ॥**

सत्याला धरून चाला; ब्रह्मचर्य पाळा, २५ वर्षे मुलांकरितां आणि १६ वर्षे मुलींकरितां म्हणजे मरेपर्यंत प्रत्येकजण ब्रह्मचर्य पाळा, नित्य व्यायाम करा, कीं, ज्याच्यायोगानें तुम्ही कोणास हार जाणार नाहीं ·विद्या पण खूब मिळव, त्यामुळें तुमची उन्नति होईल. देशभक्तीचें ब्रीद राखा, आत्मत्याग करा. म्हणजे तन, मन, आणि धन देश आणि समाजाच्या हिताकरितां अर्पण करा हे सहा गुण धारण करून सर्वत्र सन्मान मिळवा. हाच तुम्हां विद्यार्थ्यांना माझा आशीर्वाद आणि हाच माझा उपदेश आहे.

## अस्पृश्यता नष्ट करा.

हिंदु महासभेंत ब्राह्मणापासून सर्व वर्णांचा समानतेनें समावेश होतो. तेथें उच्चनीच भाव नाहीं. फक्त तो हिंदू असला म्हणजे झालें. अस्पृश्य समजला जाणारा वर्ग हिंदुधर्माचा कट्टा अभिमानी आहे. इतर हिंदूप्रमाणेंच तोहि शेंडी राखतो, रामनाम स्मरण करतो, मलशुद्धीचें काम झाल्यानंतर स्नान करून मोठ्या भक्तिभावानें एकादशीसारखें व्रत पाळतो, सत्यनारायणासारख्या कथाहि करतो. अशांना हिंदू म्हणतां पण त्यांना दूर राखतां हा त्यांचा परमावधीचा अपमान आहे, असें **पंडितजी** म्हणतात. परंतु हे लोक अशा स्वच्छतेनें वागत असतांहि त्यांना नुसतें देवदर्शन घेण्यास मनाई प्रतिबंध असणें हा त्यांजवर अक्षम्य जुलूम आहे. स्पृश्याप्रमाणेंच अस्पृश्यहि हिंदुधर्माचे अभिमानी असतां त्यांना मंदिर-प्रवेशाला प्रतिबंध, सार्वजनिक विहिरी, तळीं यांवर पाणी भरण्यास मज्जाव, या गोष्टीमुळें अस्पृश्य समाज दूरावूं लागला, तेव्हां हिंदु-संघटनेचें कार्य करावयाचें म्हणजे प्रथम अस्पृश्यतानिवारणाचें काम येतें. पवित्रतेच्या–शौच–उच्च सिद्धांतावर हिंदुसमाज व्यवस्थापकांनीं आचार-धर्माच्या मर्यादा घालून दिल्या(Cleanliness is Godliness) हा सिद्धांत ते मानीत होते. पुढें मुसलमानांच्या कालांत आचारधर्माला स्पृश्यास्पृश्यतेचें स्वरूप आलें. व तें इतकें कीं, हिंदुधर्माचें तें एक अंगच मानण्यांत येऊं लागलें. पुढें पुढें या स्पृश्यास्पृश्यतेचा इतका अतिरेक झाला कीं नुसत्या स्पर्शानें मनुष्य पतित, भ्रष्ट होऊन समाजास कायमचा पारखा झाला. व परधर्मीयांची भरती होऊं

लागली. ख्रिस्ती पाद्र्यांनीं विहिरींत पाताचा. तुकडा टाकला कीं गांवचा गांव हिंदु धर्मास पारखा होऊं लागला. व असल्या क्षुल्लक आणि क्षुद्र गोष्टींमुळें जे लोक धर्म व जातिवंचित झाले त्यांनींच हिंदु धर्मावर प्रहार करण्यास सुरवात केली. **कालाचांद्** यांचें या बाबतींत उदाहरण ठळक आहे.

हिंदुस्थान स्वराज्यवंचित होण्याला जीं अनेक कारणें झालीं त्यांत स्पृश्यास्पृश्यासारख्या अस्वाभाविक भेदासारखीं बरींच कारणें आहेत. अशा रीतीनें समाज फुटला, विस्कळीत झाला; व समाज एकदा विस्कळीत झाल्यावर मग तो तग धरणार कशी ? हिंदुसमाजाची अशीच स्थिति झाली. हिंदु समाजांतील या स्थितीचा फायदा ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं चांगला घेतला. व मुसलमानांनींहि कमी घेतला नाहीं. यासंबंधानें पंडितजींनीं एका व्याख्यानांत एक उदाहरण सांगितलें. मीरत जिल्ह्यांत एक जमीनदार होता त्याचीं कुळें अस्पृश्य होतीं. त्यांनीं मिशनऱ्यांच्या फुसलावणीवरून ख्रिस्ती धर्म स्वीकारला.ते अस्पृश्य ख्रिस्ती होतांच त्यांनीं आम्हीं ख्रिस्ती झाल्यामुळें जमीनदार आम्हावर जुलूम करतो अशी मिशनऱ्याकडे तक्रार केली. मिशनऱ्यानें तेथील मॅजिस्ट्रेटला लिहिलें. याचें पर्यवसान काय झालें असेल तें सांगण्याची आवश्यकता नाहीं. याच्या उलट दुसरा प्रकार पाहा. पानिपत येथें मुसलमानांनीं तेथील अस्पृश्यांना चिथावून दिलें. तेथील विहिरीवर अस्पृश्यांना पाणी भरूं देत नसत. मुसलमानांनीं त्यांना चिथावून, तुम्ही मुसलमान झालां तर याच विहिरीवर तुम्हांला पाणी भरतां येईल, ही गोष्ट पटवून दिली. हा प्रकार तेथील जमीनदाराला समजतांच त्यानें अस्पृश्यांना सांगितलें कीं तुम्ही या विहिरीवर खुशाल पाणी भरा, तुमची व माझी दोघांचीहि ही विहिर आहे.अशा रीतीनें त्यानें मुसलमानांचा डाव हुकवून अस्पृश्यांना परधर्मप्रवेशापासून निवृत्त केलें व तंटा आपोआप मिटला. प्रश्न अगदीं थोडा आहे. पण जरा तो विचारानें सोडविला पाहिजे. पुढें मुसलमान असंतुष्ट होऊन त्यांनीं जेव्हां हिंदु मंदिरावर हल्ला केला, तेव्हां हेच अस्पृश्य हातांत काठ्या घेऊन मंदिरांचे रक्षणासाठीं धांवून गले. व प्राण अर्पण करून त्यांनीं मंदिराचें रक्षण केलें.अशी स्थिति उघड असतां अस्पृश्याविषयींचा अन्याय दूर होणें अत्यावश्य आहे हें जाणून **पं. मालवीयजी** अस्पृश्यतानिवारणाचा सदैव सक्रिय पुरस्कार करीत असतात.

## दीक्षा-समारंभ.

ता ३० डिसेंबर १९२९ रोजीं कलकत्ता येथें कँग्रेसचें अधिवेशन भरलें असतांना पंडितजींनीं तेथें अस्पृश्यांना दीक्षा देण्याचा विधि केला. तो प्रकार असा.

ता. ३० रोजीं सकाळीं कलकत्ता येथें गंगातटाकीं लोहघाटावर **पं० मदनमोहन मालवीय** यांच्या नेतृत्वाखालीं अस्पृश्यादि हिंदूंना समंत्रक ओंकारपूर्वक दीक्षा देण्यासाठीं तयारी झाली. समारंभासाठीं एक शामियाना उभारण्यांत आला असून होमाची व दीक्षेची तयारीहि करण्यांत आली. **पं०मालवीयजी** आठाच्या सुमारास येऊन हजर झाले. व्यवस्थापक मंडळी व दीक्षा घेणारे लोक जमतात न जमतात तोंच कांहीं मारवाडी व जुन्या मताचे कांहीं शास्त्री बरोबर बरेचसे गुंड घेऊन समारंभाच्या ठिकाणीं उपस्थित झाले. व एकदां उभारलेला शामियाना उखडून समारंभासाठीं जमवलेला साहित्यसंभार त्यांनीं उधळून टाकला. मालवीयजींनीं हा प्रकार पाहतांच ते तेथून नदीच्या पात्राजवळ गेले. व तेथें समारंभ करण्याची सिद्धता करूं लागले. परंतु सनातनी लोकांनीं गोळा केलेल्या गुंडांनीं त्यांचा तेथेंहि पाठलाग केला व त्यांच्या कामांत व्यत्यय आणूं लागले. पंडितजींनीं त्यांच्या पुढाऱ्यांना शांतपणें सांगितलें कीं यासंबंधानें कोणाचा शास्त्रतः विरोध असल्यास मी त्यांच्यापैकीं कोणाहि पंडिताशीं वाद करण्यास तयार आहे. इतक्यांत गुंडांनीं पंडितजीस वेढा दिला व त्यांच्या अंगावर चिखलमाती उडवूं लागले. परंतु **मालवीयजी** अत्यंत शांततेनें व सहास्य मुद्रेनें हा प्रकार सहन करीत होते. गुंडाची धर्मश्रद्धा जरी अनाठायीं असली तरी तीबद्दल त्यांचें त्यांनीं कौतुकच केलें.

हें वादळ बराच वेळ चालल्यावर विरोधी लोकांपैकीं **पं० लक्ष्मणशास्त्री**, आपला विरोध मांडण्यास पुढें सरसावले. विरोधी **राजेश्वरशास्त्री, रामचरण न्यायाचार्य** व इतर कांहीं शास्त्री पक्षाच्या वतीनें पं. राजेश्वरशास्त्री यांनीं सुमारें तीन तास आपली कैफियत मांडली. त्यांचा शब्दन् शब्द टिपून घेण्यांत आला. या प्रकारांतच ११॥ होऊन गेले. **राजेश्वरशास्त्री** यांचें भाषण संपण्याचें चिन्ह दिसेना. व पंडितजींच्या कार्यांत विघ्न उपस्थित करण्यासाठीं त्यांचें व्याख्यान सुरू आहे असा लोकांना संशय येऊं लागला व ते उतावीळ होऊं लागले. **पं. राजेश्वर-**

शास्त्री यांनीं आपलें भाषण आतां पुरें करावें असें लोकांनींच त्यांना सांगितलें. **राजेश्वरशास्त्री** यांच्या विरोधी विधानावर उत्तर देण्यास **पं.मालवीयजी** उभे राहतांच सगळीकडून प्रचंड जयजयकार झाला. उत्तर देण्यापूर्वी **पं०मालवीयजी** यांनीं, विरोधी शास्त्रीपंडितांना विवादाच्या निर्णयासाठीं कोणते धर्मग्रंथ मान्य आहेत हें विचारून घेतलें व त्यानंतर त्यांनीं आपल्या सरबत्तीस सुरवात केली. शास्त्रीपंडितांनीं आपणास मान्य म्हणून ज्या धर्मग्रंथांचीं नांवें सांगितलीं त्यांतूनच मालवीयजी यांनीं आपल्या बाजूला पोषक असे एकामागून एक शेंकडों दाखले दिले व शास्त्री-पंडितांनीं उभारलेली इमारत पत्त्याच्या बंगल्याप्रमाणें कोठच्या कोठें नाहींशी झाली.

पंडित मालवीयजी यांची विचारसरणी लोकांस अतिशय पटली व त्यांनीं प्रचंड जयजयकार करून पंडितजींचा गौरव केला. व दुपारीं दोन वाजण्याच्या सुमारास विरोधी पक्ष अपयश घेऊन माघारी परतला.

त्यानंतर पं. मालवीय यांनीं पुनः स्नान केलें व सुमारें ३॥ वाजेपर्यंत दीक्षामंत्र देण्याचें कार्य चालू राहिलें. दीक्षा घेण्यासाठीं शेंकडों लोक जमले होते. परंतु वेळेच्या अभावामुळें फक्त ४०० लोकांना दीक्षा देण्यांत आली व इतरांस लवकरच दीक्षा देण्याचें आश्वासन देण्यांत आलें. हा सर्व समारंभ शामियान्यांत झाला. कारण एवढ्या वेळांत सनातन्यांनीं पाडलेला शामियाना पुनः उभारण्यांत आला होता.

हिंदुमहासभेचे अध्यक्ष डॉ. मुंजे, श्रीमत्स्वामी सत्यानंदजी, श्री. पद्मराज जैन वगैरे प्रमुख गृहस्थ व इतर बरेच स्वयंसेवक **पं.मालवीया**बरोबर प्रातःकालपासून दुपारीं दीक्षासमारंभ होईपर्यंत सारखे खडे होते. दीक्षामंडपांत होमाग्नि प्रदीप्त झाला होता व पवित्र वस्त्रें परिधान करून वैदिक कालांतील निष्ठावंत आचार्यांप्रमाणें अग्निसेवा करतांना पंडितजी शोभत होते.

महामहोपाध्याय पं **प्रमथनाथ** तर्कभूषण-बंगाल हिंदुमहासभेचे अध्यक्ष हेहि समारंभास उपस्थित होते.

दक्षिासमारंभांत मुख्यतः पुढील गोष्टी करण्यांत येतात. ज्यांना दीक्षा घ्यावयाची असेल त्यांनीं स्नान करून शूचिर्भूत झाल्यावर त्यास पंचगव्य देऊन नंतर, 'ॐ नमः शिवाय' 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' किंवा 'ॐ नमो

नारायणाय' या मंत्राची विधिपूर्वक दीक्षा देण्यांत येते. ही दीक्षा दिल्यावर वरील मंत्र ज्यावर छापले आहेत असें वस्त्र त्या मनुष्यास देण्यांत येतें. नंतर बत्तासे-फुटाणे त्यांचा प्रसाद देऊन विधि समाप्त होतो.

यानंतर पुनः दीक्षासमारंभ झाला त्याची हकींगत कलकत्ता येथील श्रीकृष्ण संदेश पत्रांत प्रसिद्ध झाली ती वाचकांसाठीं त्यांच्याच शब्दांत देत आहे.

## मालवीयजीकी मंत्रदीक्षा.

गत रविवार ता. ६ जनवरीको महामना पंडित मदन मोहन मालवीयजीने कलकत्ता लोहा घाटपर बहुतसे अछूतों तथा अन्य हिंदुओंको मंत्रदीक्षा भी प्रदान की। एक बडे शामियानके नीचे मालवीयजीका आसन लगा हुआ था और सहस्रोंकी संख्यामें हिंदु जनता शामियानके चारों तरफ बैठी और खडी थी। भीड अधिक हो जानेके कारण अनेक लोग घोडागाडियोंको चारों तरफ खडा कर उनकी छतोपर मन्त्रप्रदानका समारोह देख रहे थे। यद्यपि दीक्षा कार्यका समय ८॥ बजका था, किन्तु उसके एक घण्टा पूर्व ही वहां जनसमूहकी भीड जमा हो गयी थी। इसके कुछ दिन पूर्व इसी स्थानपर और इसी मंत्र-दीक्षाप्रदानके समय महामना मालवीयजीपर कलकत्तोंके कुछ सनातनधर्मी नामधारी लोगोंने कीचड, मट्टी आदि फेंक कर अपने धर्मका पालन किया था। इसी कारण वहां इस बार पुलिसका भी यथेष्ट प्रबंध था और मण्डपके चारों ओर हिन्दु मिशनके कार्यकर्ता, स्वयंसेवक तथा स्वामी विश्वानन्दजीकी देख-रेखमें महावीरदलके स्वयंसेवक खडे थे। परन्तु यह सब होते हुये भी खबर है कि जिस समय मालवीयजी स्नान करनेके लिये नदीमें उतर रहे थे तो शिखा-सूत्रधारी कोई गुण्ड मालवीयजीपर छुरेका वार करनेकी चेष्टा करता हुआ पकडा गया। पकडे जानेके बाद भी वह दुष्ट मालवीयजीके प्रति गालियां बकता रहा। ठिक ९ बजे मस्तकपर त्रिपुण्ड लगाये हिन्दु-प्राण महामना मालवीयजी "सनातत धर्मकी जय" "हिन्दु-धर्मकी जय" "**मालवीयजीकी जय**" के घोषके साथ मंडपमें पधारे। उपास्थित जनोंमें महामहोपाध्याय **श्रीप्रमथनाथ तर्कभूषण, बाबू मदन मोहन वर्मन, बाबू पद्मराज जैन, स्वामी विश्वानन्द,, श्रीभोलानन्द गिरि, बाबू विनायक लाल खन्ना** आदि अनेक प्रतिष्ठित व्यक्ती थे। कुछ अंग्रेज सज्जन भी आये थे। बहोत अछूत हिन्दु भाई **मालवीय-**

**जीसे** मन्त्रदीक्षा ग्रहण करनेके लिये लालायित बैठे थे। दीक्षार्थियोंमें कुछ ग्रेजुएट भी थे। जिनमें **श्रीदेवेंद्र नारायण गुप्त** एम्. ए. ( काशी ) का नाम विशेष उल्लेखनीय है। दीक्षा ग्रहण करनेके पूर्व प्रत्येक दीक्षार्थीको गंगाजल-पान कराया जाता था, मस्तकपर चन्दन लगाया जाता था, वह गलेमें रुद्राक्षकी माला तथा रामनामी धारण करता था। इसके पश्चात् महामना **मालवीयजी** सबको मंत्रकी दीक्षा और उपदेश प्रदान करते थे और छपाहुआ रामनाम वस्त्र प्रत्येक दीक्षार्थीको वितरण किया जाता था। दीक्षाकार्य प्रातः ९ बजे प्रारम्भ हो दिनके १२ बजे धूमधाम सहित निर्विघ्न समाप्त हुआ। सुना जाता है पं. **अनन्त कृष्णशास्त्री, मालवीयजीसे** शास्त्रार्थ करनेके लिये गये थे, किन्तु रङ्ग देखकर लौट आये।

## शुद्धीची आवश्यकता.

हिंदुधर्मांतील सर्व घटकांचें संघटन केल्यानंतरचा मुख्य प्रश्न येतो शुद्धीचा. यासंबंधानें खुद्द **पंडितजी** काय म्हणतात तेंच येथें सांगणें बरें.

**पंडितजी** म्हणतातः—

" या देशांत आज सात कोटी मुसलमान दिसतात, त्यांतून फारच थोडे परदेशांतील आहेत अरबस्तान, अफगाणिस्तान या देशांतून फार तर ५० लक्ष मुसलमान येथें आले असतील. बाकीचे सर्व येथीलच मुसलमान बनविण्यांत आलेले आहेत. मुसलमान ख्रिस्ती झाला तर त्यानें पुनः कलमा पढला कीं, त्यास पूर्वीप्रमाणें मुसलमान होतां येतें. परंतु हिंदूची स्थिति अशी नाहीं एकदां तो धर्मच्युत झाला कीं कायमचा धर्मास मुकला !

असा प्रकार होतां होतां आज आपल्या हिंदूपैकीं ६॥ कोटी हिंदू स्वधर्मास वंचित झाले. आपण त्यांना मुकलों. हिंदूंना मुसलमान करून घेण्यासाठीं नाना प्रकार करण्यांत येतात. मलकाना रजपूत, साष्टी, गोवें प्रांतांतील हिंदू, अशाच रीतीनें आम्हीं गमावून बसलों. हिंदूधर्माची चौकट इतकी घट्ट कीं एकदां मनुष्य बाहेर पडला कां आंत प्रवेश नाहीं. जरा परधर्मीयाचा संसर्ग घडला तर तो मनुष्य जातिभ्रष्ट होतो. त्याची समजांतून हकालपट्टी होते. मनुष्य पतित झाला कीं शुद्ध होतच नाहीं ! जे लोक जुलूमजबरदस्तीमुळें परधर्मांत गेले त्यांना स्वधर्मांत पुनः घेतलेंच पाहिजे. यापैकीं कित्येक जमाती अशा आहेत कीं त्यांना हिंदूंनीं त्यागलें, त्यांना परधर्मीय म्हणून गणूं लागले तरी त्यांनीं आपले आचारविचार

हिंदूंचेच कायम राखले आहेत. अशा लोकांना स्वधर्मांत पुनः स्थापन करण्याला शास्त्रविरोध मुळींच नाहीं. त्यांना शुद्ध करून स्वधर्मांत घेतलें पाहिजे. एका हिंदु बालकानें चुकीनें एका मुसलमानाच्या डब्यांतील विडा खाल्ला. त्यानें मला ही सर्व हकीकत लिहिली व आपली भेट घेण्यास मला लाज वाटतें असेंहि कळविलें. मी त्याला बोलावून घेतला. तो सनातन धर्माभिमानी व मोठा कुलीन मुलगा होता. मी त्यास सांगितलें, ' जातपात पूछे नहि कोई–हारिका भजे सो हरिका होई, परमेश्वराचें नामस्मरण कर, गंगाजल प्राशन कर, पाप नष्ट होईल. असें न करता तर तो आज मुसलमान झाला असता. एका बाजूला ख्रिस्ती व मुसलमान व दुसऱ्या बाजूला हिंदूकरणाला प्रतिबंधक अभेद्य भिंत. या प्रकारामुळें लक्षावधी लोक परधर्मांत गेले, हिंदु समाजाला गळती लागली. व गळती कायम राहिली तर हिंदूंची नांवनिशाणीहि राहणार नाहीं. प्राचीन काळीं ऋषीमुनींनीं अनार्यांना आणि–असभ्यांना आर्य सभ्य करून घेतले.त्याचप्रमाणें जे जुलूमजबरदस्तीमुळें परधर्मांत गेले आहेत त्यांना परत स्वधर्मांत घेतलें पाहिजे. ज्याला म्हणून हिंदू होण्याची इच्छा असेल त्याला हिंदू होतां येतें, अशी परमेश्वराचें नांव घेऊन घोषणा करा, अशी स्थिती झाल्यास हिंदुसमाजावर जो घनदाट अंधार पडला आहे तो दूर होऊन धर्मसूर्याचा उदय होईल व हिंदुसमाज विशाल व बलवान् बनेल.

## संघटन कां पाहिजे?

हिंदुसंघटनेचीं मुख्यांगें संघटना, अस्पृश्यतानिवारण व शुद्धीकरण या संबंधानें **पंडिजींचीं** मतें काय आहेत हें वर निवेदिलें. संघटन केल्यामुळें मुसलमानांवर आक्रमण होईल या आक्षेपालाहि त्यांच्याच शब्दांत उत्तर दिलें. त्यावरून हिंदुसंघटनाच्या चळवळीची व हिंदू सभेची राष्ट्रीय भूमिका कशी निरपवाद आहे याची कल्पना येईल. संघटनेसंबंधीं **पंडितजींच्या** उपदेशाचें सार थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे असें:—

संघटन पुढील तीन कार्यासाठीं अवश्य पाहिजे.

भारतवर्षाचा गौरव ,त्याची संस्कृति, व त्याचें साहित्य यांचें रक्षण करणें हें प्रत्येक हिंदूचें परम पवित्र कर्तव्य आहे.

भारतवर्ष स्वराज्योपभोगी झाल्याखेरीज त्यांची संस्कृति, साहित्य व गौरव

यांचें रक्षण होणें शक्य नाहीं म्हणून हिंदुस्थानाला स्वराज्य प्राप्त करून देणं हा प्रत्येक हिंदूचा परमधर्म आहे.

परंतु ही स्वतंत्रता संपादन करण्याचें प्रमुख साधन हिंदुसंघटन आहे. या कारणासाठीं संघटनाची अत्यावश्यकता असल्यानें संघटनकार्यास प्रतिकूल असणाऱ्या उच्चनीच भावांच्या कल्पना त्यानें प्रथम सोडावयास पाहिजेत.

हिंदुमुसलमानांच्या संबंधानें त्यांनीं १९३१ च्या एप्रिलमध्यें कराचीस भरलेल्या हिंदु सभेमध्यें पुनः असा स्पष्ट खुलासा केला कीं,

## एक राष्ट्रीयत्व हें ध्येय.

आमची हिंदु सभा राष्ट्रीयत्वाच्या पायावर काम करीत आहे. हिंदु व मुसलमान दोघेहि एका मातेचीं लेकरें आहेत. दोघांनाहि या देशांत नांदावयाचें आहे. तेव्हां परस्परांनीं गुण्यागोविंदानें व प्रेमानेंच येथें नांदलें पाहिजे. कोणी कोणावर जुलूम करूं लागला तर कोणाचाच फायदा होणार नाहीं. सर्वांआधीं ऐक्य पाहिजे. एकाचा दुसऱ्यावर विश्वास नसला तर स्वराज्य प्राप्त होणार नाहीं. परंतु हिंदु व मुसलमान हे दोघेहि एक झाले तर जगांत अशी कोणती शक्ति नाहीं कीं, ती आमच्या स्वराज्यांत विघ्नें आणूं शकेल ! आपणां सर्वांसच स्वराज्य पाहिजे. स्वराज्य नसल्यानें प्रतिक्षण आपली अतिशय हानि होत आहे. तेव्हां सर्वांनीं मिळून आपण स्वराज्य प्राप्त करून घेतलें पाहिजे. मतभेद असतील व तसे ते असणारच, परंतु त्यामुळें जातीय शांतता भंग अगर विवेकत्याग होतां कामा नये. मतभेद असले म्हणजे एकमेकांचे शत्रू असलेच पाहिजे असें नाहीं. दोन्ही पक्ष बसून समजूत काढतां येईल. हिंदु व मुसलमान यांनीं शांततेनें 'राहण्यांतच शहाणपणा आहे. ' आम्ही तयार आहोंत पण मुसलमान कोठें ऐकतात' असें हिंदू म्हणतील पण त्यांना माझें असें सांगणें आहे कीं निराश होऊं नका. यश मिळेलच. हा देश हिंदू मुसलमान, व शीख या सर्वांचा आहे. हाताच्या पांच बोटांप्रमाणें आपली स्थिति आहे. एका गांवांत सर्वांना नांदावयाचें तें परस्परांशीं कलह करून कसें नांदतां येईल ? आपल्या जीवितवित्ताला कसलीहि हानी पोंहोंचणार नाहीं असा परस्परांत विश्वास उत्पन्न झाला पाहिजे, दंगा होईल एक दिवसाचा, पण नुकसान होईल जन्माचें. युरोपमध्यें कोणीहि स्त्री

## पंडित मदनमोहन मालवीय.

स्वतंत्रतापूर्वक कोठेंहि हिंडूं शकते तशी स्थिति या देशांत कां असूं नये ? तुम्हीं निर्भय बना. भयाचा त्याग केल्यानें प्रतिपक्षीयांवर त्याचा प्रभाव पडतो. झगडा करणें सोपें आहे पण ऐक्य घडवून आणणें कठीण आहे. परस्परांवर प्रेम करा. विश्वास ठेवा. आपला आत्मा प्रसन्न करा. म्हणजे परमेश्वरहि तुम्हांवर प्रसन्न होईल.

# स्वराज्यार्थ प्रयत्न.

देशांत प्रमुख राजकीय संस्था दोन; एक राष्ट्रीय सभा व दुसरी कायदेमंडळें. आज देशांत विशिष्ट प्रकारचें वातावरण निर्माण झाल्याकारणानें कायदेमंडळासंबंधानें लोकांत औदासिन्य उत्पन्न झालें असलें तरी एका काळीं कायदेमंडळांत लोकपक्षाच्या वतीनें काम करणें ही गोष्ट मानाची व त्याचप्रमाणें लोकहिताची समजली जात असे. आणि लोकाग्रणी कायदेमंडळांत शिरून त्यावेळच्या परिस्थितीप्रमाणें लोकहिताचीं अनेक कामें करीत. या शिष्टसंप्रदायाप्रमाणें पंडितजी कायदेमंडळांत शिरले. तेथें त्यांनीं काय केलें हें स्वतंत्रपणें पुढें दाखविण्यांत येणार असल्यानें त्यासंबंधानें येथें नुसता निर्देश करीत आहे.

परंतु कायदेमंडळापेक्षां जास्त महत्त्वाची कामगिरी व लोकसेवा पंडितजींनीं केली असेल तर ती राष्ट्रीय सभेच्या द्वारें. स. १८८५ सालीं कॉंग्रेसची प्राणप्रतिष्ठापना झाली व स.१८८६ सालापासून पंडितजींनीं कॉंग्रेसमध्यें भाग घेण्यास सुरवात केली.तेव्हांपासून आजतागायत ते कॉंग्रेसचे एकनिष्ठ व कट्टे पुरस्कर्ते आहेत. किंबहुना हिंदुस्थानांतील विद्यमान राष्ट्रभक्तांत **पंडितजी** इतका जुना व एकनिष्ठ कॉंग्रेसचा भक्त कोणीहि नाहीं हें म्हणणें खात्रीनें धाडसाचें होणार नाहीं. कॉंग्रेसच्या राजकारणांत आजपर्यंत अनेक स्थित्यंतरें झालीं. खुद्द **मालवीयजी** यांचाहि कॉंग्रेसच्या कांहीं कार्यक्रमाबाबतींत मतभेद होता. परंतु त्यांनीं कॉंग्रेस सोडली नाहीं.

सुरतेच्या वादळानंतर कॉंग्रेसमध्यें दुफळी झाली. दोन पक्ष झाले. स. १९१६ पर्यंत कॉंग्रेस मवाळपक्षानें आपल्या लहरीप्रमाणें चालविली. मवाळांच्या धोरणासंबंधानें **पंडितजींचा** मतभेद होता. परंतु क्रीडवर सही करूनहि ते कॉंग्रेसमध्येंच राहिले. व पुढें लो० टिळकांनीं कॉंग्रेस हस्तगत केली तेव्हां मवाळांनीं

४३००

आपली स्वतंत्र कन्व्हेन्शन काढली तरीहि **पंडितजी** काँग्रेसमध्येंच राहिले. काँग्रेसला त्यांनीं सोडलें नाहीं. काँग्रेसची जोपासना करणारे **ए. ओ. ह्यूम, पं. अयोध्यानाथ**, यांच्या बरोबरीनें **पं० मालवीयजी** यांनींहि काँग्रेसला हातीं धरून वागविलें, तिला चालतीबोलती, कार्यक्षम केली. इतका काँग्रेस व पंडित **मालवीयजी** यांचा जिव्हाळ्याचा संबंध आहे. **पंडितजींना** त्यांच्या धीर व शांत प्रकृतीमुळें कोणी मवाळ म्हणतात. म्हणोत बापडे. परंतु काँग्रेसचें प्रगतिपर राजकारण जसजसें पुढें सरकूं लागलें, तसतसे **पंडितजींहि** काँग्रेसचा तोल संभाळून तिच्याबरोबर जात आले आहेत ही गोष्टहि तितकीच सत्य आहे. व ही गोष्ट काँग्रेसनें गेल्या वर्षी चढाईचा कार्यक्रम अमलांत आणला त्यावेळीं **पंडितजींनीं** त्यांत प्रत्यक्ष भाग घेऊन, सहा महिन्यांची कारागृहवासाची शिक्षा भोगून, सिद्ध केली आहे.

अखिल भारतवर्ष आज स्वराज्य–स्वातंत्र्य यांच्या जयघोषानें निनादून जात असला, तरी तो स्वराज्याचा मंत्र सर्वत्र रुढ करण्यासाठीं अनेक महा देशभक्तांना हाडाचीं काडें करावीं लागलीं आहेत व नानाप्रकारचे कष्ट सोसावे लागले आहेत. आज जी लोकांत जागृति दिसत आहे, ती कांहीं दहा पांच वर्षांतील चळवळीचें फळ नाहीं. अनेक तपें व राष्ट्रांतील दोन पिढ्यांची तपश्चर्या खर्ची पडली आहे, तिचें हें स्वाभाविक फळ आहे.

स्वराज्याच्या चळवळीचा इतिहास म्हणजे राष्ट्रीय सभेचा इतिहास असेंच म्हणावें लागतें. राष्ट्रीय सभेच्या राजकारणांचीं स्थित्यंतरें पाहिलीं, म्हणजे हिंदी राजकारणाला प्रस्तुतचें विकासित स्वरूप कसें आलें हें सहजच लक्षांत येतें. हिंदुस्थानांत रूढ असलेली राज्यपद्धति लोकमतानुवर्ती नाहीं, तींत लोकांना हक्क मिळाले पाहिजेत, ही गोष्ट जाणून त्यासाठीं लोकमत जागृत करून थोडे थोडे हक्क संपादन करण्यासाठीं राष्ट्रीय सभेचा जन्म झाला. परंतु राष्ट्रीय सभा जसजशी वर्धमान होऊं लागली तसतशा तिच्या आकांक्षा सहजच वाढत गेल्या. प्रथम अर्ज, विनंत्या, शिष्टमंडळें, निषेध, इत्यादि अवस्थांतून राष्ट्रीय सभा उत्क्रान्त होत होत बहिष्कार, सविनय कायदेभंग, करबंदी, असहकार इत्यादि स्वावलंबनाच्या मार्गापर्यन्त येऊन पोहोंचली आहे व तिचें उद्दिष्ट तिला आतां स्पष्ट स्वरूपांत दिसूं लागलें आहे.

# पंडितजींचा कॉंग्रेसमध्यें प्रवेश.

परंतु राष्ट्रीय सभेचीं हीं जीं अवस्थांतरें होत गेलीं त्यांचें श्रेय ज्यांनीं राष्ट्रीय सभेला इष्ट मार्गानुवर्ती केली त्यांनाच द्यावें लागेल व अशा थोर पुरुषांपैकीं **पंडित मालवीयजी** हे एक होत. राष्ट्रीय सभेच्या जन्मापासून आजतागायत, म्हणजे पंचेचाळीस वर्षांच्या काळांत राष्ट्रीय सभेंत जीं अनेक स्थित्यंतरें झालीं तिच्या प्रत्येक घडणावळींत पंडितजींचा थोडाफार हात आहेच आहे. सन१८८६सालीं **दादाभाई नवरोजी** यांचे अध्यक्षतेखालीं **कलकत्ता** येथें राष्ट्रीय सभेचें दुसरें अधिवेशन झालें. त्यावेळीं पंडितजी कॉंग्रेसला प्रथम उपस्थित झाले व तेव्हांपासून आजतागायत भरलेल्या प्रत्येक राष्ट्रीय सभेस **पंडितजी** उपस्थित राहतात. पहिली राष्ट्रीय सभा वगळल्यास आजतागायत त्यांनीं एकहि कॉंग्रेस चुकविली नाहीं.

**पंडितजी** कॉंग्रेसच्या राजकारणांत शिरले तेव्हां त्यांचें वय अवघें २५ वर्षांचें होतें. व त्यावेळीं त्यांनीं कॉंग्रेसमध्यें जें भाषण केलें त्यामुळें मि. **ह्यूम, पं. अयोध्यानाथ, राजा रामपालसिंग**. इत्यादि प्रसिद्ध कार्यकर्त्यांचीं मनें त्यांनीं आकर्षण करून घेतलीं तेव्हांपासून **पं. अयोध्यानाथ, ह्यूम** यांच्या सहवासानें **पंडितजी** कॉंग्रेसच्या कामांत विशेष लक्ष घालूं लागले ते आजतागायत कॉंग्रेसच्या बाबतींत अढळ आहेत. **पंडितजी** राष्ट्रीय सभानुयायी झाल्यादिवसापासून आजतागायत त्यांनीं एकहि कॉंग्रेस चुकविली नाहीं. प्रत्येक अधिवेशनांत ते उपस्थित होते व कॉंग्रेसच्या कामकाजांत मनःपूर्वक भागहि घेतात. त्यांचा सदाचार, भाषाप्रभुत्व, कार्यैकनिष्ठा, हिंदुस्थानच्या हिताविषयीं तळमळ व त्यांचें अस्खलित वक्तृत्व यांमुळें **पंडितजी** कॉंग्रेसच्या व्यासपीठावरून बोलूं लागले कीं सभा चित्रासारखी तटस्थ होऊन त्यांच्या वाक्प्रवाहामध्यें सानंद डुलूं लागते. विरोधी पक्षहि त्यांच्या वाक्पटुत्वानें नामोहरम होत नाहीं असें क्वचितच घडतें.

कॉंग्रेसचे कट्टे अनुयायी असूनहि **पंडितजींनीं** हिंदु संघटनाची चळवळ सुरू केली तेव्हां त्यांजवर स्वकीयांनीं ज्ञातिनिष्ठेचा आरोप करण्यास कमी केलें नाहीं. मग कट्टया मुसलमानांस ते दुष्मनाप्रमाणें भासूं लागले यांत नवल काय ? परंतु **पंडितजी** आपल्या हास्यमुद्रेनें, हिंदु-मुसलमानी ऐक्यासाठीं,

हिंदुसंघटनाची आवश्यकता कां व कशी आहे याचें विवेचन करूं लागले, म्हणजे विरोधकांचा विरोध विरून जातो व **पंडितजींच्या** विधानांतील सत्यांश त्यांना पटतो. याच गोष्टीमुळें हिंदू संघटनकार्यास प्रारंभीं प्रारंभीं जितका विरोध झाला, तितका आतां होईनासा झाला आहे. असो.

## कॉंग्रेसची उत्क्रान्ति.

राष्ट्रीय सभेचे जनक मि. **ह्यूम** यांनीं राष्ट्रीय सभेस हातीं धरून खेळती केली, त्या कामांतहि पंडितजींचें त्यांना मनःपूर्वक सहाय्य होतें. म्हणूनच पंडितजींना राष्ट्रीय सभेबद्दल इतकी आत्मीयता वाटते. राजकीय सत्तेमध्यें लोकांना हक्क असावेत, राजशासन संस्था लोकसंमत व्हाव्यात यासाठींच राष्ट्रीय सभेचा जन्म आहे व राष्ट्रीय सभेच्या जन्मापासून आजपर्यंतच्या तिच्या इतिहासाकडे पाहिल्यास राष्ट्रीय सभेच्या राजकारणाचा कसा विकास होत गेला, हें लक्षांत येईल. लोकहिताच्या दृष्टीनें राजशासन संस्था लोकमतानुवर्ती व्हाव्या या हेतूनें कॉंग्रेसनें जो जो आचार ठरविला, तो ठरविण्यांत पंडितजींचा समावेश प्रामुख्यानें होत होता. व त्या संबंधांत पंडितजींनीं राष्ट्रीय सभांच्या अधिवेशनांतून जीं जीं भाषणें केलीं, तीं एकामागून एक वाचलीं असतां हिंदी राजकारणांत प्रगमनशील स्थित्यंतर कसकसें घडत गेलें याची यथायोग्य कल्पना येते. राष्ट्रीय सभा ही मूर्त स्वरूपांत आहे अशी आपण घटकाभर कल्पना केली तर प्रथम शांत, नंतर गंभीर असें तिचें स्वरूप होते पालटत जाऊन अखेरीस तिनें आज उग्र रूप धारण केलेलें आपण पाहतों. हीं सर्व स्थितिदर्शनें यथाक्रम **पंडितजींच्या** भाषणांतून आढळून येतात.

आज राष्ट्रीय सभेच्या ध्येयांत स्वराज्य, स्वातंत्र्य हे शब्द स्पष्टपणें नमूद आहेत. तसे ते आरंभीं नव्हते ही गोष्ट खरी. परंतु स्वराज्याची उभारणी ज्यांवर होऊं शकते, तो कार्यक्रम प्रथमपासून परिस्थित्यनुसार राष्ट्रीय सभेचा होता, असें म्हणणें खात्रीनें अयोग्य ठरणार नाहीं. किंबहुना राष्ट्रीय सभेचा तो अव्यक्त, वा गर्भित हेतू होता म्हणून तिच्या हेतूचें आजचें भव्य व विशाल स्वरूप दृग्गोचर होत आहे. या दृष्टीनें **पंडितजींच्या** स्वराज्यविषयक कामगिरीकडे पाहावयाचें आहे.

## कॉंग्रेसमधील पहिलें भाषण.

पं. **मालवीय** कॉंग्रेसमध्यें स. १८८६ मध्यें म्हणजे दुसरी कॉंग्रेस कलकत्ता येथें श्री. **दादाभाई नवरोजी** यांचे अध्यक्षतेखालीं भरली तेव्हांपासून सभाविष्ट झाले. कॉंग्रेसचें कामकाज सुरू होतें, वक्त्यांचीं भाषणें सुरू होतीं. तीं ऐकून आपणहि भाषण करावें, अशी इच्छा **पंडितजींच्या** मनांत उत्पन्न झाली. व ती त्यांनीं पं **आदित्यनारायण** यांजपाशीं व्यक्त केली. त्यांनींहि प्रोत्साहन दिलें व त्यानंतर पं. **मालवीय** यांचें भाषण झालें. तें भाषण ' कायदेमंडळाच्या सुधारणा ' संबंधीं होतें. यासंबंधानें कॉंग्रेसच्या अहवालांत मि. ह्यूम म्हणतात, ' पण सर्वांत पं **मदनमोहन मालवीय** यांनीं केलेलें भाषण सर्वांस आवडलें. **मालवीय** हे उच्चकुलीन ब्राह्मण होत. त्यांचा गौरवर्ण, प्रमाणबद्ध शरीर, सूक्ष्म बुद्धी, व त्यांचा अस्खलित वाक्प्रवाह यामुळें त्यांनीं श्रोत्यांवर तेव्हांच छाप पाडली. ' मुख्य ठराव पास झाला. त्यांत प्रांतिक व वरिष्ठ कायदेमंडळांत हिंदी लोकानियुक्त प्रतिनिधींची संख्या निम्मी असावी, निम्मे सरकारी अधिकारी व निम्मे सरकारानियुक्त पण बिनसरकारी सभासद असावेत अशी मागणी केली होती. याखेरीज मतदानांचा हक्क कोणास असावा, हेंहि या ठरावांत स्पष्ट केलें होतें. ''मुंबई व बंगाल या प्रांतांत शैक्षणिक व सांपत्तिक लायखी मतदारास ग्राह्य धरून खास मतदारांनीं प्रतिनिधी निवडावे, इतर प्रांतांत म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्डें यांनीं प्रतिनिधि निवडावे परंतु ही निवड अशा तऱ्हेनें व्हावी कीं, देशांतील सर्व जातींचे प्रतिनिधि त्यांत निवडून यावेत. या कायदेमंडळापुढें अंदाजपत्रकें, नवे कायदे, कायद्यांत दुरुस्त्या करणें असल्यास त्या सर्व गोष्टी आल्या पाहिजेत '' अशा प्रकारचा हा सात कलमी ठराव होता.

## स्वराज्याचें मूलभूततत्त्व.

या ठरावावर भाषण करतांना **पंडितजी** म्हणाले, '' लोकसंमत शासनपद्धति संपादन करण्यासाठीं इंग्लंडच्या लोकांनीं काय प्रयास केले आहेत, या गोष्टी आपणास माहीत आहेत. या तत्त्वाचा विकास व्हावा म्हणून याच इंग्लिश लोकांनीं आपलें रक्त सांडलें व प्राणहि वेंचले आहेत. त्यांना आपण आम्हांस स्वयंशासित राज्यपद्धति द्या, असें सांगण्याची आवश्यकता काय आहे ?

ती गोष्ट त्यांच्या रोमरोमांतून भिनली आहे. ' प्रतिनिधित्व नाहीं तर कर नाहीं ! (No taxation without representation) हें तर इंग्रजांच्या राजकीय धर्मग्रंथांतील आद्य सूत्र आहे. अशी उघड स्थिति असतां हे सामान्य हक्क आपणांस त्यांच्या हातून कसे मिळणार नाहींत ! स्वतंत्र इंग्रजाला जे हक्क आहेत ते आम्हांस पाहिजेत, ते आम्ही इंग्रजाजवळ मागत आहों. एकादा देश रानटी अवस्थेंतून बाहेर पडला कीं, तत्क्षणीं लोकसंमत शासनपद्धतीचा उगम झालाच पाहिजे.

" इंग्रजांपासून आमचें पुष्कळ हित झालें आहे ही गोष्ट मान्य आहे व त्याबद्दल आम्हीं कृतघ्नहि नाहीं. परंतु हल्लींची राज्यपद्धति जुलमी आहे; लोकसंमतीचा तींत अंशहि नाहीं. या गोष्टी तर स्वयंशासित राज्यपद्धतीला अत्यावश्य असतात व हे हक्क आज हिंदी लोकांना नसल्यानें ते जवळजवळ गुलाम झाले आहेत, ही गोष्टहि सरळ मनाच्या इंग्रजास पटण्यासारखी आहे. प्रत्येक ब्रिटिश माणसाला प्रतिनिधित्वाचा जन्मसिद्ध हक्क असतो.: महाराणीचा जाहीरनामा काय सांगतो ? परंतु त्याच्याविरुद्ध आज येथील कारभार चालला आहे. आम्ही प्रत्येक गोष्टींत इंग्रजांशीं टक्कर देऊन तींत यशस्वी होत असतां आम्ही लायख नाहीं, या म्हणण्यांतहि कांहींच अर्थ नाहीं."

' प्रतिनिधित्व नाहीं तर करहि नाहीं ' या तत्त्वाचा उच्चार **पंडितजींनीं** प्रथम या भाषणांत कॉंग्रेसमध्यें केला. त्यानंतर तिसरी कॉंग्रेस मद्रास येथें भरली. तींतहि **पंडितजींनीं** कायदेमंडळाच्या सुधारणांच्या अवश्यकतेवरच भाषण केलें व तें इतकें सरस उठलें कीं राजा सर टी. **माधवराव, दि ब. आर. रघुनाथराव, मि. ईंडले नॉर्टन** वगैरे गृहस्थ **मालवीयजींवर** खूष झाले. मद्रास कॉंग्रेसच्या अहवालांत मि. ह्यूम, **पंडितजीं**संबंधानें म्हणतात, " मग पं. **मदन मोहन मालवीय** हे बोलावयास उभे राहिले. त्यांच्या भाषणांत आवेश व वस्तुस्थितीचें स्पष्ट कथन इतकें उत्तमपणें गोवलें आहें कीं तें भाषण साकल्यानें देणें जरूर आहे.

## शासनसंस्था लोकसंमत पाहिजे.

**पंडितजी** आपल्या भाषणांत म्हणाले, ' राजसभेंत आम्ही प्रतिनिधित्व मागतों म्हणजे केवळ युरोपांतच जी गोष्ट रूढ आहे ती मागत नसून अमेरिका,

आस्ट्रेलिया व इतर सर्व सुसंस्कृत जगांत एकमतानें जी गोष्ट शासनसंस्थेला अत्यावश्य म्हणून मानली जाते तीच आम्ही मागत आहोंत. व ती लोकहितासाठीं बिलकुल विलंब न लावतां सरकारनें मान्य केली पाहिजे. स्वयंशासनाचा हक्क सर्व वसाहतींना आहे. मग तो आम्हांलाच कां नसावा ? आस्ट्रेलियानें ब्रिटिश मालावर कर बसविण्याचें ठरविलें व इंग्लंडनें त्या गोष्टीला हरकत घेतली तर आस्ट्रेलिया साम्राज्यांतून फुटल्याशिवाय खास राहणार नाहीं. परंतु आमच्यावर वाटेल ते कर लादा, त्याचा खर्च आमच्या संमतीखेरीज करा. पण आम्हांला मात्र स्वयंशासनाचे हक्क नाहींत !

"खर्चावर जर आम्हांला नियंत्रण घालण्याचा अधिकार असता तर त्याचा गैरवाजवीपणें आम्हीं खर्च होऊं दिला नसता. पार्लमेंट हिंदी कारभारांकडे बेपर्वाईनें पाहते. मग आमचें काम आम्हांला करूं द्या. इतकेंच आमचें मागणें. इतकी सामान्य मागणीहि आम्हांस न मिळाल्यास इंग्लंडच्या न्यायप्रियतेबद्दल पुनः गोष्टच बोलावयास नको. हीच स्थिति इंग्लंडची असती तर इंग्लंडनें ती पत्करली असती का ? पंचवीस कोटी लोकांच्या कल्याणाचा प्रश्न निघतो तेव्हां पार्लमेंटच्या ६१७ शें सभासदांपैकीं २०।२५ सभासदहि हजर नसतात ही हिंदुस्थानविषयींची त्यांची कळकळ ! अशी स्थिति इंग्लिशांनीं एक दिवस तरी सोसली असती काय ? तर मग त्यांनीं आमचा कारभार आमच्या स्वाधीन करावा. मग आम्ही त्यांचीं गत पातकेंहि विसरूं !'

## कायदेमंडळांची सुधारणा.

यानंतर पार्लमेंटमध्यें **चार्लस ब्रॉडला** यांनीं हिंदी कौन्सिल आक्ट दुरुस्तीचें बिल आणलें त्याला पाठिंबा देणारा ठराव स. १८९० च्या कलकत्ता येथील कॉंग्रेसमध्यें आला, त्यावर भाषण करतांना पंडितजी म्हणाले, " आमच्या चार प्रमुख मागण्या आहेत. ( १ ) कायदेमंडळांतील सभासदांची संख्या वाढवावी, ( २ ) निम्मे सभासद लोकनियुक्त असावेत, ( ३ ) काददेमंडळापुढें अंदाज पत्रक ठेवण्यांत यावें, ( ४ ) व लोकहिताच्या प्रश्नासंबंधीं सरकारला जाब विचारण्याचा हक्क असावा. यांपैकीं आमच्या तीन मागण्या सरकारनें मान्य केल्या आहेत. कायदेमंडळाची वाढ, अंदाजपत्रक कायदेमंडळाला सादर करणें, व एखादा जादा कर बसवावा कीं नाहीं याबद्दल संमति घेणें व सरकारास वाटेल

त्या प्रश्नासंबंधी प्रश्न विचारण्याचा हक्क; परंतु महत्त्वाचा प्रश्न कायदेमंडळांतील सभासद नेमण्याबद्दलचा. सर्व सभासद आम्हीच नेमूं. असें सरकार म्हणतें. आम्ही म्हणतों निदान निम्मे तरी लोकनियुक्त असावेत. अशा स्थितींत कौन्सिलांची वाढ केली तरी त्यांत बदल काय होणार ? शिवाय व्हेटोचा अधिकार सरकारनें आपल्या हातीं ठेवला आहेच. आमचे प्रतिनिधी सरकार आपण नेमणार हा त्यांच्या कृपेचा मोठाच पूर आहे ! परंतु आमचें म्हणणें आम्हांला आमचे प्रतिनिधि निवडून द्या. आमचे हितानाहित आम्हांला जास्त समजतें.

लोकांवर नानाप्रकारचे कर कसे लादण्यांत येतात हें आपणास माहीत आहेच. त्यासंबंधानें लोकसंमति घेण्याचीहि गरज सरकारला वाटत नाहीं ! या नीतीनें लोकांची किती दुःस्थिति झाली आहे, अंगभर वस्त्र नाहीं पोटभर अन्न नाहीं अशा स्थितींत त्याज जवळ जें सांपडेल तें कराच्या रूपानें वसूल करण्याचा प्रयत्न सुरूच आहे. कायदेमंडळांत जनतेचे खरे प्रतिनिधि असते तर या गोष्टी चालल्या असत्या काय ? हा अन्याय दूर झाला पाहिजे.यानंतर स. १८९२ सालीं इंडियन कौन्सिल आक्ट पास झाला. तो सर्वस्वीं लोकहितघातक असल्यानें तो जास्त उदारपणाचा करावा असा विनंतीरूप ठराव स. १८९४ च्या मद्रास कॉंग्रेसपुढें आला. त्यालाहि पंडितजींनीं सणसणीत भाषण करून दुजोरा दिला. त्यांत कौन्सिलें हीं लोकांच्या आकांक्षा तृप्त करण्यास कशीं अपुरीं आहेत याचें उत्कृष्ट व भेदक वर्णन त्यांनीं केलें.

## पार्लमेंटांत हिंदी सभासद.

त्यावेळीं हिंदी राजकारणाचीं सर्व सूत्रें पार्लमेंटकडून हलविलीं जात. हिंदी अंदाजपत्रकहि ब्रिटिश पार्लमेंटपुढेंच मांडलें जाई. तेव्हां या पद्धतींत कांहीं सुधारणा करावयाची तर पार्लमेंटांतच हिंदी प्रतिनिधींना स्थान मिळावें असें कॉंग्रेसला वाटून त्याप्रमाणें स. १९०४ मध्यें मुंबईस भरलेल्या राष्ट्रीय सभेंत तसा ठरावहि आला. त्यावर भाषण करतांना **पंडितजी** म्हणाले—

"साम्राज्यसरकाराला अनेक महत्त्वाचीं व सर्व साम्राज्याचीं कामें करावयाचीं असल्यानें हिंदुस्थानच्या प्रश्नाकडे लक्ष देण्यास सवड नसेल म्हणून आम्ही त्यांना मदत करूं इच्छितों. हे प्रतिनिधी कौन्सिलांतील लोकप्रतिनिधींनीं निवडावे असें आमचें म्हणणें आहे. व यासाठीं कायदेमंडळेंहि विस्तृत झालीं पाहि-

जेत. शंभरापेक्षां अधिक वर्षे राज्य करीत आहेत. त्यांचें शिक्षणहि लोकांना मिळत आहे. तरीहि अजून त्यांना विश्वासांत घेऊन त्यांजवर राज्यकारभार सोपविण्यास सरकारनें तयार कां असूं नये ! ही अविश्वासी वृत्ति सरकार टाकणार तरी केव्हां ? लोक कारभारास लायख आहेत ही गोष्ट अनेक रीतींनें सिद्ध झाली आहे. आम्ही ब्रिटिश साम्राज्याचे खरे घटक जर आहोंत तर साम्राज्याप्रमाणें आम्हांलाहि स्वयंशासनाचे हक्क पाहिजेत कीं नकोत ! इंग्लंडनें यापेक्षां जास्त उदार दृष्टि ठेवून हिंदुस्थानशीं वागलें पाहिजे."

अशा रीतीनें काँग्रेसमध्यें **पंडितजींचें** आसन नुसतें स्थिरच झालें नाहीं तर **सर फेरोजशा मेथा, मि. केन, डिग्बी** इत्यादि पुढाऱ्यांकडून त्यांना शाबासकी मिळाली, मद्रास काँग्रेसमध्यें वायव्य प्रांतांतून भरपूर प्रतिनिधि जावेत यासाठीं **पंडितजींनीं** त्या प्रांतांत दौरा काढून अनेक व्याख्यानें दिलीं. व सुमारें १५ प्रतिनिधि मद्रास काँग्रेसला गेले. त्यावेळच्या मानानें ही संख्या मोठी होती.

वायव्यप्रांत असोसिएशनचे व काँग्रेसच्या स्टँडिंग कमिटीचें मंत्रीहि ते अनेक वर्षे होते. मद्रासनंतरची काँग्रेस प्रयाग येथेंच भरविण्यांत आली व तिला यश मिळालें त्याचें बहुतेक श्रेय **पंडित मालवीय** यांना आहे. पुढें १८९२ सालीं पुनः प्रयाग येथें राष्ट्रीय सभा बोलावण्यांत आली. काँग्रेस थोडे दिवसांवर येऊन ठेपली असतां तिजवर अकस्मात् एक संकट आलें व तें म्हणजे **पं. अयोध्यानाथ** यांच्या मृत्यूचें. सं. प्रांतांत राजकीय चळवळींत प्रामुख्यानें भाग घेणारे पं. **अयोध्यानाथ** हे असल्यानें त्यांच्या मृत्यूनें सहजच मोठी आपत्ति उत्पन्न झाली व काँग्रेस तेथें भरवितां येणें शक्य नाहीं असें काँग्रेसच्या अधिकाऱ्यांना कळवावें असें म्हणणारा एक पक्षहि उत्पन्न झाला. परंतु पं. **मदन मोहन मालवीय** यांना ही गोष्ट रुचली नाहीं. ते निरुत्साहित न होतां पं. **विश्वंभरनाथ** यांच्या मदतीनें त्यांनीं प्रयागचें काँग्रेस-अधिवेशन अत्यंत यशस्वी करून दाखविलें. पुढें स. १९०८ मध्यें सं. प्रांतिक परिषद त्यांचे अध्यक्षतेखालीं भरली.

राजकीय सुधारणासंबंधीं काँग्रेसची सारखी मागणी सुरू होती. सरकारहि सुधारणेचें कण व तुकडे टाकून लोकमत शांत करण्याचा प्रयत्न करीत होतें.

परंतु लोकक्षुधेला तें पुरेसें नव्हतें. लोकांच्या मागण्या वाढत होत्या. अशा स्थितींत स. १९०८ मोर्ले–मिंटो सुधारणा जाहीर झाल्या. त्यासंबंधानें 'इंडियन रेव्हू' मासिकांत **पंडितजी** म्हणतात.

## मोर्ले–मिंटो सुधारणा.

" सुधारणा जाहीर झाल्या ही गोष्ट ठीक झाली. त्या अंमलांत आल्या म्हणजे एका नव्या युगासच प्रारंभ झाला असें म्हणावें लागेल. **लॉर्ड मिंटो** व **मोर्ले** यांनीं चांगला मुत्सद्दीपणा दाखविला याबद्दल त्यांचें आपण कृतज्ञच असावयास पाहिजे. परंतु सुधारणांत अद्यापहि बराच उदारपणा दाखवितां येण्याजोगा आहे. प्रांतिक कायदेमंडळांत बिन-सरकारी सभासदांचें मताधिक्य असावें ही गोष्ट खरोखर इष्ट अशीच झाली. हीच योजना वरिष्ठ कायदेमंडळांत अंमलांत यावयास पाहिजे होती. स. १८९२ सालीं इंडियन कौन्सिल ॲक्ट झाला. हा काँग्रेसचा पहिला विजय व या सुधारणा ( मोर्ले–मिंटो ) म्हणजे काँग्रेसचा दुसरा विजय आहे. "

## राष्ट्रीय सभेंत क्रान्ति.

पुढें १९०९ मध्यें लाहोर येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपदाची माला यांच्याच गळ्यांत पडली. परंतु या सभेची हकीगत सांगण्यापूर्वी राष्ट्रीय सभेच्या राजकारणांत जी एक विलक्षण क्रान्ति घडून आली तिचा येथें उल्लेख करणें भाग आहे. स. १९०७ सालीं सुरत येथें राष्ट्रीय सभा भरली असतांना **लोकमान्य टिळकांनीं** अध्यक्षांच्या निवडणुकीला विरोध केला व त्यामुळें गोंधळ उडून ती बैठकच तहकूब करावी लागली. वस्तुतः सुरतेचा खरा वाद काँग्रेसच्या ध्येयाबद्दल नव्या व जुन्या या दोन पक्षांत होता. परंतु त्यावेळीं राष्ट्रीय पक्षाला काँग्रेस आपलीशी करतां आली नाहीं. पुढें **लो. टिळकांवर** तोहमत आणून त्यांस नोकरशाहीनें मंडालेस अडकवून टाकलें. त्यामुळें राष्ट्रीय पक्षाचें बळ कमी झालें व मवाळपक्षानें राष्ट्रीय सभेच्या दारांत क्रीडचें कुंपण घालून राष्ट्रीय पक्षास राष्ट्रीय सभेंत येण्यास एकप्रकारें मज्जावच केला. या सर्व वावटळींत **पंडितजींचा** कल उघड उघड मवाळपक्षाकडे होता. क्रीडचें बुजगावणें घातलेलें त्यांना सर्वस्वी पसंत होतें. व स. १९०९ सालच्या काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून भाषण करतांना त्यांना या क्रीडचें व तदनुषंगानें

मवाळपक्षाच्या धोरणाचें समर्थनच केलें. परंतु **पंडितजींचें** हें मत कायम मात्र राहिलें नाहीं. लाहोर कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावरून भाषण करतांना कॉंग्रेसनें त्या वेळेपर्यंत जें धोरण स्वीकारलें तेंच बरोबर असून त्याच धोरणानुसार चळवळ चालविली असतां आपण आज ना उद्यां या पिढींत नाहीं तर पुढच्या पिढींत खात्रीनें ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्य संपादन करूं अशी आशा त्यांनीं व्यक्त केली होती. परंतु स. १९१६ सालीं लखनौ येथें राष्ट्रीय सभा भरली असतां अध्यक्षांचे आभार मानतांना त्यांनीं राष्ट्रीय सभेच्या ३० वर्षांच्या राजकारणाचें सिंहावलोकन केलें. त्यांत ते म्हणाले, " आम्हीं १८८५ सालीं ही सभा स्थापन केली. त्यावेळीं ज्यांच्या हातीं, हिंदुस्थानचें भवितव्य परमेश्वरानें दिलें आहे त्यांच्यावर आम्हीं पूर्ण विश्वास ठेवून कामास सुरवात केली. अर्ज, विनंत्या, याचना आतांपर्यंत करीत आलों. गेलीं तीस वर्षे ठरावामागें ठराव करीत आलों. हे ठराव म्हणजे हिंदी लोकांच्या सहनशीलतेचें द्योतकच आहे. हळू हळू आपणास सर्व कांहीं मिळेल अशी आशा होती व सतत तीस वर्षे हा प्रयोग केला. परंतु या तीस वर्षांनंतर असा अनुभव आला आहे कीं, परमेश्वरानें ज्यांच्या हातीं हिंदुस्थानचीं सूत्रें दिलीं त्यांनीं हिंदुस्थानासंबंधीं आपलें कर्तव्य मुळींच पाळलें नाहीं. व यापुढें राज्यकारभारांत आपल्या हातीं खरीखुरी सत्ता आल्याखेरीज देशाची कांहीं प्रगति होणार नाहीं. आम्हाला न्याय द्या, अशाबद्दल याचना तरी करायची किती! मनुष्याला आवश्यक असें शिक्षण सक्तीचें व मोफत करा अशाबद्दल किती ठराव करावयाचे? कौन्सिलांची वाढ करा याबद्दल ओझ्यावारी ठराव झाले आहेत. अशीं एक ना दोन किती उदाहरणें द्यावीत! स्वराज्याशिवाय तरणोपाय नाहीं ही गोष्ट गेलीं तीस वर्षे स्वार्थत्यागपूर्वक कॉंग्रेसनें जी चळवळ केली तीवरून स्पष्ट झाली आहे. स्वराज्य हा व्यक्तिमात्राचा हक्क आहे ही गोष्ट आतां आमच्या अंतःकरणांत बिंबली आहे." अशारीतीनें आपलें झाललें मतपरिवर्तन **पंडितजींनीं** स्पष्ट मांडलें हा त्यांच्यांतील ठळक गुण होय!

## लाहोर कॉंग्रेसचे अध्यक्ष.

असो; लाहोर कॉंग्रेसचें अध्यक्षपद त्यांजकडे आलें तेव्हां मोर्ले-मिंटो सुधारणा नुकत्याच प्रसिद्ध झाल्या होत्या. तेव्हां त्यांच्या भाषणांत सुधारणांतील

गुणावगुणाबद्दलच विशेष भाग होता हें उघडच आहे. त्या सुधारणांत दोष कोणते आहेत, त्यांत लोकमतानुवर्ती राज्यकारभारास वाव कसा नाहीं यांचें त्यांनीं स्पष्ट व मुद्देसूद विवेचन केलें.या सुधारणांच्या वेळीं नोकरशाहीनें कुटील-पणा करून हिंदी राजकारणांत एक नवेंच तत्त्व घुसडून दिलें. व तें म्हणजे हिंदु व मुसलमान यांच्या सवत्या सुभ्याचें. हल्लीं जो हिंदुमुसलमान या दोन समाजांत राजकीय हक्कासंबंधानें मोठ्या प्रमाणावर वाद चाललेला दिसतो त्याचा उगम फार जुना आहे व त्यांत मुसलमान वर्गाला नोकरशाहीचा एक प्रकारें पाठिंबा होता असें दिसून येईल. **पंडितजींनीं** आपल्या अध्यक्षीय भाषणांत या नीतीचा खरपूस समाचार घेतला. नोकरशाहीच्या धोरणास उद्देशून ते म्हणतात.

## दुहीचें घातुक धोरण.

" राजशासन संस्थेंत प्रातिनिधित्वाला धर्म हा पाया असावा हें घातुक तत्त्व ब्रिटिश राजवटींत तरी या सुधारणांनीं प्रथमच घुसडलें व त्यामुळें मुसलमान आणि बिगर मुसलमान यामध्यें दुहीची एक नसती भिंत उभी करण्यांत आली आहे. ती नष्ट होण्याला किती काळ लागेल कोणी सांगावें ! गेलें अर्धशतक देशांत एक-मुखी व सर्वसंमत अशी जी चळवळ चालली होती ती या प्रकारानें जवळजवळ निरुपयोगी झाली. सुधारलेल्या कायदेमंडळांत मुसलमान येऊं नयेत अशी कॉंग्रे-सची कधींहि इच्छा नव्हती व पुढेंहि असणार नाहीं. योग्य असे मतदारसंघ झाले म्हणजे मुसलमानच काय पण सर्व जातींना त्यांत सहज प्रवेश मिळेल. परंतु कॉंग्रेसचें म्हणणें इतकें कीं, एखादा मनुष्य विवक्षित जातींत जन्माला आला म्हणून त्याला कायदेमंडळांत स्थान मिळतां कामा नये. त्याची शिक्षण-विषयक लायखी व लोकांनीं त्याजवर विश्वास ठेवण्याइतकी पात्रता त्याच्या अंगीं असावयास पाहिजे. "

यानंतर मुसलमान वर्गास उद्देशून ते म्हणाले,

## राष्ट्रहित प्रथम साधा.

" मुस्लीम लीगनें यासंबंधांत जें धोरण स्वीकारलें आहे त्याबद्दल मला फार विषाद वाटतो. राष्ट्रीयत्वाचा विचार बाजूला सारून केवळ जातिहित पुढें करणा-राला देशाभिमानी म्हणतां येत नाहीं. देशाभिमान तोच कीं, ज्यांत ज्ञाति-भेदाला वावच नसतो. सर्व देशबांधवांना सारखे पाहण्याची दृष्टि असेल तोच

खरा देशाभिमानी म्हणतां येईल. 'सर्वे च सुखिनः संतु ' अशी देशभक्तांची वृत्ति पाहिजे. आमच्या मुसलमानबंधूंनीं ऐन आणीबाणीच्या वेळीं अनिष्ट अशी ज्ञातिविशिष्ट चळवळ चालविली आहे. त्यामुळें राष्ट्राची प्रगति खुंटेल. परंतु अजूनहि त्यांना आपली चूक सुधारतां येणें शक्य आहे. तात्पुरत्या फायद्यासाठी राष्ट्रघात करणें बरें नव्हे. क्वचित् हिंदूंना अगर क्वचित मुसलमानांना थोडाबहुत जास्त फायदा झाला तरी त्याचें काय विशेष ? हिंदु, मुसलमान, पार्शी, ख्रिस्ती यांनीं खांद्याला खांदा लावून एकजुटीनें राष्ट्रकार्य करण्यांतच राष्ट्रकल्याण होणार आहे.

सरकारनें मुसलमानांना थोडी जास्त मेहेरबानी दाखविली असली तरी ती तात्पुरती आहे हें मात्र विसरतां कामा नये. सरकारला मुसलमान विशेष प्रिय म्हणून त्याजवर ही कृपादृष्टि आहे असें नाहीं. केवळ हिंदूपासून वेगळे फोडण्यासाठीं हा कावा आहे. व सरकारचा हेतू साध्य झाला कीं, मुसलमानांचीहि तीच गत होणार आहे. ही गोष्ट मुसलमान बांधवांनीं वेळींच ओळखली पाहिजे. अंगीं गुण असला म्हणजे मग तो हिंदु मुसलमान वा पार्शी हा विचारच उद्भवत नाहीं. गुणाः पूजास्थानं नेहमींच मिळालें पाहिजे.परंतु गुणाच्या जागीं " जात" म्हणून विशेष हक्क अगर अधिकार देणें केव्हांहि त्याज्यच होय."

या भाषणांत ब्रिटिश राजसत्तेमुळें लोकांत दारिद्र्य कसें वाढत चाललें आहे, उद्योगधंद्याच्या अभिवृद्धीबद्दल राज्यकर्त्यांची अनास्था कशी आहे, लोकांना शासनसंस्थेंत हात कसा शिरकूं दिला जात नाहीं, फोडा व झोडा या नीतीचा अवलंब कसा केला जातो याचें मार्मिक विवेचन केलें आहे.

यानंतर स. १९१६ पर्यंत काँग्रेसच्या राजकारणांत विशेष घडामोडी झाल्या नाहींत. ठरीव कार्यक्रमानें कांग्रेसची गाडी चालली होती. परंतु **लो. टिळक** बंदिवासांतून मुक्त होतांच काँग्रेसच्या राजकारणांत बदल होणार अशीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं व सन १९१६ मध्यें लखनौ काँग्रेसमध्यें त्यांनीं प्रवेश करून काँग्रेस हस्तगतच केली. व याच काँग्रेसमध्यें ' लखनौचा करार ' नांवानें प्रसिद्ध असलेला करार होऊन त्याद्वारें हिंदु-मुसलमानांत ऐक्य साधण्याचा प्रयत्न झाला.

ऑगस्ट १० स.१९१७ रोजी लखनौ येथें जादा प्रां. परिषदेचे अध्यक्ष या नात्यानें भाषण करतांनाहि त्यांनीं आपल्या नेहमींच्या पद्धतीनें हिंदुस्थानांतील राजकीय परिस्थितींत कसकशी स्थित्यंतरें होत गेली, काँग्रेसनें राजकीय हक्क संपादन करण्यासाठीं कसकशी चळवळ केली, मोर्ले-मिंटो सुधारणांत काय

मिळालें, लोकांच्या राजकीय आकांक्षा काय आहेत. त्या दडपून टाकण्या-साठीं सरकारनें दडपशाही कशी केली इत्यादि गोष्टींचें त्यांनीं सुंदर साधार विवेचन केलें आहे.

## असलें स्वराज्य हवं.

स. १९१७ च्या कलकत्ता कॉंग्रेसमध्यें स्वराज्याच्या ठरावावर बोलतांना त्यांनीं आम्हांस स्वराज्य पाहिजे म्हणजे काय याचें स्पष्टीकरण केलें आहे. त्यांत ते म्हणतात "आम्हीं जें स्वराज्य मागतों त्याचा अर्थ स्वायत्त वसाहतींच्या दर्जाचें स्वराज्य असा आहे. वसाहतींमध्यें कार्यकारी मंडळ कायदेमंडळाला जबाबदार असतें. तीच जबाबदारी आमच्या कौन्सिलना पाहिजे यापेक्षां कमी प्रतीचें स्वराज्य आम्हीं मागतच नाहीं."

महायुद्ध सुरू झाल्यानंतर हिंदुस्थानानें इंग्लंडला अकल्पनीय अशी मदत केली व आतां हिंदुस्थानला स्वराज्य द्या अशाबद्दल हिंदुस्थानांत जोरानें चळवळ सुरू झाली. लो. टिळकांनीं व डॉ. ॲनी बेझन्ट यांनीं स्वराज्यसंघ काढले. सर्व देशभर स्वराज्याची चळवळ सुरू झाली. तेव्हां सरकारनें हिंदी लोकमत शांत करण्यासाठीं म्हणून **मॉन्टफर्ड** सुधारणा प्रसिद्ध केल्या. त्यावर **पंडितजींनीं** विस्तृत व सटीक सूचना केल्या. त्यांतील तात्पर्य असें:—

( १ ) वीस वर्षांच्या आंत संपूर्ण जबाबदारीचें स्वराज्य हिंदुस्थानाला देऊं अशी खातरजमा दिली पाहिजे.

( २ ) हिंदी लोकांना मुलकी व लष्करी शिक्षण देण्यांत येऊन त्यांत ते पास झाल्यास त्यांना या दोन्ही शाखांत निम्म्या जागा देण्यांत आल्या पाहिजेत.

( ३ ) हिंदुस्थानसरकारच्या कार्यकारी मंडळांतील निम्मे सभासद हिंदी असले पाहिजेत.

( ४ ) सूचित केल्याप्रमाणें कौन्सिल ऑफ स्टेट निर्माण केल्यास त्यांतील निम्मे सभासद मतदारसंघांनीं निवडलेले असले पाहिजेत.

( ५ ) अंदाजपत्रकाला. ले. असेंब्लीची मान्यता पाहिजे.

( ६ ) साम्राज्यांतील इतर स्वायत्त वसाहतींना जें आर्थिक स्वातंत्र्य आहे तें हिंदुस्थानला मिळालें पाहिजे.

## प्रांतिक.

( १ ) प्रांतिक कायदेमंडळें इतकीं विस्तृत असावींत कीं विशिष्ट लोकसंख्या असलेल्या तालुक्याचा प्रतिनिधि त्यांत निवडून आला पाहिजे. मतदारसंघ व्यापक असून त्यांत शेतकऱ्यांना मतदानाचा हक्क मिळाला पाहिजे.

( २ ) नव्या कौन्सिलांत जे दिवाण नेमावयाचे त्यांजवर कायदेमंडळांतील बहुसंख्य प्रतिनिधींचा विश्वास पाहिजे.

( ३ ) या दिवाणांकडे कांहीं विशिष्ट खातीं सोंपवून दिलीं असलीं तरी तेच त्या त्या प्रांताच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य असावेत.

( ४ ) राखीव खातीं नसावींत.

( ५ ) ग्रँड कमिटीची सूचना गाळण्यांत यावी.

( ६ ) हिंदुस्थानांतील प्रांतांना ज्या सुधारणा लावण्यांत येतील त्याच ब्रह्मदेशालाहि लावण्यांत याव्या.

**पंडितजींनीं** सुचविलेल्या सुधारणा किती योग्य होत्या हें यावरून दिसून येईल. व त्या सरकारनें मान्य केल्या असत्या तर त्यापासून लोकांचा व सरकारचाहि फायदा झाला असता. परंतु दुर्दैवानें नोकरशाहीस तशी सुबुद्धि सुचली नाहीं हें तिचें दुर्भाग्य !

## ३३ व्या काँग्रेसचे अध्यक्ष.

यानंतर दिल्ली येथें तेहेतिसावी राष्ट्रीय सभा १९२८ सालीं भरली. तिचें अध्यक्षस्थानहि पंडित **मदनमोहन** यांसच देण्यांत आलें. त्या वेळीं महायुद्ध संपलें होतें. राजकीय सुधारणांकडे लोक आशातुर दृष्टीनें पाहत होते. ही राष्ट्रीय सभा अनेक दृष्टींनीं महत्त्वाची झाली. अध्यक्ष पं० **मालवीय** यांनीं सर्व पक्षांनीं राष्ट्रीय सभेस अगत्य यावें अशी मुद्दाम विनंति केली होती. त्या विनंतीस अनुसरून ना. शास्त्री प्रभृति प्रागतिक पक्षाचे अनेक प्रतिनिधी सभेस उपस्थित होते व त्यांनीं चर्चेंत भागहि घेतला. एकंदरीनें ही सभा चांगलीच यशस्वी झाली. अध्यक्षपदावर त्यांची निवड झाल्यावर भाषण करतांना

## महायुद्ध व हिंदुस्थान.

**पंडितजींनीं** प्रथम आपणास या घडामोडीच्या वेळीं दिल्लीसारख्या अत्यंत महत्त्वाच्या ठिकाणीं भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपणाचा मान दिल्याबद्दल आभार

मानले. नंतर दोस्त राष्ट्राच्या विजयाबद्दल आनंद प्रदर्शित करून हिंदुस्थानांतून या युद्धाप्रीत्यर्थ संस्थानिक व प्रजाजन यांनीं कशी जिवापाड मेहनत केली, तुर्कस्थानचें राष्ट्र विरुद्ध बाजूस असतां येथलि मुसलमानांनीं आपली राजनिष्ठा कशी अढळ राखिली, चार वर्षांत ११६१७७९ नवे सैनिक सैन्यांत दाखल होऊन या देशां-तून १२१५३३८ सैनिक रणांगणावर कसे गेले आणि त्यांतले १०१४३९ इसम कसे सरकारकामास आले. लॉर्ड हार्डिंज यांनीं हिंदी लोकांवर विश्वास टाकून हिंदी सैन्य फ्रेंच रणांगणावर रवाना केल्यामुळें किती उपयोग झाला या सर्व गोष्टींचा प्रशंसापर उल्लेख केला. आणि सत्पक्षास विजय दिल्याबद्दल ईश्वराचे आभार मानले. त्याचप्रमाणें या युद्धांत ग्रेट ब्रिटन, वसाहती, फ्रान्स आणि अखेरीस मुख्यत्वेंकरून अमेरिका यांनीं जी कामगिरी बजाविली तिचा त्यांनीं आदरपूर्वक उल्लेख केला. तदनंतर या महायुद्धानें कोणतें तत्त्व शिकविलें आणि कोणत्या राजनीतीचा पुरस्कार केला याविषयीं विस्तृत विवेचन करून ते म्हणाले कीं, आजपर्यंत बहुतेक सर्व राष्ट्रांना बळी तो कान पिळी हाच काय तो न्याय अवगत होता. आजपर्यंत **स्पेन, आस्ट्रिया** व **फ्रान्स** या राष्ट्रांनीं केवळ मनगटाच्या जोरावर सर्व जगभर आपलें साम्राज्य पसरण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांचा बेत फसला. इंग्लंडनें पंधराव्या शतकापासून युरोप खंडांत असला जुलूम केला नाहीं; उलट जुलमानें गांजलेल्या चिमुकल्या राष्ट्रांत परदास्यांतून मुक्त होण्यास मदत केली आहे. परंतु युरोप खंडाबाहेर इंग्लंडनेंहि असा धुमाकूळ घालण्यास कमी केलें नाहीं. गेल्या पन्नास वर्षांचाच इतिहास पाहिला तरी **इंग्लंडनें इजिप्त, सुदान, दक्षिणआफ्रिका ब्रह्मदेश** इतक्या देशांवर स्वारी करून ते देश काबीज केले. त्याचप्रमाणें **मोरोक्को**करितां **फ्रान्स, व जर्मनी, बालकन्स** देशाकरितां **आस्ट्रिया** व **रशिया**. तुर्कस्थानच्या ताब्यांतील प्रांताकरितां **तुर्कस्थान** व इतर राष्ट्रें यांचे झगडे अगदीं अलीकडच्या काळांतच झालेले आहेत. या सर्वांच्या बुडाशीं ' **ज्याच्या मनगटांत जोर त्यानें बनावें शिरजोर,** हाच प्रकार दिसून येतो. याच न्यायास अनुलक्षून अलीकडे जर्मनीनेंहि आपल्या राष्ट्राची लष्करी तयारी केली आणि युरोपांतल्या सर्व राष्ट्रांमधील परस्परांच्या चुरशीमुळें सैन्यभारानें पृथ्वी त्रस्त होऊन गेली. अशा परिस्थितींत युरोपिअन राष्ट्रांच्या डोळ्यांत अंजन पडावयास पाहिजेच होतें आणि या महायुद्धामुळें

तसें अंजन त्यांस मिळालें हा ईश्वरी संकेतच मानला पाहिजे. ' वळी तो कान पिळी ' हें तत्त्व झुगारून देऊन ' सत्यमेव जयते ' या तत्त्वाचा विजय व्हावा असा ईश्वरी संकल्प असल्यानें सत्याचा खरा पुरस्कर्ता पुढें येईपर्यंत या युद्धाचा निकाल लागला नाहीं हें साहजिकच आहे. पापी माणसास पश्चात्ताप झाल्याखेरीज ज्याप्रमाणें त्याचें पापक्षालन होत नाहीं, त्याप्रमाणें युरोपिअन राष्ट्रांना ' मनगटाच्या जोराच्या ' तत्त्वाचा वीट येऊन पश्चात्ताप होईपर्यंत हें युद्ध चाललें. पुढें सत्याचा पुरस्कर्ता **प्रेसिडेंट वुइल्सन** हा पुढें आला आणि त्यानें आपण कोणत्या तत्त्वासाठीं या युद्धांत सामील झालों तें जाहिर केलें.

## प्रेसिडेंट वुइल्सन यांचीं तत्त्वें.

**प्रेसिडेंट वुइल्सन** यांनीं आपल्या अनेक ठिकाणच्या भाषणांत असें सांगितलें कीं, ' सर्व देशांना, सर्व लोकांना ( दोस्तांना व शत्रूनांहि ) सारख न्याय, समान हक्क आणि सारखीच सुरक्षितता प्राप्त व्हावी हेंच माझें मुख्य तत्त्व आहे. हें तत्त्व सर्वमान्य होऊन जगांत प्रस्थापित झाल्याखेरीज राष्ट्राराष्ट्रांतील व्यवहाराची न्यायाच्या पायावर उभारणी होणार नाहीं. हें तत्त्व प्रस्थापित करण्याकरितां अमेरिकन लोक आपलें सर्वस्व व प्राण खर्ची घालण्यास तयार आहेत. दुसऱ्याच्या हक्कांची पायमल्ली झाली म्हणून आम्ही युद्धांत पडलों. राष्ट्रांच्या हक्काची जर शाश्वती राहणार नाहीं तर हें जग मानवी प्राण्यांना नालायक होईल. यास्तव मानवी प्राण्यांना न्यायानें, स्वतंत्रतेनें व सुरक्षितपणें या जगांत राहणें कसें शक्य होईल हा प्रश्न आम्हांस सोडवावयाची आहे. ' सारांश, सर्व जगांत शांतता प्रस्थापित करणें हाच आमच्या युद्धाचा हेतु व हीच आमची तहाचीं कलमें होत ' अशा उदात्त हेतूनें प्रेरित होऊन जेव्हां अमेरिकन राष्ट्र युद्धास पुढें सरसावलें आणि जेव्हां दोस्त राष्ट्रांनींहि **प्रे. विल्सन** यांचीं तत्त्वें मान्य केलीं त्या वेळीं त्यांची बाजू खरी, न्यायाची व सत्याची झाली आणि ' सत्यमेव जयते ' या न्यायानें त्यांस जय प्राप्त झाला. आतां तहाच्या अटींची वाटाघाट होऊन त्यांत हीं अमूर्त तत्त्वें अमलांत कशीं आणावयाचीं याची चर्चा होणार आहे. या तहाच्या वाटाघाटींत हिंदुस्थानचाहि संबंध स्वाभाविकपणेंच पोंचतो, याकरितां त्या तहाच्या परिषदेंत आमचे प्रतिनिधि हजर असणें इष्ट आहे.

## तहाची वाटाघाट व हिंदुस्थान

तहाची वाटाघाट होईल त्या वेळीं हिंदुस्थानच्या गरजा काय आहेत त्याकडे दुर्लक्ष केलें जाणार नाहीं, असें **मि. लॉइड जॉर्ज** यांनीं वचन दिलें होतें. त्यास अनुसरून तहाच्या वाटाघाटींच्या वेळीं हिंदुस्थानचे प्रतिनिधि बोलावण्यांत आले याविषयीं आम्ही मंत्रिमंडळाचे आभार मानतों. या तहपरिषदेकरतां हिंदुस्थानसरकारनें **सर सत्यप्रसन्नसिंह** यांची नेमणूक केली आहे. यांत गोम एवढीच आहे कीं, हीं नेमणूक लोकमत न विचारतां झालेली आहे. हिंदुस्थानसरकारनें त्यांस ज्या कांहीं सूचना दिल्या असतील त्यांस अनुसरून ते तह-परिषदेंत वागतील. या सूचना हिंदी लोकमतास जुळतील किंवा न जुळतील एवढीच काय ती शंका आहे. हिंदुस्थानसरकार अद्यापि हिंदी लोकांना जबाबदार नसल्यानें त्यांचीं मतें लोकमतांशीं विरोधीहि असूं शकतील. यास्तव सरकारनें कॉंग्रेसला व मॉस्लेमलीगला अथवा कायदेकौंसिलांना आपले प्रतिनिधि निवडून द्या, असें सांगितलें असतें तर ते खरे लोकमतानिदर्शक प्रतिनिधि झाले असते. कानडाच्या वतीनें सहा प्रतिनिधि हजर रहाणार आहेत; तेव्हां हिंदुस्थानतर्फे आणखी प्रतिनिधि पाठविण्यास काय हरकत आहे? तहाच्या वाटाघाटींत हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेची चर्चा होईल अशा समजुतीनें कांहीं आम्ही हीं मागणी करीत नाहीं. तथापि तेथें अशा कांहीं तत्त्वांची चर्चा होईल कीं, त्यांचा सामान्यतः किंवा प्रत्यक्षतः हिंदुस्थानच्या राज्यकारभाराशीं संबंध येईलच. असा जर संबंध नसता तर प्रधानांनीं तरी 'हिंदुस्थानच्या गरजांकडे दुर्लक्ष होणार नाहीं' असें आश्वासन देण्याचें प्रयोजन काय होतें? सारांश, तहाच्या वाटाघाटींत हिंदुस्थानचें हित ज्यांवर अवलंबून आहे, असे प्रश्न निघणार आणि त्या वेळीं आपण निवडलेला प्रतिनिधि तेथें हजर असला पाहिजे ही गोष्ट निर्विवाद आहे.

## जन्मसिद्ध हक्क व न्याय.

हिंदुस्थानांत जेव्हां प्रथमच इंग्लिशांचा अम्मल स्थापित झाला, त्या वेळीं हिंदी लोकांना स्वराज्याचें शिक्षण देण्यापुरतेंच आम्ही येथें राहणार आणि हिंदी लोकांच्या इच्छेस अनुसरूनच राज्यकारभार चालविणार, असें ब्रिटिश

मुत्सद्दी सांगत असत. पण कालांतरानें तो विचार लोपत चालला, ही गोष्ट परकी लोकांच्याहि लक्षांत येत चालली आहे. **एम. चॅली** नामक फ्रेंच गृहस्थानें कांहीं वर्षांपूर्वी एका ग्रंथांत लिहिलें आहे कीं, " हिंदुस्थान हें हिंदी लोकां-करितांच आहे, आणि आपण येथें कायमचे रहाणारे नाहीं, ही जी **एल्फिन्स्टन व मनरो** यांची भावना होती तीच आजवर कायम राहिली असती, तर हिंदी लोकांना क्रमशः स्वराज्याधिकार मिळत जाऊन आजमितीला त्यांस पूर्ण स्वराज्य प्राप्त झालें असतें. परंतु अलीकडे ब्रिटिश मुत्सद्यांचें धोरण कांहीं वेगळेंच दिसतें. हिंदुस्थानचा कारभार हिंदी लोकांच्या हिताकडे दृष्टि देऊन चालवा आणि हिंदी लोकांना अधिकाधिक अधिकार द्या, अशी मागणी गेल्या ५० वर्षां-पासून चालू आहे. महायुद्धापूर्वीं तीस वर्षें कॉंग्रेसची स्थापना झालेली आहे आणि १८८६ पासून आम्ही स्वराज्याची मागणी करीत आहों. महायुद्धाची संधि साधून आम्ही हा प्रश्न उपस्थित केला असें नाहीं. हें युद्ध उद्भवलें नसतें तरी आमची मागणी कायम होती व ती परिपूर्ण व्हावयास पाहिजे होती. या युद्धामुळें ब्रिटिशांचा दृष्टिकोन बदलला एवढेंच काय तें विशेष झालें. अशा परि-स्थितींत १९१६ सालच्या लखनौच्या बैठकींत आम्ही स्वराज्याच्या कांहीं हक्कांची मागणी केली. तिला हिंदुस्थानसरकारनें जें उत्तर देण्याचें योजिलें होतें तें इतकें अपुरें होतें कीं, भारतमंत्री **मि. चेंबर्लेन** यांचें देखील त्या योगानें समाधान झालें नाहीं; आणि त्यांनीं फिरून दुसरी योजना करून पाठवा असें हिंदुस्थानसरकारास कळविलें. हिंदुस्थानांतील ब्युरॉक्रसी तर त्याला विरुद्ध होती. कित्येक प्रांतिक सरकारांनीं ' डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्टाचा ' उपयोग करून चळवळ्या लोकांस अटकबंदी किंवा मुस्कटदाबीहि केली. इकडे हिंदी लोकांची स्वराज्याची चळवळ जोरांत चालली आणि तिला इंग्लंडमधील व हिंदुस्थानांतीलहि कांहीं उदार इंग्रजांचें पाठबळ मिळालें. युरोपिअनांतहि कलकत्त्याच्या लॉर्ड बिशपसारखे जे कांहीं उदारात्मे आहेत त्यांनीं आमच्या मागणीची न्यायता उघडपणें मान्य केली आणि ते म्हणाले कीं, ' हिंदी लोकांना जर आम्ही आमचें स्वसंमतीचें व स्वातंत्र्याचें तत्त्व लावूं इच्छिणार नाहीं, तर आमचा पक्ष न्यायाचा व स्वातंत्र्याचा आहे असें ईश्वरापुढें म्हणणें हें निवळ ढोंग होय. '

# निर्जीव व निःसत्त्व आश्वासन.

हिंदुस्थानांतल्या चळवळीची जेव्हां अगदीं कमाल झाली, तेव्हां कांहीं तरी जाहीर आश्वासन देणें जरूरीचें झालें, आणि ता. २० आगष्टचें निर्जीव व निःसत्त्व आश्वासन जाहीर झालें. हें आश्वासन महत्त्वाचें आहे खरें; पण तें निष्कारण निर्जीव व निःसत्त्व करून टाकलेलें आहे. या आश्वासनाबद्दल आम्ही आभारी आहों; पण त्यांत ज्या अटी व मर्यादा घालून ठेविल्या आहेत त्या आम्हास मान्य नाहींत. मि. **मॉंटेग्यु व लॉर्ड चेल्मसफर्ड** यांनीं आपली जी योजना केली ती त्या अटींना व मर्यादांना धरून असल्यानें त्यांची योजनाहि असमाधानकारक झाली आहे. या योजनेवर गेल्या पांच महिन्यांत व्यक्तिशः टीका झालीच आणि मुंबईच्या जादा कॉंग्रेसनें व दुसऱ्या पक्षाच्या कॉन्फरन्सनेंहि त्या योजनेंत कांहीं अतिशय महत्त्वाचे फेरफार करणें अत्यंत जरूर आहे असें मत दिलें. कॉंग्रेसच्या व कॉन्फरन्सच्या मतांत इतर बाबतींत कितीहि मतभेद असला तरी उभयतांनीं सुचविलेल्या फेरफारांत बहुतेक मुद्द्यांवर एकमत आहे. आतां त्या योजनेवर आपण कोणतें मत प्रदर्शित कराल त्याचें मी अगोदरच भविष्य वर्तवून ठेवीत नाहीं; परंतु आपण एक गोष्ट लक्षांत बाळगावी ती ही कीं, जादा कॉंग्रेसच्या वेळीं महायुद्ध चालू असल्यानें आमचे हात एकप्रकारें बांधले गेले होते. आतां युद्धसमाप्ति झाल्यानें आपल्या मागण्यांत कोणता फेरफार करावा याचा आपण विचार करा. जादा कॉंग्रेसनें संपूर्ण प्रांतिक स्वराज्यास आमची लायकी असली तरी तूर्त न्याय. पोलीस व कायदा एवढीं खातीं सहा वर्षेपर्यंत आम्ही आमच्याकडे मागत नाहीं असें म्हटलें होतें. परंतु त्यानंतर मुंबईच्या नामदारांनीं व संयुक्तप्रांताच्या प्रां. कॉं. कमिटीनें संपूर्ण प्रांतिक स्वराज्य प्रारंभापासूनच आमच्या हवालीं करावें, अशी मागणी केली आहे. आणि फ्रँचाइज कमिटीकडे बंगाल, मद्रास वगैरे प्रांतांतूनहि अशीच मागणी केली जाईल; या दृष्टीनें जादा कॉंग्रेसच्या ठरावानें फरक करावा लागेल. या योजनेच्या शेवटीं योजनाकारांनीं असा शेरा मारला होता कीं, या सुधारणेची भावभगत काय आहे तिचा निर्णय दिल्लीस किंवा लंडनास व्हावयाचा नसून फ्रान्सच्या रणभूमीवर हा निकाल लागणार आहे.

## हिंदुस्थानाविषयीं कृतज्ञतेचे उद्गार.

सुदैवानें आतां महायुद्ध समाप्त होऊन दोस्त राष्ट्रें विजयी झालीं आहेत. महायुद्ध चालू असतां वडे ब्रिटिश मुत्सद्दी हिंदुस्थानविषयीं काय उद्गार काढीत होते व कोणती अभिवचनें देत होते त्याची स्मृति जागृत करणें जरूर आहे. ता. ९ सप्टेंबर रोजीं **लॉर्ड हाल्डेन** म्हणाले कीं, 'मानवी जातीच्या स्वातंत्र्या-करितां हिंदी वीर आपलें रक्त ओतीत आहेत. अर्थातच युद्धानंतर त्यांची स्थिति हल्लींसारखीच ठेवतां येणें शक्य नाहीं.' १९१७ च्या फेब्रुवारींत प्रधान मि. **लॉईड जार्ज** म्हणाले, 'वसाहती व हिंदुस्थान, यांच्याकडून झालेली मदत अप्रतिम आहे. या युद्धांत अत्यंत आणीबाणीच्या वेळीं त्यांनीं बजावि-लेल्या कामगिरीचें मोल करतांच येणार नाहीं.' कर्नल मेरीवेदरच्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत **लॉर्ड कर्झन** लिहितात—"हिंदी पलटणी अगदीं ऐन प्रसंगीं येऊन ठेपल्या आणि त्यांनीं दोस्त राष्ट्रांची आणि मानवी सुधारणेची बाजू सांभाळली. ही गोष्ट बादशहापासून तों तहत खालच्या अधिकाऱ्यापर्यंत सर्वांस विदित आहे. हिंदुस्थानानें ही जी कामगिरी केली तिची आम्हास कधींच विस्मृति पडणार नाहीं." दुसऱ्या एका प्रसंगीं **लॉईड जार्ज** म्हणाले 'हिंदुस्थानानें किती राजनिष्ठेनें व किती शौर्यानें ब्रिटिश सैन्यास कुमक केली त्याची आठवण बुजणें शक्य नाहीं. रणयज्ञाच्या अवभृत स्नानाच्या वेळीं हिंदु-स्थानास त्याचा पुण्यांश मिळेलच.' पुनः एकदां ता. ८ नवंबर रोजीं भाषण करितांना तेच प्रधानमंत्री बोलले कीं, 'वसाहती व हिंदुस्थान यांनीं मर्द-पणानें लढून जय मिळविण्याचा मार्ग खुला करून दिला आणि आमच्या सत्रा-गारमंडळांत खुर्ची पटकावली. हिंदी सैन्यानें (पॅलेस्टाइनमध्यें) जे मोठे विजय संपादन केले त्या योगानेंच प्रथम आमच्या शत्रूचे पाय लटपटूं लागले. आतां तहाच्या परिषदेच्या वेळीं हिंदुस्थानच्या गरजांची आठवण ठेविली पाहिजे.'

## स्वसंमतीचें तत्त्व हिंदुस्थानालाहि लावा.

ही सर्व तारीफ आणि हीं अभिवचनें झालीं खरीं; पण त्यांच्यापासून हिंदु-स्थानचें कल्याण कसें साधावयाचें! 'स्वराज्य हा प्रत्येक राष्ट्राचा जन्मसिद्ध हक्क आहे.' या तत्त्वासाठींच हा झगडा झाला आणि हें तत्त्व प्रे. **वुइल्सन**

यांच्या सूत्रांत १४ अटींत गोंविलेलें आहे. आपला स्वार्थ बाजूस सारून देखील इंग्लंड व फ्रान्स यांनीं त्या अटींना आपली संमति दिली आहे. हें तत्त्व आस्ट्रिया-हंगेरीला लागू आहे, बाल्कन प्रदेश, पोलंड, तुर्कस्थानांतील विविध प्रांत यांनाहि तेंच तत्त्व लावण्यांत येणार आहे, परंतु हिंदुस्थानला तें कसें लागू करणार ? हिंदुस्थानाला स्वराज्य पाहिजे असें म्हणतांच हिंदी लोकाच्या अपात्रतेचा मुद्दा पुढें येतो. ज्यांच्या संस्कृतीची मजल पांच हजार वर्षांपलीकडे जाते अशा हिंदूंना व सुमारें ७।८ वर्षें हिंदुस्थानावर राज्य केलेल्या मुसलमानांना आपल्या लायकीचा पुरावा देण्याची पाळी यावी हें दुर्भाग्य होय. परंतु कांहीं लोक असेच आंधळे असल्यानें त्यांची खात्री करणें जरूर आहे. ब्रिटिशांचें येथें आगमन होण्यापूर्वी आम्हीं राजसूत्रें चालविलीं ही गोष्ट सोडून दिली तरी आजमितीला देखील ज्या देशांत **सर जगदीशचंद्रासारखे** शास्त्रज्ञ, **सर टी. माधवराव, सर सालरजंग** यासारखे राज्यधुरंधर मंत्री, **दादाभाई नौरोजी, सर फिरोजशहा, न्या. रानडे, न्या. तेलंग, ना. गोखले** यासारखे पुढारी होऊन गेले, आणि ज्या देशांतील वीरांनीं या युद्धांत त्रिखंडांत कीर्ति संपादन केली तो देश स्वराज्याला अपात्र ठरेल काय ?

## स्वसंमतीचें तत्त्व लावावयाचें कसें ?

हिंदुस्थानाला स्वसंमतीचें तत्त्व लावा असें आपण जें म्हणतों त्याचा अर्थ काय, याचा थोडासा खुलासा केला पाहिजे. स्वसंमति दोन प्रकारची असते. एखाद्या देशाला किंवा प्रांताला ' तूं कोणाच्या अमलाखालीं रहाणार, फ्रान्सच्या का जर्मनीच्या, आस्ट्रियाच्या का इतालीच्या, रशियाच्या का जर्मनीच्या, असा प्रश्न विचारून त्याच्या इच्छेनुरूप जें उत्तर येईल त्याप्रमाणें त्याची विल्हेवाट लावणें हा पहिला प्रकार होय. पॅलेस्टाईन, सीरिया, जर्मन वसाहती, टायरोल, ट्रीस्ट, गॅलिशिया वगैरे प्रांतांची स्वसंमति या तत्त्वास अनुसरून विचारण्यांत येईल. स्वसंमतीच्या दुसऱ्या प्रकारांत दोन देशांपैकीं कोणाचा अंमल मान्य करावयाचा असा प्रश्न नसून राज्यकारभाराच्या विविध पद्धतींपैकीं आज तुम्हाला कोणती पद्धति आवडते व कोणती लागू करावी हाच मुख्य विचाराचा प्रश्न असतो. हिंदुस्थानाला पहिला प्रकार लागू नसून स्वसंमतीचा दुसरा

प्रकारच लागू आहे. कारण आम्हास ब्रिटिश साम्राज्यांतून फुटून जावयाचें नसून त्या साम्राज्यांतच चालू राज्यपद्धतींत फरक करून घ्यावयाचा आहे, या दृष्टीनें आम्हांस आत्मसंमतीचें तत्त्व लागू करा असें आम्ही जेव्हां जेव्हां मागणें करितों त्या त्या वेळीं हल्लींच्या ब्युरोक्रॅटिक राज्यपद्धतीच्या जागीं आम्हास मानवेल आणि आमचें कल्याण साधेल अशी राज्यपद्धति सुरू करा हाच आमचा आग्रह असतो. बरें आतां स्वसंमतीच्या तत्त्वाच्या दृष्टीनें पाहिलें तरी **मॉंटेग्युसाहेबांची** योजना अगदींच फेंकून द्या आणि केवळ आम्ही तयार केलेली दुसरी योजना आमूलाग्र सुरू करा असाहि आमचा हट्ट नाहीं. **मॉंटेग्यूंच्या** योजनेंतच आम्ही सुचविलेले फेरफार करा म्हणजे आजच्या राज्यपद्धतीपुरती आमची स्वसंमति झाली. आणि त्यानंतर पुढले हप्ते कसे द्यावयाचे तें ब्यूरॉक्रसीनें न ठरवितां आमचें आम्ही ठरविण्याची आम्हांस मुभा मिळाली म्हणजे झालें. स्वसंमतीचें तत्त्व आम्हांस लागू करा अशी जी मागणी करितों तिचा सरळ अर्थ एवढाच आहे. एवढी ही मागणी पूर्ण केल्यास हिंदुस्थानांतील असंतोष दूर होऊन कृतज्ञतेची लाट उसळेल आणि ब्रिटिश साम्राज्याला अधिक बळकटी येईल.

## रौलेट-कमिटी व सिडनहॅमकंपू.

या स्वराज्याच्या प्रश्नाच्या वेळींच रौलेट-कमिटीचा रिपोर्ट पुढें आला आहे आणि **सिडनहॅमकंपूकडून** त्याचा भलताच दुरुपयोग करण्यांत येत असल्यानें त्याचा निषेध करणें जरूर आहे. आपल्या रिपोर्टांत ही कमिटीच असें लिहिते कीं राजनिष्ठ हिंदी प्रजेच्या साहाय्यानेंच अराजकांच्या सर्व कारवाईचा मोड करण्यांत आला. यावरून मूठभर अराजकांच्या अत्याचारावरून ३१ कोटी लोकांवर दोषारोप करणें किती अश्लाघ्य आहे तें कळून येईल. हिंदी लोकांना सैन्यांतील कमिशनें देण्यांत येत नाहींत. हा अन्याय दूर व्हावा अशी शिफारस **लॉर्ड हार्डिंज** यांनीं १९११ सालींच केली होती, तरी पण अद्यापपावेतों दहाच कमिशनें देण्याचें ठरलें असून त्यांतलीं देखील पांच अद्यापि हिंदी लोकांना मिळावयाचीं राहिलींच आहेत! **मॉंटेग्यू-चेल्मसफर्ड** सुधारणेच्या योजनेला येथील सिव्हिल सर्व्हंटांनीं विरोध चालविला असल्याचें सिव्हिल सर्व्हिस असोसिएशनच्या सेक्रेटरीच्या पत्रावरून उघडकीस आलें आहे. व्हॉइस-

रॉय व स्टेटसेक्रेटरी यांच्या योजनेला त्याच्या हाताखालच्या या सिव्हिल सर्व्हं-टांनीं अडथळा चालविला आहे हें ऐकून आमच्या मनास धक्का बसत आहे. **लॉर्ड हार्डिंज** यांनीं या सिव्हल सर्व्हंटांना सिमल्यास एके प्रसंगीं उपदेश केला होता, पण त्याचा कांहीं परिणाम झालेला दिसत नाहीं. त्यांच्या या कृतीचा हिंदी लोकांवर परिणाम काय होईल याचा तरी त्यांनीं विचार करावा. १८९७ पासून १९१५ पर्यंतच्या इतिहासाचें त्यांनीं पर्यालोचन करावें. या त्यांच्या विरोधानें तरुणांचें सळसळणारें रक्त अत्याचारास कसें प्रवृत्त होईल याचाहि त्यांनीं शांतपणें विचार पहावा. रौलेट–कमिटीनें ज्या अत्याचाराची मीमांसा केली तसले अत्याचार दडपशाहीनें नष्ट होत नसून उदारपणाच्या राज्यधोरणानेंच त्यांचा बींमोड होत असतो.

## डेप्युटेशन व चळवळ.

आतांपर्यंतच्या माझ्या विवेचनावरून आपला पक्ष सत्याचा आहे आणि हल्लींचा काळ आपणास अनुकूल आहे हें आपल्या लक्षांत आलेंच असेल. तथापि आमचे शत्रु विलायतेंत आपल्या विरुद्ध चळवळ करीत आहेत, याकरितां आपण विलायतेंत एक वजनदार डेप्युटेशन लवकरच पाठविलें पाहिजे. हें डेप्युटेशन आपण निवडावयाचें असून येथें स्वसंमतीच्या तत्त्वाचा उपयोग करा. अतःपर साम्राज्यांत आमचा दर्जा कोणापेक्षांहि कमी प्रतीचा न राहतां सर्वांच्या बरो-बरीनें राहील आणि इंग्लिश लोकांना इंग्लंडमध्यें ज्याप्रमाणें आपल्या बुद्धीच्या जोरावर वाटेल त्या उच्च पदावर चढण्याला मुभा असते तशी संधि येथेंहि आपण घेऊं, अशाविषयीं तुम्ही स्वसंमतीनें निश्चय करा. हें तत्त्व देशभर पसरण्या-करितां प्रत्येक तालुक्यांत व प्रत्येक खेड्यांत कॉंग्रेसकमिट्यांच्या शाखा स्थापून चळवळ करा आणि हें तत्त्व सर्वांस समजून द्या. आणि अशा रीतीनें आपण दृढ निश्चयानें व दीर्घोद्योगानें चळवळ कराल तर आपल्या कल्पनेपेक्षांहि लवकर आपणांस ईश्वरी कृपेनें स्वराज्य मिळेल.'' या आशयाचें भाषण केलें. या सभेंत स्वराज्याचा ठरावहि मंजूर झाला.

## मॉन्ट–फर्ड सुधारणा.

दिल्ली–अधिवेशनानंतर अमृतसर येथें कॉंग्रेसचें ३४ वें अधिवेशन झालें. हें अधिवेशन सुरू होण्यापूर्वीं थोडेच दिवस **मॉंटफर्ड** सुधारणा जाहिर झाल्या

होत्या. त्यापूर्वीच्या **मोर्ले-मिंटो** सुधारणांच्या मानानें पाहतां **मॉंटफर्ड** सुधारणा पुष्कळच प्रगतिपर होत्या यांत शंका नाहीं. तथापि महायुद्धांत हिंदुस्थानानें स्वार्थत्यागपूर्वक घेतलेला भाग, युद्धांत इंग्लन्डला मिळालेलें यश, **प्रे. विल्सन** यांनीं स्वयंनिर्णयाबद्दल काढलेले उद्गार व हिंदुस्थानांत झालेली राजकीय जागृति या मानानें सदर सुधारणा अपुऱ्या, निराशाजनक व असमाधानकारक होत्या व तसेंच राष्ट्रिय सभेनें जाहीर केलें. **लो० टिळकांनीं** प्रतियोगी सहकारितेच्या तत्त्वाची जाहीर घोषणा याच राष्ट्रीय सभेंत केली व मिळेल तें पदरांत पाडून घेऊन जास्तीसाठीं चळवळ करण्याचा आपला हेतू जाहीर केला. **पं. मालवीय** हेहि सुधारणा राबवाव्या अशाच मताचे होते. अशा रीतीनें या राष्ट्रीय सभेत प्रतियोगी सहकारितेचें तत्त्व मान्य होऊन सुधारणा राबविण्याचा ठराव झाला. या सभेंतहि प्रागतिक पक्ष हजर होता.

परंतु यानंतर नोकरशाहीच्या हातून जीं अनेक घोर कृत्यें झालीं तींमुळें नोकरशाहीवर आपण निष्कारण विश्वास टाकला असा अनुभव लोकांस आला. डायर-ओडवायर यांनीं पंजाब प्रांतांत जो कहर केला त्यामुळें अत्यंत राजनिष्ठ अशा लोकांचाहि विश्वास नोकरशाहीवरून उडाला. व त्याचें पर्यवसान कलकत्ता येथें भरलेल्या जादा कॉंग्रेसच्या अधिवेशनास दृष्टीस पडलें. तेथें राष्ट्रीय सभेनें सुधारणांवर पूर्ण बहिष्कार घालण्याचा ठराव पास केला. नंतर नागपूर येथें राष्ट्रीय सभेचें अधिवेशन भरलें असतां तेथेंहि कॉलेजें, कौन्सिलें, कोर्टें, यांवर बहिष्कार घालण्याचा ठराव पास करण्यांत आला. पंजाबमधील नोकरशाहीचीं दुष्कृत्यें डोळ्यासमोर खेळत होतीं, लोक संतापानें जळत होते, अशी स्थिति होती तरी सुद्धां कौन्सिलांवर बहिष्कार घालून नोकरशाहीस मोकळें रान सोडूं नका असें **पंडितजींनीं** नागपूरच्या वि. नियामक मंडळांत आग्रहानें सांगितलें. कॉलेजें व कोर्टें यांजवरहि बहिष्कार घालणें इष्ट होणार नाहीं, असेंहि त्यांचें मत होतें व तें त्यांनीं उघडपणें मांडण्यास कमी केलें नाहीं. परंतु पंडितजींचा हा पोक्त उपदेश ऐकण्याच्या मनःस्थितींत राष्ट्रीय सभा त्यावेळीं नव्हती व बहिष्कारत्रयीचा ठराव तेथें पास झालाहि.

## सुधारणांवर बहिष्कार.

परंतु तत्त्वतः **पंडितजींनीं** या ठरावास विरोध केला असला तरी तो

ठराव उल्लंघन करून ते मॉन्टफर्ड सुधारणेनें देण्यांत आलेल्या नव्या कौन्सिलांत शिरले नाहींत. यावरून त्यांची काँग्रेसनिष्ठा दिसून येते. शाळांवरील बहिष्काराबाबतहि असेंच. यांचा तत्त्वतः या बहिष्काराला विरोध होता. तथापि हिंदु युनिव्हर्सिटींतील विद्यार्थ्यांस शाळा सोडण्याचा उपदेश करण्याची **महात्माजींनीं** इच्छा व्यक्त केल्याबरोबर त्यांनीं **महात्माजींस** सत्कारानें विश्वविद्यालयांत नेलें. तेथें **महात्माजींनीं** अभ्यास सोडून राष्ट्रीय झगड्यांत सामील होण्याबद्दल विद्यार्थ्यांस उपदेश केला. परंतु त्यांच्या अपेक्षेप्रमाणें १।२ विद्यार्थीच कायते शाळा सोडण्यास तयार असल्याचें त्यांना आढळलें.

## स्वावलंबनाचा मार्ग.

नागपूरच्या राष्ट्रीय सभेपासून राष्ट्रीय सभेच्या राजकारणास वेगळेंच वळण मिळालें. यापुढें अर्ज-विनंत्या यांचा काळ संपून स्वावलंबनाचा राजमार्ग आक्रमण्यास सुरवात झाली. राष्ट्रीय सभेच्या निर्णयाप्रमाणें राष्ट्रीय पक्षाच्या लोकांनीं कौन्सिलांवर बहिष्कार घातला, हजारों विद्यार्थ्यांनीं शाळा-कॉलेजें सोडलीं. शेंकडों वकिलांनीं कोर्टांवर बहिष्कार घातला. तरी पण राष्ट्रीय पक्षाचें या गोष्टींमुळें समाधान झालें नाहीं. हजारों तरुणांनीं राष्ट्राच्या आज्ञेनुसार तुरुंगवास पत्करला. बारडोली येथें कायदेभंगाची चळवळ होणार म्हणून गाजली तीहि आकस्मिकपणें **गांधीजींनीं** थांबाविली. अशा अनेक कारणांमुळें राष्ट्रीय सभावाल्यांतच एकप्रकारची व्यग्रता उत्पन्न झाली. इकडे सरकारची दडपशाहीहि जोरांत सुरू झाली तेव्हां तिला तोंड देण्यासाठीं व राष्ट्रांत सर्व पक्षांत पुनः ऐक्य सांधावें या सदिच्छेनें पंडितजींनीं प्रयत्न करण्याचें ठरविलें. नागपूर काँग्रेसनें आपलें ध्येय व कार्यभाग सर्वच बदलल्याकारणानें प्रागतिक पक्ष त्यांतून बाहेर पडला होता. तेव्हां तो व देशांतील पक्षोपपक्ष यांच्यांत ऐक्य घडवून आणून सर्वांनीं एकजुटीनें सरकारास तोंड द्यावें या इच्छेनें पंडितजींनीं सर्वपक्षीय परिषद भरविण्याचें योजून त्याप्रमाणें मुंबईस त्यांनीं परिषद बोलावली. ही शांततापरिषद ता. १४।१५ जानेवारी स.१९२२ साली मुंबईस **सर कावसजी जहांगीरहॉलमध्यें** झाली. या सभेस म. गांधीप्रभृति राष्ट्रीय सभावाले, सर होमर्सजी वाडीयाप्रभृति प्रागतिक व जिनाप्रभृति मुसलमान उपस्थित होते. या परिषदेचे पहिल्या दिवशीं **सर शंकर नायर** व दुसऱ्या दिवशीं

**सर विश्वेश्वर अय्या** असे दोन अध्यक्ष होते. या सभेंत दोन दिवस बरीच भवति न भवति होऊन पुढील आशयाचा ठराव मंजूर झाला.

## ऐक्यार्थ प्रयत्न.

१. गेल्या कांहीं आठवड्यांपासून हिंदुस्थानांतील कित्येक प्रांतांतून, सनि-त्यांच्या व सभाबंदीच्या कायद्यांचें क्षेत्र विस्तृत करून, ते कायदे लागू केले जात आहेत व राजकीय गुन्ह्यांच्या बाबतींत सामान्य कायद्यांचाहि दुरुपयोग केला जात आहे. या योगानें सरसकट धरपकड सुरू झाली असून तिच्या तडाक्यांत कित्येक प्रमुख पुढारी व नागरिक हेहि सापडले आहेत. सरकारचें हें धोरण लेखनस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य, संस्थापनस्वातंत्र्य वगैरे नागरिकांच्या अगदीं मूलभूत हक्कांवर निष्कारण हल्ला करणारें आहे असें या सभेस वाटत आहे. शिवाय तिला असेंहि वाटतें कीं, या धोरणाचा उद्देश तर निष्फळ झालाच आहे पण वरती जनतेची सहानुभूति नष्ट होऊन लोकांच्या क्षोभांत भरच पडली आहे. यास्तव सरकारनें हें धोरण ताबडतोब बदललें पाहिजे असें या सभेचें स्पष्ट मत आहे.

२. या परिषदेचें असेंहि मत आहे कीं, देशाच्या तक्रारी दूर होऊन पूर्ण जबाबदारीच्या राज्यपद्धतीचा दर्जा प्राप्त करून घेण्यास दुसरा कोणताहि उपाय उरला नाहीं असें निःसंशय ठरेपर्यंत अहमदाबादच्या राष्ट्रीय महासभेनें ठरवि-लेल्या कायदेभंगाच्या चळवळीचा उपक्रम करूं नये.

३. ता. २१ डिसेंबर १९२१ रोजीं कलकत्ता येथें व्हाईसरॉयांनीं आपल्या भाषणांत जे विचार प्रदर्शित केले, त्यांना मान देण्याच्या हेतूनें, व पंजाब आणि खिलाफत यांच्या संबंधाच्या गाऱ्हाणीं दूर करणें आणि वसाहतींच्या धर्तीचें संपूर्ण स्वराज्य प्राप्त करून घेणें यांच्यासारखे जे महत्त्वाचे प्रश्न आज राष्ट्रापुढें आहेत त्यांचा उभय पक्षांना अपमानकारक न वाटणारा व सलोख्याच असा निर्णय लावण्याचे शक्य तितके मार्ग शोधून काढण्याच्या इराद्यानें, सर-कार आणि लोकांचे प्रतिनिधि यांची एक परिषद भरविण्यांत यावी, या सूचनेला ही परिषद दुजोरा देत आहे. शिवाय या परिषदेचें असें मत आहे कीं, वादग्रस्त मुद्द्यांचा निर्विकार मनानें विचार करतां येण्याला अनु-

कूल वातावरण उत्पन्न होण्यासाठीं समित्यांचा कायदा व सभाबंदीचा कायदा लागू करण्यासंबंधाचे जाहीरनामे, व त्या कायद्याखालीं निघालेले हुकूम, सरकारनें परत घ्यावे आणि त्या कायद्यान्वयें शिक्षा झालेले, पकडण्यांत आलेले, खटला चालू असलेले सर्व लोक सोडून द्यावे. तसेंच, ज्याअर्थीं सामान्य कायद्याच्या नांवाखालींहि कित्येक लोकांना, ते शांततेच्या व्रतापासून बिलकूल ढळले नसतांना, शिक्षा झालेल्या आहेत, त्याअर्थीं सरकारनें सुचविलेला एक व या परिषदेच्या ५ व्या ठरावांत निर्दिष्ट केलेल्या कमिटीनें निवडलेला एक अशा दोन इसमांची कमिटी, मतभेदाच्या निर्णयार्थ त्यांना सरपंच नेमण्याचा अधिकार देऊन, सरकारन नेमावी; व तिनें अगर सरपंचानें शिफारस केलेले सर्व कैदीहि सोडण्यांत यावे; व तडजोडीच्या परिषदेचा निकाल होईपर्यंत हरताळ, पिकेटिंग व कायदेभंग थांबविण्यांत यावे असेंहि या परिषदेचें मत आहे.

## वर्तुल परिषदेची मागणी.

४ देशांतील आजची आणीबाणीची स्थिति व लवकर तडजोड घडवून आणण्याची आवश्यकता यांकडे लक्ष देतां, या परिषदेचें मत असें आहे कीं, शक्य तितक्या लवकर गोलमेज परिषद ( Round Table Conference ) बोलाविण्यांत यावी व ब्रिटिश प्रधानमंडळानें सदर परिषदेंत तडजोड घडवून आणण्याकरितां जरूर तो अधिकार व्हाइसरॉयसाहेबांना देऊन ठेवावा.

५ पंजाब, खिलाफत व स्वराज्य या प्रश्नांच्या बाबतींत राष्ट्राच्या मागण्या काय आहेत, यांच्या तपशिलांत आज न शिरतां ही परिषद पुढील गृहस्थांची एक कमिटी नेमीत असून, एका बाजूला सरकार व दुसऱ्या बाजूला देशांतील महत्त्वाच्या राजकीय संस्था यांच्यांशीं पत्रव्यवहार करून तडजोडीच्या परिषदेचे सभासद व व परिषदेची तारीख वगैरे तपशिलाच्या गोष्टी ठरविणें, जरूर तर पुनः मध्यस्थ परिषद बोलावणें, व आजचे ठराव अमलांत आणण्याकरितां कराव्या लागणाऱ्या दुसऱ्या आनुषंगिक गोष्टी करणें या संबंधाचे सर्व अधिकार तिला देत आहे.

**कमिटींतील सभासदः—१ सर विश्वेश्वर अय्या, २ पं. मदनमोहन मालवीय, ३ श्री. शेषगिरी अय्यर, ४ सर. पी. सी. रॉय, ५ बॅ. जयकर, ६ सर दिनशा पेटिट, ७ सर होमॅसजी**

**वाडिया, ८ बॅ. बॅप्टिस्टा, ९ श्री. रायजादा भगतराम, १० डॉ. गौर, ११ पं. हृदयनाथ कुंझरू, १२ श्री. नटराजन्, १३ श्री. सी. आर. रेड्डी, १४ श्री. सत्यमूर्ती, १५ पं. गोकर्णनाथ मिश्र, १६ प्रो. एस्. सी. मुकर्जी, १७ बॅ. जिना, १८ श्री. जी. एम्. भुर्ग्री, १९ बॅ. बी. चक्रवर्ती, बॅ. हसन इमाम.**

या परिषदेचा विशेष उपयोग झाला नाहीं.सरकारनें आपल्या दडपशाहीच्या धोरणांत मुळींच फरक केला नाहीं, इतकेंच नव्हें तर लवकरच **म. गांधींस** अटक करून लोकमतास किती मान आहे हें दाखवून दिलें.

## स्वराज्य पक्षाची स्थापना.

हा वेळपर्यंत काँग्रेसचें राजकारण व कौन्सिलचें राजकारण हीं दोन्हीं अगदीं स्वतंत्र होतीं. परंतु कौन्सिलवरील बहिष्कार काँग्रेसनें पुकारल्यापासून राष्ट्रीय पक्षापुरतें तरी दोन्हीं भिन्न संस्थांचें राजकारण एकच किंबहुना अभिन्न झालें. या कौन्सिलवादाला गया काँग्रेसच्या वेळीं पुनः तोंड फुटलें. व काँग्रेसनें कौन्सिलांत शिरावें असें म्हणणारा एक प्रबल पक्ष तेथें निर्माण झाला. **पं. मालवीय** पूर्वींपासूनच कौन्सिलप्रवेशाचें समर्थन करणारे होते. त्यांनीं या वादांत कौन्सिलप्रवेशाचें समर्थनच केलें. व गया येथें **देशबंधु दास** यांचे अध्यक्षतेखालीं ‘ **स्वराज्यपक्ष**’ नांवाचा कौंसिल प्रवेशानुकूल असा एक पक्ष निर्माण झाला, त्यामुळें खुद्द काँग्रेसमध्येंच कौन्सिलप्रवेशवादी व कौन्सिल-बहिष्कारवादी असे दोन पक्ष उत्पन्न झाले. व पुढें स. १९२३ सालीं दिल्ली येथील जादा काँग्रेसनें कौन्सिलप्रवेशला संमति दिली तरीहि हे मतभेद दूर झाले नाहींत!

ले. असेंब्लींत स्वराज्यपक्षानें आपल्या संघटित बळावर नोकरशाहीला अगदीं पुरेपुरेसें करून सोडलें. नोकरशाहीचे पराजयावर पराजय झाले. स. १९२४मध्यें व स.१९२५मध्यें राष्ट्रीय पक्षातर्फे स्वराज्याच्या मागणीबद्दल दोनदां ठराव मांडण्यांत आले. या दोन्हीवेळां **पं. मालवीयजींनीं** आपल्या वक्तृत्वपूर्ण भाषणानें त्या मागणीस पाठिंबा दिला.परंतु राष्ट्रीय पक्षाच्या मागणी-कडे सरकारनें ढुंकूनहि पाहिलें नाहीं.

लोकपक्षाचें कौन्सिलांत असें भांडण सुरू होतें, परंतु काँग्रेसमध्यें देशांतील

सर्व पक्ष सामील झाले नव्हते. त्या सर्वांचा काँग्रेसमध्यें समावेश व्हावा या हेतूनें दिल्ली येथें ता. २३-१-२५ रोजीं. **म. गांधींच्या** अध्यक्षतेखालीं एक सर्वपक्षीय परिषद बोलावण्यांत आली. या सभेपुढें पुढील कामें होतीं.

## पुनः ऐक्यासाठीं.

१ सर्व पक्षांमध्यें ऐक्य उत्पन्न होऊन काँग्रेसमध्यें सर्व पक्षांना सामिल कसें होतां येईल तें ठरविणें.

२ हिंदू व मुसलमान यांचे दरम्यान सलोखा उत्पन्न कसा करतां येईल याचा विचार करणें.

३ सर्व पक्षांना संमत होईल अशी स्वराज्याची योजना तयार करणें.

या सभेंत भाषण करतांना **पंडितजी** म्हणाले. 'निरनिराळ्या जातींमधील तंट्याचा निकाल अगोदर करण्यापेक्षां देशांतील सर्व राजकीय पक्षांची एकी होणें स्वराज्याच्या दृष्टीनें अधिक जरूर. म्हणून राजकीय मतभेद असतील ते कमी करण्याचा प्रयत्न करून सर्व राजकीय पक्षांचें ऐक्य प्रथम करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सरकार हल्लीं आपल्या फुटींचा फायदा घेत आहे आणि बेमुर्वत-खोर व एक प्रकारें निर्लज्ज बनलें आहे. कायदेकौन्सिलांत पास झालेल्या ठरा-वांना सरकार कांहीं किंमत देत नाहीं. ली कमिशनच्या शिफारशी असेंब्लींत बहुमतानें फेटाळल्या गेल्या असल्या तरी सरकार लोकपक्षाचा उपमर्द करून घमेंडखोरपणानें त्या अमलांत आणूं शकतें. सरकारास लोकमताची पर्वा वाटे-नाशी झाली आहे. अशा स्थितींत असेंब्लीमधील माझा वेळ वाया जातो असें वाटतें. ही स्थिति सुधारण्याकरितां सर्व पक्षांची ( राजकीय ) एकी होऊन कौन्सिलांतील कामकाज अधिक जोमदार झालें पाहिजे. हिंदू-मुसलमानांचे ऐक्यासंबंधीं **पंडितजी** म्हणाले, या प्रश्नाचे दोन भाग आहेत. हिंदूंना अगोदर जातवार प्रातिनिधित्वाचें मागणें बिलकुल पसंत नाहीं. लखनौ येथें करार झाल्यानंतर पुढें ज्या कांहीं गोष्टी घडून आल्या त्यामुळें जातवार प्रति-निधित्व मान्य केल्यानें जातिजातींत एकी वाढण्याऐवजी बेकीचे अंकुर मात्र जास्त उत्पन्न होऊं लागले व त्या चुकीचे परिणाम आणखी किती होतील तें सांगतां येत नाहीं. तथापि तो करार जमेस धरून त्याचे अनुरोधानें हिंदू-मुसलमानांतील भांडणें मिटवावीं, मात्र तो करार मुसलमान बंधूंना कबूल

नसून नवीन सुधारणांत त्यांना आणखी जातवार जास्त हक्क हिंदूंच्या संमतीनें मिळविण्याची इच्छा असेल तर हें कार्य दुर्घट आहे व मग. हिंदु मुसलमानांचा नवीन करार होऊन त्याचे जोरावर सुधारणा मिळविण्यास कालावधि लागेल. हिंदु-महासभेचें मत म्हणून मला जरी कांहीं अधिकारपूर्वक सांगतां आलें नाहीं तरी हिंदूचें सर्वसाधारण मत म्हणून मी असें सांगूं शकेन कीं, जातवार प्रतिनिधित्व हिंदूंना मुळींच मान्य नाहीं. त्याचे योगानें फार वाईट परिणाम झाले आहेत. जातवार प्रतिनिधित्व व राष्ट्रीय भावना यांची सांगड असणें शक्य नाहीं. तथापि लखनौच्या कराराच्या मागें जाण्याची हिंदूंची इच्छा नाहीं. अनुभवानें ती चुकीची दिसत असली तरी जोंपर्यंत मुसलमान बंधू त्याप्रमाणें वागण्यास कबूल आहेत तोंपर्यंत हिंदूंनाहि तो कबूल करणें व त्यास मान देणें भाग आहे व त्याप्रमाणें हिंदू वागण्यास तयार आहेत."

या सभेंत पंडितजीशिवाय अनेक गृहस्थांची भाषणें होऊन पुढील चार प्रश्नांचा विचार करण्यासाठीं एक कमिटी नेमण्यांत आली.

१ संयुक्त कॉंग्रेस कशी करतां येईल ?

२ जातिप्रतिनिधित्वाबद्दल विचार.

३ सरकारी नोकऱ्यांमध्यें निरनिराळ्या जातींना अवसर मिळण्याची व्यवस्था.

४ स्वराज्याची योजना.

ही कमिटी सर्वपक्षीय मतांच्या सभासदांची असून त्यांत **पं. मालवीय** हेहि एक होते

या कमिटीपासून ऐक्य साधण्याचा प्रयत्न व्हावा तसा झाला नाहीं. परंतु खुद्द कॉंग्रेसमध्येंच स्वराज्यपक्ष व प्रतिसहकारपक्ष असे दोन पक्ष निर्माण झाले.

## स्वराज्यपक्षांत फूट

याच सुमारास कौन्सिलमधील स्वराज्य पक्षांत फुटाफूट झाली. कौंसिलांत गेल्यानंतर अधिकाराच्या जागा पत्कराव्या कीं नाहीं याबद्दल त्या पक्षांत वाद उत्पन्न झाला. व तो पुढें बराच विकोपाला जाऊन दोन पक्ष उघड झाले. मार्च १९२९ मध्यें नेहरूप्रभृति स्वराज्यपक्षीय सभासद असेंब्लींत सरकार आपल्या मतास काडीचीहि किंमत देत नाहीं, असें पाहून सभागृह सोडून बाहेर पडले. पुढें नेहरूप्रभृति स्वराज्यपक्षीयांनीं कौंसिलांतून आपापल्या जागांचे राजीनामेहि दिले. यापूर्वी म्हणजे कानपुरास सरोजिनीबाई नायडू यांचे अध्यक्षतेखालीं राष्ट्रीय सभा भरली असतां कौंसिलचा प्रवेशवाद पुन्हां

उपटला. त्यावेळीं प्रतियोगी सहकारितेच्या तत्त्वाप्रमाणें कौंसिलप्रवेश इष्ट कसा आहे याचें समर्थन करतांना **पं. मालवीय** म्हणाले,

अमृतसरच्या कॉंग्रेसमध्यें **लो. टिळक, म. गांधी व दे. बं. दास** या तिघांचें एकमत होऊन प्रतियोगी सहकारितेचें धोरण मंजूर झालें. पण नेहरूंच्या ठरावांत धड हें ना तें एकहि धोरण नाहीं, म्हणून असला ठराव करून कॉंग्रेसनें आपलें हसें करून घेऊं नये. असहकारिता बुडाली म्हणून स्वराजिस्ट कौन्सिलांत शिरले. तेथें एकजात विरोध करण्याचा त्यांचा डाव साधला नाहीं हें **पंडित नेहरूंनीं** स्कीन-कमिटीची व पटेल यांनीं अध्यक्षाची जागा स्वीकारली यावरूनच सिद्ध होत आहे. स्कीन-कमिटीची नेहरूंना मोठी आशा वाटते, पण त्यांचा हा भ्रम लवकरच दूर होईल.

कार्यकारी मंडळांतल्या व दिवाणगिरीच्या जागांवर जर आपण खंबीर देशभक्त पाठवूं शकूं तर देशहिताची प्रगति खात्रीनें होईल. पन्नास वर्षांच्या माझ्या अनुभवांत लो. टिळकासारखा चाणाक्ष, दूरदर्शी मुत्सद्दी मला आढळलाच नाहीं. महात्माजी अनेकदां फसले. परंतु **लोकमान्य टिळक** केव्हांहि फसले नाहींत.अशा लोकमान्यांनीं प्रतियोगी सहकारितेचें धोरण घालून दिलेलें आहे. अधिकाराच्या जितक्या जागा कबजांत घेतां येतील तितक्या घ्या आणि त्यांतून जितकें देशकल्याण साधण्यासारखें असेल तितकें साधून घ्या अशी त्यांची शिकवण आहे. त्या शिकवणीस अनुसरून स्वराजिस्ट सरकारच्या छावणींत घुसले. पण तेथल्या मान्याच्या जागा हस्तगत करण्याचें ते नाकारीत आहेत !

## सर्व पक्षांची जूट करा

"**गांधीजींना** देखील कायदेभंग आज अशक्य वाटत आहे. मग या ठरावांत हें कायदेभंगाचें बुजगावणें कशास पाहिजे ? सरकारला वठणीवर आणावयाचें असल्यास सर्व पक्षांची कॉंग्रेसच्या निशाणाखालीं एकजूट करा. १९१९ पर्यंत कॉंग्रेसचे दरवाजे सर्वांना खुले होते. आतां कॉंग्रेससंस्था मूठभर स्वराजिस्टांच्या स्वाधीन केली जात आहे. आजच्या कॉंग्रेसमध्यें मुसलमानहि नाहींत व जमीनदारहि दिसत नाहींत ! खादीच्या पोषाखाची अट घालून कॉंग्रेसचे दरवाजे जास्तच बंद करण्यांत आले आहेत ! असल्या धोरणानें येत्या निवडणुकींत कॉंग्रेसच्या उमेदवारांची फजीती होईल. या दुराग्रहानें कॉंग्रेस राष्ट्रहिताचा घात करीत आहे. चार वर्षांपूर्वी माझे हे विचार पटणारे जितके प्रतिनिधी

होते त्याहून आज बरेच अधिक आहेत आणि यापुढें आमचेंच धोरण यशस्वी होण्याचीं चिन्हें दिसत आहेत.''

अशा रीतीनें कॉंग्रेसमधील दोन पक्षांतच वाद उत्पन्न झाला व तो मिटविण्याविषयीं अनेकांकडून अनेक प्रकारचे प्रयत्न सुरू झाले. व त्याप्रमाणें मार्च १९२६ मध्यें साबरमतीस एक सभा भरविण्यांत आली. या सभेला **पं. मालवीयजींना** हजर राहता आलें नाहीं तरी त्यांनीं उभय पक्षांत तडजोड कशी करावी यासंबंधानें पुढीलप्रमाणें पत्र पाठविलें होतें.

## ऐक्य कसें साधावें

" दिवसानुदिवस माझी अशी दृढ खात्री होत चालली आहे कीं, हिंदुस्थानांत स्वराज्याची स्थापना त्वरित व्हावी अशी ज्यांची अंतःकरणपूर्वक मनीषा आहे त्या सर्वांनीं एकजूट करून आपला एक संयुक्त कॉंग्रेस पक्ष बनवावा आणि वरिष्ठ व प्रांतिक कौन्सिलांत त्या संयुक्त कॉंग्रेसपक्षाचें बहुमत स्थापित करावें. ही गोष्ट साध्य होण्याला प्रत्येक पक्षानें आपलें धोरण सुधारावें आणि प्रतिपक्षाकडे पाहण्याचा दृष्टिकोनहि थोडासा बदलावा. गेल्या महिन्यांत मुंबईस जी नॅशनॅलिस्ट पक्षांची परिषद झाली तिनें कॉंग्रेसच्या बाहेरच्या सर्व पक्षांना पूर्वीपेक्षां कॉंग्रेसच्या अगदीं जवळ आणलें आहे. आतां ज्यांच्या हातीं कॉंग्रेसचीं सूत्रें आहेत त्यांनींहि आपलें धोरण आणि आपले नियम थोडेसे बदलून कॉंग्रेसमध्यें येण्याचा मार्ग मोकळा करून द्यावा अशाविषयीं त्यांचें मन वळविण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे.

माझ्या समजुतीनें पुढील धोरणावर सर्व पक्षांची एकजूट होऊं शकेल. तें धोरण असें—

१ प्रत्येक राजकारणी व्यक्तीनें राष्ट्रीय सभेचें क्रीड हेंच आपलें राष्ट्रीय ध्येय होय अशी स्पष्ट संमति द्यावी.

२ राष्ट्राच्या मागणीची परिणामकारक बजावणी करण्यास सार्वत्रिक सविनय कायदेभंग हेंच अखेरचें शस्त्र आहे, पण आज राष्ट्राची तशी तयारी नाहीं या सिद्धांताला संमति द्यावी.

३ परदेशी कापडाचा सर्वथैव त्याग करून स्वदेशी कापड वापरावें; त्यांतल्या त्यांत खादी वापरल्यास उत्तम.

४ ज्या राजकीय संस्था कॉंग्रेसचें क्रीड मान्य करतील त्या संस्थांना राष्ट्रीय

सभेला प्रतिनिधी पाठवितां येतील अशा पद्धतीनें निवडणुकीच्या नियमांत दुरुस्ती करावी.

५ कायदेमंडळांतल्या कॉंग्रेसच्या प्रतिनिधींनीं प्रतियोगी सहकारिता हें धोरण स्वीकारून मुख्यतः पुढील गोष्टी साधण्याची खटपट करावी—

## कायदेमंडळांत करावयाचीं कामें

( अ ) ब्रिटिश साम्राज्यांतील स्वायत्त वसाहतींतल्याप्रमाणें जबाबदार राज्य-पद्धति ऊर्फ स्वराज्यसंपादन करणें.

( आ ) राज्यकारभाराचा खर्च व विशेषतः लष्करी खर्च कमी करणें.

( इ ) कराचा बोजा कमी करणें.

( ई ) शहरांतून व खेड्यापाड्यांतून आरोग्यरक्षणाची समाधानकारक तजवीज करणें.

( उ ) मुलांना व मुलींना सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण देण्याची तरतूद करणें.

( ऊ ) संरक्षक जकातपद्धतीचें तारतम्यानें अवलंबन करून व पेढ्या स्थापन करून व भांडवल पुरवून देशी उद्योगधंद्यास उत्तेजन देणें.

( ऋ ) दारू गाळणें व विकणें याला शक्य तितक्या लवकर बंदी करणें.

( ॠ ) अस्पृश्य वर्गांना सर्व सार्वजनिक जागीं मुक्तद्वार ठेवून व अन्य रीतीनेंहि अस्पृश्यतानिवारण करणें.

( ऌ ) राजकीय शिक्षणांत देशाभिमान, परधर्मसहिष्णुता आणि नागरिकत्वाचीं कर्तव्यें यांचें प्रत्यक्ष शिक्षण देणें.

( ए ) घरगुती उद्योगधंदे म्हणून हातरहाट व हातमाग चालविण्याला उत्तेजन देणें.

( ए ) शाळा, विद्यापीठें, आणि कॉलेजें यांतून लष्करी शिक्षण मिळविण्याची तजवीज करणें.

( ओ ) सरकारी खात्यांतून शक्य तितकी जलद हिंदी कामगारांची भरती करणें.

६ ज्या वेळीं कोणत्याहि एकाद्या प्रांतिक कायदेमंडळांतील कॉंग्रेसपक्षाच्या लोकनियुक्त सभासदांना बहुमतानें असें वाटेल कीं, दिवाणाची किंवा दुसरी कोणतीहि सत्तेची, जबाबदारीची व सूत्रधारित्वाची जागा पत्करल्यानें आपल्या पक्षाचें कल्याण अधिक साधेल त्या वेळीं ती जागा स्वीकारण्याला हरकत असूं नये. मात्र त्या कामाच्या धोरणावर लोकपक्षाची नजर राहावी.

७ जातीजातींत तंटे उद्भवल्यास ते मिटविण्याकडे प्रत्येक सभासदाचें लक्ष असावें.

८. कायदेमंडळाच्या बाहेरहि कॉंग्रेस पक्षानें जनतेची राजकीय, सामाजिक, औद्योगिक, आर्थिक, व व्यवहारविषयक उन्नति साधण्याचा प्रयत्न करावा.

९. वरील सूचना मंजूर करण्याकरितां प्रथम ऑ. इं. कॉं. कमिटीची सभा भरवावी आणि नंतर कॉंग्रेसची जादा बैठक बोलावून तींत या कार्यक्रमाचा विचार करून तो मंजूर करावा.

१०. तोंपर्यंत तूर्त कायदेमंडळाच्या निवडणुकीकरितां उमेदवार ठरविण्याचें काम खास कमिट्यांकडे सोंपवावें आणि त्या कमिट्यांतून कॉंग्रेसला येऊन मिळणाऱ्या सर्व पक्षांचें यथाप्रमाण सभासद घेतले जावेत.

## हाच खरा लोकपक्ष

हा वर सुचविलेला कार्यक्रम कॉंग्रेसनें स्वीकारला तर देशांत कॉंग्रेसचा संयुक्त पक्ष प्रस्थापित होईल, त्यास अखिल भारतवर्षाच्या वतीनें बोलण्याचा खरा अधिकार येईल आणि त्यानें हातीं घेतलेल्या कार्यांत त्यांस हल्लींच्या कोणत्याहि एका पक्षापेक्षां अधिक यश खात्रीनें मिळेल. १८८९, १९०५ आणि १९१६ या सालीं कॉंग्रेसच्या बैठकी सर्व पक्षांच्या एकविचारानें भरल्यानें १८९२, १९०५ व १९१९ या सालच्या सुधारणा आपणांस प्राप्त झाल्या. १८८५ सालीं कॉंग्रेसची स्थापना झाल्यावेळेपासून मी कॉंग्रेसचा सभासद असल्यानें यापुढें जी मोठी सुधारणा होणार आहे तिचेंहि श्रेय कॉंग्रेसलाच मिळावें अशी माझी बलवत्तर इच्छा आहे. मी कॉंग्रेसला विरोध करतों असें नुसतें मनांत आणणें ही देखील मोठी चूक आहे. मात्र हल्लींच्या कॉंग्रेसचें जें धोरण आहे त्याच्याविरुद्ध माझी चळवळ आहे. कारण अनेक विचारवंत सभासदांना कॉंग्रेसचें आजचें धोरण बदललें पाहिजे असेंच वाटत आहे. कॉंग्रेसचें धोरण निश्चित, सुसंगत व समंजसपणाचें होऊन कॉंग्रेसच्या अंगीं पूर्वीचें सामर्थ्य यावें आणि पूर्वीसारखीच ही संस्था सर्व सुशिक्षित जनतेच्या मताचें प्रतिबिंब दर्शविणारी व्हावी असाच माझा मनोदय आहे. राष्ट्राच्या कल्याणासाठीं झटणारे जे माझे सहकारी आहेत ते माझ्या या सूचनांचा गंभीरपणें खोलवर विचार करतील असा मला भरंवसा वाटतो."

यानंतर साबरमतीस कांहीं अटीवर तडजोड झाली. परंतु ती टिकली नाहीं. पुढें **पं. मालवीय, लाला लजपतराय** प्रभृतींनीं सप्टेंबर १९२६मध्यें पुनः एक प्रयत्न केला पण तोहि साधला नाहीं. अशा रीतीनें देशांतील सर्व पक्षांत निदान कॉंग्रेसमध्यें तरी सर्वत्रांची जूट असावी अशाबद्दल **पं. मालवीय** यांनीं भगीरथ प्रयत्न केले; परंतु असें प्रयत्न करीत असतांना त्यांनीं आपल्या तत्त्वाला सोडलें नाहीं. ते स्वतः प्रतिसहकार पक्षाचे सभासद नव्हते तरी त्या पक्षाचीं सर्व तत्त्वें त्यांना पुरापूर मान्य असत व संधी सांपडतांच ठामपणें मांडण्यासहि ते चुकत नसत.

प्रतिसहकार पक्षांत **पंडितजी** प्रत्यक्ष समाविष्ट न झाले तरी त्यांना त्या पक्षाचा सर्व कार्यक्रम मान्य होता ही गोष्ट मात्र खरी. जुलै स. १९२६ मध्यें कलकत्ता येथें युनिव्हर्सिटी इंस्टिट्यूटमध्यें त्यांचें 'प्रतियोगी सहकारिता' या विषयावर पुढील आशयाचें भाषण झालें.

## प्रतियोगी सहकारितेचा पुरस्कार

" १८८५ सालीं कॉंग्रेस स्थापन झाली तेव्हांपासून तिनें 'जबाबदार राज्यपद्धति' हें ध्येय डोळ्यापुढें ठेवून तत्प्रीत्यर्थ अव्याहत प्रयत्न केले आहेत. १८९२ सालीं प्रातिनिधिक पद्धतीचा पहिला उपक्रम करण्यांत आला व त्यानंतर सुधारणांचे दोन हप्ते मिळाले, हीं कॉंग्रेसच्या चळवळीचींच फळें होत. मात्र प्रत्येक वेळीं दिलेल्या सुधारणा त्या त्या वेळच्या लोकांच्या आकांक्षाच्या मानानें अपुऱ्या, अपमानकारक व निराशाजनक अशाच ठरल्या. आजहि स्थिति अशी आहे कीं, मॉंटफर्ड सुधारणा असमाधानकारक म्हणून सर्वांनीं एकजात धिःकारल्या तरी त्यांचा अंमल चालू आहे. दुसरी गोष्ट अशी कीं, हा सुधारणा-कायदा दुरुस्त होऊन पुढचा हप्ता मिळावयाचा म्हणजे पार्लमेंटानेंच पुनः कायदा केला पाहिजे. हिंदी लोकांची स्वराज्याची लायकी ठरविण्याचें काम सुधारणा कायद्यानें पार्लमेंटाकडे दिलें ही चूक आहे. हजारों वर्षें ज्या हिंदूंनीं उत्तम तऱ्हेनें राज्यें चालविलीं आणि आशियांतच नव्हे तर युरोप खंडातहि ज्या मुसलमानांचें एक वेळ राज्य पसरलेलें होतें, त्या हिंदू-मुसलमानांना ही गोष्ट अपमानास्पद आहे. अमृतसर कॉंग्रेसनें सुधारणा राबवून घेण्याचें ठरविलें तरी या कलमाबद्दल निषेधच व्यक्त केला आहे. सुधारणांचा आज सहा वर्षें आपण अनुभव घेत असून त्या नीट चालू शकत नाहींत हेंहि दिसून आलेलें आहे.

# फरीदपुरचा हवाला

सद्यःस्थितीचा विचार करतांना आणखी एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे; ती ही कीं, आमच्यांत एकी नाहीं. पूर्ण जबाबदारीचें स्वराज्य लवकर मिळ-विण्यास सुधारणांचा शक्य तितका उपयोग करून घ्यावा असें एक पक्ष म्हणतो, तर सतत विरोधच करून सरकारला स्वराज्य देण्यास भाग पाडावें असें दुसऱ्या पक्षाचें म्हणणें आहे. द्विदलराज्यपद्धति नेस्तनाबूद केलेली पाहण्यास दासबाबू हयात होते, पण तेवढ्यानें सरकारचें राज्य कांहीं बंद पडलें नाहीं. सरकाराशीं सतत विरोध करणें अशक्य असून केव्हां तरी तडजोडीवर आलें पाहिजे हें **दासबाबू** जाणून होते. फरीदपूरच्या भाषणांत या तडजोडीचा पूर्वपक्ष म्हणून त्यांनीं आपल्या कांहीं अटीहि मांडल्या होत्या व सरकारच्या वृत्तींत लवकरच बदल घडून येईल अशी त्यांची अपेक्षा होती. दुर्दैवानें काळानें त्यांना अचा-नक ओढून नेलें व आपण अशा बिकट स्थितींत येऊन पडलों. आपसांतील दुहीमुळें येत्या निवडणुकींत स्वराज्य पक्षाचें बल कमी होईल. एक गोष्ट त्याला विशेष जाचक होणार आहे ती अशी कीं, सतत विरोधाचें धोरण सुरुवातीलाच त्यानें सोडलें असलें तरी **दासबाबूंच्या** निधनापासून जनतेला नापसंत अशा तऱ्हेचें वर्तन त्याचे हातून वेळोवेळीं झालेलें आहे.

स्वराज्यपक्षानें कौन्सिलांतून उठून येण्याचा जो प्रयोग केला तो याचेंच एक उदाहरण होय. कानपूरच्या ठरावाची बजावणी करण्याच्या भरीस पडून स्कीन कमिटीवरील जागा **पं० मोतीलाल नेहरू** यांनीं सोडली! वास्त-विक ह्या कमिटीचें कार्य देशाला हितावहच होईल असेंच त्यांचें व्यक्तिशः मत होतें. कांहीं झालें तरी कौन्सिलें व असेंब्ली चालूच राहणार. आपण बाहेर पडल्यानें तीं बंद पडतील व सरकारला पुढच्या सुधारणांचा हप्ता देणें भागच पडेल अशी गोष्ट असती तर या उठून येण्यांत कांहीं तरी अर्थ होता. पण सरकारला याची पर्वा काय आहे? लोकमताला सरकार किती विचारतें, हें सर्वांना माहीत आहे आणि म्हणून स्वराज्यपक्षाची ही कृति लोकांना पसंत पडली नाहीं.

यानंतर बंगाल पॅक्टचा उल्लेख करून त्या संबंधानें चाललेला वाद स्वराज्य-पक्षाची ( विशेषतः बंगालमधील ) लोकप्रियता कमी करण्यासच कसा कारणी-भूत होत आहे हें त्यांनीं सांगितलें व पुढें म्हणाले, ' स्वराज्यपक्षांत दुफळी

माजलेली, मुसलमानांचा वेगळा पक्ष होऊं घातलेला आणि प्रतिसहकारवादी, स्वतंत्र व राष्ट्रीय हे आपापले गट बनविण्याच्या तयारीस लागलेले, अशी स्थिति असतांना राजकीय प्रगतीची आशा बाळगणें व्यर्थ आहे. ही स्थिति अशीच राहील तर देशाचें फार नुकसान करील. कायदेमंडळांत लोकपक्षाच्या वतीनें सारखा झगडेल असा एक सुसंघटित पक्ष आज पाहिजे आहे. कौन्सिलांत ज्यांना जावयाचें आहे त्यांनीं आपला कार्यक्रम मतदारांना समजेल अशा तऱ्हेनें त्यांच्यापुढें मांडला पाहिजे. सर्व पक्षांना एकत्र आणूं शकेल असें सामान्य धोरण पाहूं गेल्यास कौन्सिलें व असेंब्ली यांचा पूर्ण फायदा घेण्याचें धोरण स्वीकारणें हाच एक मार्ग दिसतो.

## स्वराज्यप्राप्तीचा अन्य मार्ग

स्वराज्यप्राप्तीचा दुसरा एक उपाय म्हणजे शक्य असल्यास उघड युद्ध पुकारणें हा होय. पण तसें करण्याची आज आपली स्थिति नाहीं. या बाबतींत आपण कसे दुर्बल व नादान झालों आहों हें सांगतांना माझ्या मनाला अत्यंत वेदना होतात. आपण आज सशस्त्र असावयाला पाहिजे होतों, आणि मग लोकमताला बेगुमानपणें धुडकावण्याची सरकारची खात्रीनें प्राज्ञा झाली नसती; पण या सर्व गोष्टींच्या अभावीं मी वर सांगितलेल्या उपाया-शिवाय दुसरा उपाय नाहीं हेंच मला पुनः सांगावयाचें आहे. लोकमताची संघटना, जोपासना व बलवृद्धि करण्यास कौन्सिलांतील कार्य हें एक उत्तम साधन आहे. फरीदपूरच्या भाषणांत सरकारशीं तडजोडीची वाटाघाट करण्यास आपली तयारी असल्याचें **दासबाबूंनीं** बोलून दाखविलें होतें. त्यांनीं स्वतः प्रधानकी स्वीकारली नसती तथापि कांहीं अटींवर श्री. चक्रवर्ती यांना पाठिंबा देण्याचें त्यांनीं आश्वासन दिलेलें होतें.

सामान्य अटींवर तडजोड होत असल्यास दिवाणगिऱ्या स्वीकारण्यास **दासबाबूंची** हरकत नव्हती एवढी गोष्ट उघड आहे. या अटी कोणत्या त्या वाटाघाट करून ठरवितां येतील. तेव्हां सुधारणासंबंधानें आपलें मत होतें तें कायम ठेवून त्या पूर्णपणें राबवून स्वराज्यसंपादनाच्या कामीं लावण्याच्या दृष्टीनें तडजोड करण्याला कांहींच हरकत नाहीं. पण आज आपलें धोरण अगदीं स्पष्ट आंखलेलें पाहिजे आणि गोरगरिबांना साहाय्य, बेकारांना काम आणि नवीन उद्योगधंद्यांना मदत त्यानें मिळवून देतां आली पाहिजे.

या कारणास्तव कौन्सिलांत असे लोक जावयास पाहिजेत कीं, जे देशाच्या हिताचीं अनेक कामें तेथें आग्रहानें करून घेतील. ' रिस्पॉन्सिव्ह कोऑपरेशन ' ज्याला म्हणतात तें यापेक्षां वेगळें कांहींएक नाहीं. किंवा **दासबाबूंच्याच** शब्दांत सांगायचें तर देशाच्या हिताकरितां जरूर तेथें सहकार्य आणि देशाच्या हिताकरितांच जरुर तेथें विरोध हा त्याचा अर्थ आहे. देशाची आजची परिस्थिति लक्षांत घेऊन स्वराजिस्ट, राष्ट्रीय, प्रतिसहकारवादी व स्वतंत्र या सर्वांचा मिळून एक संघटित लोकपक्ष उभा करण्याची योजना करावी अशी माझी सर्वांना विनंति आहे. मी पुनः एकदां बजावून सांगतों कीं, कौन्सिलें हीं राहण्याकरितां आलीं आहेत. तेव्हां तेथील कामावर बारीक नजर ठेवून आपल्या प्रतिनिधींना स्वराज्यप्राप्तीला पोषक असें एक धोरण पाळावयास लावणें हें आपलें काम आहे. ''

## सायमन कमिशन व नेहरू रिपोर्ट

यानंतर स. १९२७ मध्यें नवें सुधारणा कमिशन ( सायमन कमिशन ) नेमण्यांत येणार असल्याचें ना. व्हाईसरॉय यांनीं जाहीर केलें. देशांतील बहुतेक सर्व पक्षांनीं कमिशनवर बहिष्कार घातला. परंतु कमिशनला उत्तर म्हणून हिंदुस्थानला राज्यघटना तरी कसली पाहिजे हें स्पष्ट करण्यासाठीं ता. १९ मे १९२८ रोजीं एक सर्वपक्षीय परिषद भरविण्यांत आली. व तींत पं. **मोतीलाल नेहरू** यांचें अध्यक्षतेखालीं घटना तयार करण्यासाठीं एक कमिटी नेमण्यांत आली. या परिषदेंत पं. **मालवीयजी** यांनीं पुढील ठराव मांडला. '' ज्या राजकीय पक्षाचें ध्येय पूर्ण स्वातंत्र्य हें आहे त्यांना आपलें कार्य चालविण्यास पूर्ण मुभा देऊनहि ही परिषद असें जाहीर करीत आहे; कीं, यापुढें हिंदुस्थानांत रूढ होणारी राज्यपद्धति सर्वस्वीं लोकमताला जबाबदार असावी. व ही राज्यपद्धति स्वतंत्र वसाहतीच्या दर्जापेक्षां कमी नसावी ! ''

या ठरावाला खूप विरोध झाला तरीहि पण अखेरीस ठराव पास झाला. या कमिटीनें सर्वमान्य अशी घटनाहि तयार केली. पुढें कलकत्ता कॉंग्रेसनें या घटनेस मान्यताहि दिली.

कलकत्ता येथेंच कॉंग्रेसच्या वेळीं पुनः सर्वपक्षीय परिषद भरविण्यांत आली. तींतहि नेहरू रिपोर्टासच पाठिंबा देण्यांत आला. परंतु तेथें झालेल्या वादविवादांत नेहरू रिपोर्टाच्या प्रवर्तकांवर ते जमिनदारांचे व भांडवलवाल्यांचें

पाठीराखे आहेत इत्यादि प्रकारचे आरोप करण्यांत आले. या सर्व आक्षेपांस उत्तर देण्याचें काम पं. **मदन मोहन मालवीय** यांजवर सोंपविण्यांत आलें. कारण वरील हक्कसंबंधाचें कलम पं. **मालवीय** यांच्या शिफारसविरून नेहरू योजनेंत समाविष्ट झालें होतें. **पं. मालवीय** म्हणाले ' जनतेच्या सेवेंत आमच्या काळ्या केसांचे पांढरे झाले हें तुम्ही प्रत्यक्ष पहात असतां, आम्ही जमीनदारांस सामील होऊन तुमचा विश्वासघात केला असें संभवतें तरी कसें ? नेहरू योजनेंतील कलमाचा अर्थ तुम्ही करतां तसा नाहीं. राष्ट्रहिताकरितां जमीनदारांचे हक्क लादून घेण्याची जरूरी स्वराज्याच्या काळीं राष्ट्रास भासली तर त्यास हे हक्क काढून देतां येतील. फरक इतकाच कीं ते हक्क बुडवितां येणार नाहींत. हक्क काढून घ्यावयाचे झाल्यास नुकसानभरपाई करून देण्याची जबाबदारी स्वराज्य सरकारावर राहील. जमीनदार हेहि हिंदुस्थानचे रहिवासी आहेत. जसा तुम्हाला तसा त्यांनाहि न्याय व सहानुभूति मिळणें जरूर आहे ! पं. **मालवीय** यांच्या खुलाशानें परिषदेचा रंग तावडतोब पालटून सर्व उपसूचना नापास झाल्या व त्यांचा ठराव कायम राहिला.

लाहोर येथें कॉंग्रेसनें नेहरू रिपोर्टास मूठमाती दिली. तेव्हां सर ए. पी. **पेट्रो** यांनीं मुंबई येथें पुनः सर्वपक्षीय परिषद बोलाविली. परंतु राष्ट्रीय पक्षानें त्यांत भाग घेतला नाहीं. पं. **मालवीय** यांनीं असें कळविलें कीं, जातीय व राजकीय वाद मिटविण्याला सध्यांची वेळ आणि परिस्थिति अयोग्य व प्रतिकूल असल्यानें आपण त्यांत भाग घेऊं शकत नाहीं.

## सविनय कायदेभंगाची चळवळ

यानंतर राष्ट्रांत नवीच प्रचंड चळवळ सुरूं झाली. त्या चळवळींत **पंडितजी** पडून त्यांनीं कायदेभंग कसा केला व त्या पायीं त्यांना कारागृहवास कसा भोगावा लागला ती मनोरंजक हकीगत स्वतंत्र प्रकरणांत दिली असल्यानें तिचा विस्तार येथें करणें बरें नव्हे. परंतु मुंबई येथील तुरुंगांतून त्यांची अचानकपणें सुटका होतांच त्यांनीं ता.१२ ऑगस्ट १९३० रोजीं जें भाषण केलें त्यावरून त्यांचा स्वाभिमान व स्वातंत्र्यवृत्ति चांगलीच प्रत्ययास येते. या भाषणांत ते म्हणतात—

" गेले पांच महिने हिंदुस्थानांत जी चळवळ सुरू झाली तिमुळें जग आश्चर्यचकित होऊन गेलें आहे. **म. गांधींनीं** ज्या वेळीं कायदेभंगाची

चळवळ सुरू केली त्या वेळीं आपणास इतकें यश मिळेल अशी त्यांनाहि कल्पना नव्हती. परंतु या स्वातंत्र्ययुद्धांत देशांतील सर्व पुरुष, स्त्री व लहान मुलेंहि समाविष्ट झालीं आहेत.

## जातिभेद नष्ट झाले

**महात्माजींनीं** चळवळ सुरू केली तेव्हां बाह्यतः कलह व ज्ञातिभेद यांचा बुजबुजाट होता. व हिंदी हितविरोधी लोकांनीं, हिंदु-मुसलमानी विरोधाचें मोठें बुजगावणें उभें करून तीं हिंदुस्थानाच्या प्रगतीला अत्यंत अनिष्ट गोष्ट असल्याचा कांगावा सुरू केला होता. परंतु गेल्या पांच महिन्यांत ही सर्व स्थिति पालटली आहे. सर्व जातिभेद नष्ट झाले असून राष्ट्रीयत्वाची एकच लाट सर्व देशभर पसरली आहे. **सरोजिनीदेवी, आबास तय्यबजी** असे भिन्न जातींचे पुढारी एकाच भावनेनें तुरुंगांत गेले आहेत. राष्ट्रसेवा करण्याचा प्रथम मान आपणास मिळावा यासाठीं हिंदू, मुसलमान, पारशी, खिस्ती, शीख यांमध्यें जणुं स्पर्धाच उत्पन्न झाली आहे.

अशी वस्तुस्थिति असतांहि ज्ञातिभेदाचें तुणतुणें कांहीं स्वार्थी लोक गातच आहेत, ही मात्र आश्चर्याची गोष्ट आहे. मुसलमानांनीं या लढ्यांत किती भाग घेतला ही गोष्ट स्पष्ट दिसत असल्यानें वरील लोकांच्या बडबडण्याकडे लक्ष देण्याचेंहि कारण नाहीं. पेशावरमध्यें पूर्ण अनत्याचारी असे १२५ मुसलमान गोळी घालून ठार करण्यांत आले, व त्या प्रांतांत मुसलमान बहुसंख्य असून त्यांनीं कॅांग्रेसचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठीं हिंदूंच्या बरोबरीनें भाग घेतला आहे.

आतांपर्यंत जनता पूर्ण अनत्याचारी राहिली हा या युद्धांतील विशेष आहे. ब्रिटनला नमविण्याला अनत्याचारासारखें दुसरें शस्त्र नाहीं. अत्याचाराचे परिणाम काय होतात याची त्यांना पूर्ण कल्पना आहे. जे लोक अत्याचाराचा अवलंब करतील ते कॅांग्रेसचे नव्हत. त्यांचा कॅांग्रेसशीं कांहीं संबंधहि नाहीं.

## कायदेभंग कां करावयाचा

एखादा कायदा अन्यायी आहे अशी आपली खात्री पटली व तो मोडल्याचे परिणाम भोगण्याची सिद्धता असली म्हणजे तो मोडणें बेकायदा नाहीं. इतकेंच नव्हे तर जें सरकार आपणावर जुलूम करतें त्याला तुच्छ लेखणें, न जुमानणें हेंहि पूर्ण कायदेशिर आहे. सत्याग्रह्यांना पकडून सरकारनें त्यांना

तुरुंगांत घातलें तर त्याबद्दल आमची तक्रार नाहीं. परंतु कायद्याची ही मर्यादा उल्लंघून जेव्हां ते अनत्याचारी सत्याग्रह्यांवर लाठ्या चालवितात तेव्हां त्या अन्यायाविरुद्ध ओरड करावी लागते.

ज्या राज्यपद्धतीखालीं आज आपणास राहावें लागत आहे ती पद्धति शक्य तितक्या लवकर नष्ट झाली पाहिजे असें म्हणण्यास मला मुळींच हरकत वाटत नाहीं. या राज्यपद्धतीमुळेंच देशांतील पुढाऱ्यांचा छळ होत आहे. **लोकमान्या**-सारख्या वंद्य विभूतीला सहा वर्षें कारागृहवास याच पद्धतीमुळें भोगावा लागला. त्यांचा व **लाला लजपतराय, देशबंधु दास, पं. मोतिलाल व जवाहरलाल नेहरू** यांचा छळ झाला याचें कारण त्यांची देशसेवा.

**महात्माजी** द्वेषाचे शत्रू आहेत. त्यांची योजना व धोरणहि पूर्ण व्यवहार्य व सुगम आहे. जर तुम्हीं सर्वांनीं कर देण्याचें नाकारलें व या घातुक राज्यपद्धतीला मदत देण्याचें नाकारलें तर अल्पावधींतच हें राज्ययंत्र बंद पडल्याखेरीच राहणार नाहीं. सरकारनें किती लोकांचा छळ केला हा प्रश्न गौण आहे. पेशावरला कांहीं लोक ठार केले व सोलापुरला कांहीं लोक ठार मारले तरी ते सागरांतील बिंदूप्रमाणें होत. प्रत्येकानें आपलें शक्तिसर्वस्व पणाला लावून सरकारला सहाय्य देण्याचें नाकारलें तर अनत्याचाराचें कार्य व्यवहार्य कोटींत खात्रीनें येईल.

## लढा चालू ठेवा

शांततासंवादाच्या वार्तांमुळें युद्धांत खंड पडूं देऊं नका, महात्माजी जी गोष्ट ठरवितील ती योग्य अशीच असल्यानें ती आपणां सर्वांसच बंधनकारक होईल. आमचे आम्ही धनी होणार हें आपण नोकरशाहीला स्पष्ट बजावलें पाहिजे. अमेरिकेंत जसा अमेरिकन, इंग्लंडमध्यें जसा इंग्लिशमन तसें आम्हाला येथें व्हावयाचें आहे. सैन्यावर व आरमारावर देखील आम्हाला आमचा पूर्ण ताबा पाहिजे.

शांततासंवादापूर्वी दडपशाही थांबली पाहिजे. येथें तर सरकार एकाच वेळीं शांततेच्या गोष्टी बोलत आहे, व त्याच वेळीं लोकांचीं डोकीं फोडीत आहे! तुम्हीं शांततेच्या वाटाघाटीमुळें गोंधळूं नका. दुर्दमनीय अशा उत्साहानें हा झगडा नेटानें चालू ठेवा. बहिष्काराचा कार्यक्रम सर्वोपयोगी आहे. व प्रत्येक स्त्री–पुरुषानें बहिष्काराला मनःपूर्वक पाठिंबा दिला तरच ब्रिटिश राष्ट्र ताळ्यावर येईल. तुम्हाला एका परराष्ट्राच्या अंमलाखालीं सदैव गुलाम म्हणून नांदावयाचें

आहे काय ? का तुम्हाला आपल्या देशाचे धनी म्हणून नांदावयाचें आहे! धनी म्हणून येथें राहावयाचें असेल तर मग हल्लीं जी असत्याचाराची चळवळ सुरू आहे तींत तुम्ही उत्साहानें भाग घ्या. आज जशी वृत्ति राष्ट्रांत उत्पन्न झाली आहे. ती अशीच राहिल्यास स्वराज्य लवकरच प्राप्त झाल्याखेरीज राहाणार नाहीं. हा झगडा यश मिळेपर्यंत निकरानें चालविण्याचा तुमचा संकल्प आहे. तहाची वाटाघाट सुरू आहे म्हणून त्यात मंदाई आणूं नका. तुमचें हिताहित '**महात्माजी** पाहण्यास समर्थ आहेत. राष्ट्राच्या वतीनें बोलण्याचा त्यांनाच हक्क आहे. व त्या वाटाघाटींत आपले पुढारी कांहींहि ठरवोत, जें ठरेल तें आपल्या कल्याणाचेंच ठरेल अशी खात्री बाळगा. "

सविनय कायदेभंगाची चळवळ देशांत सुरू असतांना प्रथम **जयकर–सप्रू** यांनीं **म. गांधी** प्रभृतीबरोबर समेटाचें बोलणें सुरू केलें. या समेटाच्या प्रकरणांत **पंडितजींचें** प्रामुख्यानें नांव नसलें तरी समेटाची वाटाघाट त्यांच्या संमतीनें चालली होती. हा पहिला समेट फिसकटला. विलायतेंत वर्तुल परिषदेचें प्रथमाधिवेशन झालें. तोंपर्यंत देशांत चळवळ खूपच रंगांत आली होती. व **पंडितजी** प्रभृति पुढारी कारागृहवासांत खितपत पडले होते. ते कारागृहांत असतांनाच पुनः समेटाची वाटाघाट सुरू झाली व नंतर **' गांधी—आर्विन करार '** झाला. त्या करारान्वयें पं **मालवीयजी** यांचीहि सुटका झाली.

## समेटानंतर

यानंतर कराचीस मार्च १९३१ मध्यें राष्ट्रीय सभेचें अधिवेशन झालें. प्रति-वर्षाप्रमाणें **पंडितजीहि** या अधिवेशनास उपस्थित होत. या कॉंग्रेसनेंहि समेटास मान्यता दिली. पुढें कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या अनेक बैठका झाल्या, त्यांत अनेक महत्त्वाचे ठराव पास झाले. पं. **मालवीय** वर्किंग कमिटीचे सभासद नव्हते तरी त्यांचा सल्ला प्रत्येक बैठकीच्या वेळीं घेण्यासाठीं त्यांस अगत्यानें निमंत्रण असे. व त्याप्रमाणें ते प्रत्येक सभेस हजर राहून योग्य तो सल्ला देतहि असत. कॉं. वर्किंग कमिटीपुढें जे अनेक वादग्रस्त प्रश्न होते त्यांत जातवारीचा प्रश्न मोठा बिकट होऊन बसला होता. **पंडित मालवीय** हे हिंदुसभेचे प्रमुख पुरस्कर्ते असल्यानें त्यांजवरहि ज्ञातिनिष्ठेचा कांहीं कमी आरोप लोक करीत नाहीं. परंतु ज्ञातिनिष्ठेपेक्षांहि त्यांची देश-

भक्ति अधिक प्रखर असल्याची खात्री **म. गांधींना** पटली असल्यानें त्यांनीं **पं. मालवीय** यांच्याकडेच हा प्रश्न सोडविण्याची जबाबदारी टाकली. त्यांच्या जोडीला सरदार **शार्दुलसिंग, डॉ. अन्सारी** व **मौ. अबुल कलाम अझाद** यांना दिलें होतें व या कमिटीनें आपली म्हणून एक योजना वर्किंग कमिटीला सादर केली व वर्किंग कमिटीनेंही ती मान्य केली. या योजनेसंबंधानें पंडित **मालवीय** म्हणतात.

## जातवारीचा प्रश्न सोडविला

'मी कट्टा राष्ट्रीय वृत्तीचा असून नवीन घटनेंत जातिविषयक स्वतंत्र मतदार-संघाच्या अंकुरहि ठेवण्यास माझा विरोध आहे. पण सध्यां स्वतंत्र संघामुळें उद्भवलेल्या बिकट परिस्थितींत केवळ राष्ट्रीय दृष्टीनें मतदारसंघ ठेवणें अशक्य आहे. तरी पण वर्किंग कमिटीनें जी योजना तयार केली आहे ती सर्वसंमत असून बहिरंगावर जरी जातिविषयक छटा दिसली तरी अंतरंगांत ती राष्ट्रीय वृत्तीची असल्याचें आढळून येईल. हिंदुस्थानांत स्वराज्य सरकार स्थापन व्हावें अशी ज्यांची आकांक्षा असेल त्या सर्वांना सद्यःस्थितींत हीच योजना मान्य होईल अशी मला खात्री आहे. अंतिम अधिकाराचा ( रेसिड्यु-अरी पॉवर्स ) प्रश्न मात्र जातिविषयक नसून तो राजनैतिक शास्त्रांतील एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. हा प्रश्न फेर विचाराकरतां खुला असल्याचें धोरण वर्किंग कमिटीनें स्वीकारलें असल्यामुळें ह्या प्रश्नाचा समेटाच्या योजनेशीं मतभेद होणाऱ्यांना समाधान होईल यांत शंका नाहीं. ''

अशा रीतीनें **पंडितजींच्या** मदतीनें कॉंग्रेसचा हा प्रश्न हातावेगळा केल्याप्रमाणें केला व वर्तुल परिषदेंत आतां कॉंग्रेसचें मत ठामपणें मांडण्यास प्रत्यवाय नाहीं अशी खात्री पटली तेव्हां **म. गांधींच्या** समवेत म्हणून विलायतेस जाण्यास ते तयार झाले. **पं. मालवीय** यांचीहि गोलमेज परिषदेवर प्रतिनिधी म्हणून नेमणूक झाली. तेहि **म. गांधींच्या** समवेत विलायतेस रवाना होणार असें जाहीर झालें. परंतु अकस्मात होणार म्हणून ठरलेली गोष्ट झाली नाहीं. **गांधी** व **आर्विन** यामध्यें जो ठराव झाला होता त्याचा भंग सरकारकडून झाला असें कॉं. वर्किंग कमिटीच्या नजरेस आल्यावरून या प्रकाराची चौकशी करण्यासाठीं सरकारनें निःपक्षपाती पंच नेमावेत अशी मागणी केली. ती सरकारनें नाकारल्यानें **म. गांधी**, व

**मालवीय** प्रभृतींना गोलमेज परिषदेस जाण्याचें रहित केलें. यासंबंधानें यांनीं **पं. मालवीय** एक पत्रक प्रसिद्ध केलें त्यांत ते म्हणतात.

## सरकारचा समेटभंग

" मला अजून आशा वाटतें कीं, सरकार गांधींची मागणी मान्य करील आणि उभय पक्षाला विश्वासार्ह वाटणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून निःपक्ष व खुली चौकशी करील. कराराचें १६ वें कलमच असें आहे कीं, सारा-वसुलीच्या प्रकरणांत जप्त झालेली जंगम मिळकत परत देण्यांत येईल. जर कोणी केवळ हेकेखोरपणानें सारा देत नाहीं अशी साधार खात्री झाली, तर त्याला योग्य ती मुदत देण्यांत येईल आणि शेतसाऱ्याच्या नियमानुसार जरूर तर तहकुबी देण्यांत येईल. यावरून हें उघड होतें कीं, बार्डोलींतील शेतकऱ्यांनीं २० लाखांपैकीं १९ लाखावर म्हणजे जवळ जवळ सर्व सारा भरला असून उरलेला साराहि भरण्याला ते मुदत मागत असतांना त्यांवर जुलूमजबर-दस्ती होतां कामा नये, त्यांना मुदत दिली पाहिजे. १९२८-२९ सालीं कडका पडल्यामुळें व गुदस्ता बार्डोलीचे शेतकरी घरेंदारें सोडून गेले असतां त्यांच्या पिकाची नासाडी झाल्यामुळें त्यांनीं यंदाचा सारा भरल्यावर गेल्या तीन वर्षांची बाकी चुकती करण्याचें त्राण त्यांच्यांत राहिलें नाहीं हें सरळच आहे.

अशी स्थिति असतांना यंदाचा शेतसारा अगर मागील बाकी यांपैकीं थोडीशी रक्कम वसूल करण्यासाठीं देखील अधिकाऱ्यांनीं धाकदडपशा दाखविला हें दिल्ली कराराच्या १६ व्या कलमाला विघातक आहे. २१ गांवांतील खातेदारांच्या घरांभोंवतीं व घरांमध्यें पोलीस ठेवण्यांत आले होते. हें नाकारण्यांत आलेलें नाहीं. ही कृति पूर्ण बेकायदेशीर आहे. पोलिसांनीं गांवांना गराडा घातला. व गांवकऱ्यांना बाहेर जाण्याला मज्जाव करण्यासाठीं वाममार्ग अनुसरला. पेरणीच्या वेळीं गुरें बाहेर नेण्यालाहि प्रतिबंध करण्यांत आला. म्हणून कॉंग्रेसचें म्हणणें असें आहे कीं अशा जुलमामुळें कर्जबाम करून किंवा तशाच त्रासदायक उपायांनीं शेतकऱ्यांना जो सारा भरावा लागला, तो परत करण्यांत यावा. उलट पक्षीं, सरकारचें म्हणणें असें कीं, शेतकऱ्यांनीं सारा तत्काळ भरला व फारच थोड्या ठिकाणीं जप्त्या न्याव्या लागल्या, यावरून शेतकरी सारा भरण्याला समर्थ होते. असें असूनहि ज्याअर्थीं त्यांनीं सारा

भरला नव्हता, त्याअर्थी त्यांनींच करार मोडला आणि म्हणून सरकारला तसें वर्तन करावं लागलं.

## चौकशी झाली पाहिजे.

अशा परिस्थितींत या महत्त्वाच्या प्रश्नाचा निकाल निर्विवादपणें लावण्यास लोकांनीं सरकारला भाग पाडलें पाहिजे. कारण या प्रश्नावर त्याचें सौख्य व सन्मान अवलंबून आहे. रयत व सरकार या उभयतांचा विश्वास बसेल अशा उच्च दर्जाच्या अधिकाऱ्याकडून चौकशी होणें अगत्याचें आहे; केवळ पुढील जानेवारीपर्यंत जुलूम होणार नाहीं अशा मुंबई सरकारच्या आश्वासनानें काम भागणार नाहीं. वास्तविक गांधीजी गोलमेज परिषदेला जावोत वा न जावोत, त्याच्यावर कांहीं अवलंबून न ठेवतां सरकारनें अशी चौकशी अवश्य करावयास हवी होती.

गांधीजींची मागणी सरकारनें मान्य करण्याला आणखी एक बलवत्तर कारण होतें. तें म्हणजे मागणी अमान्य केल्यानें गांधी व इतर राष्ट्रसभावाले यांना साहजिकच असें वाटूं लागलें कीं, आपल्याच देशांतील सरकारी अधिकारी शेतकऱ्यांचें रक्षण करण्याची इतकी विचारपूर्ण मागणीहि लाथाडीत आहेत तर विलायतेला जाऊन तेथील ब्रिटिश मुत्सद्यांचें मन वळवून त्यांच्या हातांतील सत्ता हिंदी लोकांच्या हातीं आणण्याचा प्रयत्न करण्याची वेळ अजून आलेली नाहीं. गोलमेज परिषदेला हजर न राहणाऱ्या इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स व राष्ट्रीय मुसलमानांचा पक्ष यांच्यांत राष्ट्रीय सभेचीहि भर पडल्यानें त्या परिषदेंतून हिंदी लोकमताला संमत होण्यासारखी घटना निर्माण होईल अशी आशा आतां उरलेली नाहीं हें निराळें सांगावयास नकोच.

अशी स्थिति उद्भवणें म्हणजे वैषम्य, द्वेषबुद्धि व वैरभाव यांचा अंमल चालू होणेंच होय. तसें होऊं न देण्याचा प्रयत्न करणें हें आपणां सर्वांचें कर्तव्य आहे. प्रजा व राजसत्ता यांमध्यें एकाद्या मुद्यासंबंधी तीव्र मतभेद उत्पन्न झाला तर त्याची स्वतंत्र व निःपक्षपाती चौकशी करावी हा जनतेचा हक्क पूर्ण प्रस्थापित झालेला आहे. सरकारला अडविण्यासाठीं तो नव्यानेंच उकरून काढला असें नव्हे. म्हणून मी अशी आशा बाळगतों कीं, सरकार पुनः विचार करील व गांधी आणि राष्ट्रीय सभा यांना गोलमेज परिषदेंत भाग घेण्याला जो शेवटचा अडथळा आलेला आहे, तो दूर करण्याचा मार्ग शोधील. सध्यांच्या

परिस्थितींत लंडनला जाण्याचा बेत मी सोडून दिलेला असला तरी गांधीजी व मी योग्य वेळीं लंडनला जाऊन परिषदेच्या आणि तिच्या मंडळांच्या कामकाजांत भाग घेऊं अशा तऱ्हेचा निर्णय सरकार अजून देईल अशी मला आशा वाटत आहे.''

गोलमेज परिषदेंत काय होणार हें आजच सांगतां येण्यासारखें नसलें तरी परिषदेपुढील कार्यासंबंधानें व यशासंबंधानें पुण्यास ता. २७ जून १९३१ रोजीं केलेल्या भाषणांत त्यांनीं पुढील उद्गार काढले आहेत.

## हें आमचें स्वराज्य

भारतवर्ष स्वतंत्र होऊन तो स्वराज्याचा आस्वाद घेण्यास फिरून समर्थ व्हावा अशी भूतकालीन लोकांप्रमाणें आजहि आपली इच्छा आहे. याच ध्येयासाठीं काँग्रेस गेलीं ४५ वर्षे सतत प्रयत्न करीत आहे. स्वराज्य मिळविण्यासाठीं परराज्याशीं हें भांडण आहे. स्वराज्य व परराज्य दोनंहि एकाच वेळीं एके स्थळीं नांदूं शकत नाहींत. म्हणून स्वराज्य म्हणजे संपूर्ण सोळा आणे स्वराज्यच होय हीच आपली भावना असली पाहिजे. स्वराज्याची कल्पनाच हवी असेल तर असें म्हणतां येईल कीं, इंग्रज, फ्रेंच, जर्मन, जपानी व अमेरिकन लोक जे अधिकार आपल्या देशांत भोगतात तेच आपल्यास पाहिजेत. यालाच स्वराज्य असें म्हणतां येईल. उंच अशा जागीं चढण्यास पायऱ्यांचा आश्रय लागतो त्याप्रमाणें हें राजकीय ध्येय गांठण्यासाठीं राष्ट्रीय सभेनें पायऱ्या-पायऱ्यांनीं प्रयत्न केला. शेवटच्या पायरीवर चढलेला मनुष्य इच्छित स्थळीं जाण्यास जसा उत्सुक असतो त्याप्रमाणें आमची आज स्थिति झाली आहे. विलंब लागून मार्गांत विघ्न आलें तर जसा त्या वर चढणाऱ्या मनुष्यास राग येतो तद्वतच आपल्यास आज तो येणें साहजिक आहे. पण आपण जरा धीर धरून वागलें पाहिजे. गोलमेज परिषदेंत आपल्या भवितव्यतेचा विचार व्हावयाचा आहे. परिषदेस विलंब लागेल त्या मानानें प्रत्येक देशभक्ताचें अंतःकरण विदीर्ण व क्षुब्ध होत आहे. पण कांहीं रोग समयसाध्य असतात हे वैद्य व डॉक्टर जाणतात. अशा वेळीं गडबड केली तर आपत्ति ओढवते. तशीच स्थिति आज आपली आहे. नवयुवकांचें अंतःकरण तळमळत आहे. पण ज्या गोष्टी आपल्या हातच्या नाहींत त्याबद्दल तळमळ करून काय उपयोग ? म्हणून थोडे दिवस धीर धरा. गोलमेज परिषदेचा निर्णय आपल्याप्रमाणें झाल्यास आपल्यास समाधान

वाटेल. उलट झाला तर मग पुढें काय होईल हें एक परमेश्वरासच ठाऊक! परराज्याचा विषमज्वर जाण्यासाठीं गेल्या चळवळींत आबालवृद्ध स्त्री-पुरुषांनीं भाग घेतला व पुनः ते पुढें घेतीलच यांत शंका नाहीं. कारण स्वातंत्र्य कोणास नको आहे?

## संकटांतूनच यश मिळणार

पुढील झगड्यांत बहिष्कारचेंच शस्त्र हातीं घेऊन आपण चळवळ चालविली तर तिचा खात्रीनें इंग्लंडवर परिणाम होईल. बाकी कोणतेंहि उपाय अमलांत आणले तरी त्याची इंग्रजांना पर्वा वाटत नाहीं. हिंदुस्थानाची मागणी न्याय्य व धर्म्य आहे म्हणूनच ती इंग्रज मान्य करतील असें नाहीं. त्यांच्या खिशास चट्टा लागेल तरच ते कांहीं विचार करण्यास तयार होतील. याच स्वार्थाकरतां ते हिंदुस्थानवासियांचीं मनें आपल्याला अनुकूल कशीं होतील याचा विचार करतील. **महात्मा गांधी**सारख्या नंग्या फकिरानें निःशस्त्रप्रतिकाराचा, जो पंथ सुरू केला आहे तोच शेवटीं प्रभावशाली ठरेल हें निश्चित समजा.

स्वराज्याच्या मार्गांत बरेंच मोठे फत्तर आडवे पडले आहेत. हिंदुमुसलमानांचा प्रश्न, हिंदी राजेरजवाड्यांचा प्रश्न व सेफगार्ड्स् या नांवाखालीं इंग्लण्डमध्यें उभा असलेला सुधारणाविरोधी पक्ष असे हे भले मोठे फत्तर आपल्या मार्गांत आहेत ही गोष्ट खरी आहे पण सर्वांचा कालेकरून व परमेश्वरी घटनेनें निरास होऊन स्वराज्याची सिद्धि लवकरच होईल. मी पूर्ण आशावादी आहे व परमेश्वरावर माझा पूर्ण विश्वास आहे.

## हिंदी लोक वीर नाहींत काय?

आणखीहि एका गोष्टीचा उल्लेख करणें जरूर आहे. हिंदुस्थानाच्या संरक्षणाच्या प्रश्नावरहि गोलमेज परिषदेंत रण माजेल. हिंदी लोक सैनिकच होण्यास योग्य व आफिसर होण्यास नालायक असा एक आक्षेप आहे! पण जरा विचार केल्यास हा आक्षेप किती फोल आहे हें कळून येईल. श्री. शिव छत्रपति, बाजीराव, नानासाहेब पेशवे व महादजी शिंदे हे कुशल सेनानी म्हणून इतिहासांत गाजले. लष्करी शिक्षण मिळण्यासाठीं ते कोणच्या 'सँढर्स्ट'मध्यें शिकून आले होते? महादजी शिंदे व पेशवे यांच्या सैन्यानें वडगांवास इंग्रजांस धूळ चारलीच कीं नाहीं! तेव्हां ते कोणच्या कॉलेजांत शिकावयास गेले होते? या सर्व गोष्टींचा इंग्रज मुत्सद्दी विचार करतीलच. राजेरजवाडे संयुक्तघटनेंत न आले तर एवढ्यावरून ब्रिटिश हिंदुस्थानाची प्रगति खुंटावी

असें कोण म्हणतो ? नेहरू रिपोर्टाची मांडणी केली तेव्हां हेंच आमचें मत होतें. वाटल्यास संस्थानिकांनीं यावें अगर न यावें; तथापि संस्थानी प्रजेचा प्रश्न कसा सोडवावा हें शिल्लकच रहातें. पण तोहि कालांतरानें सुटेल.

## बहिष्काराचं दुधारी अस्त्र

स्वराज्य मिळालें तर विदेशी माल आपण घ्यावा काय असा एक प्रश्न उपस्थित होण्याचा संभव आहे. स्वराज्य प्राप्त झालें तरी आपण केव्हांहि विदेशी माल घेऊं नका. त्या योगानें आपली नुकसानी होईल हें सांगण्यास नकोच. गेल्या चळवळींत आपण विदेशी मालावर व दारूवर निरोधन केलें त्याचा सुपरिणामच झाला. दारूच्या निरोधनामुळें सरकारचे तीन कोटी पंचवीस लाख रुपये नुकसान झालें, पण तितके पैसे गरिबांचे वांचलेच कीं नाहीं ? हीच गोष्ट विदेशी कापडाची ! जर पुनः लढ्यास सुरवात झाली तर याच दुधारी शस्त्राचा आपल्यास अवलंब करावा लागेल हें विसरूं नका. सरकार याचा उलट प्रतिकार करण्याचा विचार करील; ' रुथलेस रिप्रेशन ' करून हें आंदोलन जागचे जागीं थंड करूं अशी ब्रिटिश नोकरशाहीची घमेंड असेल, तर तीहि गेल्या युद्धांत फोल ठरली. **महात्मा गांधी**सारखा शांतिसागर व सत्याग्रही भूमंडळावर असल्यावर असले कितीहि **हिरण्यकश्यपु** आले तरी हरकत नाहीं. मात्र **प्रल्हाद** असेल तरच **नारसिंहाचें** दर्शन होईल, एरवी नाही. स्वराज्याचें ध्येय गांठण्यासाठीं अदम्य असा उत्साह धरण्यास व आपल्या ध्येयप्राप्तीसाठीं कर्मयोगाप्रमाणें स्थितप्रज्ञ राहून अखंड खटपट करण्यास तसेंच पराधीनतेचें शल्य काढून टाकण्यास परमेश्वर तुमच्या हृदयांत प्रेरणा करो एवढेंच मी इच्छितों. "

यानंतर **म. गांधी व हिंदुस्थानसरकार** यामध्यें वाटाघाट होऊन सरकारनें **महात्माजीं**च्या म्हणण्याप्रमाणें कांहीं तक्रारींची चौकशी करण्याचें **महात्माजींस** आश्वासन दिलें. व त्यानंतर **पं. मालवीयजी सह** ते विलायतेस गेले. व **पं. मालवीयजी** यांनीं तेथें फेडरलस्ट्रक्चर कमिटींत जें भाषण केलें तें त्यांनीं आपल्या कोटिक्रमास अनुसरून असंदिग्ध असें केलें व हिंदी लोकपक्षाची बाजू म.गांधींनीं मांडली तिला पूर्णपणें पाठिंबा दिला. ईशकृपेनें **पंडितजींना** त्यांच्या अंगिकृत कार्यांत यश यावें अशीच कोणाचीहि अपेक्षा असणार-

# कायदेमंडळांतील लोकसेवा.

## स्थानिक स्वराज्यांतील कामगिरी.

राष्ट्रीय सभेच्या खालोखाल राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्रांत **पंडितजींनीं** केलेलें काम म्हणजे कायदेमंडळांतील होय. परंतु कायदेमंडळांत शिरण्यापूर्वींहि **पंडितजी** अगोदर कित्येक वर्ष प्रयाग म्यु. मध्यें लोकनियुक्त सभासद होते. व तेथें त्यांनीं केलेली लोकसेवा चिरस्मरणीय झालेली आहे. ते प्रयाग म्यु.त शिरल्यानंतर त्यांनीं प्रयागवासियांच्या कल्याणाकडे अत्यंत काळजीपूर्वक लक्ष दिलें. शहरांतील घाण नाहींशी करून शहर स्वच्छ राखण्याबद्दल ते फार दक्ष असत. शहरांतील वाढती वस्ती पाहून त्यांनीं नव्या पेठा वसाविल्या. "**लूकरगंज मोहोल्ला**" हा **पंडितजींच्या** प्रयत्नाचेंच फळ आहे. श्रीमंत, गरीब असा भेद न राखतां ते सर्वांनाच सारखी मदत करीत.

**पंडितजी** म्यु. कौन्सिलर असतांना प्लेगचें आगमन झालें! प्लेगचा अत्यंत कहर उडाला. कोणी कोणास पुसेनाशी स्थिति निर्माण झाली. सर्व शहराला अवकळा प्राप्त झाली. अशा बिकट स्थितींत आराम करीत स्वस्थ न वसतां **पंडितजी** पेठोपेठीं हिंडत, आजारी माणसांचा पत्ता काढीत, त्यांच्या औषधपाण्याची व्यवस्था करीत, त्यांना धीर देत; घरें स्वच्छ करवीत व घरवाल्यांची समजूत घालून त्यांना शहर सोडावयास लावीत. लोकांचा सरकारवर विश्वास नव्हता. लोकांना आपल्या विश्वासाचा कोणी सहाय्यक पाहिजे होता व ती मदत **पंडितजींनीं** अत्यंत निरलसपणें केली.

**पंडितजींनीं** म्यु. कडून शहराबाहेर हेल्थकॅम्प उघडाविला व तेथें लोकांची राहण्याची सोय केली. **पंडितजीं**ची ही लोकसेवा पाहतांच अशाच प्रकारचें कार्य निरलसपणें करणाऱ्या **लोकमान्यांचें** स्मरण झाल्याखेरीज रहात नाहीं. व यावरून लोकसेवा करणारांची मनोवृत्ति सर्वत्र सारखीच कशी असते हेंहि ध्यानीं येईल.

## कायदेमंडळांत प्रवेश

**पंडितजीं**च्या या लोकसेवेचा प्रभाव सरकारवर पडल्याखेरीज राहिला नाहीं. सं. प्रांतीय कायदेमंडळांतील सदस्य **पंडित** विश्वंभरनाथ यांनीं कायदेमंडळ सोडलें त्याबरोबर त्यांच्या जागीं सरकारनें **पंडित मालवीयजी** यांची नेमणूक केली. ही गोष्ट स. १९०२ सालीं झाली. **पंडितजी** प्रांतिक कायदेमंडळांत स. १९०८ पर्यंत सभासद होते. पुढें स. १९०९ पासून ते वरिष्ठ कायदेमंडळांत शिरले व तेथें ते स. १९३० पर्यंत सतत सभासद होते. म्हणजे कॉंग्रेसच्या खालोखाल त्यांनीं कायदेमंडळांतून देशसेवा केली आहे असें दिसून येईल. परंतु सरकारशीं इतका दीर्घकालीन संबंध होता तरी अखेर सरकारच्या मनोवृत्तींत काडीचाहि फरक पडणें शक्य नाही अशी खात्री वाटल्यानें त्यांनीं वरिष्ठ कायदेमंडळाचा राजीनामा दिला व त्यांनीं कॉंग्रेसच्या कामास आपणास सर्वस्वीं वाहून घेतलें.

**पंडितजी** प्रांतिक कायदेमंडळांत गेले त्यावेळीं कौन्सिल सभासदास सल्लागारापेक्षां जास्त महत्त्व नव्हतें. सभासदांनीं बहुमत केलें तरी त्यांचा सल्ला मानलाच पाहिजे असें सरकारवर बंधनहि नव्हतें. कौन्सिलांत फक्त बारा सभासद असत व तेहि सर्व सरकारनियुक्त. त्यांना सरकारवर टीका करतां येत नसे अगर कसलेहि प्रश्न विचारतां येत नसत. त्यांनीं सरकारला सल्ला द्यावा. तो मानणें अगर न मानणें ही सरकारची मर्जी. वस्तुस्थितिच अशी होती कीं, कायदेमंडळांत जाऊन कांहीं लोकसेवा करावी या विचारापेक्षां ती एक मानाची जागा आहे म्हणूनच तींत शिरण्याचा लोक प्रयत्न करीत.

## खरा लोकप्रतिनिधी

अशी सर्वतोपरि विरुद्ध परिस्थिति असतांहि लोकपक्षाचें काम निर्भीडपणें करणारे एकटे **पंडित** मालवीयजीच होते. स. १९०३ मध्यें सरकारनें बुंदेलखण्ड जमिनी बाबत कायदा कौन्सिलपुढें मांडला. या कायद्यामुळें रयतेची फारच हानी होणार होती. **पंडित मालवीयजी** यांनीं या ठरावाला कसून विरोध केला. बुंदेली प्रजा दिवसानुदिवस दारिद्र्यग्रस्त होत चालली आहे. कर्जाच्या भाराखालीं वाकून गेली आहे. या कायद्यानें जमीनदार व रयत दोघांचेंहि मनस्वी नुकसान होणार आहे. जमिनीची किंमत उतरेल व

जमिनींवर तर जमिनदाराला कर्ज मिळतें. परंतु यापुढें जमिनी विकण्याचा हक्कच नष्ट झाला तर त्याला कर्ज तरी कसें मिळणार? अशा प्रकारची विचारसरणी **पंडितजींनीं** मांडली परंतु कौन्सिलें कशाप्रकारचीं असत हें वर सांगितलेंच आहे. त्यामुळें **पंडितजींच्या** कोटिक्रमाचा कांहींच उपयोग झाला नाहीं व कायदा लोकांवर लादला गेलाच. त्याचा परिणामहि **पंडितजींनी** वर्णिल्याप्रमाणेंच झाला. लहान लहान जमीनदारांना कोणी कर्ज देईना. बरें कोणी कर्ज दिलेंच तर कर्जवसूलीचा फार तगादा होई. व तें भागविण्यासाठीं गाय, म्हैस इत्यादि विकून कर्ज भागवावें लागे. कर्ज काढल्याखेरीज शेतकऱ्याचें भागतच नसे. त्यामुळें शेतकऱ्यांची स्थिती अत्यंत शोचनीय झाली.

कायदेमंडळांत येणाऱ्या बिलांवर **पंडितजींची** जीं भाषणें होत तीं सर्वच प्रभावशाली असत. परंतु त्यांतहि अंदाजपत्रकांवरील भाषणें त्यांचीं जास्त प्रेरक विचार होत. त्या सर्वांत शिक्षण प्रसारावर त्याचा विशेष जोर असे. उच्च नोकऱ्या हिंदी लोकांना द्याव्या. लोकांना स्वास्थ्य लाभेल अशा सुधारणा कराव्या, व स्थानिक स्वराज्यसंस्थांना सरकारनें अधिकाधिक मदत करावी, या गोष्टींवर **पंडितजींचा** जोर असे. सर्वच गोष्टी सरकार मानीत नसलें तरी **पंडितजींच्या** श्रमाचा उपयोग झाल्याखेरीजहि राहत नसे.

स. १९०४ च्या बजेटावरील भाषणांत ते म्हणाले,

## शिक्षणाची उपासमार कां ?

" हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांत शिक्षणा प्रसाराचा प्रयत्न सुरू आहे. परंतु सं. प्रांत मात्र मागें आहे. मुंबई व बंगाल प्रांतांत शाळेंत जाण्यास योग्य अशा १०० मुलांतील २२ मुलें शाळेंत जातात पण या प्रांतांत फक्त १० च जातात. हिंदु व मुसलमानांच्या राजवटींत सं. प्रांत म्हणजे शिक्षणाचें केंद्र समजलें जाई. आतां त्याची स्थिति लांछनास्पद झाली आहे. "

या १९०९ च्या बजेट भाषणांतहि शिक्षणावर जादा खर्च करण्याबद्दल अनुरोध केला. त्यावेळीं ते म्हणाले,

" मुंबई प्रांतांत प्रतिवर्षी दहा हजार माणसामागें २४५ रु. खर्च करितात. पण सं.प्रांतांत मात्र फक्त ८० च रुपये खर्च होतात." याच विषयावर बोलतांना स. १९०७ सालीं कायदेमंडळांत ते म्हणाले,' या बाबतींत जपाननें गेल्या

तीस वर्षांत जी उन्नति केली आहे तिकडे आपण लक्ष दिलें पाहिजे. तीस वर्षापूर्वी सं. प्रांतापेक्षांहि जपानमध्यें शिक्षणप्रसार कमी होता. परंतु स. १९०२ मध्यें जपानमध्यें २७ हजार प्राथमिक शाळा निघाल्या, व त्यांत ५० लक्षापेक्षांहि जास्त विद्यार्थी विद्या संपादन करीत. परंतु सं. प्रांतांत स. १९०९ फक्त ९७९९ प्राथमिक शाळा होत्या व त्यांत ४ लक्ष ११ हजार विद्यार्थी विद्या संपादन करीत होते. जपाननें १९०२ पर्यंत प्राथमिक शिक्षणावर पांच कोटी रुपये प्रतिवर्षी खर्च केले. पण या प्रांतांत फक्त १४ लक्ष रुपये खर्चले जातात.

स. १९०८ मध्यें सं. प्रांत सरकारनें पोलीसचा खर्च वाढविला. सर्व देश शिक्षणाच्या वाढीबद्दल प्रयत्न करीत असतां सरकारनें शिक्षणाला उपाशी ठेवून पोलिसांवर खर्च वाढवावा ही गोष्ट लोकहिताविरोधी होती. त्याप्रसंगीं **पंडितजींनी** स्पष्ट शब्दांत सरकारची कान उघाडणी केली, ते म्हणाले, "आतांच्या या प्रकारावरून शिक्षण देऊन आमची उन्नति करण्याचा सरकारचा इरादा आहे या गोष्टीवर लोकांचा विश्वास बसणें कठीण पडेल. पोलिस खात्यावर एक कोटी रुपये सरकार खर्च करतें व शिक्षणावर फक्त ४३।. लक्ष रुपये खर्च करणार, यावरून सरकारच्या शिक्षणविषयक धोरणासंबंधीं लोक साशंक झाले तर त्यांत लोकांचा मुळींच दोष नाहीं.

शिक्षणासंबंधीं सरकारचें कर्तव्य काय याबद्दल प्रतिवर्षी **पंडितजी** लोकमत स्पष्टपणें सरकारपुढें मांडीत व त्याचा थोडाना थोडा तरी उपयोग खास होई.

## देशाचा धनी दरिद्रीच

हिंदुस्थानांतील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती असल्यानें त्या शेतीलाच जर हानी पोहोंचू लागली तर लोकांची दुःस्थिती सारखी वाढतच जाणार. हें जाणून **पंडितजी** शेतकऱ्यावरील सारा कमी व्हावा, त्यांना जास्त सवलती मिळाव्या अशासाठीं नेहमीं प्रयत्न करीत. स. १९०६ च्या अंदाजपत्रकावर बोलतांना ते म्हणाले,

" भारतवासियांच्या दारिद्र्याचें मुख्य कारण देशांतील बहुसंख्य समाज शेती करणारा आहे हें आहे. व त्यांची कशी दुर्दशा आहे ही गोष्ट यापूर्वी ज्या ज्या वेळीं दुष्काळ पडले त्यावरून सिद्ध झाली आहे. अशी दुःस्थिती असतांहि

देशांत नवे उद्योगधंदे काढावे, लोकांना पोटाला अन्य साधन निर्माण करून द्यावें व शेतीवरच सर्वस्वीं जो बोजा पडतो तो कमी करावा असा प्रयत्नच सरकार करीत नाहीं. निरनिराळे धंदे निघाले व लोकांना अन्य व्यवसाय मिळू लागला तर सहजच प्रजा सुखानें जीवन-व्यतित करील. देशांत निरनिराळे धंदे काढून देशी कारागिरीला उत्तेजन देणें हें सरकारचें मुख्य कर्तव्यच आहे.सरकारनें एक औद्योगिक-महाविद्यालय काढावें व लोकांना शिक्षणाचें तें एक द्वार खुलें करावें अशाबद्दल त्यांनीं स.१९०७सालच्या बजेटावरील भाषणांत सरकारला बजावलें.

उच्च पदाधिकाऱ्यांत हिंदी लोकांचा भरणा अत्यल्प असतो त्यासंबंधानें स. १९०९ च्या बजेटाच्या वेळीं भाषण करितांना ते म्हणाले, ' लोक कितीहि लायख झाले तरी सरकार त्यांना मोठ्या अधिकाऱ्याच्या जागा देत नाहीं अशी शंका लोकांस येऊं लागली आहे. या प्रांताच्या हायकोर्टांत सहा न्यायाधीश आहेत त्यांत केवळ १हिंदी आहे.'अखेर सरकारनें ही गोष्ट मान्य करून तेथील प्रयाग हायकोर्टांत २ हिंदी जज्जांची नेमणूक केली.

## वरिष्ठ कायदे मंडळांत प्रवेश

अशा रीतीनें प्रांतिक कायदेमंडळांत लोकपक्षाचें उत्कृष्ट काम **पंडितजींनीं** सुमारें सात वर्षे बजावलें. त्यानंतर म्हणजे स. १९०८–०९ सालांत मोर्ले–मिंटो सुधारणा अस्तित्वांत आल्या. प्रांतिक व वरिष्ठ कायदेमंडळांत अल्पांशानें लोकप्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क प्राप्त झाला. तेव्हां प्रांतिक कायदेमंडळानें **पं. मदनमोहन मालवीय व रायबहादुर श्रीरामजी** यांना आपल्या प्रांताचे प्रतिनिधी म्हणून निवडून दिले.व त्यावेळेपासून म्हणजे स.१९०९ सालापासून **पंडितजी** वरिष्ठ कायदेमंडळाचे लोकनियुक्त सभासद स.१९३०पर्यंत एकसारखे-१९२० तें१९२२ ही वर्षे वगळून-होते. कायदेमंडळांत लोकप्रतिनिधींचें मताधिक्य असावें अशाविषयीं **पंडितजींनीं** अनेकवेळां,कॉंग्रेसमधून,कौंसिलांतून, आपलें मत निर्भीडपणें मांडलें परंतु सरकारच्या हातीं जोंपर्यंत अनियंत्रित सत्ता आहे तोंपर्यंत लोकप्रतिनिधी बहुसंख्य असले तरीहि त्यांनां मनाप्रमाणें लोकहिताचें काम करतां येणें शक्य नाहीं असा **पंडितजींस** पुरा अनुभव पटल्यानें त्यांनीं आपल्या जागेचा राजीनामा दिला. तो प्रकार यथाक्रम निवेदन करण्यांत येईलच.

## कायदेमंडळें लोकनियुक्त करा

असो. लोकसेवेची थोडी कां होईना पण संधि मिळाल्यास ती सोडावयाची नाहीं हा **पंडितजींचा** बाणा असल्यानें त्यांनीं मर्यादित स्वातंत्र्य असले-ल्याहि वरिष्ठ कायदेमंडळांत प्रवेश केला. कायदेमंडळाची ही वाढ कसकशी होत गेली याचें विवेचन ' स्वराज्यार्थ प्रयत्न ' या प्रकरणांत दिलें असल्यानें त्याची पुनरुक्ति येथें करण्याची अवश्यकता नाहीं. स. १८८५ सालापासून म्हणजे कॉंग्रेस स्थापन झाल्यापासून कायदेमंडळांत लोकप्रतिनिधींची संख्या वाढविण्याबद्दल लोकपक्षाची ओरड सुरू होती. स. १८६१ च्या कायद्यान्वयें व्हाइसरायाच्या कौंसिलमध्यें बारा सभासद असावेत असें ठरलें. त्यापैकीं निम्मे सरकारी, त्याखेरीज एक्झिक्यूटिव्ह कौंसिलचे सभासद व बाकीचे बिनसरकारी पण सरकारनियुक्त असे सभासद असत. पुढें कॉंग्रेसच्या चळवळीमुळें १८९२ चा कायदा झाला, व सभासदांची संख्या १६ करण्यांत आली. त्यांत सहा सरकारी व बाकीचे बिनसरकारी. परंतु हा प्रकारहि योग्य नव्हताच कारण हें प्रमाण म्हणजे दर तीन कोटी सभासदांना एक प्रतिनिधी असें पडे. म्हणून लोकपक्षाची सारखी चळवळ सुरू होती. त्यांत **लॉर्ड कर्झनच्या** कारभारामुळें लोकांत अत्यंत असंतोष फैलावला. व त्याचें पर्यवसान मोर्ले-मिंटो सुधारणांत झालें.

या सुधारणांमुळें व्हाईसरायाच्या कार्यकारी मंडळांतील सात जागांपैकीं एक जागा हिंदी प्रतिनिधीस द्यावी असें ठरून वरिष्ठ कायदेकौंसिलच्या सभासदांची संख्या ६० करण्यांत आली. त्याखेरीज ७ कार्यकारी मंडळाचे सभासद; म्हणजे ६७ सभासदांचें वरिष्ठ कायदेमंडळ बनविण्यांत आलें. परंतु त्यांतहि ३५ सभ-सद सरकारनियुक्त व २५ लोकनियुक्त असें विसंगत प्रमाण होतें. व या २५ सभासदांत दोन प्रतिनिधी सं० प्रांताच्या वांट्याला आले होते. त्यांपैकीं एक जागा **पंडितजींना** मिळाली व त्यावेळेपासून कौंसिलचा राजीनामा देईपर्यंत ते एकसारखे वरिष्ठ कायदेमंडळाचे सभासद होते. व आपल्या शक्त्यनुसार त्यांनीं तेथें कशा प्रकराची लोकसेवा केली ही गोष्ट सर्व विश्रुतच आहे.

## दडपशाहीच्या अस्त्रांना विरोध

स. १९०६ च्या सुमारास वंगभंगाची चळवळ सुरू झाली. बंगालमध्यें क्रांतिकारकांचे कांहीं अत्याचारहि झाले. पुढें **लो. टिळकांवर** राजद्रोहाचा

खटला होऊन त्यांस सहा वर्षांची कारागृहवासाची शिक्षा झाली. देशांत अशा तऱ्हेची लाट उसळली ती बंद करण्यासाठी सरकारनें दडपशाहीच्या शस्त्र संभारांत आणखी भर टाकण्याचें ठरवून त्याप्रमाणें वरिष्ठ कायदेमंडळांत **सर हरबर्ट रिस्ले** यांनीं ता. ४ एप्रिल १९१० रोजीं "प्रेस बिल" पुढें मांडलें. 'ए बिल टु प्रोव्हाइड फॉर दि बेटर कंट्रोल ऑफ दि इंडियन प्रेस' हें त्याचें नांव होतें. या बिलाला **पंडितजींनीं** कसून विरोध केला. **लो. टिळकांवर** झालेल्या राजद्रोहाच्या खटल्यांत इं. पि. को. कलमें १२४ व १५३ हीं सरकारला अपुरीं वाटल्याकारणानें सरकारचे हात जास्त बळकट करण्यासाठीं सदर कलमांना पोषक म्हणून १२४ अ व १५३ अ अशीं नवीं कलमें या बिलानें जोडण्यांत आलीं.

या बिलाला विरोध करतांना पंडितजी म्हणाले. "ज्या हेतूनें हें बिल आणण्यांत आलें आहे तो हेतू सहज साध्य होईल अशी योजना कायद्यांत अगोदरच आहे. हा कायदा अपुरा कसा आहे याचें उत्तर सरकारतर्फे मुळींच देण्यांत आलें नाहीं. सरकारतर्फे नुसतें असें सांगण्यांत आलें कीं, तीन वृत्तपत्रांना दोनदां, दोन वृत्तपत्रांना तीनदां व एका पत्राला सहा वेळ शिक्षा झाल्या. परंतु देशांत आठशें वृत्तपत्रें आहेत. त्यांना या सहा पत्रांबद्दल प्रायःश्चित्त काय म्हणून? तेव्हां प्रथम पूर्वींचे कायदे अपुरे पडतात कीं काय हें पहावयास नको काय?

उदाहरणार्थ नव्या बिलांतील कलम चारपैकीं अ पाहा. यांत खून करणें अगर खुनास प्रवृत्त करणें याबद्दलची व्यवस्था सांगितली आहे, परंतु त्यावर स. १९०८ च्या सातव्या कायद्यांत सर्व योजना केलेली आहेच. सरकारी नोकरांना नोकऱ्या सोडण्याबद्दल मन वळविणें याची व्यवस्थाहि इं. पि. कों. क. १३१ मध्यें आहे, तीच गोष्ट १२४ अ व १५३ अ कलमांची, या सर्वांची पूर्वींच कायद्यांत सोय करून ठेवली असतांना तीच आणखी पुनः नव्या रूपानें मांडण्याची गरजच काय? मॅजिस्ट्रेटला जुन्या कायद्याप्रमाणें राजद्रोही वाङ्मयप्रसाराला आळा घालतां येणें शक्य आहे. त्याला छापखाना जप्तहि करतां येतो. वृत्तपत्रीय स्वातंत्र्याचा कोणी दुरुपयोग करूं लागल्यास त्याला आळा घालतां येणें शक्य आहे. असें असतां व गेलीं ५० वर्षें ज्या कायद्यान्वयें कारभार करतां आला त्यांत आजच इतक्या लोकविलक्षण दुरुस्त्या करण्याची गरज नाहीं.

## ग्लॅडस्टनकृत निषेध

पूर्वी स. १८७८ सालीं व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्ट झाला त्यावेळीं **मि. ग्लॅडस्टन** यांनीं त्या कायद्याचा स्पष्ट शब्दांत निषेध केला होता. त्यावेळीं ते म्हणाले ' कोणतें वाङ्मय आक्षिप्त व राजद्रोही हें ठरविण्याचें काम ज्यांच्या क्षेत्रांतील त्यांच्या हातून तें काढून घेणें केव्हांहि बरें नव्हें. वृत्तपत्रांवर खटले करण्याचें काम न्यायखात्याकडून काढून घेणें ही गोष्ट अत्यंत वाईट आहे. यामुळें आपल्या धोरणावरच घाला बसत आहे.' **मि. ग्लॅडस्टन** यांनीं केलेला निषेधच आम्हांला पुनः करावा लागत आहे. मला पुनः पुनः इतकच सांगावयाचें आहे कीं जुने कायदे निरुपयोगी झाल्याचें प्रथम सिद्ध करा, नंतर नव्या दुरुस्तीच्या मार्गे लागा. हें बिल पास झाल्यास जास्त असंतोष मात्र माजेल. प्रत्येक पत्राला अनामत रक्कम ठेवणें भाग पाडण्यानें त्या धंद्याला मोठाच धक्का बसेल. वृत्तपत्राच्या धंद्याचा या देशांत तरी गेला ७० वर्षे दुरुपयोग झालेला नाहीं ही गोष्ट तरी लक्षांत घेऊन कायदा करणें तो करा. त्या धंद्यावर घाला घालूं नका. निदान यासंबंधांत लोकमत अजमावण्याला मुबलक संधी तरी देणें योग्य होणार आहे. ''

## राजद्रोही सभांचा कायदा

**पंडितजींच्या** विरोधाचा कांहींच उपयोग न होतां अखेर बिल पास झालेंच. परंतु इतर होयबाप्रमाणें त्यांनीं सरकारी धोरणाला मान न तुकवितां लोकपक्षाची बाजू चांगल्या प्रकारें पुढें मांडली. पुढें ता. ६ ऑगष्ट १९१० रोजी राजद्रोही सभांचा कायदा ' या नांवाचे बिल **ना. जेन्किन्स** यांनीं कौंसिलपुढें मांडलें. त्यालाहि विरोध करतांना पंडितजींनीं लोकपक्षाची बाजू दणदणीतपणें पुढें मांडली. सदर बिल म्हणजे स. १९०७चा सिडिशस मीटिंग्ज ॲक्ट सुरू ठेवावा हें ठरविणारें बिल होय. यासंबंधानें बोलतांना **पंडितजी** म्हणाले,

"हें बिल म्हणजे स. १९०७ च्या बिलाची दुसरी आवृत्तीच आहे. स १९०७चें बिल पुढें आणण्यांत आलें त्यावेळीं त्यांच्या उद्देशांत असें म्हटले होतें कीं, पंजाब व पूर्व बंगालच्या कांहीं भागांत फार गोंधळ माजला आहे त्याच्या निवारणार्थ हें बिल आहे. परंतु तो ऑर्डिनन्स पास होण्यापूर्वीच तेथें शांतता स्थापना झालेली होती. तरीसुद्धां सरकारनें तो कायदा पास केलाच. आतां असें सांगण्यांत येत आहे. स्थानिक

सरकारांकडून अशा कायद्याची मागणी आहे.परंतु स्थानिकसरकारला आपण आपली बुद्धी विकण्याइतकें आपण खास नादान नाहीं.आपणासहि परिस्थिति समजतेच. असें सांगण्यांत आलें कीं, देशांत क्रांतिकारक व अराजक लोक आहेत परंतु असे क्रान्तिकारक असलेच तर सभाबंदी करून त्यांचें उच्चाटन कसें करणार ? त्यांना कटच करावयाचे तर ते गुप्तपणें करणार ते कांहीं जाहीरपणें कट करणार नाहींत. कायद्यानें अराजकांना आळा पडेल अशी व्यवस्था त्यांत काय आहे ! व तशी ती जर त्यांत नाहीं तर हा कायदा तरी कशाला ? अशाप्रकारें कायदा करणें एकप्रकारें वाईट डोहाळेच होत. तेव्हां अशा प्रकारचे कायदे करून लोकक्षोभांत भर घालणें बरें नव्हे.

## सक्तीच्या शिक्षणाचा कायदा

स. १९१२ मध्यें **कै. ना. गो. कृ. गोखले** यांनीं वरिष्ठ कायदेमंडळांत प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत करण्याचें बिल आणलें. तेव्हां त्या बिलाला पाठिंबा देतांना **पं० मालवीय** म्हणाले, " देशांत शांतता व न्याय प्रस्थापित करणें हें प्रत्येक सुसंस्कृत सरकारचें आद्य कर्तव्य आहे हें खरें तथापि त्यानंतरचें दुसरें महत्त्वाचें कर्तव्य म्हणजे देशांतलि अज्ञान अंधःकार नष्ट करणें. देश दारिद्र्यांतून मुक्त करणें व लोकांचें संकट हरण करून अत्याचारापासून त्यांचा बचाव करणें हें आहे. देशांत शांतता स्थापन करण्यासाठीं पैसे खर्च करण्याची जशी सरकार दक्षता घेते तशीच शिक्षणप्रसारार्थ द्रव्य खर्चण्यासाठींहि घ्यावयास पाहिजे. केवळ अज्ञानामुळें आमचे देशबांधव नानाप्रकारच्या आपत्तींत सांपडतात ! केवळ अज्ञानामुळें कोट्यावधी भारतवासी मृत्युमुखीं पडतात. त्यांना ज्ञानदान दिल्यास ते खात्रीनें वांचतील. अज्ञानामुळें त्यांना अत्यंत कठीण असा जीवनक्रम व्यतीत करावा लागतो. दुसऱ्याहि अशा अनेक आपत्तींत ते सांपडतात कीं त्यांना थोडेसें शिक्षण मिळाल्यास त्यांत ते खात्रीनें सांपडणार नाहींत. प्रत्येक सुधारलेलें सरकार शिक्षणप्रसारासाठीं अत्यंत प्रयत्न करीत असतें. हें सरकारहि सुधारलेलें आहे असें मानण्यांत येतें. तेव्हां जनता अज्ञानांधकारांत चाचपडत आहे तिचा बचाव करावयाचा तर निदान प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें केलेंच पाहिजे. स. १८८३ सालीं एज्युकेशन कमिशननें आपला रिपोर्ट केला तेव्हांपासून सरकारची जमा सारखी वाढतच

आहे. लष्करी व मुलकी खात्यांत खर्चाची वीस कोटींची वाढ झाली. ना. **गोखले** यांनीं हिशेब करून स्पष्ट दाखविलें कीं, शाळेंत जाण्यायोग्य सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनीं यांच्या शिक्षणाची सोय करावयाची असें म्हटलें तरी प्रतिवर्षी फक्त ४॥ कोटी रुपयांचा खर्च वाढेल. शिक्षण मंत्री म्हणतात, तो ९ कोटींनीं वाढेल. तो नऊ किंवा दहा कोटींहि धरला तरी त्यांत विशेष हरकत काय आहे ! यासाठीं जरूर तर जादा कर बसवा असेंहि आमचें म्हणणें आहे. विदेशी मालावर शें. २ रुपये कर जास्त केला तरीसुद्धां हा जादा खर्च भरून निघेल. देशांत प्रतिशेंकडां ९४ बालकें निरक्षर आहेत ही दुस्थिति कोणीकडून तरी टाळली पाहिजे. ''

हा ठराव मान्य व्हावा अशाबद्दल अनेक प्रयत्न झाले तरी कौन्सिलनें ठराव पास केला नाहीं परंतु शिक्षणखर्चांत मात्र थोडीशी वाढ केली.

## देशी धंद्याची वाढ करा

शिक्षणा खेरिज दुसऱ्या एका गोष्टीकडे पंडितजींचें विशेष लक्ष असे व तें म्हणजे देशी कलाकौशल्याच्या अभिवृद्धीकडे. देशांतील कारागीर सुखी असावे, कापड, साखर. इत्यादि अत्यवश्य वस्तूंत आपला देश स्वयंपूर्ण असावा अशा-बद्दल **पंडितजी** सदैव प्रयत्न करीत. स. १९०९ सालीं प्रयागास साखरेचा कारखाना स्थापन झाला. तो **पंडितजींच्या** प्रयत्नानेंच. वेळोवेळीं सर-कारचें लक्ष या विषयाकडे ते वेधून घेत.

स. १९१४ सालीं महायुद्ध सुरू झालें त्याबरोबर देशांत विदेशी माल कमी प्रमाणांत येऊं लागला. देशांत लागणाऱ्या वस्तू देशांतच तयार करण्याला ही चांगली संधी म्हणून स. १९१५ मध्यें **पंडितजींनीं** सरकारास अशी सूचना केली कीं, देशी कारखानदारांना मदतीबद्दल म्हणून सरकारनें प्रतिवर्षी बारा लक्ष रुपये द्यावे. या रकमेंतून कारखानदाराला भांडवल देणें, त्याला तज्ज्ञांकडून सल्ला देणें, नवे पदार्थ तयार करण्याचें काम शिकविणाऱ्या शाळा काढणें, नव्या कारखान्याला तूट येऊं लागली तर पहिलीं दोन वर्षें ती सरका-रनें सोसणें, कारखानदारांना किफायतशीरपणें यंत्रें मागवून देणें इत्यादि कामा-कडे सदर रकमेचा विनियोग करावा अशी **पंडितजींची** सूचना होती. या सूचनेवर भाषण करतांना **पंडितजी** म्हणाले,

" आमच्या देशांत कच्चा माल पुष्कळ उत्पन्न होतो, पण तो परदेशांत पाठविण्यांत येतो. देशांत उद्योगधंदे नाहींत. देशांतील उद्योगधंदे वाढवावे अशी सूचना स. १८७८ सालीं फॅमिन कमिशननें केली होती. हिंदुस्थानसरकारनें हें तत्त्व मान्य केलें आहे. परंतु उद्योगधंद्याच्या वाढीला सक्रिय मदत मात्र केली नाहीं. या महायुद्धानें देशी उद्योग धंद्याची वाढ करण्याला सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे. परंतु सरकारनें अद्यापिहि मदत केली नाहीं. याच्या उलट जपान-कडे पाहा. अवघ्या ४० वर्षांत जपाननें आपली केवढी उन्नति केली आहे! जपानहि प्रथम आपला कच्चा माल विदेशीं पाठवीत असे.पण आतां पक्का माल तयार करून तो विदेशांत पाठवूं लागला आहे. हें उदाहरण हिंदुस्थान सरकारला घेण्यासारखें नाहीं काय? जपाननें आपले उद्योगधंदे वाढविले तसे हिंदुस्थान सरकारला खात्रीनें वाढवितां येतील. "

## मुदतबंदीचे मजूर

यानंतर ता. २० मार्च १९१६ मध्यें मुदतबंदचि मजूर पाठविण्याचें बंद करावे अशा अर्थाचा ठराव त्यांनीं कौन्सिलपुढें मांडला. हा ठराव मांडतांना **पंडितजींनीं** परदेशांत हिंदी मजुराचे कसकसे हाल होतात, त्यांचा तेथें छळ कसा होतो, त्यांच्या धर्मभावनांचा उपमर्द कसा होतो, नानाप्रकारें त्यांना देहदंड कसा भोगावा लागतो. याचें इतकें हृदयस्पर्शी वर्णन केलें, कीं कित्येक सहृदय सभासदांच्या नेत्रांतून अश्रुबिंदूहि ठिबकले असें सांगतात. **पंडितजींच्या** भाषणाचा परिणाम असो कीं कांहीं अन्य कारण असो, सरकारनें या प्रकरणाची चौकशी करण्याचें अभिवचन दिलें एवढेंच मात्र खरें.

सप्टेंबर १९१७ मध्यें हिंदुस्थानांत व इंग्लंडमध्यें एकाच वेळीं इंडियन सीव्हिल सर्व्हिसच्या परीक्षा घेण्यांत याव्यांत अशी सूचना केली. या भाषणांत इंग्रजी सत्ता हिंदुस्थानांत रूढ झाल्यापासून तींत उत्क्रांति कसकशी होत गेली परंतु लोकांच्या आकांक्षाना व कर्तबगारीला त्यांत वाव कसा मिळाला नाहीं. याचें स्पष्टोक्तीपूर्ण विवेचन केलें. पब्लिक सर्व्हिसेस कमिशनपुढें झालेल्या साक्षींत त्यांनीं या सर्व गोष्टींचा पूर्ण ऊहापोह केला आहे व त्या साक्षीचा गोषवारा इतरत्र दिला असल्यानें त्याच विषयावर त्यानीं केलेलें भाषणांत पुनः येथें देत नाहीं. तथापि या प्रसंगींहि ब्रिटिश राजनीतीच्या कुटिल धोरणाचें पुनः एकदां स्पष्टोक्तीपूर्ण आविष्करण त्यांनीं केलें.

# मॉटफर्ड सुधारणांचें आगमन

मोर्ले-मिंटो-सुधारणान्वयें मिळालेल्या कायदेमंडळांत **पंडितजींनीं** काय काम केलें हें वर दर्शविलें. यानंतर त्यांच्या कायदेमंडळांतील लोकसेवेचा तिसरा भाग सुरु झाला. पहिला भाग स्थानिक कायदेमंडळांतील. दुसरा भाग मोर्ले--मिंटो सुधारणा कायद्यान्वयें मिळालेल्या कौन्सिलांतील. व त्यानंतर तिसरा भाग मॉट-फर्ड-सुधारणान्वयें विस्तृत झालेल्या कायदेमंडळांतील.

मॉटफर्ड सुधारणा जाहीर झाल्यानंतर त्यावर कॉंग्रेसनें अपुऱ्या, असमाधानकारक व निराशाजनक असा शिक्का मारला. व कलकत्त्याच्या जादा कॉंग्रेसनें व नंतर नागपूर कॉंग्रेसनें या कौन्सिलावर पूर्ण बहिष्कार घातला. **पं. मालवीय** या बहिष्काराला पूर्ण विरोधी होते तरीहि त्यांनीं राष्ट्रीय सभेच्या हुकुमान्वयें कौन्सिलावर बहिष्कार घातला. व पुढें गया कॉंग्रेसनंतर बहिष्कार उठला तेव्हां **पंडितजी** पुनः प्रयाग-झांशी विभागातर्फे ले. असेंब्लींत अविरोध निवडून गेले. ले. असेंब्लींत **पंडितजींनीं** लोकपक्षातर्फे केलेली कामगिरी अपूर्व आहे. प्रत्येक वर्षी अंदाजपत्रक असेंब्लीपुढें आलें म्हणजे **पंडितजींनी** सरकारच्या लोकहितविघातक धोरणाचे वाभाडे काढले नाहींत असें कधींच घडलें नाहीं. **पंडितजींचीं** सर्वच भाषणें मुद्देसूद, साधार, प्रतिपक्षानें वेळोवेळीं केलेलीं विधानें परत त्यांच्या तोंडावर टाकून त्यास नामोहरम करण्याची त्यांची पद्धत, आंकडे देऊन आपलीं विधानें बळकट करण्याची त्यांची हातोटी या सर्वच प्रकारानें **पंडितजींचीं** भाषणें म्हणजे प्रतिपक्षाच्या हृदयाचा भेद करणारीं असावींत यांत नवल नाहीं. त्यांच्या भाषणांत तुलनात्मक माहिती तर इतकी मुबलक मिळते कीं, हिंदी राजकारणाचा तुलनात्मक अभ्यास करणाराला तीं अभ्यसनीय झाल्याखेरीज राहणार नाहींत. तीं सर्वच येथें देणें स्थलाभावामुळें शक्य नाहीं. तथापी त्यांतील विशेष महत्त्वाचें भाषण फेब्रुवारी १९२४ मध्यें **पंडित मोतिलालजी नेहरू** यांनीं हिंदुस्थानला वसाहतीच्या दर्जाचें स्वराज्य देण्यांत यावें व त्यासाठीं एक प्रातिनिधिक वर्तुल परिषद बोलवावी अशी सूचना ले. असेंब्लीपुढें आणली. तीवर अनुमोदनादाखल भाषण **पं.मालवीय** यांनीं केलें तें होय.

## स्वराज्याची पात्रता

हिंदी लोक स्वराज्याला अपात्र आहेत अशी त्यांच्या हितशत्रूंची नेहमींची ठरावकि तक्रार पुढें करण्यांत येतें. या विधानाला **पंडित मालवीय** यांनीं साधार व मुद्देसूद उत्तर दिलें. **चंद्रगुप्ताच्या** वेळीं लोकस्थिती कशी उत्तम होती, लोक कसें सुखी असत, चारचार लक्ष सैनिकांचा तळ पडला तरीहि ३०-४० रुपयापेक्षा जास्त किंमतीचा माल चोरीला गेला नाहीं. वगैरे माहिती इंग्रज इतिहासकरांनींच लिहून ठेवलेली आहे. ही झाली ब्रिटिशांच्या पूर्वींच्या काळची हकीगत. परंतु हिंदुस्थान इंग्रजांच्या हातीं गेल्यानंतर **सर जान मालकम** यानें लॉर्ड **विलियम बेंटिक** याला ता. २० फेब्रुवारी स. १८३० रोजीं एक पत्र लिहिलें आहे त्यांत तो लिहितो, ' पूर्वीं देशी राजांच्या अंमलाखालीं जो संतोष नांदत होता. तितका आज नाहीं. प्रजा असंतुष्ट झाली आहे. पोलिसांचा बंदोबस्त नीट नाहीं, साराहि जादा वाढविण्यांत आला आहे व ही सर्व स्थिती सुधारतां येणें शक्य असतांहि आम्हीं ती सुधारीत नाहीं. " या पत्राचा उल्लेख करून **पंडितजी** पुढें म्हणतात,

"मला इतकेंच सांगावयाचें आहे कीं, आम्हांलाहि संस्कृती होती. व आमचें स्वराज्य-स्वातंत्र्य केवळ दुर्दैवानें गेलें. व इंग्रज येथें आले नसते तरीहि आम्हीं हिंदु व मुसलमानानीं आपला कारभार चालविलाच असता. आजहि ⅓ हिंदुस्थानावर आमचेच लोक राज्य करीत आहेत. ( मालकम हेले-पण तेथें सुधारणा काय आहेत ? ) तेथें सुधारणा नाहींत याला जबाबदार ब्रिटिश सरकारच आहे. संस्थानिकांना योग्य शिक्षण दिलें असतें तर आज सर्वत्र बडोदा व म्हैसूर सारखीं प्रगतीपर संस्थानें दिसलीं असतीं.

## सुधारणांची बजावणी तरी केली कां ?

खेरीज सुधारणाकायदा करण्यांत आला त्य.च्या हे प्रमाणें तरी बजावणी कोठें होत आहे ? कायदा व व्यवस्था हें खातें राखीव ठेवलें व परिणाम काय झाला तर शेंकडों देशभक्त तुरुंगांत डांबण्यांत आले. या ले. असेंब्लींतीलहि कित्येक सभासदांना केवळ मताभिन्नतेमुळें कारागृहवास भोगावा लागला आहे. कायदा व व्यवस्था या खात्याचा दुरुपयोग यापूर्वी इतका कधींच झालेला

नाहीं. ज्या बाबतींत स. १९१९ च्या सुधारणा कायद्यान्वयेंच प्रगति व्हावयास पाहिजे होती त्यांत ती मुळींच करण्यांत आली नाहीं.

महायुद्धानंतर इंग्लंडनें आपला आर्थिक कारभार सांवरला. कर कमी केले. राष्ट्रीय कर्जाची फेड होऊं लागली. उद्योगधंद्यास मदत केली. पण आमच्या येथील चित्र पाहा. सुधारणा अमलांत आल्यापासून ४१ कोटींचे नवे कर लादण्यांत आले. अगोदरच कर्जाचा बोजा दुस्सह झाला आहे. त्यांतच १९१३-१४ पासून ५३ कोटींचे नवे कर लादण्यांत आले. शिक्षणाची उपासमार होत आहे. आरोग्यखात्याकडे लक्ष नाहीं. दिवाणांच्या नेमणुका होतात पण त्या बिचाऱ्यांना प्रगति करून दाखवितांच येत नाहीं. देशाची प्रगति होण्याऐवजीं सारखी परागतीच होत आहे. जबाबदारीचें स्वराज्य देण्याच्या दृष्टीनें सरकार पुढें पावलें टाकील अशी मूळ कल्पना पण नोकऱ्यांचें हिंदीकरणहि नाहीं. आय्. सी. एस्च्या शिक्षणासाठीं येथें काडीचीहि सोय नाहीं. लष्कराच्या संबंधांत तर कमालच चालली आहे. स. १९१३-१४ सालीं लष्करी खर्च २७ कोटी होता. १९२२-२३ सालीं तो ६४ कोटींवर गेला. हा खर्च कमी करा म्हणून आम्ही सारखे ओरडत आहोंत. परंतु तो कमी होण्याऐवजीं वाढत मात्र आहे. बँकिंगची रड तशीच. जपाननें अवघ्या वीस वर्षांत बँकांची संघटना केली. व व्यापारधंदा वाढविला. पण येथें आमची ठेव इंग्लंडमध्यें ! आमचा कारभार आमच्या हातीं देण्याची किंचितहि प्रवृत्ति या व अशा अनेक गोष्टींवरून दिसत नाहीं ! लष्करी शिक्षणाच्या बाबतींतील अनास्था विचारावयासच नको. यावरून लोकांत असा समज उत्पन्न झाला आहे कीं, ब्रिटिश नोकरशाहीला हिंदुस्थान सोडावयाचें नसल्यानें ती या गोष्टीकडे दुर्लक्ष करीत आहे. व यासाठींच आम्हांस जबाबदारीचें स्वराज्य पाहिजे.

## अडचणींचें बुजगावणें

स्वातंत्र्य मिळविण्याचे मार्ग दोन. एक तडजोडीचा व दुसरा शस्त्राच्या बळावरचा. दुसरा मार्ग आज निरुपयोगी आहे. कारण नोकरशाहीनें आमचीं शस्त्रेंच हिरावून घेतलीं आहेत. व आम्हांस युद्धाचें शिक्षणहि दिलेलें नाहीं. खेरीज आम्हां हिंदी लोकांना रक्त सांडण्यांत आनंद वाटत नाहीं. तथापि रक्तहि आम्ही सांडलें नाहीं असें नाहीं. व तसें सांडल्याचें इंग्लिश लोकांनाहि मान्य आहे.

गेल्या महायुद्धांत दहा लक्ष हिंदी सैनिक हिंदी किनारा सोडून युद्धभूमीवर गेले. पैकीं ६० हजारांनीं साम्राज्यासाठीं आपले प्राण वेंचले. त्यांनीं साम्राज्याच्या स्वातंत्र्यार्थ प्राण वेंचले तेव्हां आमचें स्वातंत्र्य आम्हांस मिळेल अशी आमची कल्पना होती ती दुर्दैवानें साफ खोटी ठरली.

आम्हांस स्वराज्य दिल्यास संस्थानिक काय म्हणतील, असा प्रश्न विचारण्यांत येतो. त्याला उत्तर असें कीं, संस्थानिक स्वराज्य द्या असेंच म्हणत आहेत. विकानेरचे महाराज पहिल्या साम्राज्यपरिषदेला गेले तेव्हां त्यांनीं, पत्याळाचे महाराज दुसऱ्या साम्राज्यपरिषदेला गेले तेव्हां ते व अलवारचे महाराज, यांनीं हिंदुस्थानला स्वराज्य द्या अशी घोषणाच केलेली आहे.

दुसरा असा एक सवाल टाकण्यांत येतो कीं, स्वराज्य दिल्यास युरोपियन व्यापाऱ्यांचा काय वाट ? स्वराज्यांत त्यांचें रक्षण खास होईलच व ठरावांत जी वर्तुल परिषद मागितली आहे तींतहि या गोष्टींचा विचार होईल.

शेवटचा मुद्दा अल्पसंख्यांकाबाबतचा. या प्रश्नाबद्दल आम्हांला फार भेंडसावण्यांत येतें. परंतु सुधारणाकायदा होण्यापूर्वींच हिंदु-मुसलमानांचा प्रश्न सोडविला तो कांहीं सरकारनें नाहीं. लखनौचा करार हिंदुमुसलमानांनीं मिळून केला आहे.

तुम्हीं आपलें रक्षण कसें करणार ? असाहि एक सवाल करण्यांत येतो. परंतु ही स्थिति आणली नोकरशाहीनेंच कीं नाहीं ? लोकांना सैनिकशिक्षण का देण्यांत आलें नाहीं ? यासंबंधीं उत्तर एवढेंच कीं असा काथ्याकूट करण्यापासून कांहीं निष्पन्न होणार नाहीं. पूर्ण वसाहतीचें स्वराज्य द्या व येथून चालते व्हा. संरक्षणाचें आमचें आम्हीं पाहून घेतों. स्वराज्य आज ना उद्यां आम्हांला मिळणार यांत शंकाच नाहीं. प्रश्न इतकाच कीं इंग्रज तें गोडीनें देणार कीं त्याच्या आड येणार !'

## सरकारचें विरोधी धोरण

याप्रमाणें ले० असेंब्लींत लोकपक्षाची उत्कृष्ट सेवा करीत असतां ले. असेंब्लीच्या उपयुक्ततेबद्दल खुद्द लोकपक्षांतच- कॉंग्रेस मतानुयायी-कौन्सिलवाद्यांमध्येंच मतभेद उत्पन्न झाला. या पक्षांत जूट होती तोंपर्यंत अनेक वेळां सरकारचा सपशेल पराभव करण्यांत आला होता. या गोष्टींचा प्रभाव सामान्य

लोकांवरहि कांहीं कमी पडला नाहीं. लोकप्रतिनिधींनीं कायदेमंडळांत जाऊन लोकांच्या हक्कासाठीं निकरानें भांडावें, आपल्या बाजूचें बहुमत करून सरकारला चारीमुंड्या चीत करावें, परंतु सरकारनें लोकमताविषयीं किंचितहि पर्वा न बाळगतां आपल्या जादा अधिकाराच्या जोरावर लोकपक्षाचें सर्व काम नासून टाकावें. लोकांच्या इच्छेविरुद्धच नव्हे तर निषेधाच्याहि विरुद्ध लोकांवर नाना-प्रकारचे कर लादण्यांत यावेत, हा प्रकार होऊं लागल्यानें सरकारच्या अशा कृत्यांनींच लोकक्षोभ वाढण्यास मदत होऊं लागली.

सरकारच्या या निरंकुश वृत्तीमुळें कंटाळून **पं. मोतिलाल नेहरू** प्रभृतींनीं ले. असेंब्लीचे राजीनामे दिले. अशा मोडक्या कां होईना पण कायदे-मंडळांत जी थोडी फार लोकसेवा करतां येते ती आपण तींतून बाहेर पड-ल्यास मुळींच करतां येणार नाहीं व नोकरशाहीस सर्वच रान मोकळें सांपडेल तेव्हां येथेंच राहून लोकपक्षाची बाजू निस्पृहपणें सतत मांडू या, अशी **पं. मालवीय प्रभृतींची** विचारसरणी असल्यानें त्यांनीं **नेहरूंच्या** बरोबर राजीनामे दिले नाहींत व सरकारच्या टोल्यास टोला देण्याचा आपला क्रम त्यांनीं सुरूच ठेवला.

पुढें स. १९३० मध्यें सरकारनें फिनॅन्सबिल असेंब्लींत आणलें तेव्हां तर राष्ट्रीय पक्ष व सरकारपक्ष यांचे एकसारखे खटके उडाले. मार्चमध्यें कॉटन प्रोटेक्शन बिल सरकारनें आणलें.

## ब्रिटिश मालाला सवलती

या बिलांत ब्रिटिश मालाला विशेष सवलत देण्याच्या पक्षपाताचें जें बीज घुसडलें गेलें आहे त्याला विरोध करण्याकरतां पं. **मालवीय** यांनीं परदेशाहून येणाऱ्या सर्व कापडावर किंमतींच्या मानानें शेंकडा १५ टक्के अगर वजनावर दर रत्तलास ३॥ आणे यांतून ज्या हिशोबानें जास्त जकात बसेल त्या हिशोबानें तेवढी जकात घ्यावी अशी उपसूचना मांडली. मूळची सरकारची सूचना अशी कीं, सर्व मालावर शेंकडा १५ टक्के जकात घेऊन शिवाय ब्रिटिशेतर मालावर मात्र जादा ५ टक्के किंवा दर पौंडास ३॥ आणे प्रमाणें जी जास्त होईल ती जकात घ्यावी. यावर मद्रासचे **षण्मुखं चेट्टी** यांची उपसूचना अशी होती कीं, बिनाकिनारीच्या व बिनबुवट अशा ब्रिटिश मालावर शेंकडा १५ टक्के किंवा वजनावर दर पौंडास ३॥ आणे

प्रमाणें. जास्तींत जास्त होईल ती जकात घ्यावी; इतर प्रकारच्या मालांवर ब्रिटिश मालाला १५ टक्के आणि ब्रिटिशेतर मालावर २० टक्के जकात घ्यावी.

आपल्या मूळ बिलाला जोराचा विरोध होत असल्याचें पाहून सरकारनें **षण्मुखं चेट्टी** यांची उपसूचना मान्य करण्याचें ठरविलें होतें. त्या उपसूचनेमुळें ज्या बिनकिनारींच्या व विनधुवट अशा मँचेस्टरच्या मालाची हिंदी गिरण्यांच्या मालाशीं चढाओढ होते तेवढ्या मालावर जपानी मालाप्रमाणेंच दर पौंड वजनावर ३॥ आणे जकात बसवावी ।आणि मुंबईच्या गिरण्यास तेवढ्या मालापुरती तरी मँचेस्टरची चढाओढ बाधक होणार नाहीं. पण तेवढा माल वगळून इतर सर्व बाबतींत ब्रिटिश मालावर १५ टक्के आणि ब्रिटिशेतर मालावर २० टक्के असलें पक्षपाताचें धोरण कायमच होतें, आणि तेवढ्याच आशेनें सरकारनें तरी **चेट्टी** यांची उपसूचना स्वीकारण्याचें कबूल केलें होतें.

पण मूळ सरकारी बिल काय किंवा **चेट्टी** यांची उपसूचना काय या दोहोंतहि ब्रिटिश मालाला वेगळा दर आणि ब्रिटिशेतर मालाला वेगळा दर असला पंक्तिप्रपंच असल्यामुळें,साम्राज्यसवलतीच्या उंटाचें हें पिलूं एकदां घरांत घुसलें, तर पुढें तें वाढत जाऊन घर अंगावर येईल, अशी भीति सकारण वाटत असल्यामुळें राष्ट्रीय पक्षानें पं. **मालवीयांच्या** नेतृत्वाखालीं 'इंपीरिअल प्रेफरन्स' च्या तत्त्वाला कसून विरोध करण्याचें ठरविलें.

## पंडितजींचा सरळ हल्ला

राष्ट्रीय पक्षाचे पुढारी पं. **मालवीय** यांनीं आपला हा डाव अत्यंत धूर्ततेनें टाकला. त्यांनीं प्रथम अशी शंका उपस्थित केली कीं, हिंदी गिरण्यांना संरक्षण देण्याची व त्यांत साम्राज्यसवलतीचें घोडें घुसडण्याची कल्पना ब्रिटिश-सरकाराकडून सुचविण्यांत आली काय? त्यावर अर्थातच सरकारतर्फे असा खुलासा करण्यांत आला कीं, मँटेग्यू चेल्म्सफर्ड सुधारणेच्या कायद्यापासून हिंदुस्थानाला आर्थिक स्वायत्तता प्राप्त झाली असल्यानें जकातीचा प्रश्न हिंदुस्थान सरकार व कायदेमंडळ यांच्या अधिकारांतला आहे. या उभयतांचें एकमत होईल तर भारतमंत्री किंवा ब्रिटिश मंत्रिमंडळ त्यांत बिलकूल ढवळाढवळ करणार नाहींत. यावर **मालवीय** यांनीं दुसरा असा प्रश्न टाकला कीं, तर मग ब्रिटिशेतर मालावर २० टक्के जकात बसवावी ही कल्पना कोणाची? हिंदुस्थान सरकारची कां ब्रिटिश सरकारची? त्यावर सरकारपक्षाकडून स्पष्ट उत्तर

मिळेना व आपला पत्रव्यवहार कौन्सिलापुढें मांडण्यास सरकार तयार होईना ! **सर जॉर्ज रेनी** यांनीं नुसतें असें गुळमुळीत उत्तर दिलें कीं, सरसकट १५ टक्के जकात पुरे आहे असें हिं. सरकारचें प्रथम मत होतें. पण त्यावर हिंदी गिरणीवाल्यांकडून जकात २० टक्के बसवावी अशी मागणी आली. तिचा विचार चालू असतांनाच ब्रिटिश सरकारकडूनहि कांहीं सूचना आल्या. त्यावरून सरकारनें ब्रिटिशेतर मालावर २० टक्के जकात बसविण्याचें ठरविलें ! याचा उघड अर्थ असा झाला कीं, ब्रिटिश सरकारच्या सांगण्यावरूनच ब्रिटिश मालावर १५ टक्के आणि ब्रिटिशेतर मालावर २० टक्के अशी पक्षपाती जकात बसविण्याचें बिल पुढें आलें. परंतु ही उघड उघड गोष्ट कबूल न करितां जेव्हां **सर जॉर्ज रेनी** हे पुनः पुनः सांगूं लागले कीं, हिंदुस्थानास आर्थिक स्वायत्तता मिळाली आहे आणि या बाबतींत आमचे आम्ही मुखत्यार आहों, त्या वेळीं असा सवाल विचारण्यांत आला कीं, असेंब्लीनें जर २० टक्के जकात नामंजूर करून सरसकट १५ टक्के किंवा वजनावर ३॥ आणे प्रमाणेंच जकात ठेवण्याचें ठरविलें तर तें तुम्ही मान्य कराल काय? त्यावर **सर जॉर्ज रेनी** म्हणाले कीं, तसें झाल्यास आम्ही बिलच परत घेऊं !

## पंडितजींचे तीन मुद्दे

असेंब्लींतील बहुमतानें मंजूर केलेली सूचना जर सरकार अशा रीतीनें कस्पटासमान मानणार तर आर्थिक स्वायत्तता याचा अर्थ तरी काय ? हिंदुस्थान सरकार हें कोणास जबाबदार आहे ! तें जर असेंब्लीला जबाबदार असेल तर असेंब्लीनें पास केलेलें बिल त्यांस मान्य करणें प्राप्त आहे. असेंब्लीला जर तें जबाबदार नसेल तर तें ब्रिटिश पार्लमेंटला जबाबदार असलें पाहिजे व तें खरें धरल्यास आर्थिक स्वायत्ततेचा डोलारा कोठें राहिला ? या शृंगापत्तींतून सुटण्याला सरकाला मार्ग नसल्यानें अध्यक्ष **ना. पटेल.** यांनींहि तोच प्रश्न रेनी यांस विचारला. त्या वेळीं **रेनी** म्हणाले कीं, जेव्हां हिंदुस्थान सरकार व असेंब्ली यांचें एकमत होईल तेव्हां ब्रिटिश मंत्रिमंडळानें ढवळाढवळ करूं नये एवढीच स्वायत्तता तूर्त मिळाली आहे; पण ज्यावेळीं असेंब्ली व हिंदुस्थान सरकार यांच्यांत मतभेद उत्पन्न होईल तेव्हां कोणाचा अधिकार चालावा याचा खुलासा कायद्यांत नाहीं ! त्यावरून पं. **मालवीय** यांनीं असा प्रश्न उपस्थित केला कीं, सरकारतर्फे जो आर्थिक स्वायत्ततेचा अर्थ करण्यांत येत

आहे. तो अर्थ बरोबर आहे कां चूक आहे हें अध्यक्षांनीं सांगावें; कारण नियमांचा अर्थ संशयास्पद असल्यास त्यांचा निर्णय देण्याचा अधिकार अध्यक्षांसच आहे.

## सरकारनें तोंड घालूं नये

याच प्रश्नाबरोबर दुसरा असा प्रश्न उपस्थित झाला कीं सरकार व असेंब्ली यांच्यांत एकमत झालें कां नाहीं हें पाहतांना असेंब्लींतले सरकारी कामगार व सरकारनियुक्त सभासद यांचीं मतें कोणाच्या बाजूला धरावयाचीं? सरकारी सभासद हे तर बोलून चालून सरकारचेच अवयव आणि सरकारनियुक्त सभासद हे तसे नैसर्गिक अवयव नसले तरी ते चिकटविलेले अवयव म्हणतां येईल! मग ज्या वेळीं सरकारपक्ष व लोकपक्ष या दोहोंची संमति एखाद्या बिलाला आहे कां नाहीं हें पहावयाचें असेल त्या वेळीं सरकारी सभासद व सरकारनियुक्त सभासद यांनीं लोकप्रतिनिधींत घुसून लोकमताचें पारडें बदलण्याचा उपद्व्याप काय म्हणून करावा? त्यांनीं तसें करणें म्हणजे सरकारला दुहेरी मताधिकार मिळाल्यासारखा होतो. मॉंटेग्यू चेल्म्सफर्ड बिलाची रचना करतांना ज्या पोट-कमिट्या नेमल्या होत्या त्यांतील क्र्यू कमिटीनें त्या वेळीं असा अभिप्राय दिला आहे कीं ज्या ज्या वेळीं सरकारचें मत आणि लोकपक्षाचें मत यांच्यांत ऐक्य आहे कां विरोध आहे हें ठरविण्याचा प्रसंग येईल त्या त्या वेळीं सरकारनियुक्त सभासद व प्रत्यक्ष सरकारी अधिकारी यांचीं मतें विचारांत घेऊं नयेत. या सूचनेचा आधार घेऊन पं. **मालवीय** यांनीं अध्यक्षांस असा प्रश्न केला कीं, कॉटन प्रोटेक्शन बिलासंबंधीं सरकार व लोकपक्ष यांच्यांत मेळ कितपत बसतो हेंच पाहावयाचें असल्यानें या पूर्ण सरकारी व निमसरकारी सभासदांस मतें देण्याचा अधिकार पोंचतो काय याचा निर्णय अध्यक्षांनीं द्यावा.

तिसरा प्रश्न हा कीं, असेंब्लीनें जर पं. **मालवीय** यांची उपसूचना बहुमतानें स्वीकारली तर मग पुढें आपण कोणतें धोरण स्वीकारावयाचें तें ठरविण्याचा अधिकार सरकारास राखून ठेवतां येतो काय? असेंब्लीनें दिलेला निर्णय सरकारला बंधनकारक नाहीं काय? असे हे तीन मुद्द्यांचे प्रश्न आहेत. यावर अध्यक्षांनीं आधीं आपला अभिप्राय द्यावा, आणि नंतर त्यांस अनुसरून हा वादविवाद पुढें चालावा अशी पं. **मालवीय** यांनीं मागणी केली.

## असेंब्लींतील अखेरचें भाषण

अध्यक्षांचें मत वरील तीनहि मुद्दयांवर प्रतिकूल पडल्यानें बिलाचें भवितव्य काय हें ठरून गेलें. बिल पास होण्याच्या मजलेवर आलें तेव्हां **पं० मदनमोहन** यांनीं त्यास अखेरचा विरोध केला तेव्हां ते म्हणाले,

" वादाची परिसीमा झाली. परंतु त्याचा सरकारवर कांहींएक परिणाम झाला नाहीं. मी जुन्या इम्पीरियल कौन्सिलचा सभासद व या ले० असेंब्लीचा ( पहिली असेंब्ली वगळून ) सुमारें वीस वर्षें सभासद आहे. परंतु आजच्यासारखी बेपर्वाईची वृत्ति सरकारनें केव्हांहि दाखविलेली मीं पाहिली नाहीं. प्रस्तुत घटना सदोष व असमाधानकारक असतांनाहि तीं राबविण्याचा आम्हीं प्रयत्न केला. पण आजच्या सरकारच्या धोरणानें आम्हाला मर्यादेबाहेर लोटून दिलें आहे. अशा स्थितींत आम्हीं बिल पास झालेलें पाहत बसल्यानें जास्त अपराधी ठरूं म्हणून त्याच्या निषेधार्थ येथें न बसणेंच इष्ट आहे. या बिलाच्या पहिल्या वाचनाच्या वेळीं सरकारच्या बाजूला ६० मतें पडलीं. पैकीं २६ इसम तर सरकारचेच नोकर. त्यांची संख्या वगळल्यास सरकारच्या बाजूला फक्त ३४ मतें दिसतात. उलट लोकपक्षाच्या बाजूला ४२ मतें पडलीं आहेत. बिलाच्या दुसऱ्या वाचनाच्या वेळींहि सरकारला ६२ मतें मिळालीं. त्यांतील २६ वगळल्यास सरकारला फक्त ३९ मतें व आमच्या बाजूला ४२ मतें पडलीं. याला सरकारनें वाटला तर आपला जय झाला असें खुशाल म्हणावें. पण लोक तरी तसें म्हणणार नाहींत.

देश आज एका विशिष्ट अशा संकटांतून जात आहे. लोक पडेल तो त्याग करीत आहेत. अशा स्थितींत लोकांवर कराचा आणखी नवा बोजा बसविणें अत्यंत गैर आहे. आमच्या सामर्थ्याप्रमाणें लोकहितासाठीं जी जी गोष्ट करणें जरूर वाटली ती ती आम्हीं केली आहे. सरकार ही अन्यायाची गोष्ट करीत आहे ही गोष्टहि आम्हीं निर्भीडपणें सांगितली आहे. परंतु त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं. तेव्हां या पुढील वादविवादांत भाग घेणें म्हणजे महत्पाप करण्यासारखें होणार आहे. म्हणून आम्ही येथून निघून जातों. आमच्या मागें बिल पास करून घेण्यास तुम्ही मोकळे आहांत. "

याप्रमाणें **पंडितजींनीं** भाषण केल्यानंतर ते आपल्या सहकाऱ्यांसह

असेंब्ली सोडून चालते झाले. त्यानंतर त्यांनीं आपल्या जागेचा राजीनामा दिला.

## असेंब्लीचा राजीनामा

असेंब्लींतलि सभासदत्वाचा राजीनामा देतांना त्यावरोबर **पं० मदन-मोहन मालवीय** यांनीं व्हाइसरॉयांना जें पत्र लिहिलें आहे त्यांत ते लिहितात, "मी गेलीं २५ वर्षें वरिष्ठ कायदे-कौन्सिलाचा सभासद आहे. मला कौन्सिलबहिष्कार मान्य नाहीं आणि परवांच्या लाहोरच्या राष्ट्रीय सभेंतहि मी कौन्सिलबहिष्काराला विरोध केला. एवढेंच नव्हे तर राष्ट्रीय सभेची आज्ञा मानून ज्यांनीं राजीनामे दिले त्यांना किंवा त्यांच्या जागीं दुसऱ्यांना फेर-निवडणूकीला उभे राहण्यास मींच प्रोत्साहन दिलें असें असतां आज मीच राजीनामा देत आहे तो अर्थातच उगीच लहरीखातर देत नाहीं, हें उघड आहे.

दिवसेंदिवस माझी अशी खात्री होऊं लागली आहे कीं, मांटेगु-चेल्म्सफर्ड सुधारणांमुळें जेवढे हक्क हिंदी लोकांना मिळत आहेत तेवढेहि त्यांना पचूं द्यावयाचे नाहींत अशा कुत्सित बुद्धीनेंच हल्लीं सरकार वागत आहे. तसे नसतें तर सरकारनें अध्यक्ष **ना. पटेल** यांचा इषारा धाब्यावर बसवून सरकारी व निमसरकारी सभासदांस मतें देण्यास लावून आणि गिरण्यांना संरक्षण पाहिजे असेल तर आम्ही देतों त्या पद्धतीनेंच तें घ्या असली बळजबरी करून हिंदी लोकांच्या डोक्यावर इंपीरियल प्रेफरन्स लादून आर्थिक स्वायत्ततेचे असे धिंडवडे मांडले नसते. लष्करी खर्च कमी न करणें, अठरा पेन्साचा हुंडणावळीचा भाव लोकांवर लादणें, रेल्वेचा सवता सुभा करणें वगैरे सर्व बाबतींत सरकारचें धोरण हिंदी जनतेच्या राष्ट्रीय आकांक्षांच्या विरुद्धच आहे. म्हणून जोंपर्यंत सरकाराची ही वृत्ति आणि ही राज्यपद्धति बदलली व सुधारली नाहीं तोंपर्यंत मी असेंब्लींत काम करूं इच्छित नाहीं.

गेल्या ऑक्टोबरांत जेव्हां भारतमंत्री **मि. बेन** आणि **व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन** यांनीं हिंदुस्थानाला 'डोमीनियन स्टेटस' देणें हेंच आपलें ध्येय आहे, असें सांगितलें आणि राऊंड टेबल कॉन्फरन्स बोलावण्याचें ठरविलें त्या वेळीं मला वाटलें कीं, आतांपासून डोमीनिअन स्टेटस दिल्याप्रमाणें

हिंदुस्थानसरकार वागूं लागलें. या वागणुकीची परीक्षा नवीन कर बसविण्याची योजना आणि आर्थिक स्वायत्तता यासंबंधीं सरकारच्या धोरणावरून होणार होती. परंतु सरकारनें सेलबोर्न रिपोर्ट, क्रू कमिटीचा रिपोर्ट आणि फिस्कल कमिशनाचा रिपोर्ट हे सर्व रिपोर्ट धाब्यावर बसविले आणि दबकावणी देऊन कॉटन प्रोटेक्शन बिल पास करून घेतलें म्हणून ज्या सरकाराकडून प्रजेवर असले जुलुम व अत्याचार होतात त्या सरकारच्या कायदेमंडळांत मी त्यांचें धोरण बदलेपर्यंत काम करणार नाहीं."

अशा रीतीनें कायदेमंडळाशीं दीर्घ काळ असलेला संबंध त्यांनीं तोडून टाकला व निर्बंधपणें राष्ट्रकार्य करण्यास ते मोकळे झाले.

# कमिशनांपुढील साक्षी व काम.

हिंदुस्थान सरकारनें येथील कारभाराच्या अनेक विभागांची चौकशी करण्यासाठीं आजपर्यंत अनेक कमिट्या-कमिशनें नेमलीं. त्यापैकीं औद्योगिक कमिशनवर एक सभासद म्हणून त्यांची नेमणूक झाली होती व तें काम त्यांनीं अत्यंत चोखपणें बजावलें. सरकारची देशी उद्योगधंद्यासंबंधानें कशी अनास्था आहे, देशी उद्योगधंद्यास सरकारचें सहाय्य कसें नाहीं, परदेशी मालांनीं बाजार भरले गेल्यानें केवढी हानी झाली आहे व देशांत धंदेच नाहींसे झाल्यानें लोकांचा ओघ शेतीकडे कसा वळतो व त्यामुळें दारिद्र्य कसें वाढत चाललें आहे याचें मोठें भेदकवर्णन **पंडितजींनीं** केलें असून उद्योगधंद्याच्या वाढीसंबंधानें सरकारनें काय करावयास पाहिजे याबद्दल अनेक उपयुक्त सूचनाहि केल्या आहेत, त्या तपशीलवारपणें या प्रकरणाच्या शेवटीं दिल्या आहेत.

## डी सेंट्रलायझेशन कमिशन.

औद्योगिक कमिशन खेरीज दोन महत्त्वाच्या कमिशनांपुढें **पंडितजींच्या** साक्षी झाल्या. त्यापैकीं डिसेंट्रलायझेशन कमिशन हें एक होय. हें कमिशन स. १९०७ सालीं नेमण्यांत आलें. या कमिशनपुढें ता. १३ फेब्रुवारी १९०८रोजीं लखनौस **पंडितजींची** साक्ष झाली. ती देतांना त्यांनीं पुढील सूचना केल्या—

"·इंग्लंडांतील चांगल्या राजनीतिज्ञांतील एखादा गव्हर्नर निवडावा. त्याला एक कार्यकारिणी मंडळ असावें, त्यांत चार सभासद असावेत, त्यांत दोन हिंदी असावेत. याप्रमाणें प्रत्येक जिल्ह्याच्या कलेक्टरला सल्ला देण्यासाठीं एक जिल्हा-कौन्सिल असावें. त्यांत दोन सरकारी अधिकारी व दोन लोकप्रतिनिधी असावेत. या जिल्हा-कौन्सिलनें कलेक्टरला जिल्ह्याचा कारभार चाल-

विण्याबाबत सल्लामसलत द्यावी. तगाई देणें, तलाव, विहिरी बांधणें, जंगलाबाबत मदत करणें, हत्याऱ्यांचे परवाने देणें, अबकारी पदार्थांचे परवाने देणें, दंगे झाल्यास ते मिटाविणें, सार्थीच्या रोगांचा प्रसार होऊं नये म्हणून प्रतिबंधक उपाय योजणें इत्यादि प्रश्नांचा विचार या जिल्हा-कौन्सिलनें करावा. यामुळें लोक व सरकार एकत्र येऊन उभयतांना परस्परांच्या विश्वासानें काम करतां येईल.

गांवाला काय अधिकार असावेत यासंबंधानें ते म्हणाले "गांवचे पोलीस, आरोग्य, शिक्षण यांची व्यवस्था करणें, लहान लहान फौजदारी व दिवाणी दाव्यांचा निर्णय करणें हेहि अधिकार गांवाला असावेत. शक्य तर प्रत्येक गांवाला व तसें नच जुळल्यास दोन चार गांवांना मिळून पंचायत स्थापन करावी. ही निवड गांवकऱ्यांनीं करावी. व तीवर अधिकाऱ्यांचें नियंत्रण नसावें. पंचायतींना पूर्ण स्वातंत्र्य मिळालें तरच त्या चांगल्या प्रकारें काम करतील. अशा पंचायती गांवोगांव स्थापन झाल्यास खेड्यांतील लोकांची स्थिति थोडीबहुत खात्रीनें सुधारेल. गांवांची स्थिती सुधारण्याला पंचायती स्थापनेखेराज दुसरा योग्य उपाय माझ्या मतें नाहीं. या पंचायतीला कांहीं अधिकार देऊन त्यावर कांहीं जबाबदारीहि टाकली पाहिजे. या पंचायतीवर जिल्हा-कौन्सिलनें देखरेख करावी."

या कमिशनचा अहवाल १९०९ मध्यें प्रसिद्ध झाला. कमिशननें राजकीय सुधारणा संबंधानें एकंदर १३४ शिफारशी केल्या. त्या शिफारशींपैकीं दोन हिंदी सभासद कार्यकारी मंडळांत असावेत ही सूचना मान्य करण्यांत येऊन मुंबई, मद्रास, बंगाल व बिहार प्रांतांत त्याप्रमाणें नेमणुकी झाल्या व इतरहि कांहीं बारीक सारीक सुधारणा करण्यांत आल्या.

## पब्लिक सर्व्हिसेस कमिशन.

यानंतर **पंडितजींची** दुसरी महत्त्वाची साक्ष 'पब्लिक सर्व्हिसेस कमिशन' पुढें झाली ती होय. हिंदी लोकांना वरिष्ठ अधिकाराच्या जागांवर नेमण्यांत यावें ही लोकांची ओरड कांहीं नवी नाहीं. फार जुनी आहे. यासंबंधानें हिंदुस्थानांत बरीच चळवळ झाली. तेव्हां स. १९१२ मध्यें 'पब्लिक सर्व्हिसेस कमिशन' नेमण्यांत आलें. या कमिशनमध्यें तीन हिंदी गृहस्थ

होतें. कमिशन हिंदुस्थानांत व इंग्लंडांत फिरलें. अनेक सरकारी बिनसरकारी लोकांच्या साक्षी घेतल्या. त्यापुढें ता. ३१ मार्च १९१३ रोजीं **मालवीयजींची** साक्ष झाली. यापूर्वी स. १८८६ सालीं याच धर्तीचें एक कमिशन नेमण्यांत आल होतें. त्या कमिशननें आपल्या रिपोर्टांत असें लिहिलें होतें कीं, ' हिंदुस्थानची आजची सामाजिक स्थिति लक्षांत घेतां, इंग्लंड व हिंदुस्थान या दोन्ही देशांत एकाच वेळीं इं. सी. सर्व्हिसच्या परीक्षा घेणें उचित होणार नाहीं. कारण राजशासनाला उचित असें शिक्षण इंग्लंडच्याप्रमाणें या देशांतील शाळाकॉलेजांतून मिळत नाहीं व हिंदुस्थानांतच ही परीक्षा सुरू केली तर तिचा फायदा देशांतील उच्च जातींनाच मिळेल. व इतर जाती मागें पडतील. या आक्षेपास उत्तर देतांना **पंडितजी** आपल्या साक्षींत म्हणाले,

" हिंदुस्थानांतील सामाजिक कारणामुळें इंग्लंडवाल्याप्रमाणें हिंदी लोकांना समाजशासनाची योग्यता नसते म्हणून येथें परीक्षा नको.. याचा अर्थ इंग्लंडांतील सामाजिक जीवनक्रमाला जास्त महत्त्व देऊन हिंदी सामाजिक जीवनाला कमी लेखण्याचा आहे.

## हिंदी लोक व वरिष्ठ जागा

" इं. सी. सर्व्हिसमध्यें असे कित्येक युरोपियन आहेत कीं, त्यांना शासनाचें अवश्यक तें ज्ञान नाहीं. परंतु हिंदुस्थानच्या कधींहि बाहेर न गेलेले असें हिंदुस्थानांत किती तरी लोक आहेत कीं,ते उच्च अधिकार चालविण्यास सर्वतोपरी योग्य आहेत. देशी संस्थानांत असे लोक उच्चपदारूढ आहेतहि.

" इं. सी. सर्व्हिसच्या नोकरांना जी योग्यता प्राप्त होतें त्याचें कारण माझ्या मतें इंग्लंडमधील सामाजिक जीवन नसून त्यांना येथें मिळणारे ओझ्यावारी पगार हें आहे. येथें परीक्षा सुरू केल्यानें सीव्हिल सर्व्हिसमध्यें सर्व हिंदी लोकांचाच भरणा होईल असा एक आक्षेप घेतला जातो. पण असें झाल्यास त्यांत वाईट काय झालें ? आम्हीं हिंदी लोक इंग्लंडच्या येथील सत्तेचा हाच उद्देश समजतो.

" हिंदी लोक उच्चाधिकारास योग्य नाहींत असा आक्षेप कांहीं इंग्रज गृहस्थ घेतात. त्यांना माझें उत्तर असें कीं, अवघ्या शंभर वर्षांपूर्वीच या देशांत हिंदु व मुसलमान उच्च पदाधिकारी होते कीं नाहीं ? कालचक्र फिरल्यानें आज

त्यांना मान नसला तरी एका काळीं विशाल असें साम्राज्य हेंच लोक सुयोग्य रीतीनें चालवीत होते. इंग्रजी सत्ता स्थापन होऊन अवघीं १५० वर्षे झालीं. राष्ट्राच्या आयुष्यांत दीडशें वर्षांचा काल फार मोठा नाहीं. यापूर्वी आम्हीच येथलि राज्यें चालविलीं आहेत. देशी संस्थानांत आजहि चालवीत आहोंतच. आज-काल भारतवासीयांत उन्नति झाली नसली तर त्याचें कारण त्यांना तशी संधिच मिळाली नाहीं हें आहे. येथें परीक्षा सुरू झाल्यास उच्च जातींच्या लोकांचा भरणाच जास्त होईल असाहि एक आक्षेप काढण्यांत आला आहे. त्यावर उत्तर असें कीं, सर्वांना शिक्षण मिळून सर्वांनाच परीक्षेस बसण्याची संधी मिळावी. व परीक्षेंत जे योग्य ठरतील त्यांना नोकऱ्या मिळतीलच. एखादी विशिष्ट जात म्हणून त्यांना नोकरी मिळावी हें धोरणच घातकी आहे. लोकसेवा करणें हा या नोकरीचा अर्थ मी समजतों. व तशी निरपेक्षपणें सेवा करील व लायख ठरेल त्याला ती मिळेल. यांत उच्चनीच असा मुळीं भावच नाहीं."

या कमिशनचा रिपोर्ट स. १९१७ सालीं प्रसिद्ध झाला. या कमिशननें केले-ल्या शिफारशी सरकारनें मुळींच मान्य केल्या नाहींत. लोकात असंतोष उत्पन्न झाला. पुढें हिंदुस्थानांत व इंग्लंडमध्यें एकाच वेळीं परीक्षा घेण्याचें सरकारास मान्यहि करावें लागलें. त्याप्रमाणें हिंदुस्थानांत सीव्हिल सर्व्हिसच्या परीक्षा हल्लीं होत असतात.

यानंतर महत्त्वाचें कमिशन म्हणजे **औद्योगिक कमिशन** होय. हें बरेंच महत्त्वाचें होतें. त्यांत **पंडितजींनीं** भिन्नमतपत्रिका जोडली. ती बरीच महत्त्वाची असल्यानें पुढें देण्यांत येत आहे.

## स्वदेशीची आवड

**पंडितजींनीं** राजकारणांत प्रवेश केल्यापासून त्यांचें विशेष लक्ष कोणत्या एका गोष्टीकडे वेधलें असेल तर तें लोकांच्या वाढत्या दारिद्र्याकडे. इंग्रजी अंमल सुरू झाल्यापासून एकामागून एक देशी धंदे नष्ट होऊं लागले, जमिनीच्या साऱ्याची वाढ भरसमाट होऊं लागली, दुष्काळ व रोगराई यांच्या साथी देशभर थैमान घालू लागल्या, शेतकरी वर्ग अन्नाला मोताद झाला, बेकारी वाढली. या सर्व कारणांमुळें प्रजा त्रस्त झाली. तेव्हां पंडितजींसारख्या लोकहितचिंतकाचें लक्ष या गोष्टीकडे वळलें यांत आश्चर्य नाहीं. संधि मिळतांच हा प्रश्न सरकारपुढें

व लोकांपुढें मांडून त्यांचें लक्ष तिकडे आकृष्ट करून घेण्याचा त्यांचा नेहमीच प्रयत्न असतो.

देशी उद्योगधंद्याची वाढ व्हावी, लोकांनीं देशीच माल विकत घ्यावा व त्याला उत्तेजन द्यावें यासाठीं **पंडितजींचे** प्रयत्न फार जुने आहेत. स.१८८१ सालीं म्हणजे वयाच्या २० व्या वर्षींच पंडितजींच्या प्रयत्नानें प्रयागास 'देशी तिजारत कंपनी' नांवाचें स्वदेशी वस्तूंचें दुकान निघालें. व तेव्हांपासून आज-तागायत ते स्वदेशीचे कट्टे पुरस्कर्ते असून प्रसंगानुरोधानें वेळोवेळीं स्वदेशीचा प्रचार त्यांनीं केलेला आहे. आपल्या देशांतील माल मग तो परदेशी मालापेक्षां ओबडधोबड असला तरी प्रत्येकानें घेतला पाहिजे. विदेशांत तेथील धंद्याची वाढ झाली त्याला कारण तेथील लोकांचें स्वदेशीवरील प्रेम हेंच होय. व अशा रीतीनें आपण शुद्ध स्वदेशी माल वापरूं लागलों म्हणजे देशी माल सहजच स्वस्त व सुबक होईल असें ते सांगत असतात. पडेल तो स्वार्थत्याग करूनहि स्वदेशी माल वापरणें हा ते आपला धर्मच समजतात. स. १९०५ मध्यें काशीस हिंदी औद्योगिक परिषदेची स्थापना झाली तींत ते एक प्रमुख होते. याखेरीज १९०७ मध्यें सं. प्रांतीय औद्योगिक परिषद व प्रदर्शन भरविण्यांत हेच अग्रणी होते प्रयाग शुगर वर्क्स नांवाचा कारखाना काढण्यांतहि ते प्रमुख होते. स. १९०७ सालीं **सर जॉन ह्यूएट** यांनीं औद्योगिक परिषद भरविली तींतहि त्यांनीं महत्त्वाचा भाग घेतला होता. व त्यांनीं स्थापिलेल्या हिंदु विश्वविद्यालयांत टेक्निकल व इंडस्ट्रियल शिक्षणावर जास्त भर दिला जातो या गोष्टी सर्वश्रुत आहेत.

## वाढतें दारिद्र्य व सरकारची बेपर्वाई

लोकांचें वाढतें दारिद्र्य व नोकरशाहीची आपल्या कर्तव्याविषयीं बेपर्वाई यासंबंधानें स. १८९३ च्या कॉंग्रेसमध्यें भाषण करतांना ते म्हणाले.

"येथील स्थिति काय आहे याची त्यांना दाद आहे काय? परमेश्वरावर त्यांचा विश्वास असेल व आपल्या पापपुण्याचा झाडा कधीं काळीं परमेश्वरापुढें द्यावा लागेल अशी त्यांची श्रद्धा असेल तर त्यांनीं एकदां तरी या देशांत यावें, खेडोंपाडीं, शहरोंशहरीं हिंडून लोकांचें दारिद्र्य स्वनेत्रानें अवलोकन करावें. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धापूर्वीं देशस्थिति कशी होती हें लोकांना विचारावें.

खेडोंपाडीं पसरलेले ते कोष्टी आज कोठें गेले ? इंग्लंड व इतर परदेशांत नाना-प्रकारचा माल पाठविणारे ते कारागीर आज कां दिसत नाहींत ? देशाचें तें वैभव आज गतकालची एक कहाणी कां झाली ? व सर्वत्र विदेशी कापडाचा व मालाचा प्रसार कां व कसा झाला ? याचा विचार करा. आज लोकांची स्थिति किती शोचनीय झाली आहे पाहा. शेतीखेरीज अन्य व्यवसाय नाहीं. व्यापाराची, नोकरीची हीच अवस्था. आमच्या लोकांना सर्वत्र मज्जाव. अशा स्थितींत लोक सुखी असणार तरी कसे ? ”

स. १८९९ च्या राष्ट्रीय सभेंत याच संबंधानें ते पुनः म्हणाले, सरकारनें देशी उद्योगधंदे व कलाकौशल्य यांची वाढ केली पाहिजे. एका कालीं याच लखनौ शहरांत हजारों लोक उद्योगधंद्यावर उत्तमप्रकारें पोट भरीत असत. पण आज येथिल नागरिकांना जाऊन विचाराल तर ते सांगतील कीं विदेशी मालानें त्यांचे धंदे पार ठार केले आहेत. सरकारनें लोकांना औद्योगिक शिक्षण देण्याची सोय केली पाहिजे. म्हणजे आपणांस जरूर त्या वस्तू येथें,या देशांत, तयार करतां आल्या पाहिजेत,त्यासाठीं कोट्यावधी रुपये परदेशांत जातां कामा-नयेत,सरकारी नोकऱ्या किती मिळतील हा मुख्य प्रश्न नाहीं.पण किती लोक देशी धंद्यांत गुंततील हा मुख्य प्रश्न आहे. म्हणून सरकारनें या देशांत उद्योगधंद्याचें शिक्षण देण्याची सोय केली पाहिजे. जर्मनी, जपान हे देश यासंबंधानें काय करीत आहेत पाहा. ”

## लोकांचें दारिद्र्य कसें नष्ट होईल ?

स. १९०० च्या राष्ट्रीय सभेंत ते म्हणतात, “ लोक दिवसानुदिवस जास्त जास्त दरिद्री होत आहेत. ही गोष्ट सरकारच्या लक्षांत आणण्यासाठीं आपण आज १५ वर्षे सारखे ठराव करीत आलों आहों. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. आतां यापुढें लोकांचें हें वाढतें दारिद्र्य कमी होणें शक्य आहे कीं नाहीं याकडे प्रथम लक्ष द्या. प्रामुख्यानें शेतीवर लोक अवलंबून आहेत. व ज्या प्रांतांत कायमधारा-पद्धति आहे तेथें लोकांवर कमी ताण पडतो असा अनुभव आहे. यासाठीं कायमधारा पद्धत सर्वत्र रूढ होणें अत्यावश्य आहे.

लोकांनीं यासंबंधानें काय करावें या संबंधानें **पंडितजींच्या** अशा सूचना आहेत कीं, ‘ जिल्हानिहाय देशी वस्तूंचीं प्रदर्शनें भरवावींत. जिल्ह्यांत

कच्चा माल कोणता होतो, त्याच्या कोणत्या वस्तू तयार होतात व त्या कोठें पाठविल्या जातात याची माहिती तेथें असावी. त्या वस्तूंमध्यें काय काय सुधारणा करतां येणें शक्य आहे याचीहि माहिती तेथें देण्यांत यावी.

इतर जिल्ह्यांप्रमाणें आपला जिल्हा कां व कोणत्या बाबतींत मागें आहे याची चर्चा तेथें व्हावी.

घरगुती धंदे कोणते वाढणें शक्य आहे व त्यांत सुधारणा करतां येणें किती शक्य आहे ही गोष्ट डोळ्यापुढें ठेवून जिल्हानिहाय प्रदर्शनें भरविलीं जावीत.

अशा प्रदर्शनांतून शेती व इतर धंदे यावर सप्रयोग व्याख्यानें व्हावीत. उत्तम खतें कोणतीं, कोणत्या पिकांस कोणतें खत मानवतें याची माहिती तेथें देण्यांत यावी.

व या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन प्रदर्शनाची मांडणी करावी म्हणजे तें जास्त उपयुक्त होईल.'

## औद्योगिक कमिशन

परंतु देशी उद्योगधंद्याबाबत जास्त महत्त्वाचें काम **पंडितजींनीं** केलें तें इंडस्ट्रियल कमिशनचे सभासद या नात्यानें. स. १९१६ च्या मार्चमध्यें **सर इब्राहिम रहिमतुल्ला** यांनीं देशाची औद्योगिक पाहाणी करून उद्योगधंद्याची वाढ कशी करतां येईल तें पाहण्यासाठीं एक कमिशन नेमावें अशी वरिष्ठ कायदेमंडळांत मागणी केली व त्या ठरावान्वयें सन १९१६ मध्यें हिंदुस्थान सरकारनें **सर थॉमस हॉलन्ड** यांच्या अध्यक्षतेखालीं इंडस्ट्रियल कमिशन नेमलें. या कमिशनवर हिंदी प्रतिनिधि म्हणून **पं. मालवीय** यांची नेमणूक सरकारनें केली. या कमिशनच्या कामाचें पर्यवसान अखेर कशांत झालें ही गोष्ट हिंदुस्थानांतील कमिशनांचा इतिहास ज्यांना माहीत आहे त्यांना सांगावयास नको. नेहमींप्रमाणेच कमिशनचा रिपोर्ट व सूचना दप्तरीं दाखल करण्यांत आल्या.

परंतु कमिशनच्या कार्याचें प्रत्यक्ष फल पदरांत न पडलें तरी **पं. मदनमोहन मालवीय** यांनीं आपली जी भिन्नमतपत्रिका अहवालाला जोडली तींत हिंदी लोकांचें म्हणणें मुद्देसूद व स्पष्टपणें नमूद केलें असून हिंदी उद्योगधंदे कसे नष्ट करण्यांत आले व ते सुधारण्यास काय उपाययोजना केली पाहिजे याचें साग्र विवेचन केलें असल्यानें त्याची माहिती वाचकांस असणें

अत्यावश्य आहे. म्हणून कमिशनच्या रिपोर्टाचा सारांश व **पं. मालवीय** यांची भिन्नमतपत्रिका येथें सारांशरूपानें देत आहों:—

## औद्योगिक कमिशनचा रिपोर्ट

औद्योगिक कमिशननें दोन वर्षें **सर टॉमस हॉलंड** यांच्या अध्यक्षतेखालीं सर्व हिंदुस्थानांतील उद्योगधंद्यासंबंधानें पाहणी केली. त्या कमिशननें आपला रिपोर्ट प्रसिद्ध केला त्याचा सारांश पुढीलप्रमाणें आहे:—वरिष्ठ व प्रांतिक राज्यकारभारांत उद्योगधंद्याची स्वतंत्र खातीं काढण्यांत यावीं. वरिष्ठ सरकारचें औद्योगिक खातें वरिष्ठ कार्यकारी मंडळांतील एका कौन्सिलरच्या हातीं असावें. इंडियन इंडस्ट्रिज बोर्ड नांवाचें स्वतंत्र बोर्ड निर्माण करून त्याचे तीन सभासद वरील कौंसिलरच्या मदतीस द्यावे. देशांतील उद्योगधंद्यासंबंधाचें सरकारचें धोरण व उद्योगधंद्याच्या उन्नतीसंबंधानें सरकारतर्फे होणारे प्रयत्न व सुधारणा याबद्दल हें खातें जबाबदार असावें. उद्योगधंद्याच्या या खात्यांत मेक्यानिकल एन्जिनियर्स व एन्जिनियरिंग टेक्नॉलॉजिस्ट वगैरे विशिष्ट प्रकारचें शिक्षण घेतलेल्या लोकांची जरूरी असल्यामुळें इंपीरियल इंडस्ट्रियल सर्विस काढून त्यांतून तज्ज्ञ नोकर मिळविण्याची योजना सरकारनें तयार करावी. या खात्याचें सर्व प्रकारचें सूत्रचालकत्व हिंदुस्थानसरकारच्या हातीं असावें.

प्रांतिक उद्योगखात्याचा कारभार उद्योगखात्याच्या डायरेक्टरांनीं पाहावा. प्रांतिक उद्योगमंडळाच्या सल्ल्यानें व उद्योगधंद्यांतील तज्ज्ञ लोकांच्या सहाय्यानें आपल्या प्रांतांतील औद्योगिक उन्नति करण्याचा त्यानें प्रयत्न करावा. प्रांतिक उद्योगमंडळाचे सभासद सरकारी नोकर नसावे.

## देशी धंद्यांची स्थिति

उद्योगधंद्याच्या उन्नतीच्या दृष्टीनें सरकारनें कोणत्या सुधारणा करणें जरूर आहे याचा विचार करतांना जगांतील अर्वाचीन उद्योगधंद्याच्या प्रगतीचा हिंदुस्थानच्या उद्योगधंद्यावर किती थोडा परिणाम झाला आहे, सर्व हिंदी प्रजा अद्याप शेती करण्यांतच कशी गुंतली आहे, ही शेतीसुद्धां जुन्या परंपरेच्या पद्धतीनेंच चालू असल्यामुळें शेतीचें उत्पन्नसुद्धां पोटापुरतें जेमतेम कसें निघतें, देशाच्या कांहीं भागांत पाश्चात्य औद्योगिक प्रगतीपर पद्धतीला अनुसरून कारखाने काढण्याचा प्रयत्न झालेला दिसत आहे, तथापि त्या ठिकाणींहि मजुरांची चणचण कशी

भासते, हिंदी मजूर सामान्यतः चोख रीतीनें काम करण्याच्या बाबतींत कसे अपात्र आहेत, कारखान्यावर देखरेख करण्याच्या कामींहि तज्ज्ञ हिंदी लोक अद्याप कसे मिळत नाहींत, उद्योगधंद्यापेक्षां व्यापाराच्या किंवा ज्या धंद्यांत सुरक्षित रीतीनें व विनआयासानें नफा मिळेल अशा धंद्यांत व आपलें भांडवल गुंतविण्याची हिंदी लोकांची अद्याप कशी प्रवृत्ति आहे, युद्धापूर्वी परदेशांतून माल आणविण्याकडेच लोकांची प्रवृत्ति कशी होती व सर्व सरकारी माल इंग्लंडांतूनच आणण्याच्या सरकारच्या परिपाठामुळें लोकांच्या या संवयीस कसा दुजोरा मिळाला वगैरे गोष्टींचें कमिशननें विस्तृत विवेचन केलें आहे. अर्वाचीन सुधारलेल्या समाजास लागणाऱ्या सर्व गरजा पुरतील अशा वस्तु उत्पन्न करतां येतील इतका विविध प्रकारचा कच्चा माल हिंदुस्थानांत उत्पन्न होतो; परंतु परदेशांतून यंत्रसामुग्रीचा पुरवठा झाल्याशिवाय शांततेच्या व युद्धाच्या काळांत लागणारा पक्का माल हिंदुस्थानांत तयार करणें शक्य नाहीं. उदाहरणार्थ, हिंदुस्थानांतील कापडाच्या सर्व गिरण्या परदेशच्या यंत्रसामुग्रीवर अवलंबून आहेत व समुद्रावरील सरकारची सत्ता नाहींशी झाल्यास हे सर्व कारखाने बंद करावे लागतील. तेव्हां हिंदुस्थानांतील उद्योगधंद्याच्या दृष्टीनें सर्वांत महत्त्वाची सुधारणा जर कोणती करावयाची असेल तर लढाईच्या प्रसंगीं वरील प्रकारच्या भयंकर प्रसंगांतून हिंदी कारखान्यांचा निभाव लागण्याकरितां यंत्रसामुग्री तयार करण्याचे कारखाने हिंदुस्थानांत निघतील अशी व्यवस्था येथें झाली पाहिजे असें कमिशननें सुचविलें फारसे मजूर न ठेवतां अर्वाचीन शास्त्रीय पद्धतीला अनुसरून शेतीचें उत्पन्न कसें काढतां येईल, शेतीच्या लागवडीच्या बाबतींत सुधारणा करून शेतांतील माल बाजारांत ठेवण्यालायक कसा करतां येईल याचें शिक्षण लोकांना दिल्यास व शेतीला योग्य अशी सुधारलेली यंत्रसामुग्री मिळेल अशीं दुकानें व ही यंत्रसामुग्री तयार करण्याचे कारखाने काढण्यांत आल्यास पुष्कळ मजूर कारखान्यांत काम करण्याकरितां मिळून यंत्रसामुग्रीचा पुरवठा करण्याच्या हिंदुस्थानांतील धंद्यास उत्तेजन मिळेल असें कमिशनचें म्हणणें आहे.

## साधनसामुग्रीची अनुकूलता

नवीन उद्योगधंदे निर्माण करण्याच्या हिंदुस्थानांतील साधनसामुग्रीचा

विचार करतांना हिंदुस्थानांतील कोळसा हलक्या प्रतीचा असता व तोहि एका विशिष्ट प्रदेशांतच मिळतो. तेव्हां त्याचा उपयोगहि मर्यादितच होणार असल्यामुळें हिंदुस्थानांत आणखी कोणत्या ठिकाणीं कोळशाच्या खाणी सांपडतील याची पहाणी करणें जरूर आहे असें कमिशननें आपलें मत दिलें. ब्रह्मदेशांत खाणींतील तेलाचा सांठा संपत आला असून तितक्या दर्जाचें तेल असलेल्या खाणी अद्याप दुसरीकडे सांपडलेल्या नाहींत. कारखाने चालविण्याच्या कामीं पवनशक्तीचा उपयोग करून घेण्याइतकी हवामानाची निश्चितता हिंदुस्थानांत नाहीं. विजेच्या शक्तीवर चालणारे कारखाने काढतां येतील अशा प्रकारची जलौघशक्ति निर्माण करतां येईल अशीं स्थळें हिंदुस्थानांत पुष्कळ असून कोणकोणत्या ठिकाणीं अशीं स्थानें निर्माण करणें शक्य आहे याची रूपरेषा नक्की करण्याकरितां सरकारनें अशा स्थानांची पाहणी केली पाहिजे अशी कमिशननें सरकारास आग्रहाची सूचना केली आहे.

## धंद्यांची वाढ कशी होईल ?

हिंदी उद्योगधंद्याच्या वाढीसंबंधानें विचार करतांना कमिशननें हिंदी कारागिरांची चोख काम करण्याची लायकी कशी वाढेल व सुशिक्षित हिंदी लोक उद्योगधंद्यांत कसे लक्ष देऊं लागतील याचें विवेचन केलें आहे. शिक्षणाचा अभाव, मजुरीचे हलके दर, जुजबी उपायानें प्रतिबंध करतां येईल अशा हिंवताप, नारू वगैरे रोगांचें मजूरवर्गांत वाढतें प्रमाण अशीं तीन कारणें हिंदी मजूर नालायक ठरण्यास आहेत असें कमिशनचें मत आहे. सार्वत्रिक व प्राथमिक शिक्षणप्रसाराचा कमिशननें पुरस्कार केला असून मजूरवर्गांतील मुलांच्या शिक्षणपद्धतींत योग्य ते फेरफार केले पाहिजेत व घरगुती उद्योगधंदे करणाऱ्या लोकांची संख्या हिंदुस्थानांत जास्त असून त्यांच्या मुलांच्या शिक्षणासंबंधानेंहि उद्योगखात्याकडून विशेष काळजी घेण्यांत आली पाहिजे असें कमिशननें सुचविलें आहे. हिंदी उद्योगधंद्याच्या वाढीसंबंधानें सुसंघटित प्रयत्न होण्याकरितां मेक्यानिकल एंजिनियरिंगच्या शिक्षणाचा प्रसार होणें जरूरीचें असल्यामुळें उद्योगधंद्याची आवड असलेल्या विद्यार्थ्यांस चारपांच वर्षें उत्तम रीतीनें उमेदवारी करतां येऊन त्याला या विषयाचें योग्य शिक्षण मिळेल अशी व्यवस्था

झाली पाहिजे अशीहि कमिशनची एक सूचना आहे. मजुरांच्या वसतिस्थानांत सुधारणा करणें या गोष्टीस कमिशननें आपल्या सूचनांत अग्रस्थान दिलें आहे. सुशिक्षित हिंदी लोकांचें उद्योगधंद्याकडे लक्ष न जाण्यास सध्यांची अव्यवहार्य शिक्षणपद्धति मुख्यतः कारणीभूत झाली असून या पद्धतींत मुळापासून फेरफार करण्यांत आले पाहिजेत असें कमिशनचें म्हणणें आहे. उद्योगधंद्याच्या बाबतींत नांव मिळवूं इच्छिणाऱ्या महत्त्वाकांक्षी तरुण विद्यार्थ्यांस योग्य तें तात्त्विक शिक्षण व त्याच्या आवडत्या विषयाचें पूर्ण व्यावहारिक शिक्षण मिळेल अशी व्यवस्था करण्यासंबंधानें व तसेंच व्यापारी व खाणी खोदण्याच्या शिक्षणाची सोय करण्यासंबंधानें विशेष सूचना रिपोर्टांत करण्यांत आल्या असून एंजिनियरिंग व धातुकामाचें उच्च प्रतीचें शिक्षण देण्याकरितां कॉलेज काढण्याची कल्पनाहि कमिशननें सुचविली आहे.

## सरकारनेंहि देशीच माल घ्यावा

देशाच्या औद्योगिक उन्नतीकडे सरकारचें लक्ष अलीकडे अधिकाधिक लागूं लागलें असून आजपर्यंत या बाबतींत चालू असलेल्या प्रयत्नांना सुसंघटित स्वरूप देण्यांत यावें, शास्त्रीय संशोधनसंस्थांच्या कामासंबंधानें व इंपीरियल इंडस्ट्रियल सर्व्हिसमधील लोकांच्या पगारासंबंधानें एक स्पेशल कमिटी नेमण्यांत यावी असें कमिशनचें मत आहे. व्यापार व उद्योगधंदा यासंबंधाची आजतारखेपर्यंतची माहिती असणें हें सरकारच्या व लोकांच्या दृष्टीनें अत्यंत हितावह आहे. तेव्हां ही माहिती कशी मिळवितां येईल यासंबंधाची एक योजना कमिशननें तयार केली आहे. सरकारांत लागणारा माल परदेशांतून मागविल्यामुळें हिंदी उद्योग-धंद्याची पीछेहाट झाली आहे; याकरितां हें खातें उद्योगखात्याकडे द्यावें व त्या खात्यानें कोणत्याहि मालासंबंधानें हिंदुस्थानांत पूर्ण चौकशी केल्याशिवाय इंडिया ऑफिसमधील स्टोअरखात्याकडून माल मागवूं नये असें कमिशनचें स्पष्ट मत आहे.

उद्योगधंद्याच्या विशेषतः घरगुती धंद्याच्या बाबतींत सहकारिता कशी करतां येईल याचें विवेचन कमिशननें केलें आहे. मालवाहतुकीच्या रेल्वेच्या दरासंबं-धाच्या नेहमींच्या जाचक प्रश्नासंबंधानें कमिशननें विस्तृत विचार केला असून हिंदुस्थानांतील मालावरील ठिकठिकाणच्या बंदरापासून देशांत रवाना होणाऱ्या मालावरील रेल्वेच्या कमी दरानें देशी उद्योगधंद्याची वाढ खुंटली

आहे. तेव्हां यासंबंधाची नीट चौकशी करून सध्यांच्या या बाबतींतील अड-चणी दूर कराव्या, निर्गत माल व यंत्रसामुग्रीखेरीज इतर परदेशी आयात माल यावरील रेल्वेचे दर वाढविण्यांत यावे, रेल्वे-बोर्डांत व रेल्वे-परिषदेंत व्यापारी व कारखानदार यांचे प्रतिनिधि असावे असें कमिशननें सुचविलें आहे.

देशांत पैशाचा तुटवडा आहे असें नाहीं, पण उद्योधंद्यांत भांडवल गुंत-विण्यास लोक तयार नाहींत, भांडवल पुरविणाऱ्या बँका निघाल्या तर देशांत ठिकठिकाणीं त्यांची अत्यंत जरूर आहे. औद्योगिक बँका स्थापण्याबद्दल कमि-शनचें अनुकूल मत आहे, पण या विषयासंबंधानें पूर्ण विचार करण्याकरितां एक तज्ज्ञांची कमिटी नेमली पाहिजे व हें काम सरकारनें शक्य तितकें लवकर केलें पाहिजे अशी कमिशननें सरकारास विनंति केली आहे.

कमिशननें केलेल्या सूचनांप्रमाणें सरकारी उद्योगखातें काढल्यास त्याकरितां दरसाल ८६ लाख, औद्योगिक शिक्षणसंस्थांकरितां १५० लाख व इतर प्रगति-कारक सुधारणांकरितां ६६ लाख रु. लागतील असा कमिशनचा अंदाज असून सात वर्षांच्या अवधींत या सुधारणा पूर्णपणें अमलांत याव्या असें कमिशननें आपलें मत दिलें.

## पंडितजींची भिन्न मतपत्रिका.

या रिपोर्टाला **पंडितजींनीं** आपली विस्तृत भिन्न मतपत्रिका जोडली. ती जोडतांना त्यांनीं देशी धंद्याचा नाश कसा करण्यात आला याचा साद्यंत इतिहास दिला आहे. भिन्न मतपत्रिका लिहितांना प्रथम त्यांनीं वरिष्ठ कौन्सिलांतील कमिशन नेमण्याच्या वेळा झालेल्या चर्चेचा उल्लेख करून ते पुढें म्हणतात, "सरकारतर्फे **सर वुइल्यम क्लार्क** यांनीं या ठरावास अनुमति दिली व सांगितलें कीं, 'या प्रश्नाची चौकशी करण्याला कमिटी न नेमतां रॉयल कमिशन नेमण्याचा विचार ठरला आहे, परंतु या कमिशनकडे आर्थिक स्वातंत्र्याचा प्रश्न सोंपवितां येत नाहीं; कारण युद्धोत्तरकालांत साम्राज्यांतील घटकांचे परस्परांशीं व इतर देशांशीं व्यापारीसंबंध कसे असावे हें युद्धसमाप्तीनंतर ठरविण्यांत येईल.' अशा रीतीनें या कमिशनची नेमणूक झाली खरी; पण जकातीचा प्रश्न अजि-बात वगळल्यामुळें हॅम्लेट नाटकांतून **हॅम्लेटचा** तेवढा पार्ट गाळल्यासारखें झालें! असो. जकातीचा प्रश्न वगळल्यानंतर कमिशननें विचार करावयाचे प्रश्न

मुख्यतः दोनच राहिले. हिंदी भांडवलवाल्यांस किफायतशीरपणें भांडवल घालतां येईल असे उद्योगधंदे दाखवून देणें आणि सरकारनें उद्योगधंद्यास कोणत्या प्रकारें उत्तेजन द्यावें तें सुचविणें.यासंबधांत सर वुइल्यम क्लार्क यांच्या भाषणांतील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा लक्षांत ठेवण्याजोगा आहे. "हिंदी उद्योगधंद्यांना उत्तेजन द्यावयाचें खरें; पण हिंदी उद्योगधंदे म्हणजे कोणते? अर्थातच ज्या धंद्यांतलि भांडवल, सत्ता व देखरेख हिंदी लोकांच्याच हातीं आहे, अशा धंद्यांना प्रोत्साहन दिलें तरच त्यांत हिंदुस्थानचा व साम्राज्याचाहि फायदा आहे. नाहीं तर आज जे कारखानदार बाहेरून दूर अंतरावरून हिंदी कारखानदारांशीं स्पर्धा करीत आहेत तेच हिंदुस्थानच्या उंबरठ्याच्या आंत शिरून घरांतल्या घरांतच तुमच्याशीं स्पर्धा करूं लागतील!" याच दृष्टीनें सर्वतोपरी हिंदी उद्योगधंद्यांना उत्तेजन कसें देतां येईल हें ठरविण्याकरितां **प्रो. सी. जे. हॅमिल्टन** यांस जपानला धाडून देण्यांत आलें होतें आणि जपानी सरकारनें आपल्या देशांतल्या कारखान्यांना कसा हातभार लावला याचा रिपोर्टहि **प्रो. हॅमिल्टन** यांनीं या कमिशनला सादर केला. कमिशनच्या सूचनांचा विचार करितांना हा महत्त्वाचा मुद्दा दृष्टीआड होऊं देतां कामा नये.

## शेतकरी आणि कारागिर.

**प्रो. हॅमिल्टन** यांनीं जपान देशाचें निरीक्षण करून जो रिपोर्ट सादर केला त्यांत असें म्हटलें आहे कीं, " जपानांत पूर्वीं बहुतेक सर्व लोकांचा धंदा शेतकी हाच असून अल्पावधींतच त्यानें अर्वाचीन काळांतल्या प्रमुख औद्योगिक राष्ट्रांत प्रमुख स्थान पटकाविलें! ज्या एशियाटिकांना आपल्या देशांत शांतता व सुराज्य स्थापण्यालाहि दुसऱ्या राष्ट्राची मदत लागते आणि परोपदेशानें देखलि ज्यांना अर्वाचिन अर्थशास्त्राचे सिद्धांत पटत नाहींत अशा एशियाटिकांनीं ही क्रांति घडवून आणिली ही विशेष आश्चर्याची गोष्ट होय." **प्रो. हॅमिल्टन** काय किंवा इतर युरोपियन काय या सर्वांचीच अशी भ्रामक समजूत झालेली दिसते कीं,हिंदुस्थान हा केवळ शेतकऱ्यांचा देश आहे व तो सदोदित शेतकरीच रहाणार! या भ्रमाचा प्रथमारंभींच निरास करून हिंदी लोक केवळ शेतकरी नसून शेतकरी व कारागीर आहेत हें सिद्ध करणें अगत्याचें आहे.

## भरभराटलेला हिंदुस्थान

**प्रो. वेबर** लिहितात कीं, 'तलम कापड विणण्यांत, रंगाची फरमास साधण्यांत, धातूंवर व रत्नांवर काम करण्यांत, अर्क व सत्वें काढण्यांत आणि सर्व प्रकारच्या कारागिरींत हिंदी कारागिरांचें कौशल्य प्राचीन काळापासून जगप्रसिद्ध आहे.' इ. स. पूर्वी ३००० वर्षांपासून बाबिलोनचा हिंदुस्थानशीं व्यापार सुरू होता. इजिप्तमधील २ हजार वर्षांपूर्वी पुरलेलीं प्रेतें अप्रतिम हिंदी मलमलींत गुंडाळलेलीं आढळतात. हिंदुस्थानचा बराच माल रोम शहरांत खपत असे. ग्रीक लोकांना डाक्क्याची मलमल 'गंगेतिक' या नांवानें माहीत होती. कै. न्यायमूर्ति रानडे यांनीं आपल्या अर्थशास्त्रीय निबंधांत हिंदुस्थानांतील धातूच्या कारखान्याविषयीं असें लिहिलें आहे कीं, "हिंदी लोखंडाच्या कारखान्यांतून देशांतील मागणीचा पुरवठा होऊन तो माल परदेशालाहि जात असे आणि त्या मालाच्या उत्कृष्टपणाविषयीं सर्वत्र ख्याति होती. दिल्ली शहरानजीक जी मोठी लोखंडी 'लाट' दीड हजार वर्षांपूर्वी उभारलेली आहे तेवढी लाट तयार करणें कांहीं वर्षांपूर्वी कोणत्याहि देशांत शक्य नव्हतें. आणि आजमितीलाहि एवढा अजस्र स्तंभ तयार करूं शकणारे कारखाने थोडेच आहेत ! आसामांत मोठ्या अजस्र तोफा ओतीत असत. हिंदुस्थानांतून पोलाद नेऊन दमास्कस‍ला जंबिये तयार करीत आणि खुद्द इंग्लंडांतील चाकूकात्र्यांचें पोलाद हिंदुस्थानाकडून पुरविलें जात असें." हिंदुस्थानांतील विविध कारागिरीचें येथील अगणित संपत्तीचें, शांततेचें व सुराज्यव्यवस्थेचें वर्णन पेरिप्लस ग्रंथापासून तों मार्कोपोलोच्या प्रवासवर्णनापर्यंत सर्व ग्रंथांतून आढळून येतें. अकराव्या शतकांतील मुसलमानांच्या स्वाऱ्यांनीं या भरभराटीस प्रथम धक्का बसला तथापि अकबराच्या सुराज्यव्यवस्थेखालीं, हिंदी कारखाने व कारागिरी यांची पूर्वीसारखीच भरभराट झाली आणि **बर्निअर** व **टॅव्हर्निअर** यांच्या प्रवासवर्णनावरून त्याचें प्रत्यंतर पहावयास सांपडतें.

## हिंदी धंदा कसा मारला

हिंदुस्थानच्या या व्यापारानें व भरभराटीनेंच युरोपिअन कंपन्यांचें चित्त हिंदुस्थानकडे आकर्षिलें गेलें आणि हिंदुस्थानांत आपला माल खपविण्याकरितां नव्हे तर हिंदुस्थानचा माल युरोपांत नेण्याकरितां

ईस्ट इंडिया कंपनीनें सनद संपादन केली. शंभर वर्षेंपर्यंत असा व्यापार चालून हिंदी मलमल आणि चिटें यांनीं इंग्लंडची पेठ व्यापिलेली पाहिल्यावर इंग्लंडांतील रेशमी व लोकरी कापडाच्या कारखानदारांच्या पोटांत दुखूं लागलें आणि १७०० व १७२१ सालीं हिंदी चिटें वापरण्याचा पार्लमेंटच्या कायद्यानें प्रतिबंध करण्यांत आला. तथापि १७८७ पर्यंत नुसती डाक्क्याची मलमल इंग्लंडांत ३० लक्ष रुपयांची खपत होती. १८१७ सालीं मात्र हा प्रवाह अगदींच बंद पडला. पूर्वीं डाक्क्याची वस्ती २ लाख असून तें शहर लंडनपेक्षांहि धनाढ्य होतें. परंतु त्याची वस्ती अलीकडे ७९ हजारपर्यंत उतरली असून तेथील सगळे कसबी कारागीर पोटाच्या पाठीस लागून खेडोंखेडीं गेले ! एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत हिंदुस्थानांतून ६ ते १५ हजार गठ्ठे कापड विलायतेस जात असे; पण १८२० सालापासून ही निर्गत अगदींच बंद झाली आणि विलायतेंतून कापडाचा ओघ इकडे वाहूं लागला. हा विपर्यास आकस्मिक किंवा नैसर्गिक नसून मुद्दाम घडवून आणण्यांत आला. आणि तो सिद्धीस नेण्याला विलायतेंत व हिंदुस्थानांत असे दुहेरी प्रयत्न झाले. हिंदुस्थानांतील **ईस्ट इंडिया कंपनीच्या** अधिकाऱ्यांना १७६९ सालीं असा हुकूम फर्माविण्यांत आला कीं, त्यांनीं या देशांत कच्च्या रेशमास उत्तेजन द्यावें आणि रेशमी कापड तयार होण्याच्या मार्गांत कांटे पसरावे. याच सुमारास विलायतेंत हिंदी आयात मालावर अशी जबर जकात बसविण्यांत आली कीं, हिंदी कापड विकणें परवडूंच नये. विलायतेंत हिंदी चिटावर शेंकडा ८१ टक्के, लोंकरी कापडावर ८४ टक्के, मलमलीवर व इतर कापडांवर ३२ टक्के अशी जकात ठेवण्यांत आली आणि हिंदुस्थानांत मात्र विलायती मालावर अवघी २ टक्के जकात असे ! हिंदी कापडावर जर अशी जबर जकात बसविली नसती तर वाफेच्या यंत्राच्या जोरावर देखील पेसली व मँचेस्टर येथील गिरण्या टिकाव धरूं शकल्या नसत्या. अशाप्रकारच्या जबर जकातीनें हिंदुस्थान देश शेतकरी बनविण्यांत आला.

हिंदुस्थानांतील नौकाबंधनाचा नायनाट कसा झाला तो पहा. प्राचीन काळीं **दरायस** व **शिकंदर** यांनींहि आपल्या सैन्याकरितां येथें नौका तयार

करून घेतल्या होत्या. हिंदी व्यापारी नौका मेक्सिकोपर्यंतहि जलपर्यटण करूं शकत. मग जावा, सुमात्रा, बोर्निओ, कन्तान येथपर्यंत प्रवास करीत हें सांगणें नको. इ. स. १८०० सालीं **ग. ज. लॉर्ड वेलस्ली** यांनीं डायरेक्टरांना असें लिहिलें कीं, हिंदुस्थानांत बांधून तयार झालेल्या १०००० टनांच्या हिंदी बोटी कलकत्त्याच्या बंदरांत असून त्या इंग्लंडला माल रवाना करण्याला लायक आहेत. बंगाल प्रांतांत नौकाबंधनाची कला पूर्णत्वाला गेली असून इंग्लंडशीं व्यापार करण्याला लागतील तितक्या बोटी या बंदरांतून मिळूं शकतील! पण हीं गलबतें कलकत्त्याहून लंडनच्या बंदरांत जाऊन दाखल होतांच लंडनच्या नौकाबंधनाच्या कारखानदारांनीं आमचा धंदा ठार बुडाला, आम्ही आणि आमचीं मुलेंमाणसें आतां उपाशीं मरणार अशी ओरड सुरू केली. ही ओरड कंपनीच्या डायरेक्टरांच्या कानीं जाऊन त्यांनीं हिंदुस्थानांतलि बोटींतून विलायतेला माल पाठविण्याला बंदी केली! या बंदीला अशी एक सबब सांगण्यांत आली कीं, असल्या बोटींवरून शेंकडों हिंदी खलाशी विलायतेस येतील आणि ते विलायतेंतले आमचे नाना ढंग पाहून त्यांच्या गप्पा हिंदुस्थानभर पसरावितलि. तसें झाल्यास हल्लीं हिंदुस्थानांत 'साहेब' म्हटला कीं, त्याच्याविषयीं जो वचक व आदर वाटतो तो पार नाहींसा होईल. यास्तव नैतिक, आर्थिक, व्यावहारिक, राजकीय कोणत्याहि दृष्टीनें पाहिलें तरी हिंदी आगबोटी इकडे येऊं देणें अनिष्ट आहे! अशा रीतीनें इंग्लंडच्या हिताकरितां ईस्ट इंडिया कंपनीनें हिंदुस्थानचे नानाप्रकारचे धंदे बुडवून टाकले. आतां उलटपक्षीं विलायतेंत कारखान्यांची जोपासना व वाढ कशी करण्यांत आली तें पाहू.

## इंग्लंडांतील औद्योगिक क्रांति

१७७० पर्यंत इंग्लंडांत कोळशानें व लोखंडानें काळे झालेले भूप्रदेश कोठेंच नव्हते. इंग्लंडांत रेल्वेहि नव्हती व कालवेहि नव्हते आणि हल्लींचीं जीं शहरें कारखान्यांनीं व मजुरांच्या चाळींनीं गजबजलेलीं दिसतात तसलीं शहरेंहि त्या वेळीं अस्तित्वांत नव्हतीं. ही सगळी क्रांति अलीकडे शें-सव्वाशें वर्षांत घडून आलेली आहे. १७६४ त **हारग्रीव्हजनें** सूत कातण्याचा रहाट शोधून काढिला. १७६८ त **आर्कराइटनें** व १७७६ त **कॉम्टननें** त्यांत

सुधारणा केली. १७६७ त ब्रिडलेनें मँचेस्टरपासून लिव्हरपूर बंदरापर्यंत कालवा तयार केला आणि याच वेळीं एंजिनच्या शक्तीचाहि कारखान्यांत उपयोग होऊं लागला. या चार शोधांमुळें इंग्लंडचे कारखाने पुढारले खरे. परंतु त्याच्या-बरोबरच या शोधांचा उपयोग करून घेणारे भांडवलवाले पुढें आले नसते तर हे शोध कवडीमोल झाले असते. किंबहुना हे शोध जगासमोरच आले नसते. भांडवलवाल्यांना बँकांकडून मदत झाली; पण ह्या बँका आल्या कोठून? १७५० त एडमंड बर्क जेव्हां आयर्लंडांतून इंग्लंडांत आला त्या वेळीं सर्व देशांत मिळून १२ बँकाहि नव्हत्या, आणि १७९० त पहावें तों बँक नाहीं असें एकहि शहर इंग्लंडांत राहिलें नाहीं. हें स्थित्यंतर कशानें झालें बरें? या शोधांच्या आधीं थोडेंच दिवस म्हणजे १७५७ त प्लासीच्या लढाईंत इंग्लिशांना जय मिळाला. याचा ब्रिटिश कारखान्यांच्या उदयाशीं कार्यकारण संबंध नाहीं काय? जोंपर्यंत हिंदुस्थानांतल्या द्रव्याचा इंग्लंडकडे पूर वाहूं लागला नव्हता तोंपर्यंत इंग्लंडचे कारखानेहि विशेष भरभराटींत नव्हते. यावरून बंगाल व कर्नाटक येथलि संपत्तीमुळें इंग्लंडच्या कारखान्यांना उत्तेजन मिळालें असेंच सिद्ध होत नाहीं काय?

## कच्च्या मालाच्या निर्गतीचा दुष्परिणाम.

देशांतील कच्चा माल परदेशीं जाऊं लागला म्हणजे तो देश केवळ शेतकीवर अधिकाधिक अवलंबून राहतो. १८ व्या शतकांत इंग्लंडला वसाहतींतून कच्चा मालाचा पुरवठा होत असे व आतां तेंच काम हिंदुस्थानला करावें लागत आहे. हिंदुस्थानांत कापूस जास्त कसा पिकेल याची ई. इं. कंपनीला १७८८ पासून काळजी वाटूं लागली. १८५८ पासून ब्रिटिश व्यापाऱ्यांच्या भिडेस्तव हिंदुस्थानसरकारनेंहि याच प्रश्नाकडे लक्ष पुरविलें असून नुकतीच विलायतेंत एक ' कॉटन कमिटी ' हि स्थापन झाली आहे! हिंदी शेतकीची उन्नति होऊं नये, येथील कापसाचें पीक व त्याचा दर्जा वाढूं नये असें मी म्हणत नाहीं. परंतु तो कापूस परदेशींच कां जावा? त्या कापसाचें येथें कापड बनविण्याला उत्तेजन देणें हें सरकारचें कर्तव्य नाहीं काय? परंतु अनिर्बंध व्यापाराचें तत्त्व, सरकारची तटस्थ वृत्ति, ब्रिटिश व्यापाऱ्यांची मर्जी खप्पा होण्याची धास्ती इत्यादि कारणांमुळें हिंदुस्थान देश कच्चा माल पुरविणारा देश बनला. १८५३

त **लॉर्ड डलहौसी** यांनीं हिंदुस्थानांत रेल्वे करण्याचा पहिला खलिता लिहिला, त्यांत रेल्वे करण्याचें पहिलें कारण सैन्याच्या हालचालीची सोय हें असून दुसरें कारण ब्रिटिश भांडवल हिंदुस्थानांत गुंतविण्याला आमिष असें देण्यांत आलें आहे ! याच खलित्यांत इंग्लंडला कापसाची गरज आहे आणि हिंदुस्थानांतील कापूस वाहून नेण्याला साधन मिळेल तर हिंदुस्थानांत किती तरी कापूस पैदास होण्यासारखा आहे व रेल्वेनें हें काम होऊन शिवाय इंग्लंडचा पक्का मालहि देशभर पसरण्याला साधन होईल असें मत स्पष्टपणें नमूद केलें आहे. या भविष्याप्रमाणें **डलहौसी** साहेबांच्या आठ वर्षांच्या कारकिर्दीतच कापसाची निर्गत १½ कोटीपासून ३¾ कोटीपर्यंत आणि धान्याची निर्गत १ कोटीपासून ३ कोटीपर्यंत वाढली. त्याचबरोबर ब्रिटनचा एकंदर पक्का मालहि १३ कोटींपासून २३ कोटींच्या घरांत येऊन ठेपला.

बरें, सरकारनें रेल्वे करण्याचें ठरविलें तर त्याचबरोबर लोखंड गाळण्याचे कारखाने कां सुरू केले नाहींत ? हिंदुस्थानांत इतकें लोखंड निघण्याजोगें असून येथें ( टाटाच्या कारखान्यापूर्वी ) एकहि कारखाना असूं नये हें आश्चर्य नव्हे काय ? रेल्वेबरोबरच लोखंडाचा कारखाना काढला असता तर देशांतलें भांडवल देशांतच खेळलें असतें. परंतु आतां दरसाल दहा कोटी रुपये लोखंड खरेदीकरितां परदेशीं जातात आणि इकडे पूर्वीचे लोखंड गाळणारे धावड आपला धंदा गेला म्हणून देशोधडीला लागत आहेत. ही सर्व कहाणी सांगण्याचा हेतु एवढाच कीं, अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत शेतकी व उद्योगधंदे या बाबतींत हिंदुस्थान व इंग्लंड या उभयतांची स्थिति हल्लींच्या अगदीं उलट होती. इंग्लंड देश शेतकीचा होता व हिंदुस्थानांत हजारों वर्षांपासूनचे उद्योगधंदे भरभराटींत होते. अर्थातच यापुढें शेंदीडशें वर्षांत जें धोरण स्वीकारण्यांत आलें त्यायोगानें इंग्लंडचे कारखाने तरारले आणि हिंदुस्थान केवळ शेतकरी बनला ! सांगण्याचा मुद्दा एवढाच कीं, इंग्लिश लोकांत उद्योगधंद्याविषयीं कांहीं विशेष पात्रता आहे आणि हिंदी लोकांना शेतकऱ्यांचे कारखानदार बनवितां येणार नाहीं असे कांहीं नैसर्गिक दोष आहेत असें नसून जर हिंदुस्थानालाहि इंग्लंडसारखेंच उत्तेजन व संधि मिळाली तर हा देश देखील

व्यापारधंद्यांत पुढाकार घेऊं शकेल. यासाठी त्याजविषयीं खरी उदारबुद्धि जागृत ठेवा. हिंदुस्थानांतलि कारखाने बुडाल्यानें सगळ्यांचा शेतकीवरच भार पडला आहे, आणि त्यामुळें वारंवार दुष्काळाची आपत्ति ओढवत आहे. १८०० ते १८२५ पर्यंत ५ दुष्काळ पडले. १८२५ ते १८५० पर्यंत २ दुष्काळ पडले. १८५१ ते १८७५ पर्यंत ६ आणि १८७६ ते १९०० पर्यंत १८ दुष्काळांची मालिका लागली ! १८५४ पासून १९०१ पर्यंत दुष्काळामुळें २८८४९००० लोक मृत्युमुखीं पडले असावे असा **मि. डिग्बी** यांचा अंदाज आहे !

## फॅमिन-कमिशनच्या सूचना.

१८७७ सालच्या दुष्काळानें डोळे उघडल्यामुळें सरकारनें फॅमिन-कमिशन नेमिलें. त्या कमिशननें १८८० सालीं आपला रिपोर्ट प्रसिद्ध केला. त्या रिपोर्टांत कमिशननें असा इषारा दिला कीं, हल्लीं शेतकीखेरीज लोकांना दुसरा धंदा नाहीं; यामुळें अवर्षणानें तेवढा एक धंदा बसला कीं, रयतेला दुसरा आधारच रहात नाहीं. याकरितां पावसाच्या कमजास्तपणावर अवलंबून नसलेले असे दुसरे अनेक उद्योगधंदे देशांत वाढविल्याखेरीज रयतेची उपासमार चुकणार नाहीं. देशांत नवा धंदा कसा प्रस्थापित करावा हें सरकारास कांहीं शिकवावयास नको. चहाच्या लागवडीच्या बाबतींत सरकारनें जो मार्ग स्वीकारला तोच इतर धंद्यांनाहि लागूं पडेल. हिंदुस्थानांत चहाची लागवड करण्याकरितां सरकारनें चीन देशांतून मजूर आणविले, लागवडीकरितां जमीन संपादन करून तेथें वसाहत करविली. चहाचें बीं आणून तें मळेवाल्यांना वांटून दिलें आणि जेव्हां हा धंदा किफायतशीर होतो असें दिसून आलें तेव्हां तो भांडवलवाल्यांच्या स्वाधीन केला. हीच पद्धति इतर धंद्यांत सरकारनें कां स्वीकारूं नये ? साखर, कातडीं कमावणें, कापूस, रेशीम व लोकर यांचें कापड, ताग, तंबाकू, कागद, चिनीमातीचीं भांडीं, कांचसामान, साबण, मेणबत्त्या, तेलें इत्यादि कारखान्यांची येथें वाढ होऊं शकेल. याखेरीज सरकारी उपयोगाकरितां माल खरेदी करितांना येथें तयार झालेल्या मालाची प्रथम निवड करण्यानेंहि देशी धंद्यास बरेंच उत्तेजन देतां येईल. औद्योगिक व यांत्रिक शिक्षण देण्याचें काम तर सरकारनें अंगिकारलें पाहिजे.

फॅमिन-कमिशननें ३८ वर्षांपूर्वी या सूचना लिहून ठेविल्या; पण अद्यापि सरकारनें त्या अमलांत आणल्या नाहींत! १८८५ सालीं कॉंग्रेसची स्थापना झाली आणि तिनेंहि सरकारच्या पाठीमागें हेंच टुमणें लाविलें. १९१४ सालापर्यंत कॉंग्रेसनें यासंबंधीं १५ ठराव केले आहेत. १९०५ सालापासून औद्योगिक परिषदेची सालोसाल बैठक होऊं लागली आणि तिनेंहि अनेक ठरावांच्या रूपानें कॉंग्रेसच्या मागणीस दुजोरा दिला. परंतु युद्धास सुरुवात होईपर्यंत सरकारनें कांहींएक केलें नाहीं. १९०७ सालीं संयुक्त प्रांताचे ले. ग. **सर जॉन ह्यूएट** म्हणाले कीं, औद्योगिक व यांत्रिक शिक्षणाचा विषय आज वीस वर्षें सरकारपुढें व लोकांपुढें आहे; परंतु अद्यापि लेख व व्याख्यानें यांच्यापुढें कांहीं मजल गेली नाहीं. नाहीं म्हणावयास कांहीं वर्षांपूर्वी सरकारनें परदेशांत जाऊन औद्योगिक शिक्षण संपादण्याकरितां दरसाल १० शिष्यवृत्त्या देण्याचें ठरविलें. या शिष्यवृत्त्या घेऊन १०० विद्यार्थी परदेशीं गेले. परंतु ही संख्या देशाच्या जरूरीच्या मानानें फारच अल्प आहे असें पाहून असल्या शिक्षणाकरितां परदेशाला विद्यार्थी रवाना करण्यासाठीं एक खासगी संस्था स्थापन झाली. या संस्थेच्या विद्यमानें आजपर्यंत ३०० विद्यार्थी परदेशास गेले; त्यांतले जे १४० परत आले त्यांतून १३० नोकरींवर आहेत. या विद्यार्थ्यांनीं २० नवे कारखाने स्थापिले असून इतर कित्येक कारखान्यांचें चालकत्वहि त्यांच्याकडे आलें आहे व अशा सर्व कारखान्यांचें भांडवल ४० लक्ष रुपये आहे. अशा या संस्थेला बंगालसरकार सालिना ५ हजार रुपये मदत करीत होतें आणि युद्धाच्या सुरवातीपासून ती मदत २½ हजारांवर आली!

## परकी राष्ट्रांची प्रगति

१८७७ च्या दुष्काळापासूनच्या ४० वर्षांत हिंदुस्थानांत किती अल्प प्रमाणांत प्रगति झाली हें आम्ही वर पाहिलें. आतां याच ४० वर्षांत इतर राष्ट्रांनीं किती झपाट्यानें प्रगति केली पहा. जर्मनी, आस्ट्रिया, जपान व अमेरिका या चार देशांच्या व्यापारानें हिंदुस्थानची बरीच बाजारपेठ व्यापिली असल्यानें त्या चार देशांचाच आपण तूर्त विचार करूं. हिंदुस्थानाभोंवतीं संरक्षक जकातपद्धतीचा कोट नसल्यानें या चार देशांनीं येथल्या खुल्या व्यापा-

राचा पूर्ण फायदा करून घेतला आणि येथून कच्चा माल नेऊन पक्का माल परत धाडण्याचा धडाका सुरू केला. या मोहिमेमुळें हिंदुस्थानांतील निळीची लागवड बुडाली; हिंदुस्थानच्या साखरेच्या कारखान्यास धोका पोंचला; परकी राष्ट्रांच्या या व्यापारी मोहिमेमुळें केवळ हिंदुस्थानचेंच नव्हे तर इंग्लंडचेंहि नुकसान होत आहे. महायुद्धापूर्वी हिंदुस्थानच्या आयात मालांत इंग्लंडचा हिस्सा शेंकडा ६२·८ टक्के होता आणि जपान, अमेरिका व जावा यांचा अनुक्रमें २·५, ३·१ व ६·४ असा होता. १९१७ सालच्या आयात मालांत इंग्लंडचा वांटा शेंकडा ५८·७ पर्यंत उतरला आणि जपानचा ८·९, अमेरिकेचा ७·३ आणि जावाचा ८·९ पर्यंत वाढला. महायुद्धाच्या अनुभवावरून जे कारखाने हिंदुस्थानांत असणें अवश्यक असून ते तेथें विद्यमान नाहींत त्यांची यादी कमिशनच्या रिपोर्टाच्या चौथ्या भागांत दिलेली आहे ती पाहिली म्हणजे मन खिन्न होतें. सरकारनें आजपर्यंत जर औद्योगिक शिक्षणाची तरतूद केली असती, औद्योगिक बँकांना सवलती दिल्या असत्या, आणि येथल्या कारखान्यांचा माल खरेदी करून त्यांस उत्तेजन दिलें असतें तर हे अवश्यक कारखाने येथें आज भरभराटीला आलेले दिसले नसते काय ?

## उद्योगधंद्याविषयीं सरकारचें धोरण

हिंदुस्थानांत औद्योगिक प्रगति घडवून आणण्याच्या दिशेनें पहिला प्रयत्न मद्राससरकारनें केला आणि हिंदुस्थानांत कोणते नवे कारखाने किफायतशीरपणें घालवितां येतील हें भावी कारखानदारांना सप्रयोग दाखविण्याचें काम सरकारनें आपल्या अंगावर घ्यावें असें १९१० सालीं स्टेटसेक्रेटरीस सुचविलें. परंतु दुर्दैवानें त्या वेळचे भारतमंत्री **लॉर्ड मोर्ले** यांनीं ती सूचना मान्य केली नाहीं. सहा वर्षांनंतर या चुकीचा दुष्परिणाम दिसून आल्यानें १९१६ सालीं भारतमंत्री **लॉर्ड क्रयू** यांनीं व्हाइसरॉयांस तारेनें असें कळविलें कीं, **लॉर्ड मोर्ले** यांच्या पूर्वीच्या हुकमामुळें अडून बसूं नका, औद्योगिक कमिशनचा रिपोर्ट प्रसिद्ध होऊन नवीन हुकूम सुटेपर्यंत तुम्हांस ज्या उद्योगधंद्यास सरकारी मदत देणें जरूर वाटेल आणि सांपत्तिक दृष्ट्या शक्य असेल त्यांना मदत करावयास लागा." पण हा प्रकार तहान लागल्यानंतर विहीर खणण्यासारखा झाला. वास्तविक पाहतां यांत **मोर्ले साहेबापेक्षां** हिंदुस्थान-

सरकारचीच चूक मोठी आहे. कारण हिंदुस्थानसरकारनें कोणत्याहि उद्योगधंद्यास कधींच कसल्याहि प्रकारें सहाय्य करूं नये असा कांहीं **लॉर्ड मोर्ले** यांच्या हुकमाचा अर्थ नव्हता. **लॉर्ड क्रयू** १९१२ च्या मार्चमध्येंच हिंदुस्थान-सरकारास असें लिहून कळविलें कीं, " हिंदी लोकांना नव्या पद्धति व नवीं यंत्रें यांचें शिक्षण द्यावें एवढी पडत्या फळाची आज्ञा **लॉर्ड मोर्ले** यांनीं दिलीच होती. पण मद्राससरकारनें तिचा अर्थ अगदींच संकुचित करून औद्योगिक शाळांत शिक्षण देण्याखेरीज इतर रीतीनें कारखान्यांना उत्तेजन किंवा कारखान-दारांना शिक्षण देऊं नये असें जें ठरविलें तें चुकीचें आहे. नवीं यंत्रें आणि सुधारलेली पद्धति यांचें सप्रयोग शिक्षण देण्याकरितां यंत्रें खरेदी करण्याला आणि प्रयोगवजा कारखाने चालविण्याला आमच्याकडून बिलकुल हरकत नाहीं. " परंतु या सूचनेचा कांहीं उपयोग झाला नाहीं आणि आतांपर्यंत सरकारनें आपलें हें अवश्य कर्तव्य बजावलें नाहीं.

## धोरण बदलूं लागलें

युरोपियन महायुद्धामुळें रोजच्या अवश्यक वस्तूकरितां देखील हिंदुस्थानाला जर्मनी व आस्ट्रिया या देशांवर कसें अवलंबून रहावें लागतें तें व्यक्त झालें आणि हिंदुस्थानसरकारनें ता. २६ नवंबर १९१५ रोजीं स्टेटसेक्रेटरीकडे एक खालिता लिहिला त्यांत पुढील आशयाचा मजकूर आहे. " महायुद्धानंतर प्रत्येक परकी देशानें आपला माल हिंदुस्थानच्या बाजारपेठेवर लादावा. ही अनिष्ट गोष्ट टाळावयाची असल्यास हिंदुस्थानदेशाचें कांहीं तरी निश्चित व्यापारी धोरण ठरविलें पाहिजे, कारण राष्ट्राची उन्नति आर्थिक उन्नतीवर अवलंबून असते हें सिद्ध झालें आहे. हिंदी उद्योगधंद्यांना सरकारनें उत्तेजन द्यावें अशी मागणी कारखानदार, राजकीय पुढारी आणि विद्वत्समूह या सर्वां-कडून एकमतानें पुढें येत आहे. याकरितां ज्यायोगानें येथें औद्योगिक शिक्षण देण्यांत येऊन तें यशस्वी होईल आणि जेणेंकरून केवळ बौद्धिक शिक्षणाकडचा आणि नोकरी, वकिली व डॉक्टरी यांच्याकडेच असलेला भर कमी होईल असें औद्योगिक धोरण सरकारनें अंगिकारणें अगत्याचें आहे. महायुद्धानंतर हिंदुस्थानाला शक्य तितक्या रीतीनें कारखान्यांचा देश म्हणवून घेतां येईल. अशी स्थिति प्राप्त होण्याला सरकारनें सहाय्य केलेंच पाहिजे असा हट्ट धर-

ण्याचा हिंदुस्थानाला हक्क आहे." हें मत भारतमंत्र्यांसही मान्य होऊन हें कमिशन नेमण्यांत आलें व त्या योगानें हिंदी लोकांस हर्ष झाला. परंतु हिंदुस्थानच्या कापडाच्या आयातीवरील जकातीच्या प्रश्नाच्या वेळीं मजूरपक्ष, आयरिश पक्ष आणि लँकेशायरचे प्रतिनिधि यांची जूट होऊन त्यांनीं स्टेट-सेक्रेटरीची भेट घेऊन कापडावरची जकात न वाढविण्याविषयीं जो आग्रह धरिला तो लक्षांत घेतां या कमिशनपासून तरी कितपत उपयोग होईल याची शंका वाटते.

## इंग्लिशांची चुकीची कल्पना

इंग्लिशांच्या डोक्यांत शिरलेली एक चुकीची कल्पनाच या विरोधाच्या बुडाशीं आहे. हिंदुस्थान देशांत कारखाने निघून उद्योगधंदे भरभराटीला आले व हिंदुस्थान देश संपन्न झाला तर त्यांत इंग्लिश कारखानदारांचें नुकसान आहे ही ती चुकीची कल्पना होय. जपान व अमेरिका या देशांनीं गेल्या चाळीस पन्नास वर्षांत आपली किती औद्योगिक प्रगति साधली आहे बरें? पण त्यापासून इंग्लंडच्या व्यापाराचें नुकसान न होतां उलट भरभराटच झाली. १८८० सालीं जपानांत इंग्लंडचा माल अवघा ३ कोटींचा खपत होता तो आतां १९१० सालीं १३½ कोटींचा खपला. आणि सर्व देशांची मिळून जपानांतील आयात अवघी ७ कोटींची होती ती ५८ कोटींची झाली. परदेशाचा माल अमेरिकेंत १८६० सालीं १०० कोटींचा आला होता तो १९०० सालीं १५५ कोटींचा आला. आतां हें मत इंग्लंडांतहि होत चाललें आहे. **लॉर्ड बालफर** यांनींहि आपल्या 'युद्धोत्तरकालीन व्यापार' या विषयावरील रिपोर्टांत असेच विचार प्रदर्शित केले आहेत. **लॉर्ड चेल्मस-फर्ड व मि. मॉंटेग्यु** यांनीं आपल्या सुधारणेच्या रिपोर्टांतहि याच मताला दुजोरा दिला आहे. परंतु हें बदललेलें धोरण अमलांत येणें न येणें ही गोष्ट, हिंदुस्थानसरकारला या बाबतींत कितपत स्वातंत्र्य दिलें जाईल, त्यावर अवलंबून आहे. आणि या रिपोर्टांतील आमच्या सर्व सूचनांचा मोक्षमोक्ष हिंदुस्थानसरकारास मिळणाऱ्या आर्थिक स्वातंत्र्यावरच अवलंबून आहे.

## शेतीला उत्तेजन.

हिंदुस्थानांत शेती हा मुख्य धंदा व मोठ्या उत्पन्नाची बाब आहे, यास्तव

शेतकीची पद्धति सुधारणें आणि शेतीचें उत्पन्न वाढविणें अत्यंत जरूरीचें आहे असें या कमिशनचें स्पष्ट मत आहे. पण ही शेतीची सुधारणा घडवून आणण्याकरितां नव्या यंत्रांचा प्रसार शक्य तितक्या उपायांनीं केला पाहिजे असें जें सांगण्यांत येतें तें बरोबर नाहीं. हिंदुस्थानसरकारचे शेतकीखात्याचे सल्लागार **मि. जेम्स. मॅकेना** यांनीं आपल्या १९१५ सालीं प्रसिद्ध केलेल्या 'हिंदुस्थानांतील शेती' ( Agriculture in India ) या पुस्तकांत असें नमूद करून ठेविलें आहे कीं, "हिंदुस्थानांतील शेती सुधारण्याचा प्रश्न निघाला कीं, पाश्चात्य नांगर व कापणीचीं यंत्रें यांचा प्रसार करा असा उपदेश जो तो करितो. जेथें शेतांचा विस्तार मोठा असून मजुरांचा मात्र तुटवडा असेल तेथें हीं कापणीचीं यंत्रें उपयोगी पडतात. पण लहान लहान शेतांत व मजुरांचा भरपूर पुरवठा असलेल्या ठिकाणीं त्यांच्यापासून फायदा होत नाहीं. जीं यंत्रें गांवांतल्या गावांत दुरुस्त करितां येतील व जे नांगर घरच्या बैलांकडून ओढले जातील अशींच यंत्रें व नांगर शेतकऱ्यांस उपयुक्त होत." **मि. मॅकेनाच्या** या मतावरून परकी यंत्रांचा शक्य तेथें शक्य त्या उपयांनीं प्रसार करणें हें चुकीचें आहे हें दिसून येईल.

## शेतकीचें शिक्षण द्या

वरील कारणास्तव परदेशी यंत्रांचा प्रसार करण्याचा अट्टाहास करण्यापेक्षां 'शेतकी शिक्षणाचा' प्रसार करणें हें इष्टतर आहे. १८८० सालच्या फॅमिन-कमिशननें शेतकीची सुधारणा करण्याकरितां प्रत्येक प्रांतांत शेतकीखातें काढण्याविषयीं शिफारस केली. परंतु १८८९ पर्यंत त्या दिशेनें कांहींच प्रयत्न झाला नाहीं. त्यानंतर तरी शेतकी खात्याची स्थापना होऊन शेतकी तज्ज्ञ व त्यांचे मदतनीस यांच्या नेमणुका झाल्या, पगार सुरू झाले; पण शेतीची सुधारणा जागच्या जागींच राहिली ! १९०५ सालीं पुसा येथें शेतकीच्या संशोधनाची संस्था काढण्यांत आली. पुणें, कानपूर, नागपूर, लियालपूर, कोइमतूर या ठिकाणचीं शेतकी कॉलेजें सुधारून वाढविण्यांत आलीं. पाटबंधारे व कालवे यांच्या योगानेंहि शेतीस थोडाबहुत फायदा झाला व त्याचें श्रेय सरकारास दिलें पाहिजे. परंतु सामान्य शेतकऱ्यांत शेतकीच्या शिक्षणाचा प्रसार होऊन जो फायदा व्हावयाचा तो कांहीं झाला नाहीं. **मि. मॅकेना** हे आपल्या

पुस्तकांत लिहितात-" शेतकी शिक्षणाविषयीं ओरड मात्र पुष्कळ; परंतु कृति मात्र अत्यल्प झाली आहे. फॅमिन-कमिशन व ॲग्रिकल्चरल कमिशन यांनीं असा अभिप्राय दिला कीं, शेतकऱ्यांमध्यें शिक्षणाचा प्रसार झाल्याखेरीज शेतकऱ्यांची उन्नति होणार नाहीं.पण याचा पुढें मोठा विपर्यास होऊन प्राथमिक शाळांतून शेतकीच्या विषयाचें शिक्षण देण्याचा क्रम सुरू झाला. परंतु असल्या लहान मुलांना शेतकी शिकवून उपयोग काय ? खरा मार्ग म्हणजे हाच कीं, प्राथमिक शिक्षणाचा शेतकरीवर्गांत प्रसार व्हावा व त्या प्राथमिक शिक्षणांत शेतकीला पुढें उपयोगी पडेल असें वस्तुपाठशिक्षण आणि सृष्टयवलोकन यांचा समावेश करावा. " आणि वस्तुतः प्रयोगानें शेतकी शिक्षणाची नक्की दिशा ठरेपर्यंत तें शिक्षण देण्यास प्रारंभ तरी कसा करणार? सारांश, ३५ वर्षें धडपड करून अद्यापपावेतों शेतकी शिक्षण कसें द्यावें याचा प्रयोग करून पहा, असेंच **मि. मॅक्केना** हे आम्हांस सांगणार ! जपान, अमेरिका, आयर्लंड वगैरे देशांनीं ही कामगिरी इतक्या दिरंगाईवर टाकली नाहीं. जपानच्या शेतकीविषयीं **सर फ्रेडरिक निकलसन** यांनीं जें टांचण या कमिशनकरितां तयार करुन दिलें त्यावरून जपानी शिक्षणपद्धतीची कल्पना येईल आणि येथें शिक्षण देण्याला तो एक नमुना उपयोगी पडेल. हिंदुस्थानांत शेतीपासून इतर देशांच्या मानानें किती थोडें उत्पन्न निघतें हें पुढील आंकड्यावरून कळून येईल. हिंदुस्थानांत गव्हाचें पीक सरासरीनें दरएकरीं १२५० पौंड येतें तर डेन्मार्कामध्यें तें २४५६ आणि बेल्जममध्यें २९५३ पौंड येतें.येथें मक्याचें पीक दरएकरीं १३५६ पौंड निघतें तर न्यूझीलंडमध्यें तें ३१९१ पौंड व कानडांत ३४८७ पौंड निपजतें. तांदुळाचीहि स्थिति तीच आहे. दरएकरीं जपानांतल्या अर्ध्यानें येथें तांदुळ पैदा होतो !

## शेतकी पेढ्या काढा.

शेतकी सुधारण्याला शेतकी शिक्षण देणें हा एक उपाय झाला; परंतु त्याचबरोबर शेतकी बँका स्थापून शेतकऱ्यांना द्रव्यद्वारांहि मदत मिळाली पाहिजे. **सर वुइल्यम वेडरबर्न** यांनीं १८८२ सालीं हा प्रश्न पुढें आणला. पण त्यास सरकारकडून उत्तेजन मिळालें नाहीं. पुढें कॉंग्रेसनेंहि हाच उपाय ठरावाच्या रूपानें सरकारापुढें मांडला, पण व्यर्थ ! **कै. न्या. मू. रानडे** यांनीं

१८९१ सालीं पुणें येथलि औद्योगिक परिषदेपुढें याच विषयावर निबंध वाचला. जपाननें तर या संबंधांत प्रत्यक्ष कृति करून कित्ता घालून दिला आहे. जपानांत शेतकी बँकांतून शेतकीला अल्पमुदतीनें किंवा दीर्घकालीन मुदतीनें कर्जाऊ रकमा मिळतात. छोट्या मुदतीच्या रकमांचीं खतें, शेतकीचीं आउतें, बियाणें किंवा चारा यांच्या खरेदीकडे उपयोग होतो. मोठ्या म्हणजे ५० वर्षांपर्यंतच्या मुदतीच्या रकमा विहिरी, पाटबंधारे, ताल घालणें वगैरे कामांकडे खर्च करण्यांत येतात, हिंदुस्थानांत अशा शेतकी बँका स्थापन व्हावयास नकोत काय ?"

औद्योगिक कमिशनच्या अहवालाला पंडितजींनीं जोडलेल्या या भिन्न मतपत्रिकेंत ब्रिटिशांनीं हिंदुस्तानांत कोणत्या पद्धतीनें राज्य चालविलें याचें फार सुंदर व मार्मिकचित्र रेखाटलें आहे. त्या स्थितीचा भेसूरपणा आद्यापहि कमी झालेला नाहीं. परंतु त्यावरून स्वदेशबांधवांबद्दल पंडितजींचें अंतःकरण कसें तिळतिळ तुटतें याची मात्र वाचकांस योग्य कल्पना येईल.

# पंडितजी व कायदेभंग.

म. गांधींनीं हिंदुस्थानच्या राजकारणाचीं सूत्रें हातीं घेतल्यानंतर असहकरिता-कायदेभंग यांची भाषा ज्याच्या त्याच्या तोंडीं खेळूं लागली. व सामुदायिकरीत्या कायदेभंग करण्याचें तत्व लोकांच्या गळीं उतरवून तें प्रत्यक्ष व्यवहारांत आणणेंहि शक्य आहे ही गोष्ट त्यांनीं स. १९३० सालीं सविनय:कायदेभंगाची जी अपूर्व मोहिम यशस्वी करून दाखविली ती वरून सिद्ध झाली आहे.

परंतु पारतंत्र्यांत असणाऱ्या प्रत्येक स्वाभिमानी मनुष्यास तो स्वातंत्र्यार्थ चळवळ करू लागला म्हणजे अन्यायानें घातलेल्या कायद्याच्या प्रतिबंधाची कुंपणें त्यास मोडून टाकावीं लागतात असा अनुभवच आहे. पंडितजींनाहि या दिव्यांतून अनेक वेळां जावें लागलें आहे. देशांतील सर्व समाजांत ऐक्य नांदावें यासाठीं पंडितजींचे सदैव प्रयत्न व ते संधि मिळेल तेव्हां तसा अंतःकरणपूर्वक उपदेश करीताहि असतात. त्यांना आतापर्यंत एकंदर पांच वेळां कायदेभंग करावा लागला. त्यांतील चार·वेळां १४४ कलमाखालीं भाषणबंदी करण्यांत आली, कारण काय तर त्यांच्या भाषणानें जातीजातींत वैमनस्यें वाढून तंटे उत्पन्न होतील! जणू काय पंडितजी म्हणजे जातिकलह पेटविणारे कोणी माथेफिरूच आहेत!! पंडितजींचीं आजपर्यंतचीं भाषणें, लेख व कृति या कशाहिमध्यें, कोणीहि व केव्हांहि जातिद्वेषाची नुसती झुळूक तरी दाखवून द्यावी! परंतु नोकरशाहीला त्याचें काय! त्यांनीं त्यांजवर १४४ कलमाचा सतत चार वेळा वार केला परंतु पंडितजींनीं या चारहि वेळां हा अन्यायी हुकूम पायां–



पं. मालवीयजी — महात्मा गांधी

खालीं तुडवून आपला भाषण स्वातंत्र्याचा हक्क शाबीत केला.

एकदां मकरसंक्रांतीचे दिवशीं प्रयागास कुंभमेळ्याच्या वेळीं भाषण करण्याची पंडितजींना डि. मॅ. नें. मनाई केली. त्यावेळीं पंडितजींनीं तो हुकूम मानला नाहीं.

## दुसऱ्यांदा कायदेभंग

यानंतर दुसरा प्रसंग म्हणजे चौरीचौरा येथें झालेल्या दंग्याच्या वेळचा. चौरीचौरा येथें दंगा झाल्यानंतर तेथील परिस्थिति प्रत्यक्ष पाहण्यासाठीं **पंडितजींनीं** तेथें जाण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें ते तेथें जाण्यासाठीं गोरखपूर येथें गेले. तेथें त्यांचा अपूर्व सत्कार झाला. चौरीचुरा प्रकरणांत पकडलेल्या आरोपींची त्यांनीं भेट घेतली. लोकांशीं खासगी चर्चा केली. स्वसंरक्षण करण्यासाठीं संरक्षणदलें स्थापन करण्याचा लोकांना त्यांनीं सल्ला दिला व तेथून ते चौरीचौरा येथें गेले. ता.४ फेब्रुवारी १९२१ रोजी याठिकाणीं मोठा दंगा झाला होता. **पंडितजींनीं** दंग्याचें क्षेत्र स्वतः पाहिलें. लोकांनीं आपल्या करुण-कथा **पंडितजींना** सांगितल्या. अशा रीतीनें **पंडितजी** लोकांशीं बोलत असतां तेथें एक पोलिस इन्स्पेक्टर येऊन त्यानें पंडितजींना डि. पो. सु. कडून आलेली एक तार दाखविली. या तारेंत **पंडितजींनीं** सदर तहशिलींत कोठें भाषण करतां कामा नये असा १४४ कलमाखालीं हुकूम दिला होता. तेथील संभाषण झाल्यानंतर दंग्याचा भाग-मंदेरा बाजार-याठिकाणीं मद्यनिरोधनावरून दंगा झाला होता, येथें गेले. तेथून परत फिरतांना जमलेल्या लोकांना दारू न पिण्याचा व विदेशी कापड न घेण्याचा उपदेश केला. तेथून **पंडितजी** भटपूर येथें गेलें. तेथेंहि पंडितजींचें मोठ्या समाजापुढें भाषण झालें.

## गोरखपूर जिल्ह्यांत बंदी

तेथून **पंडितजी** मुक्कामाच्या जागीं येतात तोंच दोन पोलिस इन्स्पेक्टर्स हजर होत. त्यांनीं दोन वेगळाले हुकूम १४४ कलमाखालीं **पंडितजींवर** बजावले. एका हुकुमान्वयें त्यांना **गोरखपूर** जिल्ह्यांतील देवारिया-कासिया या भागांत

भाषणें करण्यास मनाई केली होती. दुसरा हुकूम **गोरखपूर**च्या डि. मॅ. चा होता व त्यानें सर्व **गोरखपूर** जिल्ह्यांतच **पंडितजींना** भाषणें करण्यास मनाई केली होती. परंतु **पंडितजींनीं** हे हुकूम धाब्यावर बसवून आपल्या ठरलेल्या कार्यक्रमांत कांहींचाहि बदल न करतां त्यांनीं त्याचा दिवशीं सायंकाळीं **देवरिया** भागांतील **बहरज** या गांवीं भेट दिली. तेथें त्यांचें अपूर्व स्वागत झालें, मोठी मिरवणूक निघाली. व सायंकाळीं त्यांचें प्रचण्ड समुदायापुढें भाषणहि झालें. तेथून पंडितजी **देवरियाला** गेले. व दुसरे दिवशीं सकाळीं तेथेंहि जाहीर व्याख्यान झालें. तेथून मोटारनें ते **गोरखपूरला** गेले. वाटेंत **रामपूर**, कारखाना, कासीया, पद्राना या गांवींहि यांचीं जाहीर व्याख्यानें झालीं.

मोटारनें हा प्रवास करीत असतां पंडितजींच्या जिवावरचा एक मोठाच प्रसंग टळला. मोटार भरवेगांत होती. वाटेंत चालणारी एक बैलगाडी चुकविण्यासाठीं मोटारनें किंचित वळण घेण्याचा प्रयत्न केला. तें घेत असतां मोटार एकदम जवळच्या खड्यांत घुसली. सुदैवानें थोड्याशा जखमा होण्यापलीकडे कोणासच फार त्रास झाला नाहीं.

तेथून खलिलाबादेस व्याख्यान जाहीर झालें होतें तेथें तें देण्यासाठी गेले. तेथें जातात तोंच १४४ कलमाचा प्रतिबंध सज्ज होता. परंतु पंडितजींनीं ठरल्याप्रमाणें त्यास दाद न देतां व्याख्यानाचा कार्यक्रम यथास्थितपणें पार पाडला.

ज्यांनीं पंडितजींवर १४४ कलम सोडलें त्यांनीं स्वतः जर पंडितजींचीं भाषणें ऐकलीं असतीं तर आपले हुकूम किती वेडगळपणाचे होते याची त्यांना योग्य कल्पना आली असती. लोकांना जर स्वराज्य पाहिजे असेल तर इंग्लण्डमध्यें ज्याप्रमाणें इंग्रजांचें राज्य आहे त्याप्रमाणें आम्हांस हिंदुस्थानांत सत्ता पाहिजे असें सांगून लोकांनीं कॉंग्रेसचा विधायक कार्यक्रम तंतोतंत पाळावा; अहिंसावृत्ति ठेवावी; चौरीचौऱ्यासारखे प्रकार होऊं देऊं नयेत; देशाभिमान वाढवावा; उद्योगधंदे वाढवावे; शुद्ध खादी तयार करावी व वापरावी, अस्पृश्योद्धार करावा, आपसांतील खटले लवादामार्फत तोडावे. या प्रकारचा उपदेश पंडितजींच्या भाषणांत असे. यांत १४४

कलमाखालीं भाषणबंदी करण्यासारखें त्यांत काय होतें हें नोकरशाहीखेरीज इतरांस कसें उमजणार !

## कायदेभंगाचा तिसरा प्रसंग

स. १९२६ मध्यें कलकत्ता येथें हिंदुमुसलमानांमध्यें एकामागून एक तीन भयंकर स्वरूपाचे दंगे झाले. तेथलि परिस्थिति समक्ष पाहून ते शांत करावे, दुःखितांस सहाय्य करावें या सद्विचारानें प्रेरित होऊन **पंडितजींनीं** कलकत्त्यास जाण्याचें ठरविलें. ही वार्ता बंगालसरकारला समजतांच दडपशाहीच्या वेडेपणांची लहर मधून मधून एकेक सरकारास पछाडीत असते त्याप्रमाणें बंगालसरकाला या वेडानें घेरलें आणि हौऱ्याच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनें पंडित **मदन मोहन मालवीय** यांना कलकत्त्यास येण्याला मनाई असल्याची नोटीस बजावली ! ही झारशाहीची नोटीस पोंचतांच पंडितजींनीं आपला कलकत्त्यांस जाण्याचा निश्चय जाहीर केला. आज चाळिस वर्षे राजकारणांत प्रमुखपणें वावरणाऱ्या, तीन वेळां कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावर चढलेल्या, हिंदु युनिव्हर्सिटीसारख्या संस्थेला व हिंदुसमाजाला ललामभूत वाटणाऱ्या अशा वरिष्ठ कायदेमंडळाच्या एका सन्माननीय- सभासदास एखाद्या बदमाषाप्रमाणें एखाद्या जिल्ह्यांत येण्यास अगर भाषण करण्यास बंदी करणें हें कृत्य अत्यंत उर्मटपणाचें व अरेरावीचें असल्यानें मॅजिस्ट्रेटच्या या हुकमाचा सर्वत्र निषेध होऊं लागला. सरकारच्या बगलेंतल्या ॲंग्लो-इंडियनी पत्रांनींहि मॅजिस्ट्रेटनें ही घोडचूक केली असा त्यांजवर ताशेरा झाडला आणि **पंडितजी** तर स्वकर्तव्य जाणून कलकत्त्यास जाण्यास निघाले. तेव्हां या झटापटीचें पर्यवसान कसें होणार याकडे अखिल हिंदु जनतेचे डोळे लागून राहिले होते. पण अखेरीस कोणत्या सोनारानें डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटचे कान टोचलें कोणास ठाऊक ! **पंडितजींना कलकत्ता** शहरांत शिरण्यास हरकत घेण्यांत आली नाहीं आणि **बी. चक्रवर्ती, सर पी. सी. मितर. इंदुभूषण सेन, जे. चौधरी, बी. के. लाहिरी, नलिनीरंजन सरकार प्रभृति** पुढाऱ्यांनीं स्टेशनावर पंडितजींचें थाटानें स्वागत करून त्यांस शहरांत नेलें. आपल्या आगमनप्रसंगीं कोणताहि समारंभ करूं नये अशी पंडितजींनीं आगाऊच तार पाठविली होती व समक्षहि विनंती केली; त्यावरून मिरवणू-

कीचा बेत रहित करण्यांत आला होता व तेवढ्यांतच समाधान मानून पोलीस निघून गेलें. अशा रीतीनें पंडितजींनीं आपला सत्याग्रह शेवटास नेला व त्याबद्दल सगळीकडून त्यांच्यावर अभिनंदनपर तारांचा वर्षाव झाला.

## कलकत्त्यांतील जाहीर सभा

कलकत्त्यास पोंचल्यानंतर शनिवार ता. ७ आगष्ट रोजीं आल्बर्ट हॉलमध्यें पंडितजींचें सद्यःस्थितीवर जाहिर व्याख्यान झालें. त्यांत हिंदु-मुसल्मानांचा तंटा, प्रतियोगी सहकार पक्षाचीं तत्त्वें आणि सरकारचा दृष्टिकोन या तीन मुद्यांवर पंडितजींनीं भाषण केलें. कोणत्याहि जातीविषयीं किंवा धर्माविषयीं पक्षपात न धरतां सरकार जर कायदेशीर हक्कांची बजावणी न डगमगतां करील तर हे तंटे बंद पडतील असा पहिल्या मुद्यावर पंडितजींनीं अभिप्राय व्यक्त केला. स्वराज्य पक्षाचें उठपळीचें धोरण आत्मघातक असून वाणेदार पुढाऱ्यांनीं कौन्सिलांत जाऊन लोकहिताचीं कार्यें घडवून आणावीत आणि लोकहितास विघातक होणारे सरकारचे डावपेंच हाणून पाडावेत हाच प्रतियोगी सहकारितेचा मार्ग सर्वश्रेष्ठ होय असेंहि त्यांनीं सांगितलें. कॉंग्रेसनिष्ठेविषयीं ते म्हणाले कीं, मी चाळीस वर्षें कॉंग्रेसचा सभासद आहे व जिवांत जीव आहे तोंपर्यंत तसाच सभासद राहणार आहे. परंतु देशकार्याचें महत्त्व कॉंग्रेसविषयींच्या पूज्य बुद्धीपेक्षां अधिक आहे. अर्थातच जेथें जेथें कॉंग्रेसनिष्ठा राष्ट्रकार्याच्या आड येत असेल तेथें राष्ट्रकार्यास पहिला मान दिला पाहिजे. नंतर सरकारच्या हल्लींच्या धोरणावर टीका करून ते म्हणाले कीं, आमच्यांत जी फूट आहे तिचा फायदा सरकार घेत आहे. आपण सर्वांनीं एकच राजकीय धोरण स्विकारलें पाहिजे, व तें धोरण म्हणजे प्रतियोगी सहकारितेचेंच धोरण होय. या धोरणानें आपण सर्व चाललों आणि याच धोरणाचे उमेदवार एकमतानें निवडून दिले तर सरकार वठणीस येण्यास वेळ लागणार नाहीं. परंतु निर्विवाद गोष्टीविषयीं जेथें मुद्दाम पक्षभेद उत्पन्न करण्यांत येतात तेथें इतक्या समंजसपणाची अपेक्षा करणें निराशाजनकच ठरणार. हिंदूमुसलमानांच्या झगड्याचें खरें स्वरूप व्यक्त झालें असून देखील जेव्हां आमच्यांतलेच कांहीं शिष्ट दंग्याची जबाबदारी कळकळीच्या

पुढाऱ्यांच्या माथीं मारून स्वतःच्या निर्लेपपणाचा डांगोरा पिटतात त्यावेळीं सरकारलाहि असल्या पुढाऱ्यांवर हात टाकण्यास उत्तेजन मिळतें. " पंडितजी हे बोलके सत्याग्रही नसून कर्ते पुढारी असल्यानें त्यांच्या तेजापुढें अखेर सरकारी हुकुमालाहि निस्तेज व्हावें लागलें.

## बंगालसरकारची फजीति

परंतु अशा रीतीनें त्यावेळीं पंडितजींच्या आगमनास सरकारनें हरकत घेतली नाहीं तरी त्यांजवर **व. डॉ. मुंजे** यांजवर कलकत्ता येथील मॅजिस्ट्रेटसाहेब यांनीं नोटीस काढली. नोटिशींत त्यांना असें आव्हान करण्यांत आलें कीं, 'ता. २३ रोजीं आमचें समोर हजर व्हा,वाटल्यास स्वतः या,वाटल्यास वाकिलामार्फत या, आणि १४४ कलमाप्रमाणें तुम्हांला जी आज्ञा पूर्वी करण्यांत आली होती ती अमान्य करून कलकत्ता शहराच्या हद्दींत तुम्हीं प्रवेश कां केला याचें कारण सांगा.'

हें नोटिस प्रकरण बाहेर पडतांच नोकरशाहीचा सर्वत्र धिक्कार होऊं लागला. ले.असेंब्लीच्या सभासदांनीं ना.**व्हॉइसरायांस** भेटून या कामीं बंगाल सरकारला कांहीं सामोपचार सांगण्याबद्दल आग्रह केला. व तो बराच फलद्रूपहि झाला. यापूर्वी जेव्हां त्यांजवर १४४ कलम लागूं करण्यांत आलें होतें त्या वेळींहि प्रांतिक सरकारनें मॅजिस्ट्रेटास गुप्त कानमंत्र देऊन तें प्रकरण आवरतें घेतलें व तसाच प्रकार यावेळींहि झाला. अखेरीस बंगाल सरकारला शहाणपणा सुचून सरकारी वकिलानें खटला काढून घेण्याची परवानगी मागितली व मॅजिस्ट्रेटनें ती दिली ! अशा रीतीनें बंगाल सरकारनें आपल्या अब्रूचें आणखी अधिक धिंडवडे होण्याचे टाळलें. पंडितजी व **डॉ. मुंजे** यांच्यासारख्या सन्मान्य पुढाऱ्यांवर असल्या मनाईनोटिसा काढण्यापूर्वींच बंगालसरकारनें विचार करावयास हवा होता. पण बंगालसरकारनें विचार न करितां अविचार केला म्हणूनच **पंडितजी व डॉ. मुंजे** यांना बेकायदेशीर हुकूम अमान्य करून स्वकर्तव्य बजावण्याची संधि लाभली.आणि जनतेला सत्याग्रहाचा एक नमुना पाहावयास मिळाला. स्वकर्तव्य निष्काम बुद्धीनें करीत राहावयाचें. तें करीत असतांना प्रतिपक्षानें अन्यायानें हरकत केल्यास ती मानावयाची नाहीं. आणि त्याकरितां शिक्षा भोगण्याचा प्रसंग आला तरी त्याची

पर्वा करावयाची नाहीं, हाच सनदशीर चळवळीचा खरा मार्ग होय; व **पंडितजी व डॉ. मुंजे** यांनींहि या प्रकरणांत, ' प्राप्तं प्राप्तमुपासीत हृदये-नापराजितः ' अशीच आपली वृत्ति राखली याबद्दल त्यांचें कोणीहि अभिनंदन करील.

## चौथा कायदेभंग

या नंतरचा चौथा प्रसंग **पेशावरचा**.पेशावर येथें कायदेभंगाची चळवळ जोरानें सुरू झाली. मद्यनिरोधनाची चळवळ यशस्वीपणें चालली ही गोष्ट सहज-च न मानवणारा जो वर्ग होता त्यानें कांहीं निमित्त काढून पुढें त्याचें पर्यवसान भयंकर हत्याकाण्डांत झालें. या **पेशावर** येथील प्रकरणाच्या भयंकर वार्ता प्रसृत होऊं लागल्या. शंकडों माणसें गोळीबारास बळी पडली, रस्त्यावर प्रेतें पडून आहेत, लोक निराधार, निराश्रित झाले आहेत. अशा बातम्या फैलावूं लागल्यानें तेथील वस्तुस्थिति पाहून घाबरल्यास धीर द्यावा, त्यांना वैद्यकीय व अन्नवस्त्राचें साहाय्य करावें या हेतूनें **पंडितजींनीं पेशावरला** जाऊन तेथलि निराश्रितांस मदत करण्याचा हेतू प्रसिद्ध केला. त्याबरोबर सरहद्द प्रांतीय कमि-शनरनें त्यांस आपल्या प्रांतांत येण्यास मनाई हुकूम काढला. पंडितजींनी त्यावर हिंदुस्थानसरकारकडे तारा करून आपला हेतू केवळ भूतदयेचा असल्यानें लोकांच्या मदतीसाठीं आपणांस जाऊं द्यावें अशी परवानगी मागितली. परंतु तिकडूनहि नन्नाचा पाढा आल्यानें पंडितजींनीं हुकूम मोडून पेशावरला जाण्याचें योजिलें व त्याप्रमाणें आपले पुत्र **पं. गोविंद मालवीय** यांसह ते पेशा-वरला जाण्यास निघाले. परंतु सरहद्द प्रान्त लागण्यापूर्वींच त्यांस आग-गाडींतून उतरवून घेऊन बाहेर नेऊन सोडून देण्यांत आलें. व त्यांचा बेत अशा रीतीनें हाणून पाडला. त्यांस पेशावरास जाऊं दिलें नाहीं. परंतु अन्यायाचा हुकूम स्वाभिमानपूर्वक न पाळण्याचा त्यांनीं आपला निश्चय मात्र ढळूं दिला नाहीं.

**पेशावरमध्यें** अत्याचारास ऊत येत असतांच देशांतील राजकीय चळवळीला भर येऊं लागला होता, कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटींतील सभासदांना एका मागून एक कारागृहाची शिक्षा ठोठावण्यांत येऊं लागली. कित्येक ठिकाणीं कॉंग्रेसची

वर्किंग कामिटी व अनेक काँग्रेससंस्था बेकायदा ठरविण्यांत आल्या. **पंडितजी** प्रारंभापासून काँग्रेसचे एकनिष्ठ भक्त आहेत. **काँग्रेसच्या** सभासदांना अशा प्रकारें अटक होऊं लागतांच पंडितजींच्या स्वाभिमानास ती गोष्ट असह्य वाटून त्यांनीं आपण **वर्किंगकमिटीचे** सभासद होण्यास सिद्ध असल्याचें त्यावेळचे अध्यक्ष सरदार **वल्लभभाई** यांस कळाविलें व त्याप्रमाणें त्यांची वर्किंगकमिटीवर नेमणूक करण्यांत आलीहि. या वार्किंग कामिटीची सभा मुंबईस ता. १ ऑगष्ट १९३० रोजीं ठेवण्यांत आली होती व त्यासभेस वर्किंग कमिटीचे सर्व सभासद उपस्थित होते. त्यावेळीं मुंबईस जवळ जवळ पोलीस राज्यच सुरू असल्यानें ता. १ ऑगष्ट रोजीं **लोकमान्य टिळकांच्या** पुण्यतिथीनिमित्त तेथील प्रां. काँ. कमिटीनें योजिलेल्या मिरवणुकीस पोलीस कमिशनरांनीं मनाई केली. यासंबंधाचा प्रकार असाः—

## ता. १ आगष्टची मिरवणूक

मुं. प्रां. कांग्रेस कमिटीतर्फे प्रतिवर्षी **लोकमान्यांची** पुण्यातिथि साजरी केली जाते. त्याप्रमाणें १९३० सालींहि मुं. प्रां. कां. कमिटीनें **लो० टिळकांच्या** पुण्यतिथीनिमित्त ता. १ आगष्ट रोजीं सायंकाळीं **लोकमान्यांच्या** चौपाटीवरील समाधीपासून एक मिरवणूक काढून ती फ्लोरा फाऊंनटनकडे नेऊन **अझाद मैदानावर** आणावी व तेथें कांग्रेसचे अध्यक्ष सरदार **वल्लभभाई पटेल**, पंडित **मदन मोहन मालवीय** व इतर अखिल भारतीय पुढारी यांचीं भाषणें व्हावीं, असा कार्यक्रम ठरविला. कांग्रेस–कमिटीनें मिरववणूक काढण्याचें ठरावेलें कीं, पोलीस कामिशनर मनाई हुकूम काढीत. त्याचें पर्यवसान हुकूमबंदी मोडण्यांत होऊन कांग्रेसकमिटीचे आधिकारी पकडले जात व शेंकडों लोकांना लाठींचें तडाखे खावे लागत. ह्या सर्व गोष्टींची जाणिव असूनहि मुंबई प्रां. कां कमिटीनें मिरवणुकीचा कार्यक्रम टेवला.

कल्पना केल्याप्रमाणेंच सर्व गोष्टी घडून आल्या. मुंबईचे अ. पोलिस कमिशनर **मि. हेली** यानीं प्रां. कां. कमिटीच्या अध्यक्ष श्रीमती **सौ. हंसाबेन मेहता** यांना एक पत्र लिहून असें कळाविलें कीं, **टिळकादिनानिमित्त** निघणारी मिरवणूक हॉर्नबी रोडवर नेऊं नये तर क्रूकशँक रोडवरूनच अझाद

मैदानाकडे वळवावी. हें पत्र सकाळीं दहाच्या सुमारास **सौ. हंसा मेहता** यांना मिळालें. या पत्रांत असेंहि म्हटलेलें होतें कीं, ती मिरवणूक हॉर्नबी रोडवर जाऊं देण्यांत येणार नाहीं. लगेच युद्धमंडळानें ह्या पत्राचा विचार करून मिरवणूक पूर्वसंकेताप्रमाणेंच काढण्याचें ठरविलं. **लोकमान्यांच्या** स्वभावांत करारीपणा होता व त्यांचा निश्चयहि अढळ असे.त्याप्रमाणेंच प्रांतिक काँ. कमिटीनेंहि पुढील परिणामांचें चित्र डोळ्यापुढें असून एकदां जाहीर केलेल्या कार्यक्रमांत कानामात्रेचाहि फरक न करण्याचें ठराविलें.प्रान्तिक काँ. कमिटीचा निर्णय जाहीर होतांच पोलिस कमिशनर मिरवणूकबंदीकरतां पोलिसांचा बंदोबस्त करूं लागले. चौपाटीपासून हॉर्नबीरोडपर्यंत प्रत्येक नाक्यावर सार्जंट व लाठीवाले पिवळी पगडीवाले शिपाई ठेवण्यांत आले होते. मिरवणूक बोरीबंदरजवळ अडवा-याची असल्यामुळें एस्प्लेनेड पोलीस स्टेशनाच्या आवारांत पुष्कळ सार्जंट व पोलीस ठेवण्यांत आले होते; इकडे प्रान्तिक काँ. कमिटीनेंहि भावी लढ्यावर दृष्टि ठेवून धैर्यानें मिरवणुकीची सिद्धता चालविली होती.

बरोबर चार वाजतां दहा हजारांवर लोक टिळकसमाधीच्या शेजारीं जमा झाले. **लोकमान्यांच्या** समाधीला भक्तिपूर्ण अंतःकरणानें पुष्पें वाहण्यांत आलीं.

## मिरवणुकीला बंदी

प्रां. काँ. कमिटीच्या अध्यक्ष **सौ. हंसाबेन मेहता** यांच्या नेतृत्वखालीं मिरवणुकीला प्रारंभ झाला. मिरवणूक सँढर्स्ट रोडवरून गिरगांव बॅकरोडकडे वळावयाला लागली त्यावेळीं वर्किंग कमिटीची बैठक चालू होती. मिरवणुकीचा जयघोष ऐकून सरदार **वल्लभभाई पटेल**प्रभृति सर्व सभासद मिरवणूक पाहण्याकरितां बाहेर आले. पंडित **मदन मोहन मालवीय** यांना पोलिस कमिशनरचा हुकूम अगदीं अन्याय्य वाटत होता व तो हुकूम मोडण्यांत पुढाकार घेण्याची त्यांनीं तयारी दर्शविली होती. काळबादेवीला मिरवणूक आल्यावर पंडितजी हे त्यांचे चिरंजीव **श्री. गोविंद मालवीय** यांच्या समवेत मिरवणुकीला येऊन मिळाले व अग्रभागीं उभे राहिले. त्यांच्या आगमनाबरोबर त्यांच्या स्वागतार्थ टाळ्यांचा गगनभेदी कडकडाट झाला. **मालवियजी** मिरवणूकबंदीचा हुकूम मोडण्यास आपल्याबरोबर येणार हें पाहून

मिरवणुकींतील हजारों लोकांना दुप्पट अवसान आलें. क्रुकशँक रोडवर ज्यावेळीं मिरवणूक आली तेव्हां ती सुमारें एक मैल लांब पसरली होती.

## मिरवणूक अडवली

हॉर्नबीरोडवर मिरवणूक शिरणार इतक्यांत पोलिसांच्या रांगा पुढें उभ्या करून मिरवणूक अडवण्यांत आली. पंडित **मालवीयाजवळ** एक ऑफिसर आला व त्यांना सांगूं लागला कीं, " मिरवणूक पुढें जाऊं देऊं नये असा आपणाला सरकारचा हुकूम आहे." त्यावर **मालवीयजींनीं** उत्तर दिलें कीं "तो हुकूम गैरशिस्त असल्यामुळें मी मोडणार आहे." यानन्तर **पंडितजींनीं** सर्व लोकांनां रस्त्यावर बसण्यास सांगितलें व ते स्वतः सर्वांना शांत राहण्याविषयीं उपदेश करीत राहिले. शुभ्र पोषाक परिधान केलेली ती कृश मूर्ति ज्यांनीं त्या वेळीं त्या ठिकाणीं पाहिली त्यांच्या डोळ्यापुढून ती हलणें शक्य नाहीं. वर्किंग कमिटीची बैठक आटोपून **मौलाना अबुल कलाम अझाद** व **डॉ. शेरवानी** हेहि साडेसहा वाजतां तेथें आले, व रस्त्यावर बसले. आठ वाजण्याच्या सुमाराला सरदार **वल्लभभाई पटेल. सौ. कमला नेहरू, जयरामदास दौलतराम** ही मंडळी तेथें येऊन बसलीं. रस्त्यावर बसलेल्या मंडळींना खाण्यापिण्यास देण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. रात्रौं सवादहाच्या सुमाराला एक पावसाची जोराची सर आली. सर्वत्रांचे कपडे भिजून चिंब झाले, परंतु कोणीहि हललें नाहीं. त्यानन्तर थोडा वेळ **मौलानाअबुल कलाम अझाद, डॉ. शेरवानी, पण्डित मालवीय** हीं मंडळी कांहीं कामाकरितां घरीं जाऊन आली. जमलेल्या लोकांवर मधून मधून लाठ्या चालविण्यास सार्जंटांनीं प्रारंभ केला होताच. रात्रौ बाराला दिवस पालटत होता. त्यामुळें पोलीस काढून घेऊन मिरवणूक पुढें जाऊं देण्यांत येईल असें वाटलें होतें परंतु ती कल्पना फोल ठरली, सर्व पुढारी मंडळी एकदां जी रस्त्यावर बसली ती बसली. सत्तर वर्षें वयाचे पंडित **मालवीय** एक ब्लँकेट पांघरून डुकली घेत होते! रात्रीं १ वाजल्यापासून प्रभातफेऱ्या शहरांतून निघून मिरवणुकीला येऊन मिळूं लागल्या. झालें, जिकडे तिकडे पताका व राष्ट्रीय निशाणें दिसूं लागलीं. जसजशी जास्त जास्त पहांट होऊं लागली, तसतसे आल्हाददायक प्रशान्त वारे वाहूं लागले. जाग्र-

णानें झालेल्या त्रासाचा अंशतः तरी प्रतिकार झाला. " रघुपति राघव राजाराम हें भजन त्या समयीं तर अतिशयच गोड वाटलें.

## पोलिसांचा लाठीमार

इकडे पोलीस कमिशनरांनाहि पेंच येऊन पडलेला दिसला. **हॅाटसन-साहेबांना** पुण्याहून बोलावण्यांत आलें. ते सकाळीं येऊन पोंचले. त्यांचें व पोलीस कमिशनरांचें बोलणें झालें. सात वाजण्याच्या सुमाराला पोलीस-कमिशनर, **शेठ लालजी नारनजी, सरदार वल्लभभाई** व **पण्डित मालवीय** यांचीं बोलणीं झालीं. **पण्डित मालवीय** ज्या वेळीं मिरवणूक-बंदीचा हुकूम गैरशिस्त आहे असें सांगूं लागले त्या वेळीं **हेलीसाहेब** उद्गारले कीं " ही कांहीं असेंब्ली नव्हे " ! कमिशनरसाहेबांनीं शेवटीं निर्वाणीचें म्हणून असें सांगितलें कीं, " जर आपण येथून न जाल तर मी आपणास अटक करीन." यानंतर आणखीहि बरीच बोलाचाली झाल्यावर सरदार **वल्लभभाई पटेल, पंडित मालवीय, जयरामदास दौलतराम, डॉ. हर्डीकर** व **बॅ. शेरवानी** इ. वर्किंग कमिटीचे सभासद, व मुंबई कॉंग्रेस कमिटीच्या सुमारें ४० सभासदांना अटककरण्यांत आली. पुढाऱ्यांना व स्त्रियांना नेल्यावर स्वयंसेवकांना बाजूला उभें राहण्यास सांगण्यांत आलें. नंतर सर्व बाजूंनीं सार्जंट व शिपाई यांनीं लाठी चालविली. बाजूला काढलेल्या स्वयं-सेवकांना जाण्यास सांगण्यांत आलें. परंतु ते एक इंचाहि हलले नाहींत; तेव्हां त्यावरहि लाठीचे अमानुष प्रहार करण्यांत आले ! निशाणें हातांत घेऊन उभे असलेले शीख बेशुद्ध पडेपर्यंत एका जागेवर उभे होते. मारहाणींत **पंडित गोविंद मालवीय** यांनाहि पुष्कळ मार बसला. एकंदर सुमारें पांचशें लोकांना औषधोपचार करण्यांत आला.

## खटल्याला प्रारंभ

नंतर शनिवार तारीख २ आगष्ट रोजीं दुपारीं ११॥ वाजतां चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट मि. **दस्तूर** यांच्यापुढें खटल्याला प्रारंभ झाला. **पंडित मालवीय** पोलीस कमिशनरचे हुकूम कसे अन्याय्य होते हें सिद्ध करणार हें माहीत असल्यामुळें **पण्डितजींचें** भाषण ऐकण्यास अतोनात गर्दी झाली होती. खटला ऐकण्याकरतां आलेल्या मंडळींत **महात्माजींच्या** पत्नी,

**सौ. कमलादेवी नेहरू, श्री. विठ्ठलभाई पटेल, सौ. हंसा मेहता** हीं मंडळी प्रमुख होती. पण्डित **मालवीयांच्या** एका बाजूला श्री **विठ्ठलभाई पटेल** व दुसऱ्या बाजूला सरदार **वल्लभभाई** बसलेले होते.

खटल्याला प्रारंभ झाल्याबरोबर पंडित **मदन मोहन मालवीय** यांनीं कोर्टाला अशी विनंति केली कीं, ज्याअर्थीं सर **अर्नेस्ट हॉटसन** हे मुंबईला पोंचेपर्यंत पोलीस कमिशनरानें फक्त मिरवणूक अडवून धरली होती. परंतु गृहमंत्री **हॉटसनसाहेब** यांच्याशीं बोलणें झाल्यावर आम्हांला पकडण्यांत येऊन लाठ्या मारून मिरवणुकींतिल इतर लोकांना घालविण्यांत आलें, त्याअर्थीं सर **अर्नेस्ट हॉटसन** यांचें व पोलिसकमिशनरचें काय बोलणें झालें हें समजण्याकरितां **हॉटसनसाहेबांना** फिर्यादीतर्फे साक्षीदार म्हणून बोलावण्यांत यावें. मॅजिस्ट्रेटांनां **पंडितजींनीं** असेंहि बजावलें कीं, मि. **हेली** यांना फिर्यादीतर्फे साक्षीदार बोलावण्यांत येऊं नये असें आरोपीचें म्हणणें असतांनाहि ज्याअर्थीं मॅजिस्ट्रेटनें त्यांना बोलावलें त्याअर्थीं आमची **हॉटसन साहेबांना** बोलावण्याची मागणी मॅजिस्ट्रेटनें मान्य करावी. यापुढें **मालवियजींनीं** असेंहि सांगितलें कीं, **हेली** यांनीं स्वतःच्या वैयक्तिक मतानें सर्व गोष्टी केल्या नसून त्यांत सर **अर्नेस्ट हॉटसन** यांचाहि हात होता असें मला सिद्ध करावयाचें आहे.

**मालवीयजींचें** व मॅजिस्ट्रेटचें वरील आशयाचें बोलणें चालू असतां सरदार **वल्लभभाईंनीं** कोर्टाला उद्देशून असें सांगितलें कीं, सर **अर्नेस्ट हॉटसन** हे बोरीबंदरच्या गच्चीवर बसून पुढें काय करावें याविषयीं सल्ला देत होते, ही गोष्ट सर्वांना माहीत असल्यामुळें **हॉटसनसाहेबांना** बोलावून खटला लांबणीवर टाकूं नये. या कोर्टाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याला साक्षीला बोलावून कोर्टाची कुचंबणूक होऊं नये असें मला वाटतें. श्री. **जयरामदास दौलतरामप्रभृति** सर्वांनीं सरदार **वल्लभभाईंना** दुजोरा दिला. यावर मॅजिस्ट्रेट चेष्टेनें **मालवीयजींना** उद्देशून म्हणाले कीं, आपण अल्पमतवाले आहांत. यावर **मालवीयजींनीं** ताबडतोब असें उत्तर दिलें कीं, प्रत्येक आरोपीला स्वतःचा बचाव करण्याचा पूर्ण अधिकार आहे. यानंतर आणखी कांहीं प्रश्नोत्तरें झाल्यानंतर मॅजिस्ट्रेटनें **पंडितजींस**

असें विचारलें कीं, जर मी पोलीसकमिशनर **मि. हेली** यांना पुनः फेरतपासणीकरितां बोलावलें व त्यांच्या फेरतपासणींत **पंडितजींना** अपेक्षित असलेलीं उत्तरें मिळालीं तर काम भागेल अगर नाहीं ? या प्रश्नाला उत्तर म्हणून **मालवीयांनीं** असें सांगितलें कीं, **हॉटसनसाहेबांनाच** बोलावण्यांत यावें. यावर **वल्लभभाई** असें म्हणाले कीं, आमची राहण्याची व्यवस्था चांगल्या ठिकाणीं केल्यास खटला लांबविण्यास आमची हरकत नाहीं. आणखी कांहीं प्रश्नोत्तरें झाल्यावर **हेलीच्या** उलटतपासणीनंतर **हॉटसनसाहेबांना** बोलवावयाचें कीं काय याचा विचार करूं असें मॅजिस्ट्रेटनें सांगितलें.

पोलीसकमिशनर **मि. हेली** यांना बोलावणें पाठविण्यांत आल्यावर पंडित **मालवीयांनीं** टाइम्सच्या एका संपादकीय लेखांकडे कोर्टाचें लक्ष वेधून असें सांगितलें कीं, त्या लेखामुळें टाइम्सनें कोर्टाची बेअदबी केली आहे. **पंडितजींनीं** त्या लेखांतील कांहीं उतारे वाचून दाखविल्यावर मॅजिस्ट्रेटांनीं असें उद्‌गार काढले कीं, त्या लेखांत कोर्टाची बेअदबी करणारा मजकूर आहे असें दिसतें. परंतु त्या बाबतींत मला कांहींच मत प्रदर्शित करतां येत नाहीं. त्यांनीं पुढें असेंहि सांगितलें कीं, ही बाब हायकोर्टाच्या नजरेस आणणें एवढेंच मला करतां येण्यासारखें आहे. यानंतर सरदार **वल्लभभाई** म्हणाले, अँग्लोइंडियन वृत्तपत्रांना असें वाटतें कीं कोर्टाच्या निकालाची दिशा कोणती असावी हें सांगण्याचा आपणांस हक्क आहे. हें वाक्य व मॅजिस्ट्रेटाच्या कानीं पडल्यामुळें पुनः सरदार **वल्लभभाई** व मॅजिस्ट्रेट यांच्यामध्यें हटातटाचीं प्रश्नोत्तरें झालीं.

यानंतर **पं. मालवीयजींनीं** पोलिस कमिशनरसाहेबांची उलट तपासणी घेतली. पोलिस कमिशनरांनीं पंडितजींच्या प्रश्नांना जीं उत्तरें दिलीं त्याचा थोडक्यांत मथितार्थ असा. "कमिशनरसाहेबांनीं होममेंबर **सर हॉटसन** यानां मुंबईंतील टिळकदिनाच्या मिरवणुकीमुळें उत्पन्न झालेल्या परिस्थितीबद्दल स्वतः टेलिफोनहि केला नाहीं, अगर दुसऱ्याकडून करविला नाहीं. **हॉटसनसाहेब** मुंबईला येईपर्यंत पो. कमिशनरांचें व त्यांचें मुळींच बोलणें झालें नाहीं. **हॉटसनसाहेब** आले ते मुंबईला उत्पन्न झालेल्या बिकट परिस्थितीमुळें आले. त्यांना कोणी बोलावलें हें पो. कमिशनरना माहीत

होतें. परंतु तें गुपित फोडण्याचें त्यांनीं नाकारलें. **हॉटसनसाहेब** येणार ही बातमी शुक्रवारीं रात्रीं साडेदहालाच पो. कमिशनरला मिळाली होती. **हॉटसनसाहेबांचें** व पो. कमिशनरचें पुढील धोरणाविषयीं बोलणें झालें कीं नाहीं याची आठवणच पोलीस कमिशरसाहेबांना नव्हती! मिरवणूक पुढें जाऊं दिली तर योग्य होईल कीं नाहीं याविषयीं पो. कमिशनर व हॉटसन यांचें बोलणें झालें नाहीं. मिरवणूक उधळून लावली जाईपर्यंत **हॉटसन-साहेब** बोरीबंदरच्या गच्चीवर बसून होते!" अशा अर्थाचीं उत्तरें मिळाल्या-वर धरपकडीविषयीं प्रश्नोत्तरें चालू असतां मॅजिस्ट्रेटचे व **मालवीयजींचे** बरेच खटके उडाले. मि. **हेली** यांची साक्ष आटोपल्यावर **पंडितजींनीं सर अर्नेस्ट हॉटसन** यांना साक्षिदार म्हणून आणण्याविषयीं अर्ज केला. तो कोर्टानें फेटाळून लावला.

सरकारतर्फे **मि. ठाणावाला** यांचें भाषण झाल्यावर पंडित **मदन मोहन मालवीय** यांनीं कोर्टाला उद्देशून सुमारें दोन सवादोन तास पुढील आशयाचें भाषण केलें.

## नागरिकत्वाच्या हक्कावर गदा.

"ज्यामुळें नागरिकांच्या मूलभूत हक्कांना बाध येतो अशा कोणत्याहि हुकुमाला कायदेशीरपणा फारच कमी असतो. कमिशनरच्या हुकुमाला न जुमा-नता हॉर्नबी रोडवरून जाण्याचा मिरवणुकीला हक्क होता. सर्व दृष्टींनीं कायदे-शीर असलेल्या सभांना अगर जमावांना बंदी करण्याचा हक्क सरकारला पोंचत नाहीं. जर हॉर्नबीरोडवरून मिरवणूक गेली तर त्यामुळें रहदारीस अडथळा होण्याचा संभव आहे असें म्हणून त्या रस्त्यावरून मिरवणूक नेऊं नये अशी साधी विनंति करणें एवढीच सत्ता कमिशनरच्या हातीं देण्यांत आली आहे. परंतु कमिशनरच्या सांगण्यावरूनच क्रूकशंक रोडवर फक्त चारहजारच लोक होते व या लोकांमुळें हॉर्नबीरोडचा फार तर एकतृतीयांश भाग व्यापला गेला असता. तसेंच यापूर्वीं कित्येक वेळां मिरवणुकी शांतपणें हॉर्नबीरोडवरून गेलेल्या आहेत. अशी वस्तुस्थिति असतां कमिशनरनें मिरवणुकीला बंदी करणें म्हणजे राजरस्त्यावरून जाण्याच्या नागरिकांच्या हक्कावर अन्याय्य हल्ला करणें होय. मिरवणुकीमध्यें कोणत्याहि प्रकारचे गुंड नसून सुशिक्षित व अदबीनें

वागणारी स्त्री-पुरुषमंडळी होती. कायदे मोडण्यांत मला आनंद वाटत नाहीं. परंतु ज्या वेळीं मला असें कळलें कीं, **सौ. हंसा मेहता**सारख्या माझ्या कन्या व भगिनीसमान उच्चकुळांतील स्त्रिया असलेली मिरवणूक रस्त्यावर अडविण्यांत येईल व क्वचित् त्यांवर हल्लाहि करण्यांत येईल त्यावेळीं त्या मिरवणुकींत सामील होणें हें माझें कर्तव्य होतें.ज्यांना राजरस्त्यावरून जाण्याचा हक्क होता अशा लोकांनीं रस्त्याचा एकतृतीयांश भाग अडवला असता तर त्यामुळें कोणता अनर्थ कोसळला असता ?

## अनत्याचारी समाज

"मिरवणुकींत सामील झालेले स्त्री-पुरुष सुखासमाधानानें आपल्या घरीं राहणारे होते परंतु त्या सुखी जीवनक्रमाचा त्याग करून थंडीवाऱ्याला न जुमानतां ते सर्व लोक रात्रभर जागत रस्त्यावर बसले होते. त्यांची कल्पना अशी होती कीं, निदान मध्यरात्रीनंतर तरी मिरवणूक पुढें जाऊं देण्यांत येईल. कमिशनराच्या स्वतःच्या सांगण्याप्रमाणेंच शहरचा व्यापार-उदीम साधारणतः सकाळीं नऊ वाजेपासून सायंकाळीं साडेसात वाजेपर्यंत चालतो. असें असतां व मिरवणूक दोघां-दोघांच्या रांगांनीं जाईल असें सरदार **वल्लभभाईंनीं** सुचविलें असतां रात्रौ मिरवणूक कां पुढें जाऊं दिली नाहीं ? सबंध रात्रभर मिरवणुकींतिल लोक रस्त्यावर बसून राहिल्यानंतर पोलीस कमिशनर येतो व मिरवणूक बळजोरीनें मोडून टाकण्याचा हुकूम करतो. जो मनुष्य इतका कोडगेपणा ( Callousness ) दाखवितो तो जनतेचा नोकर होण्याच्या लायकीचाच नाहीं. यानंतर लोकांनीं निमूटपणें पोलिसांच्या हातचा मार खाल्ला. यांचे कारण लोकांच्या मनावर **महात्माजींच्या** शिकवणुकीचा झालेला इष्ट परिणाम हें होय." असें सांगून **पंडितजींनीं** सद्गदित अंतःकरणानें परमेश्वराचे व **महात्माजींचे** कृतज्ञतापूर्वक आभार मानले.

## पोलीसचें कर्तव्य

उपहाराच्या सुट्टीनंतर **पंडित मालवीय** यांनीं आपल्या भाषणाला पुनः प्रारंभ केला. ते म्हणाले " पोलीस कमिशनरला दिलेले अधिकार त्यानें लोकांच्या सुखसोयीकडे लक्ष पुरवावें म्हणून दिलेले आहेत. जर

रस्त्यावर गर्दी होईल असें कमिशनराला वाटलें होतें तर त्यानें निराळा रस्ता आंखून द्यावयाला पाहिजे होता. मुंबईच्या लोकांचे न्याय्य हक्क मर्यादित करण्याची अनियंत्रित सत्ता त्याच्या हातीं देण्यांत आलेली नाहीं. लोकांचे न्याय्य हक्क कायद्यानें मान्य केलेले आहेत. आणि त्या हक्कांना नियंत्रण घालावयाचें असेल तर त्यानें तसें करण्याची कारणें देऊन आपलें करणें हक्क योग्य आहे असें सिद्ध केलें पाहिजे." आपल्या म्हणण्याला आपण कांहीं आधार द्याल काय असा प्रश्न करतांच **पंडितजी** म्हणाले, "सारासार विचार शक्ति म्हणजेच नऊ-दशांश कायदा आहे. कमिशनरनें हुकूम करतांना लोकांच्या हिताचा व पोलिस रेग्युलेशनन्सचा नीट विचार केला होता अगर नाहीं, नव्हे मुळांत विचार तरी केला होता कीं नाहीं हें ठरवितांना कोर्ट सारासार विचारशक्तीचा उपयोग करील असा मला भरंवसा आहे. कमिशनराला मनसोक्तपणानें जुलमी हुकूम काढण्याचा अधिकार नाहीं.

"जर तो अन्याय हुकूम मी पाळला असतां तर माझी छीःथूः झाली असती. पोलिस कमिशनराला माझ्या हक्कांच्या आड येण्याचा अधिकार नाहीं. जर रस्त्यावर गर्दी असेल तर ती मोडून रस्ता मोकळा होईपर्यंत थांबण्यास सांगण्याचा कमिशनरला कायद्यानें अधिकार दिला आहे. परंतु रस्ता मोकळा होतांच तो त्याचा अधिकार संपुष्टांत येतो. पोलिस कमिशनर मिरवणूक जेथें थांबविण्यांत आली तेथें हजर होते. हॉर्नबी रोडवरील रहदारी थांबल्यावर त्यांनीं आपला पूर्वीचा हुकूम बदलावयास पाहिजे होता. परंतु त्यांनीं तसें केलें नाहीं. असें न करण्यांत ते कायद्याच्या तत्त्वाविरुद्ध वागले असें मला वाटतें. ते म्हणतात कीं आम्हीं त्यांचा हुकूम मोडला. परंतु हा अधिकाराचा उन्माद आहे. हिंदुस्थानसारख्या देशांतच अधिकारी उन्मत्तपणानें वागूं शकतात. लाडामुळें बिघडलेल्या तिरसट मुलाची जी स्थिति, तीच पोलिस कमिशनरची स्थिति आहे."

## खटल्यांत भाग कां घेतला ?

या खटल्याच्या कामांत आपण भाग कां घेतला, यासंबंधीं **मालवीयजींनीं** जें स्पष्टीकरण केलें तें असें– "मी कांहीं साक्षीदारांना जे थोडे प्रश्न विचारले व थोडक्यांत जें माझें म्हणणें कोर्टापुढें मांडलें, तें स्वतःचा बचाव करण्याच्या

अगर खटल्यांतून सोडवणूक होण्याकरितां नव्हे. हिंदुस्थानांतील न्यायालयांच्या सद्यःस्थितीकडे लक्ष टाकल्यास राजकीय स्वरूपाचे ज्यांच्यावर खटले होतात व त्यांत जे भाग न घेण्याचें ठरवितात त्यांच्या तशा वागण्यांतच जास्त तथ्यांश असतो. याकरितांच मी बचावाकरितां माझ्या बाजूनें कोणताच साक्षीदार बोलावला नाहीं. अशा तऱ्हेच्या खटल्याचें सत्यस्वरूप काय असतें याची थोडीशी तरी कल्पना जगाला यावी म्हणून मीं एवढा तरी भाग घेतला. ”

शनिवारीं सायंकाळीं पं. **मालवीय** प्रभृतींवरील खटला चालू असतां, पोलिस कमिशनरचें पत्र हा हुकूम मानावा अगर मानूं नये, व शनवारीं सकाळीं त्यानें पुढाऱ्यांना रस्त्यावरून निघून जाण्यासाठीं केलेला तोंडी हुकूम न्याय्य होता किंवा नव्हता हे कायद्याचे प्रश्न उद्भूत केल्यामुळें चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट मि. **दस्तूर** यांनीं सोमवार ता. ११ पर्यंत खटला तहकूब केला. पोलिस कोठडींत अत्यंत अस्वच्छता असते अशी तक्रार सरदार **वल्लभभाई** प्रभृतींनीं केली. पुढारी कोणत्याहि प्रकारचा जामीन देण्यास तयार नसल्यामुळें मॅजिस्ट्रेटला त्यांना कोठडीबाहेर सोडतां येईना. परंतु पुढाऱ्यांची गैरसोय होऊं नये म्हणून त्यांना बाहेरच्या लोकांच्या गांठी भेटी घेऊं दिल्या जाव्या व त्यांच्या मनाप्रमाणें त्यांची जेवणाची व्यवस्था व्हावी असे हुकूम मॅजिस्ट्रेटनें दिलें होते.

## खटल्याचा निकाल

परंतु मॅजिस्ट्रेटनें सोमवारची वाट न पाहतां गुरुवारींच **मालवीय, पटेल** प्रभृतींवर भरलेल्या खटल्याचा निकाल सांगितला. निकाल सांगतांना मॅजिस्ट्रेटांनीं फिर्यादीचें सर्व म्हणणें मान्य केलें. पोलिस कमिशनरनें **सौ. हंसा मेहतांना** पाठविलेलें पत्र हा हुकुम होता, पोलिसकमिशनरनें शनिवारीं सकाळीं दिलेला तोंडी हुकूम कायदेशीर होता तो तोंडी हुकूम मोडल्याचा गुन्हा आरोपींनीं केला असें मॅजिस्ट्रेटांनीं मत दिलें; पंडित **मालवीय** व **वल्लभभाइ** यांची मुलगी श्रीमती **कुमारी मनुबेन पटेल, बाई रतनबेन मेहता, बाई हरनाम कुवर** व **अमृत कुवरबाई** यांना प्रत्येकीं १०० रुपये दंड अगर १५ दिवसांची साधी कैद सांगण्यांत आली. सरदार **वल्लभभाई, मि. शेरवाणी,** श्री. **जयरामदास दौलतराम, डॉ.**

**हर्डीकर**, श्री.**एस. टी. पालेकर**, श्री. **रमाकांत मेहता**, **बाबू-भाई जव्हेरी मि. एच वी.. व्यंकटराम**, **के. जी. नारायण अय्यर** या सर्वांना प्रत्येकीं तीन महिन्यांची साधी शिक्षा ठोठावण्यांत आली. पंडित **मालवीयांना** इतरांपेक्षां कमी शिक्षा देण्याचें कारण मॅजिस्ट्रेटनें असें सांगितलें कीं, 'पंडित **मालवीयांचा** हेतु कायदेभंग करण्याचा नसून पोलिस कमिशनरचा हुकूम कायदेशीर होता अगर नाहीं एवढेंच पाहण्याचा होता.' सर्वांनीं अगदीं हंसत मुखानें शिक्षा ऐकल्या. या अखिल भारतीय पुढाऱ्यांना शिक्षा झाल्यामुळें मुंबईमध्यें तीन दिवस हरताळ पाडण्यांत आला.

खटल्याचा निकाल झाल्यावर पं. **गोविंद मालवीय** यांनीं त्यांच्या वडिलांनीं मॅजिस्ट्रेटांनीं उद्देशून लिहिलेलें पत्र त्यांनीं कोर्टापुढें सादर केलें. त्यांत पंडित **मालवीयांनीं** कोर्टाला असें स्पष्ट कळविलें कीं, मी स्वतः तर दंड देण्यास तयार नाहींच, परंतु इतरांनींहि माझ्यातर्फे दंड भरूं नये. जर कोणीं दंड भरलाच तर तो कोर्टानें स्वीकारूं नये. यावर मॅजिस्ट्रेटांनीं असें उत्तर दिलें कीं, पं. **मालवीयांना** तुरुंगांत जाण्याची वेळ येऊं नये अशी माझी इच्छा आहे. त्यांना दंडाची शिक्षा करण्यांत हाच हेतु होता. जर त्यांनीं दंड दिला नाहीं तर नाइलाज म्हणून त्यांना तुरुंगांत पाठवावें लागेल. आरोपींचा दंड जरी कोणीहि भरला तरी त्यानंतर दंड द्यावा कीं शिक्षा भोगावी हा प्रश्नच आरोपीच्या इच्छेवर राहात नाहीं.

मॅजिस्ट्रेटनें निकालांत असें म्हटलें होतें कीं, **मालवीयांना** कमी शिक्षा देण्याचें कारण असें कीं, त्यांचा हेतु कायदेभंग करण्याचा नव्हता. शिक्षेनंतर आपल्या चिरंजीवामार्फत वृत्तपत्राकडे पाठविलेल्या स्पष्टीकरणामध्यें **पंडित-जींनीं** पुनः पुनः असें म्हटलें आहे कीं, "पोलिस कमिशनरनें केलेला अन्याय हुकूम मी बुद्धिपुरस्पर मोडला आहे, माझे इतर सहकारी व मी यांना निरनिराळ्या शिक्षा द्यावयाच्या होत्या तर वयानें मी इतरांपेक्षां मोठा असल्यामुळें माझें म्हणणें असें कीं, मलाच अधिक शिक्षा व्हावयास पाहिजे होती. पोलीस कमिशनरचा हुकूम जुलमी व अन्याय्य होता असें माझें मत झालें व तो हुकूम मोडणें हेंच सर्व नागरिकांचें कर्तव्य होतें. जरूर पडली असा हुकूम मी आणखी वीस वेळांहि मोडीन."

## मालवीयांची अचानक सुटका झाली !

पंडित मालवीय यांना दंड अगर कारागृहवास अशी वैकल्पिक शिक्षा दिली गेली होती. आपल्या इतर सहकाऱ्यांपेक्षां आपणाला मॅजिस्ट्रेटनें कमी शिक्षा दिली, व दिली तीहि वैकल्पिक दिली ही गोष्ट **पंडितजींच्या** मनाला लागून त्यांनीं सर्वांना अशी विनंति केली कीं, त्यांच्याकरितां कोणीहि दण्ड भरूं नये. **पंडितजींनीं** ही गोष्ट पुनः पुनः सांगितली असूनहि कोणा एका माणसानें शुक्रवारीं दुपारीं साडेतीन वाजण्याच्या सुमाराला दण्डाचे पैसे भरले. शुक्रवारीं सकाळपासून अशा बातम्या कानीं पडूं लागल्या कीं कोणीं तरी **पण्डितजींचा** दण्ड भरणार आहे. परंतु दण्ड दुपारीं साडेतीनच्या सुमारास भरला जाऊनहि सायंकाळच्या वृत्तपत्रांतहि ही बातमी आली नाहीं. सहा वाजल्यानंतर हळूहळू **मालवीयांच्या** सुटकेच्या बातम्या पसरूं लागल्या. परंतु सायंकाळीं साडेसहा-नंतर चौपाटीवरच्या सभेला **पं. मालवीय** हे **श्री. विठ्ठलभाई पटेल** यांच्यासमवेत येईपर्यंत कोणाचाहि विश्वास त्यांच्या सुटकेवर बसेना. **पण्डितजींचा** दण्ड कोणीं भरला हें अखेरपर्यन्त गुलदस्तांतच राहिलें.

त्यासंबंधानें जी बातमी बाहेर आली ती अशी कीं, शुक्रवारीं एक मनुष्य कोर्टांत जाऊन **पण्डितजींचा** दण्ड कसा भरावयाचा याची चौकशी करूं लागला. त्या दिवशीं सुट्टी असल्यामुळें कोर्ट बंद होतें व त्यामुळें तेथें पैसे भरण्याची शक्यता नव्हती. असें समजतें कीं, आतां पुढें कसें करावें, या विचारांत तो मनुष्य असतां एका पोलीस अधिकाऱ्यानें त्याला असें सुचविलें कीं, जर त्यांनीं प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट **खंडाळावाला** यांची भेट घेतली तर ते कांहीं मार्ग सांगतील. त्याप्रमाणें त्यानें **श्री. खंडाळावाला** यांची भेट घेतली. त्यांनीं असें सांगितलें कीं, आर्थररोड तुरुंगाच्या जेलरजवळ पैसे भरल्यास **पण्डितजींना** सोडण्यांत येईल. लगेच तो गृहस्थ आर्थररोड तुरुंगांत गेला, व त्यानें इतक्या शिताफीनें दंडाची रक्कम भरली कीं, **पं. मालवीयांची** व त्या गृहस्थाची दृष्टिभेटहि झाली नाहीं अगर **पंडितजींनी** अत्याग्रह धरला तरी जेलरनें त्यांना तो दंड भरून जाणाऱ्या माणसाचा थांगपत्ता लागू दिला नाहीं. ज्या वेळीं पंडितजींना जेलरनें त्यांचा दंड भरला गेल्याची बातमी

सांगितली त्या वेळीं त्यांना अतिशय आश्चर्य वाटलें, व पैसे भरणाऱ्या माणसाचा रागहि आला. **पंडितजी** तुरुंगाबाहेर पडण्यास राजी नव्हते असें म्हणतात. त्यांनीं तत्संबंधीं जेलरला पुष्कळ छेडलें, परंतु शेवटीं जेलरनें त्यांना असें सांगितलें म्हणतात कीं, कायद्याप्रमाणें त्यांना यापुढें पळभरहि तुरुंगांत ठेवणें शक्य नाहीं. शेवटीं नाइलाजानें **पंडितजींनीं** सरदार **वल्लभभाई** प्रभृतींचा निरोप घेतला व ते तुरुंगाबाहेर आले.

सुटकेनंतर **पंडितजी** चौपाटीवर गेले. तेथील सभेंत ते व **श्री. विठ्ठलभाई** यांचीं भाषणें झालीं. दोघांनींहि आपल्या भाषणांत असें सांगितलें कीं, ज्यांनीं **पंडितजींचा** दंड भरला ते देशप्रेमी नसून देशद्रोही आहे त्यानंतर श्वेतांबर जैन परिषदेच्या विद्यमानें झालेल्या भाषणांत **पंडितजींनीं** असें जाहीर केलें कीं, त्यांचा ब्रिटिशांवरील विश्वास पूर्णपणें नष्ट झाला आहे.

## राजबंदी-दिनानिमित्त मिरवणूक

टिळक–दिनाच्या मिरवणुकीच्या दिवशीं इतके पुढारी पकडले असतां व शेंकडों लोकांना लाठी बसली असतांहि मुं. प्रां. कॉं. कमिटीच्या युद्धमंडळानें रविवारीं दहा तारखेला हॉर्नबी रोडवरून राजबंदी–दिनाची मिरवणूक नेण्याचें ठरविलें. रविवारीं मिरवणुकीला बंदी होणार कीं नाहीं याबद्दलचे विचार लोकांच्या मनांत घोळत होते. शनिवारपासून तर कॉंग्रेस हाऊसकडे जाणाऱ्या रस्त्यावर अतिशय गर्दी झाली होती. त्यांत **पंडित मालवीय** यांची सुटका झाल्यावर त्यांनीं असें जाहीर केलें कीं, जर कमिशनरनें रविवारच्या मिरवणुकीला बंदी केली तर मी पुनः सत्याग्रह करीन. यामुळें एक निरालेंच चैतन्य लोकांत उत्पन्न झालें. हॉर्नबी रोड व एस्प्लेनेड रोडवरील व्यापाऱ्यांनीं पो. कमिशनरकडे असा अर्ज केला कीं, कॉंग्रेसच्या अगर इतर तत्सम मिरवणुकींमुळें त्यांची मुळींच गैरसोय होत नाहीं. रविवारीं अगदीं सायंकाळपर्यंत असें वाटत होतें कीं, मिरवणूक-बंदीचा हुकूम येईल, परंतु तसें कांहीं झालें नाहीं. पावणेपांचाच्या सुमाराला मिरवणुकीला प्रारंभ झाला. मिरवणुकीच्या अग्रभागीं **पंडित मालवीय** व **विठ्ठलभाई पटेल हे** होते. मिरवणूक एवढी मोठी होती कीं, ती एका जाग्यावरून जाण्यास पाऊण तास लागत होता. मिरवणूक अगदीं शिस्तीनें व शांतपणानें हॉर्नबी रोडवरून

व्हाइटवे लेडलॉच्या दुकानापर्यंत जाऊन खलास झाली व तेथून सर्व लोक घरोघर पसरले.

कायदेभंगाच्या चळवळींत भाग घेतल्याचें पर्यवसान असें होऊन **पंडितजींची** कोणी तरी अज्ञात माणसानें दंड भरून सुटका केली असली तरी **पंडितजींचा** कारागृहवास कांहीं चुकला नाहीं. सरकारची दडपशाही सारखी वाढत्याच प्रमाणांत होती व तींत अखेर कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटीची आहुति घेण्यांत आली. कॉंग्रेस वर्किंग कमिटी ही संस्थाच बेकायदा ठरविण्यांत आली. परंतु सरकारनें जितक्या जोरानें दडपशाही केली तितक्याच दुर्दमनीय उत्साहानें लोकहि निकरानें भांडूं लागले. वर्किंग कमिटी बेकायदा ठरवितांच दिल्ली येथें कॉंग्रेस वर्किंग कमिटीची बैठक त्या वेळचे अध्यक्ष **डॉ. अन्सारी** यांनीं बोलावली. सभेचें काम सुरू होतांच हजर असलेल्या सर्व सभासदांस सरकारनें अटक करून प्रत्येकास सहा सहा महिन्यांची शिक्षा ठोठावली. त्यांत **पं. मालवीयजी** हेहि असल्यानें त्यांसहि ह्या सहा महिन्यांच्या सक्तीचा सरकारी पाहुणचार मिळाला.

ह्या कारागृहवास **पंडितजींच्या** थकित प्रकृतीस मानवला नाहीं. तेथें त्यांची प्रकृति एकंदरीनें खराबच झाली. तुरुंगांत सर्व आचार बाहेर प्रमाणेंच अत्यंत कडकपणें ते पाळीत. रामायण, महाभारत, भागवत या ग्रंथांचें परिशीलन हा त्यांचा नित्याचा व्यवसाय होता. पुढें **गांधी-आर्विन** वाटाघाटींच्या तहान्वयें त्यांची सुटका झाली त्यावेळीं. त्यांची शिक्षा फक्त एकच महिना भोगावयाची राहिली होती.

# उपसंहार

## देवाजवळील नंदादीप

" हिंदुत्वाचा आदर्श कोण असा मला कोणी प्रश्न केला तर मी हिंदुस्थानांतील एकाच विभूतीकडे बोट दाखवीन व ती म्हणजे **पंडित मदनमोहन मालवीयजी**. त्यांची ओळख करून देणें म्हणजे सूर्याची ओळख करून देण्यापैकीं प्रकार आहे. परस्परविरोधी गुणांचा उत्तम समन्वय करून दाखविण्याचें खरें कौशल्य कोणामध्यें असेल तर तें **पंडितजींमध्यें** आहे. **पंडितजींची** दृष्टि अगर विचारसरणी एकांगी नसून जुन्यांतील चांगलें त्याचप्रमाणें नव्यांतीलहि चांगलें घेऊन त्यांचा ते उत्तम समन्वय करूं शकतात. जुन्या व नव्या संस्कृतीचा सुंदर मिलाफ कसा घालावा हें **पंडितजींइतके** उत्तम कोणीच जाणीत नाहीं. **हिंदुविश्वविद्यालय** हें या सुंदर मिलाफाचें उत्कृष्ट उदाहरण आहे. **पंडितजींनीं** इतर राष्ट्रकार्यें अनेक केलीं असतील व तशीं ते करतातहि. परंतु **हिंदुविश्वविद्यालयाची संस्थापना** हें त्यांचें एकच कार्य इतकें मोठें व भव्य आहे कीं, त्या एकाच कार्यामुळें त्यांचें नांव चिरंजीव होईल. या **विश्वविद्यालयासाठीं** त्यांनीं एकट्यांनीं **एक कोटी चाळीस लक्ष रुपये** जमविले. यावरून त्यांनीं केलेलें कार्य किती मोठें असेल अशी कल्पना येईल. डोळे दिपवितील अशा विजेसारख्या दिव्याप्रमाणें चमकणारे लोक कांहीं कमी नाहींत परंतु त्या दिव्यापेक्षांहि देवाजवळ लावलेल्या नंदादीपाचें महत्त्व कांहीं वेगळेंच असतें व त्यानें जी चित्ताला एक प्रकारची प्रसन्नता वाटते ते **पंडितजी** आहेत. "

ता. २२ जून रोजीं **पंडित मदनमोहन मालवीय** यांच्या हस्तें **श्रीक्षेत्र वाई** येथें गोशाळा मंदिराचा अनावरण समारंभ झाला त्याच दिवशीं सायंकाळीं वाईकर नागरिकांनीं पंडितजींना **मानपत्र** समर्पण केलें. त्या प्रसंगीं **पंडितजींची** ओळख करून देतांना **श्री. तात्यासाहेब**

**केळकर** यांनीं पंडितजींच्याबद्दल वरील उद्गार काढले. या उद्गारांत **पंडित-जींच्या** चरित्राचें सारसर्वस्व आहे.

## ब्राह्मण्याचा खरा आदर्श

याच मानपत्र-समारंभाचे स्वागताध्यक्ष **रा. ब. ग. रा. दातार** यांनीं मानपत्र समर्पण करतांना **पंडितजींचें** केलेलें गुणवर्णन यथोचित असून थोड क्यांत व मार्मिकरीतीनें त्यांनीं पंडितजींचें चित्र रेखाटलें आहे. ते म्हणाले: 'आपल्या भारतभूच्या मुकुटावर जे बहुमोल हिरे चमकत आहेत त्यांतील **पंडित मालवीयजी** हा अष्टपैलू हिरा आहे. **मालवीयजी** हे नामत, रूपतः, जन्मतः, स्थानतः, ज्ञानतः,अधिकारतः,आचारतः व कीर्तितः असे अष्टांग सुंदर आहेत.

" त्यांचें **मदन मोहन** हें नामहि किती श्रवणमनोहर आहे ! हें नांव देऊन आपल्या मुलाचें नामकरण करणारे त्यांचे मातापिता धन्य होत. मुलाचें नामकरण सुश्राव्य करणें हें फारसें अवघड नाहीं. पण नांवाप्रमाणें करणी करणारा पुत्र निपजणें ही मात्र महद्भाग्याची गोष्ट आहे.

" **पंडितजी** हे जन्मतः ब्राह्मण आहेत. 'वर्णानाम् ब्राह्मणः श्रेष्ठः' असें म्हणण्याचे हे दिवस आहेत कीं नाहीं हें सांगतां येत नाहीं, तथापि **पंडितजी** केवळ जन्मानेंच ब्राह्मण आहेत असें नाहीं तर गुणतःहि ब्राह्मण आहेत व सुदैवानें ब्राह्मणास प्रिय व योग्य असें पवित्र पावन **प्रयागराज** हें क्षेत्र त्यांचें निवास-स्थान आहे.

" विद्या ही ब्राह्मणाची मुख्य शोभा आहे. त्याप्रमाणें **पंडितजींची** विद्वत्ता सर्वमान्य आहे. परंतु स्वतः विद्वान् असण्यानें ब्राह्मणाची कर्तव्यता पूर्ण होत नाहीं. दुसऱ्यास विद्वान् करणें हें त्याचें आद्य कर्तव्य आहे. व हें कर्तव्य प्रस्तुत कालास अनुसरून **श्रीक्षेत्र काशी** येथें **हिंदु विश्वविद्यालयाची** स्थापना करून त्यांनीं विश्वाच्या निदर्शनास आणून दिलें आहे.

"हे केवळ पुस्तकी पंडित नाहींत; तर आचारसंपन्न असल्याचा त्यांचा लौकिक आहे. केवळ कर्मठहि नाहींत. ' आत्मवत् सर्व भूतानि यः पश्यति स

'पश्यति ' असे ते शुद्ध सत्वशील ब्राह्मण आहेत व अशांच्या हातूनच समाजाचा उद्धार होत असतो "

## गंगौघाप्रमाणें वक्तृत्त्व.

. व्यापक अशा सार्वजनिक कार्यक्षेत्रांत त्यांनीं वयाच्या २४ व्या वर्षी पाऊल टाकलें. तेव्हांपासून आजतागायत त्यांनीं एकनिष्ठेनें देशसेवा चालविली आहे. विशुद्ध चारित्र्य, अचल धर्मनिष्ठा, अपरिमित त्याग, उज्वल तपःसामर्थ्य, नम्र स्वभाव, जाज्वल्य देशाभिमान, या गुणसमुच्चयाची मूर्ति म्हणजे **पंडित मालवीयजी** होत. वक्तृत्त्व तर असें अगाध कीं, हिंदुसंस्कृतीचें महत्त्व, अगर देशवासीयांची हल्लींची हीन दशा या संबंधानें बोलूं लागतांच त्यांच्या गंगौघाप्रमाणें अस्खलित वाक्प्रवाहाच्या द्वारें श्रोत्यांचें भान हरपून त्यांना आपल्या बरोबर सहज घेऊन जातात.

आज त्यांचें वय सत्तरावर गेलें असलें तरी त्यांची कार्यतत्परता एखाद्या तरुणास लाज वाटवील अशी आहे. अत्यंत निरलस वृत्ति, वागणूक अत्यंत साधी, कोणीहि कांहींहि कारणानें त्यांच्या भेटीस जावो हास्यमुखानें त्याचें स्वागत करून त्याच्याशीं दोन गोड शब्द बोलल्याखेरीज त्याला ते कधींच परत पाठविणार नाहींत.

**सं. प्रांतांत पंडितजींच्या** बरोबरीचे अनेक सुप्रसिद्ध पुढारी होऊन गेले व अद्यापहि आहेत. त्यांच्या इतकाच **पंडितजींचा** सरकारशीं संबंध येत असतो. परंतु इतर लोक जसे अनेक कारणांनीं पाश्चात्य संस्कृतीशीं तादात्म्य किंबहुना एकरूप होऊन गेले तसे **पं. मालवीयजी** कधींच झाले नाहींत. परंतु आपल्या साध्या व अकृत्रिम आचारानें त्यांनीं गोऱ्या लोकांवर नेहमींच छाप ठेवलेली आहे.

## विविध कार्यें

**पंडितजींचा** सार्वजनिक जीवनक्रम, हिंदुस्थानांतील सर्व श्रेष्ठ अशा **हिंदी राष्ट्रीय महासभेच्या** जीवनक्रमाबरोबर सुरू झाला व आज तागायत तो त्या महनीय संस्थेशीं निगडित आहे. **लोकमान्य टिळक, ना. गोखले** अगर **महात्मा गांधी** यांच्याप्रमाणें **पंडितजी** एखाद्या विशिष्ट राजकीय संप्रदायाचे प्रणेते नसले तरी त्या कोणापेक्षांहि त्यांचें स्वदेशप्रेम कोणा-

लाच कमी म्हणतां येणार नाहीं, ही गोष्ट मात्र सत्य आहे. ते आपल्या विशिष्ट तेजोगोलांत फिरत असले व आपल्या आकर्षणानें इतर गोलकांना आपल्या कक्षेंत फिरवूं शकत नसले तरी राष्ट्रीय जीवनाला अत्यावश्य असें कार्य मात्र ते अखण्ड करीत आहेतच. **राष्ट्रीयसभेचे** तर ते प्रारंभापासून निष्ठा-वन्त भक्त आहेत. कायदेमंडळांत करतां येईल तितकी लोकसेवा त्यांनीं करण्यास कुचराई केलेली नाहीं, हिंदुसमाजाची वाढती अधोगति पाहून अंतःकरण तिळतिळ तुटणारा तो **एकच महात्मा** असून हिंदु संघटन व **शुद्धि** यांचा पुरस्कार व संवर्धन करणारे **पंडितजीच** होत. उपलब्ध असलेल्या साधनांचा पुरापुर उपयोग करून राष्ट्रीय शिक्षण कसें देतां येईल हें त्यांनीं **हिंदु विश्व-विद्यालयाच्या** स्थापनेनें सिद्ध केलेले आहे.

सदाचार व स्वधर्मनिष्ठा यांची आदर्शमूर्ति **पंडितजीच** होत म्हणून सांगण्यास कोणालाहि अभिमान वाटेल. राष्ट्राची भावी आशा तरुणांवर आहे तेव्हां हिंदी तरुण बलवन्त, धीमन्त, व श्रीमंत व्हावा अशाविषयीं त्यांचे आहर्निश प्रयत्न असतात व तरुणाशीं तरुणभावानें भाषण करण्यास त्यांस सदैव आनंदच वाटत असतो.

## ध्येयसिद्धीची आशा

**पंडितजींनीं** हिंदुमहासभा स्थापन केली. शुद्धि-संघटनेप्रीत्यर्थ ते चळवळ करीत असतात. तेव्हां ते राष्ट्रकार्यास अत्यावश्य अशा हिंदु-मुसलमानी ऐक्यास विरोधी असल्याचा त्यांजवर आरोप करण्यांत येतो. परंतु तो असत्य असल्या त्यांनीं स्वकृतीनेंच दाखविलें आहे. राष्ट्रकार्य साधण्यासाठीं प्रसंगीं थोडेंसें झुकतें कां होईना पण मुसलमानांच्या पदरीं माप टाकून हिंदु-मुसलमानांचा वाद मिटवावा या **महात्माजींच्या** हेतूला **पंडितजींनीं** वर्तुल परिषदेच्या संयुक्तघटनामंडळांत पाठिंबाच दिला आहे.व हिंदु-मुससमानांचा प्रश्न सलोख्यानें सुटून राष्ट्रीय सभेनें गेलीं ४५ वर्षें जें ध्येय हृदयाशीं बांधून ठेवलें आहे तें सिद्ध झाल्याखेरीज राहणार नाहीं, अशी **पंडितजींना** फार आशा वाटते. राष्ट्रीय-सभेस हातीं धरून चालती, बोलती, कार्यक्षम करण्यांत **पंडितजींचे** परिश्रम विशेष असल्यानें अशा रीतीनें आपल्या परिश्रमास यश आलेलें पाहण्याइतका परमभाग्याचा सुदिन दुसरा कोणता असणार ! जगदीश करो व **पंडितजींचा**

इच्छित हेतु त्यांच्या देखत सिद्धीस जावो, एवढीच आमची जगन्नियंत्याच्या चरणीं नम्र प्रार्थना आहे.

ईशकृपेनें **पंडितजींना** ७० वर्षें पूर्ण झालीं आहेत. हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांच्या वयोमानाकडे पाहिल्यास परमेश्वरानें **पंडितजीं**वरच नव्हे व आम्हां भारतवासीय हिंदु जनतेस परम ऋणी करून सोडलें आहे याबद्दल दयाघन प्रभूचे आपण कृतज्ञ असावयास पाहिजे. व पुढें ज्यासाठीं त्यांनीं आपलें आयुष्य वेंचलें तें कार्य, भारताचें मंगल, भारत स्वतंत्र होणें ही गोष्ट त्यांना 'याच देहीं याच डोळां' पाहावयास सापडो अशी आपण जगन्नियंत्याची करुणा भाकूं या.

## निष्ठावन्त धर्मप्रेमी

**पंडितजींचें** आयुष्य आज ७० वर असलें तरी त्यांचा दुर्दमनीय उत्साह मात्र अणुमात्रहि कमी झालेला नाहीं. नित्य व्यायाम घेण्यांत केव्हांहि खण्ड पडलेला नाहीं. स्वधर्माचरण व मनास प्रसन्नता देणाऱ्या स्नान-संध्या इत्यादि आन्हिकांत अंतर पडलेला नाहीं.आहाराच्या बाबतींत त्यांचा फार कटाक्ष आहे. कधींहि परान्न घ्यावयाचें नाहीं असा त्यांचा निग्रह आहे व कशाहि अडचणी आपत्ती आल्या तरी त्यांनीं आपलें तें व्रत सोडलें नाहीं. कायदेभंगाच्या निमित्तानें **नैनीच्या** तुरुंगांत असतांना त्यांना स्वतंत्र स्वयंपाकी सरकारला द्यावा द्यावा लागला ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे.

धर्माचरणाबाबतींत त्यांचा मोठा लौकिक आहे. परधर्मीयांशीं नेहमीं संबंध येत असूनहि त्यांनीं आपला आचार कधींहि सोडला नाहीं. **पंडितजींची** मूर्ती नुसती डोळ्यासमोर आणली म्हणजे प्रथमच त्यांच्या विशाल ललाटावरील तो शुभ्र चंदनातिलक ठळकपणें दिसतो. त्रिकालसंध्या, प्रातःस्नान, पूजा यांत अंतर नाहीं. वैदिक, शास्त्री, पुराणिक यांच्याशीं त्या त्या शास्त्रांत चर्चा करूं लागले म्हणजे त्यांना वेळाचेंहि भान राहत नाहीं. एकदां कै. **पं. विष्णु दिगंबर** यांच्याशीं संगीताबद्दल चर्चा करीत असलेले ऐकण्याचें भाग्य लेखकाला लाभलें होतें. त्यावेळीं **पंडितजींनीं पं. विष्णु दिगंबर** यांजला त्यांनीं संस्कृत मध्यें उतरून घेतलेलें एक श्लोकांचें बाडच दाखविलें त्यांत संस्कृतमध्यें संगीतासंबंधानें कोठें काय आलें आहे यांचीं टिपणें होतीं.

वेदपारायण ऐकणें, यज्ञयागादि कोणी करण्यास निघाला असतां त्यांस मुक्त

हस्तानें मदत करणें, या गोष्टींत **पंडितजींना** फार आनंद वाटतो. जुन्या आयुर्वेदाचे ते फार अभिमानी आहेत. **काशी** येथील **विद्वान पंडित श्री. त्र्यंबकशास्त्री द्रवीड** यांच्या औषधांवर त्यांची मोठी निष्ठा असून त्यांचें औषध घेण्याबद्दल ते इतरांनाहि साग्रह सांगत असतात.

**पंडितजींचा** कुटुंबविस्तारहि मोठा आहे. मुलगे, मुली, पुतणे आदि-करून त्यांचें घर गजबजलेलें असतें. **पंडितजींस** चार सुपुत्र आहेत. **पं. रमाकान्त** हे **प्रयाग** येथें वकिली करीत असतात. **पं. राधाकान्त** हे पूर्वी वकिली करीत असत परंतु हल्लीं त्यांनीं व्यापारी पेशा स्वीकारलाआहेत व ते एक्सपोर्ट इंम्पोर्टचे व्यापारी आहेत. तिसरे **मुकुंद मालवीय** हे पूर्वी व्यापारी होते परंतु गेलीं ५।६ वर्षें त्यांनीं **मुंबई** हेंच आपलें राहण्याचें ठिकाण केलें असून तेथें विविध राष्ट्रकार्यांत भाग घेत असतात. सर्वांत कनिष्ठ **पं. गोविन्द मालवीय** हे एम्. ए. एल्. एल्. बी झाले असून कायदेभंगाच्या चळवळींत राष्ट्रीयसभेचे मुख्य मंत्री होते. हे वकिली करीत नाहींत. सार्वजनिक कार्यांतच यापुढें पडणार असें दिसतें. **पं. मदन मोहन** यांजबरोबर हे विला-यतेस गेले आहेत.

**पंडितजींस** तीन कन्या. पैकीं एक कानपुरांत व दुसरी काशी येथें अशा दिल्या आहेत.

भारतवर्ष पुनः वैभवसंपन्न होऊन अखिल भारतवासीय जनता स्वातंत्र्योप-भोगी व्हावी यासाठीं पंडितजींनीं आतांपर्यन्त अव्याहत परिश्रम केले. त्यांस तो मंगलादिन पाहण्यास परमेश्वरानें दीर्घायुष्य द्यावें एवढीच त्याच्या चरणीं प्रार्थना आहे.

# परिशिष्ट. १

## सुधाबिन्दू.

पुस्तकाच्या प्रारंभीं **पं. मालवीय**कृत जी संस्कृत श्लोकावली दिली आहे. तींत एका दृष्टीनें **पंडितजींचें** आत्मचरित्रच ग्रथित झालें आहे. कारण हिंदूनें काय काय गोष्टी कराव्या तें त्यांत संक्षेपतः सांगितलें आहे व त्याचा विस्तार **पंडितजींनीं** आपल्या प्रत्यक्ष आचरणानें आयुष्यभर केला आहे. ज्या गोष्टी त्यांनीं लोकांना उपदेशासाठीं म्हणून सांगितल्या त्याचा तंतोतंत आचार करणारे ते कर्मयोगी आहेत. आधीं केलें मग सांगितलें, असा त्यांचा बाणा आहे. त्यापैकीं कांहींचा उल्लेख या प्रकरणांत करण्याचें योजिलें आहे. हिंदु युनिव्हर्सिटी, कॉंग्रेस, कौन्सिलें व हिंदुसंघटन यासंबंधानें त्यांनीं केलेली कामगिरी व्यापकस्वरूपाची असल्यानें ती अन्यत्र विस्तारानें वर्णिली. त्या-खेरीज **पंडितजींची** राष्ट्रसेवा विविधप्रकारची व विविधशाखांतील असल्यानें सर्वांचा न झाला तरी त्यांतील कांहीं महत्त्वांच्या गोष्टींचा उल्लेख येथें करणें अप्रासंगिक होणार नाहीं.

## खरी लोकसेवा कोणती.

खरी लोकसेवा कोणती या संबंधानें ते म्हणतातः—

यज्ञाशिवाय यज्ञपुरुष, परमेश्वर, प्रसन्न होत नसतो. व त्याच्या प्रसन्नते-शिवाय आपला अभ्युदयहि होणार नाहीं. त्या परमेश्वराला प्रसन्न करण्याचा मुख्य उपाय लोकसेवा–देशभक्ती–हा आहे. देशवासियांच्या दुःखानें दुःखी होणें व त्यांचें दुःख दूर करण्यासाठीं शुद्धभावानें यज्ञ करणें हीच परमेश्वराची परम उपासना आहे. अखिल मनुष्यमात्राचें कल्याण चिंतणाऱ्या भगवान् वेद-व्यासानें म्हटलें आहे.

**" तप्यन्ते लोकतापेन प्रायशः साधवोजनाः ।**
**परमाराधनं तद्धि पुरुषस्याखिलात्मनः ॥**

साधू लोक प्रायः दुसऱ्यांच्या दुःखानें दुःखी होतात. प्राणिमात्रांच्या ठिकाणीं वास करणारा जो परमेश्वर त्याची हीच परमसेवा आहे.

## पंडित मदनमोहन मालवीय.

ज्यावेळा मातेच्या पयप्राशनाबरोबर बालकांच्या हृदयांत देशभक्तीचा संचार होऊं लागेल त्याचवेळीं आपल्या देशाचा अभ्युदय होईल. देशाचें हित साधण्यासाठीं व मातृभूमीचा गौरव वृद्धिंगत करण्यासाठीं आपलें सुख व स्वार्थ यांचा सर्वस्वी त्याग करण्यास आपलें देशबंधू त्याचवेळो पुढें येतील. आज आमची स्थिति अत्यंत शोचनीय झाली आहे. लोक स्वत्व विसरून गेलें आहेत. अशा वेळीं बालकांत देशभक्ती उत्पन्न होऊं शकतें व ती देशासाठीं वाटेल तें कष्ट सहन करूं शकतात या गोष्टींचें लोकांस आश्चर्य वाटेल परंतु यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहींच नाहीं. आज आपल्या देशांत सुशिक्षीत समजल्या जाणाऱ्या लोकांत देशासाठीं त्याग करण्यास शिकले नाहींत असें लोक थोडे नाहींत.

यासंबधांत जपानी बालकांचें उदाहरण घेण्यासारखें आहे. ज्या वेळीं रुसो-जपानी युद्ध होतें त्यावेळीं तेथील लोकांना युद्धाप्रित्यर्थ अनेक वर्गण्या द्याव्या लागत. आपल्या वडिलांना त्या वर्गण्या देण्यास अडचण पडूं नये म्हणून अनेक विद्यार्थ्यांनीं दुसऱ्यांदा भोजन करण्याचें सोडून दिलें होतें. ज्या देशांतील विद्यार्थ्यांत असा अपूर्व त्याग आहे तो देश उन्नति शिखरास गेल्याखेरीज कधींहि राहणार नाहीं.

## राष्ट्रभाषा.

हिंदी भाषा ही राष्ट्रभाषा म्हणून आज सर्वमान्य झाली आहे. व अखिल भारतीय स्वरूपाच्या ज्या सभा, संमेलनें होतात त्यांतून हिंदी भाषेच्या द्वारें प्रामुख्यानें कामकाज चालतें. राष्ट्रसंघटन होण्यास एक भाषा हें एक प्रमुख साधन आहे ही गोष्ट आज जरी सर्वमान्य झाली असली तरी एका काळीं आज हिंदी म्हणून समजल्या जाणाऱ्या प्रांतांतच हिंदीला मान नव्हता. **पंडितजी** प्रारंभापासून हिंदीभाषेचे कट्टे अभिमानी असून हिंदी साहित्यप्रसाराच्या कामीं त्यांचें प्रयत्न सर्वश्रुत आहेत: पहिलें हिंदीसंमेलनही **पंडितजींच्या** अध्यक्षतेखालीं भरलें. व तेव्हांपासून आजतागायत सुव्यवस्थितपणें त्याचें काम चाललें आहे.

संयुक्तप्रांतांतील अधिकांश जनतेची मातृभाषा हिंदी असतांहि सरकारी कामकाज उर्दूतून चाले. त्यामुळें लोकांची मोठी कुचंबना होई. **पंडितजींनीं**

राष्ट्रभाषेवरील ही आपत्तीच व जनतेची कुचंबणा पाहून उर्दूच्या बरोबरीनें हिंदी भाषाहि कोर्टकचेऱ्यांतून चालावी अशाबद्दल मोठी चळवळ केली **पंडितजींना** या कामींहि कांहीं कमी विरोध झाला नाहीं. परंतु त्यावेळचे संयुक्तप्रांताचे ले. गव्हर्नर **लार्ड मॅकडोनाल्ड** यांना **पंडितजींच्या** म्हणतील सत्यता पटून स. १९०० मध्यें त्यांनीं सर्व सरकारी कचेऱ्यांतून उर्दूच्या बरोबरीनें हिंदी भाषेमध्येंही कामकाज चालावें असा ठराव केला. हिंदी भाषा बोलणारांवर **लॉर्ड मॅकडोनाल्ड** यांचे हे महदुपकार होत.

पंडित मालवीयजी यांनीं हिंदी राष्ट्रभाषा व्हावी म्हणून प्रयत्न केले त्यास तत्क्षणीं **लो० टिळक, रमेशचंद्र दत्त, अरविंद घोस,** यांनीं मान्यता दिली. पंडितजी एवढेंच करून थांबले नाहींत. स. १९०८ मध्यें त्यांनीं प्रयागला हिंदींत ' अभ्युदय ' पत्र सुरू केलें, स. १९१० मध्यें " मर्यादा " नांवाचें हिंदी मासिक सुरू केलें. १९१० सालीं पहिलें हिन्दी साहित्य संमेलन भरलें. त्याच्या अध्यक्षाच्यां जागींहि **पंडितजींचीच** निवड झाली. त्यावेळा देशीभाषांची हेळसांड कशी झाली आहे व त्यांची उन्नति कशी करतां येईल याचें त्यांनीं सुंदर चित्र रेखाटलें आहे. हिंदु-विश्वविद्यालयांतहि शिक्षणाचें माध्यम त्यांनीं हिंदीच ठेवलें आहे.

## गोरक्षण.

गोरक्षणासंबंधानेंहि पंडितजींची आस्था सुप्रसिद्ध आहे. संधी सांपडेल तेव्हां त्या कार्याची महती वर्णन केल्याखेरीज ते राहत नाहींत. गोरक्षणासंबंधीं ते म्हणतातः—

" गाय आणि मनुष्यप्राणी यांचा संबंध चिरंतन असून परमेश्वरानेंच तो घडवून आणला आहे आणि परस्परांनीं परस्परांच्या उपयोगी पडावें, कोणाहि स्थितींत कोणी कोणास अंतर देऊं नये, ही त्याचीच योजना आहे. गाईचें दूध अमृतोपम असून लहानथोरांस तें हितकर आहे. म्हशीचें दूध वापरतात खरें, पण तें योग्य नव्हे. लहान मुलांना तर विशेषेंकरून गाईचेंच दूध आपण दिलें पाहिजे. माझ्या माता भगिनींना माझी नम्र विनंति आहे कीं, त्यांनीं **गोपाल श्रीकृष्ण** व **माता यशोदा** यांचें चरित्र आठवावें आणि आपआपल्या घरांत एकेक तरी गाय पाळून मुलांना तें

अमृतोपम दूध पाजावें. प्रत्येक घराघरांत एकेक तरी गाय पाळली जावी, घराघरांतून दधिमंथनाचा घडघडाट प्रातःकाळीं ऐकूं यावा, आणि घरांघरांतून दह्यातुपाचीं गाडगीं शिंक्यावरून लोंबतांना दिसावींत अशी माझी इच्छा आहे. नेहमीं गाईचें दूध पितांना माझ्या मनःचक्षूंपुढें त्या गोमातेची मूर्ति उभी राहते.

पण त्याजबरोबर तिच्यावरील सध्यांच्या संकटाची व हिंदूंच्या या बाबतींतलि अनास्थेविषयींची मला कल्पना येऊन मन उद्विग्न होतें. आमच्या तरुणवर्गावर एक मोठी जबाबदारी आहे. 'गोरक्षण' हें आमच्या ह्या तरुणवर्गाचें कार्य आहे. गोरक्षणाविषयीं प्रत्येक हिंदुजिवाला तळमळ वाटली पाहिजे, तद्वतच ती मुसलमानालाहि वाटली पाहिजे, कारण गायीजवळ आपपर भाव नाहीं. अमृतोपम दूध व कृषिकष्टसहन असे बैल ती सर्वांना अभेदभावानें सारखेच देत असल्यानें सर्वांच्याच मातृपदाचा मान तिनें मिळविला आहे. यासाठीं आपण कृतज्ञ असूं तर गोरक्षणकार्याविषयीं आपणांस उदासीन राहतां येणार नाहीं. राष्ट्रांत गोवध चालला असतां आपणांस स्वस्थ बसतां येणार नाहीं. गोरक्षणाविषयीं अनास्था आणि गोवध हीं समानार्थक आहेत असें मी समजतों. गोरक्षणाविषयीं यत्किंचितहि हातपाय न हलविणें म्हणजे आपल्या आईला स्वहस्तें ठार करण्यासारखेंच होय.

देवानें उपजतांच आपणांस २ माता दिल्या; एक गाय आणि दुसरी जन्मदात्री आई. जिचें आपण दूध पितों ती आपली माता मानण्याचा प्रघात आहे. अर्थात् गाय ही माताच नव्हे तर काय? पण खेदाची गोष्ट अशी कीं, आपण ह्या गोमातेबद्दल जितके कृतज्ञ रहावयास पाहिजे तितके राहिलों नाहीं. कुत्र्याचे बाबतींत मात्र पुष्कळदां लोक वर्दळीवर येत असलेले आपण पाहतों; त्यापेक्षां गाईचे मनुष्यजातीवरील उपकार फार मोठे आहेत हें खरें नाहीं काय? दुभतें आणि कृषिकार्य या रूपानें गाईनें जगावर जे उपकार केले ते अनुपम आहेत, तसेंच ते जातिनिरपेक्ष आहेत. अर्थात् गाय ही सर्वांची माता आहे, अवध्य आहे, रक्षणीय आहे. गोरक्षण करणें हा आपला धर्म आहे. **भगवान कृष्णाचा** अवतार हा पूर्णावतार मानतात. त्या **कृष्णजींनीं** गोरक्षणाचा व गोसेवेचाच संदेश आपणांस दिला नाहीं काय? मग तो त्यांनीं उपदेश कोणाला

केला ? अर्थात तुम्हां आम्हांलाच केला आहे. तदनुसार आपलें आचरण घडलें पाहिजे.

गाईसारखें दुसरें धन नाहीं. महाभारतांतील च्यवनभार्गवाची गोष्ट हेंच शिकवितें. च्यवन भार्गव हे ऋषि पाण्यांत रहात असत. एकदां धीवरांनीं त्यांना चुकून माशाबरोबर जाळ्यांत धरून वर काढलें. ऋषिनीं धीवरांचें कल्याण व्हावें या हेतूनें 'आपली विक्री करा' असें धीवरांना सांगितलें. ऋषीला विकत घेण्यास प्रत्यक्ष नहुष राजा आला. त्यानें सारें राज्य देऊं केलें. तरी ऋषि म्हणे ही माझी किंमत नव्हे. अखेर एका गाईच्या बरोबर ऋषीची किंमत ठरली व ती ऋषीला मान्य झाली. ऋषींनीं सांगितलें 'गोभिस्तुल्यं न पश्यामि धनं किंचिदिहाप्युत' हा मंत्र आज आम्हाला अमेरिकेपासून शिकण्याची पाळी आली आहे, तिकडील लोक 'Cow the mother of prosperity' म्हणून गाईची जोपासना करीत आले आहेत. आम्हीं तिकडे दुर्लक्ष केलें आहे. इकडलि सरकारचे कुनूर येथील आहारज्ञ श्री. मॅक कॅरिसन यांनीं प्रसिद्ध केलें आहे कीं, दूध हें सर्वश्रेष्ठ अन्न आहे, दूध घेतल्यावर दुसऱ्या कसल्याहि आहाराची जरूर राहात नाहीं, माझें वय आज सत्तरीच्या जवळजवळ झालें आहे, माझी आई मला दररोज सकाळच्या प्रहरीं लहानपणीं नियमितपणें दूध लोणी देत असे. त्याचा फायदा मला आतां कळतो. त्या दुधातुपाच्या प्रभावावरच मी आज बोलतों आहे. माझ्या डोळ्यांत आजहि जर कांहीं तेज असेल तर तें त्या दूधलोण्याच्या प्रभावामुळेंच आहे. घरोघर गोपालन होऊन दूधदुभतें यथेच्छ सेवन केलें जाईल, तर शक्ति वाढेल, ज्ञान वाढेल, बुद्धि, उत्साह वगैरे वाढतील यांत तिळमात्र शंका नाहीं. म्हणून गाई पाळा. चांगले वळू ठेवा. गोपालनांचा संदेश गांवोगांव जाऊन कळवा. गोरक्षणाचा डंका गांवोगांव वाजूं द्या. गाईंना सुख द्या, त्यांना भुकिस्त आणि तृषित अशा कधीं ठेवूं नका. गाईंना सुख दिलेंत तर त्या तुम्हांला अवश्य सुखी करतील.

## ग्रामसंघटन कसें करावें ?

पुणें येथें ता. २०-२१ जून १९३१ रोजीं पंडितजींच्या अध्यक्षतेखालीं ग्रामसंघटन परिषद भरली असतां पंडितजींनीं पुढील आशयाचें भाषण केलें. त्यावरून त्या कार्याची व्याप्ती किती व कशी असावी याची यथार्थ कल्पना येते.

## पंडित मदनमोहन मालवीय.

"ग्रामोद्धार व्हावा अशी इच्छा बाळगणारांनी व ग्रामोद्धार कार्यांत प्रत्यक्ष भाग घेणारांनी ' साधी राहणी व उच्च विचारसरणी ' हें प्राचीन आर्यांचें ब्रीद राखलें पाहिजे. त्यांनीं स्वतःच्या आचरणानें साधा पोषाख व साधें अन्न ह्यांचा आदर्श ग्रामस्थांपुढें ठेवला पाहिजे. प्राथमिक शिक्षण सर्वांस मोफत मिळाल्याखेरीज ग्रामोद्धार होणें शक्य नाहीं. प्राथमिक शिक्षणांत केवळ Three 'R's असून भागणार नाहीं Four ' R 's पाहिजेत. Reading, Writing ' Rithmetic याजबरोबर Religion या चवथ्या R चा समावेश केला पाहिजे. सुशिक्षित बेकारांची संख्या देशांत सारखी वाढत आहे. स्वराज्य मिळालें तरिहि या सर्वांना शहरांतून नोकऱ्या मिळणें शक्य नाहीं. यांनीं खेड्याचांच आश्रय करून अल्पसंतुष्ट वृत्तीनें राहून ग्रामोद्धाराच्या कार्यास लागलें पाहिजे.

आपल्या देशांत एक लाख वस्तीच्या वरचीं शहरें सुमारें २०।२५ आहेत; बाकी सर्व अफाट लोकसंख्या खेड्यापाड्यांतून नांदत आहे. या कोटयावधि लोकांचा संसार सुखाचा व्हावा एतदर्थ सांप्रतच्या सुशिक्षित बेकारांनीं शहरांत राहण्याचा मोह सोडून खेडयांचा रस्ता धरला पाहिजे. सध्याच्या शिक्षणपद्धतीनें ही बुद्धि सुशिक्षितांत जागृत होत नाहीं. ही शिक्षणपद्धति राष्ट्राची सांप्रतची स्थिति ध्यानीं आणून आमूलाग्र बदलली पाहिजे. १५० वर्षे देशांत राज्य करूनहि व शेतकऱ्याकडून साऱ्याच्या रूपानें मिळणाऱ्या उत्पन्नावर जगत असूनहि सांप्रतच्या सरकारनें ग्रामवासियांची स्थिति सुधारण्याचा प्रयत्न केलेला नाहीं. या एका ढोबळ चुकीमुळें सांप्रतचें सरकार नालायक ठरत आहे. या परकीय सरकारनें जी शिक्षणपद्धति सुरू केली आहे तीहि शिक्षितांस स्वावलंबी बनविणारी नाहीं. सबंध जगांत परकीयभाषेंतून शिक्षण देण्याचा घातुक व वेडगळ प्रघात जर कोठें चालू असेल तर तो आपल्याच देशांत होय. ही लाजिवाणी गोष्ट नव्हे काय ? राहणी व पोषाख इत्यादि बाबतींत शिक्षितांनीं पाश्चात्यांचें अंधानुकरण केल्यानें राष्ट्रकार्यास व ग्रामोद्धारकार्यास धक्का पोंहोचत आहे. सुशिक्षित बेकारांचा प्रश्न सोडवण्याचा एकच मार्ग म्हणजे सुशितांनीं प्राचीन ब्राह्मणांच्या वृत्तीनें ग्रामवासीयांस ज्ञानदान केलें पाहिजे. ब्राह्मण ' हा प्रतिग्रह पराङ्मुख ' असला पाहिजे. त्याचें ब्रीद 'देणें' हें असलें पाहिजे; ' घेणें ' हें नव्हे. आयुष्याच्या आवश्यक गरजा फार थोडया आहेत; सुशि-

क्षितांनीं या गरजा मर्यादित ठेवूनच: ग्रामोद्धाराच्या कामीं कोणतेंहि कष्ट करण्यास कमीपणा मानूं नये. मी ५० वर्षांपूर्वी कॉंग्रेसच्या कार्यांत नुकतांच पडलों होतों. तेव्हां स्वतः जागा झाडून सभास्थान स्वच्छ करून सभा भरवीत असें. कांहीं दिवसांपूर्वी शीख धर्मीयांचा एक तलाव साफ करण्याचें काम शीख धर्मीयांनीं चालविलें असतां मी त्या ठिकाणीं गेलों. तो धार्मिक तलाव स्वच्छ करण्यासाठीं त्यांतील गाळ उपसण्याचें काम उच्च दर्जाचे शीखहि करीत असलेले पाहून माझें अंतःकरण प्रेमानें व आदरानें भरून आलें. या पवित्र कार्याला माझाहि हातभार लागावा अशी मला स्फूर्ति झाली व मी तसाच पुढें झटकन हातांत पाटी व पावडे घेऊन गाळाच्या ५।७ पाट्या मी डोक्यावरून वाहून टाकल्या. माझें पागोटें चिखलानें खराब होईल या भीतीनें तें काढून ठेवणेंहि मला इष्ट वाटलें नाहीं, उलट चिखलाचे डाग माझ्या पागोट्यास लागणें हें मला भूषणच वाटलें म्हणून मी माझें पागोटें काढून न टाकतां तशाच डोक्यावर पाट्या वाहिल्या.

सुशिक्षितांनीं अशी अंगमेहनत करण्यांत व ग्रामवासीयांचीं गटारें साफ करण्यांतहि भूषणच मानलें पाहिजे. कष्टाचें कोणतेंहि काम करण्यांत किंबहुना जोडे शिवण्यांतहि कमीपणा मानतां कामा नये. ग्रामवासीयांस स्वावलंबी बनविणें हें ग्रामोद्धार करणाराचें आद्य कर्तव्य होय. सांप्रतच्या सरकारनें प्रजेला अत्यंत परावलंबी अतएव आत्मविश्वासशून्य बनाविलें आहे सरकारनें आपलें प्रजेवरील नियंत्रण फाजील प्रमाणांत वाढविलें आहे. सरकारच्या मदतीशिवाय आम्ही कांहींच करूं शकत नाहीं असें प्रजेस वाटणें हा फाजील सत्तेचा दुष्परिणाम आहे. स्वतंत्रदेशांतील सरकार आपल्या प्रजेस इतकें परावलंबी बनवीत नाहीं. या दृष्टीनें विचार करितां ग्रामवासीयांना स्वावलंबी व स्वाश्रयी बनविण्याची ग्रामोद्धारकांनीं शिकस्त केली पाहिजे. एखादा युरोपियन आपल्या तरुण पत्नीसह व संपत्तीसह गांवापासून दूर अशा एखाद्या बंगल्यांत निश्चित अंतःकरणानें राहूं शकतो; परंतु हजारपांचशें वस्तीच्या गांवांत राहणाऱ्या आपल्या लोकांना चोर व दरवडेखोर ह्यांच्या भीतीनें आपलें जीवित व आपली संपत्ति, सुरक्षित वाटत नाहीं हा दुःखद अनुभव नेहमीं येतो. हा अनुभव न येण्यासाठीं ग्रामवासीयांत परस्परांत

प्रेम व विश्वास जागृत राहील व वाढीस लागेल अशी योजना ग्रामोद्धारकानें घडवून आणली पाहिजे.

गांवांतील कोणावरहि अरिष्ट आलें तर सर्व लोक त्याच्या मदतीस धावून जातील इतकी शिस्त, संघटना, आत्मसंरक्षणाची भावना व परस्परांतील विश्वास ग्रामवासीयांत जागृत झाला तरच चोरदरवडेखोरांचें फावणार नाहीं. आत्मसंरक्षण, आत्मविश्वाससंपादन, आरोग्यसंवर्धन, रस्ता दुरुस्ती इत्यादि अनेक गोष्टी घडवून आणण्यासाठीं ग्रामपंचायती स्थापन केल्या पाहिजेत. ग्रामोद्धार-कार्यांत् खादीपैदास-विशेषतः वस्त्रस्वावलंबन या कार्यास अग्रस्थान दिलें पाहिजे. ग्रामवासीयांच्या जीवनांत अन्नाची वाढ अद्याप त्यांच्या स्वाधीनची आहे. परंतु वस्त्राच्या बाबतींत मात्र ते अत्यंत परस्वाधीन झाले आहेत, हें ग्रामोद्धारकार्यांत मोठेंच संकट होय. पूर्वी हिंदुस्थान सर्व देशांस वस्त्र पुरवीत होता तशीच परिस्थिति पुन्हा प्राप्त होणें अशक्य नाहीं. या भरत-खंडांतील हिंदपुत्र व हिंदकन्या ज्या दिवशीं घरच्या घरीं बसून सूत काततांना व वस्त्र विणतांना सर्वत्र आढळतील तो सुदिन होय. अहाहा ! तो देखावा किती रमणीय व स्फूर्तिदायक दिसेल बरें! खादीचा जो संदेश महात्मा गांधींनीं आपल्या देशबांधवांस दिला आहे तो राष्ट्रोद्धार करण्याचे कामीं खराखर बहुमोल होय. महात्मा गांधींना पागल समजूं नका ! परमेश्वराचा संदेशच त्यांच्या मुखांतून आपल्याला लाभत आहे असें समजा !

ग्रामोद्धार करूं इच्छिणारांनीं खेड्यापाड्यांतील उद्योगधंद्यांना मदत केलीच पाहिजे; तरच त्यांच्या उद्धाराची आपणांस खरी तळमळ लागली असें समजतां येईल. गरीबांच्या पोटाला दोन घास घालण्याचा तोच एक राजमार्ग आहे. अत्यंत सुसंपन्न अशा इंग्लंड अमेरिकेंतीलहि संपन्न लोक आपआपल्या देशांतीलच उद्योगधंद्यांना चालन देण्यांत भूषण मानतात. मग हिंदुस्थानसारख्या दरिद्री देशांतील श्रीमान् लोकांनीं व सरदार संस्थानिकांनीं तर तसें स्वतः वागून आपल्या वागणुकीनेंच इतरेजनांस उदाहरण घालून दिलें पाहिजे. यःकश्चित पादत्राण घेतांनाहि ग्रामवासियांनीं तयार केलेलें पादत्राणच वापरण्याची आकांक्षा धरली पाहिजे. कापडाच्या बाबतींत तर ग्रामोद्धार करूं इच्छिणाऱ्या सर्वांनीं खेड्यापाड्यांत तयार झालेल्या हात-

सुताच्या खादीचाच कपडा वापरला पाहिजे. मी आज ५३ वर्षें स्वदेशीच कपडा वापरीत आलों आहे. परदेशी सुताचा विटाळ मी माझ्या शरीराला गेल्या सुमारें ५५ वर्षांत होऊं दिला नाहीं; व १९२२ सालीं महात्मा गांधी तुरुंगांत गेले तेव्हांपासून तर मी केवळ हातसुताचेंच कपडे वापरीत आहे व असें करतांना माझ्या गरीब बांधवांच्या पोटाला मी चार घास घालीत आहे हा अत्यानंद अनुभवित आहे. तरी तुम्हीं सर्वांनीं अगदीं आजपासूनच हातसुताच्या खादींचेच कपडे वापरण्याचा निश्चय करावा.

## व्यायाम

**पंडितजी** स्वतः व्यायामाचे अत्यंत भोक्ते आहेत. नित्य प्रातःकाळीं स्नान, संध्योपासना, सूर्य नमस्कार या त्यांच्या क्रमांत कधींहि खळ पडला नाहीं. तरुणांनीं बलोपासक बनावें, ब्रह्मचर्य पालन करावें याविषयीं ते सदैव उपदेश करीत असतात. तरुणांना त्यांचा उपदेश असा—“ भारतयि नवयुवकांमध्यें ईशभक्ति व देशभक्ति उत्पन्न झाल्याशिवाय तरणोपाय नाहीं. त्याबरोबरच बलसंधर्धनाचीहि अत्यंत जरूरी आहे. ‘ शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् ’ या वचनाप्रमाणें देशकल्याणाकरितां झटणाऱ्या प्रत्येक युवकानें व युवतीनें शरीरबल वाढविण्याकरितां झटलें पाहिजे.

आपण स्वराज्याच्या जवळ जवळ येत आहोंत; पण तें स्वराज्य टिकविण्यासाठीं राष्ट्राची शरीरसंपत्ति सुधारणें आवश्य आहे. कारण बलवानच स्वतंत्र राहूं शकतो.


आमच्या लोकांना वार्धक्य लौकर येतें. आमच्या तरुणांना १७–१८ वर्षांतच आरशी लावावी लागते. आमच्याकडील पेन्शनर पेनशन घेतल्यावर वर्ष सहा महिन्यांतच इहलोक सोडून जातात. पण पाश्चात्य लोकांकडे पाहिल्यास याच्या उलट स्थिति असल्याचें दिसतें. त्यांच्यांत म्हाताऱ्यांनासुद्धां व्यायामाची आवश्यकता वाटतें व ते त्याप्रमाणें व्यायाम घेण्यास लाजत नाहींत. पाश्चात्यांचे दोष मात्र आपण इंग्रजी शिकून घेतलें पण गुण मात्र नेमके टाकले.

आपल्याकडे पूर्वीं सूर्योदयाबरोबर नमस्कार घालण्याची पद्धत होती, ती आतां बंद झाली आहे. पण असें होणें बरें नाहीं. प्रत्येक युवकानें व युवतीनें

नमस्कार घातलेच पाहिजेत. युवतींनीं व्यायाम घेतल्याशिवाय बलवान अशी प्रजा निर्माण होणार नाहीं. आणि वीरमाता, वीरपत्नी व वीरकन्या हें नामाभिधान त्यांना प्राप्त होणार नाहीं. नमस्काराचा व्यायाम उत्तम आहे. हजार-बाराशेंपर्यंत नमस्कार घालणारे पूर्वी आपल्याकडे होते. स्त्रियाहि तुळशीस प्रदक्षिणा व सूर्यास नमस्कार घालीत असत.

भारतवर्षांत हल्लीं व्यायामाची आवड उत्पन्न झाली आहे ही सुदैवाची गोष्ट आहे. पण त्याबरोबर एकच गोष्ट मला सांगावयाची आहे. ती म्हणजे परमेश्वरावर प्रत्येकानें अढळ निष्ठा ठेविली पाहिजे, तरच आपल्यास स्वराज्यप्राप्ती होईल.

---



१श्री. भागोजीराव कीर, २श्री. न. चिं. केळकर, ३पं. मालवीय, ४श्री. चौंडे महाराज.

# परिशिष्ट २

## पं. मालवीय व महाराष्ट्र

पं. **मदन मोहन मालवीय** यांनीं वाई-सातारा भागांत एक लहानसा दौरा काढला होता. तो अनेक दृष्टींनीं यशस्वी झाला. गेलीं दोन वर्षें (१९२८-३१) ते जून महिन्याचें सुमारास पुण्यांत येऊन कांहीं दिवस राहात असतात. त्याचें एक कारण या दिवसांत पुण्याची हवा समशीतोष्ण, विशेषतः काशीप्रयाग यांच्या तुलनेनें थंड व उत्साहवर्धक असते. आज उतारवयांत त्यांना अशा थंड हवेंत कांहीं दिवस विश्रांति घेणें अवश्यच झालें आहे. मन कितीहि उद्योगप्रिय व स्वाभाविक उल्हासानें तरतरीत असलें तरी शरीरापुढें कोणाचाहि इलाज चालत नाहीं. आणि मृगशीतळाईच्या थंड वाऱ्याची झुळूक अंगाला लागल्याबरोबर **पंडितजी** जे आनंदोद्गार काडतात ते ऐकले म्हणजे, या वृद्ध देशभक्ताला इतकें तरी सुख आपणाला देतां येते या विचारानें महाराष्ट्राला कृतार्थताच वाटेल.

पण **पंडितजींचा** पुण्यास येण्यांत येवढाच उद्देश नसतो. त्यांना देशांत कोठें काय चाललें आहे हें पाहण्याची फार हौस. म्हणून पुण्यास ते विश्रांति-करितां आले तरी क्षणभरहि स्तब्ध बसत नाहींत. ते शहरांतील संस्थांना भेटी देण्यांत तरी गुंतलेले असतात, किंवा कोणत्यानां कोणत्या संस्थेच्या चालकांशीं ते घरींहि विचारविनिमय करीत बसलेले असतात, समजून घेण्याप्रमाणें समजून देणें व सुचविणें याचीहि त्यांना फार हौस असल्यामुळें, ज्ञानाच्या घेवीबरोबरच त्यांची ज्ञानाची देवहि सुरू असते. आणि वेदांतापासून वास्तुविधानापर्यंत असा एकहि विषय निघूं शकत नाहीं कीं ज्यांत **पंडितजींना** कोणास कांहीं विधायक सूचना करावयाच्या नसतात. ज्ञान व कर्तृत्व यांच्या जाणिवेचा त्यांचा ओघ अनिरुद्ध असाच असतो.

पुण्यास ते सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटींत उतरतात. **कै० गोखले** यांचा व **पंडितजींचा** फार जुना स्नेह. यामुळें सोसायटी हें एक प्रकारें आपलें घर असें ते सहजच मानतात. आज तरी ते नैमित्तिक चळवळींच्या राजकीय

बाबतींत सोसायटीच्याच मताचे सर्वस्वी नाहींत, तसेंच धर्म, समाजशास्त्र व महाराष्ट्रीय इतिहास या विषयांत त्यांच्यांशीं समानधर्म असे लोक सोसायटीच्या आवारांत जितके आहेत त्यापेक्षां बाहेरच अधिक आहेत. तथापि जुने ऋणानुबंध, सोसायटीचे कुंझरूसारखे कांहीं आजचेहि सभासद, आणि राजकीय विषयांतील नित्य स्वरूपाचें सर्वसामान्य धोरण या दृष्टीनें तें सोसायटीच्याच अधिक जवळ आहेत, पण विशेष हा कीं, आपपरभाव दूषित दुराग्रह यांच्यामुळें दळणवळण व विचारविनिमय या बाबतींत कित्येक लोक जसे मनांत अढी धरून वागतात तसे पंडितजी वागत नाहींत. म्हणून सर्वांना ते आपलेसेच वाटतात.

पंडितजींनीं ज्ञानलालसेनें व विशेषतः हिंदु युनिव्हर्सिटीच्या वर्गण्या गोळा करण्याचें उद्योगांत, सर्व हिंदुस्थान अनेक वेळ पालथा घातला आहे. व सर्व प्रांतावर त्यांचें प्रेमहि आहे. तथापि महाराष्ट्रावर आपलें प्रेम विशेष आहे असें जेव्हां ते बोलून दाखवितात तेव्हां ते उगीच तोंडदेखलें कांहीं तरी बोलतात असें सहसा म्हणवत नाहीं. रानड्यांशीं झटून पूज्यबुद्धीनें, गोखल्याशीं जुटून प्रेमबुद्धीनें, व टिळकांशीं तुटून आदरबुद्धीनें, वागण्यांत पंडितजींचा जन्म गेला. यामुळें महाराष्ट्राशीं त्यांचा अखंड संबंध जन्मभर राहिला आहे. पण महाराष्ट्राच्या इतिहासानें त्यांच्यावर जी मोहनी घातली आहे ती कांहीं विशेषच आहे. ते नेहमीं म्हणतात कीं, मी येवढें हिंदुविद्यापीठ बनारसेस स्थापलें, पण त्यांत महाराष्ट्रीय ' स्पिरिट ' उत्पन्न करण्याचा उद्योग मला अजून आणखी कांहीं काळ केला पाहिजे. '

मराठ्यांनीं हिंदवी स्वराज्य स्थापून व गाजवून भरतखंडाची विशेष प्रकारची सेवा केली असें त्यांचें मत आहे. उत्तर हिंदुस्थानांत मराठ्यांच्या हातून झालेल्या कांहीं कृत्यांबद्दल बंगाली–हिंदुस्थानी लोकांप्रमाणें पंडितजींच्या मनांत नापसंती असणारच. पण आतां हिंदुस्थान हें एक अखंड राष्ट्र अशी भावना उत्पन्न झाल्यामुळें, मराठे उर्मट किंवा लुटारू प्रवृत्तीचे होते. या उत्तर हिंदुस्थानीय समजुतींत व्यक्त होणाऱ्या मराठ्यांच्या दोषांपेक्षां त्यांच्या पराक्रमादि गुणाकडेच **पंडितजींचें** लक्ष अधिक वेधतें. पुण्याच्या भारत-इतिहास मंडळांतील सवाई माधवरावाच्या दरबारचें चित्र व नव्या पुलापलीकडील

शिवाजीचा पुतळा पाहून त्यांना वाटलें कीं, हो दोनहि उचलून आपल्या युनिव्हर्सिटींत नेऊन ठेवतां आली तर काय बहार होईल ! तूर्त त्यांनीं युनिव्हर्सिटींत ' शिवाजी हॉल ' म्हणून एक इमारत बांधली असून, ती एखाद्या महाराष्ट्रीय संस्थानिकांच्या हातून उघडवावी व तींत एखाद्या महाराष्ट्रीय इतिहासज्ञाकडून एखादी व्याख्यानमाला गुंफवावी असा त्यांचा मनोदय असल्याचें त्यांनीं नुकतेंच बोलून दाखविलें आहे.

जमल्यास त्यांचा असाहि एक विचार आहे कीं, उन्हाळ्याचें तोंडीं काशी हिंदू विद्यापीठाच्या इतिहासशाखेचे कांहीं विद्यार्थी, बरोबर त्यांचे एकदोन अध्यापक देऊन, महाराष्ट्रांत पाठवावयाचे व त्यांच्याकडून महाराष्ट्रांतील व कोंकणांतील किल्ले व इतिहासप्रसिद्ध स्थळें यांची ' यात्रा ' करावावयाची. तळेगांव—वडगांवच्या दरम्यान महादजी शिंद्यानें इंग्रजांचा पराभव केला. ही गोष्ट त्यांना माहीत नव्हती. पुरंदरचा किल्ला दुरून पाहतांना पुरंदरच्या तहाच्या गोष्टीवरून. ही इंग्रजांच्या प्रत्यक्ष पराभवाची गोष्ट त्यांना प्रथम कळली. तेव्हां ' अरेरे, मी किती अज्ञान आहे, ' असे उद्गार त्यांनीं काढले व या ज्ञानाचा उपयोगहि त्यांनीं ताबडतोब याच दौऱ्यांत केला. तो असा. वाई, सातारा, कऱ्हाड येथील व्याख्यानांत गोलमेज परिषद, सँढर्स्ट कॉलेज व लष्करी सत्ता हे विषय निघाले असतांना ते श्रोतृवृंदाला विचारीत " बोलो वडगांवके युद्धमे इंग्रजोंको जीत करनेवाले महादजी कोनसे सँढर्स्टमे पढे थे ? हें मार्मिक वाक्य ऐकतांच सर्व सभा हंसून बेजार होई.

वांईचे **चौंडे** महाराज, मसूरचे **विनायक** महाराज इत्यादि लोक राजकारणांत पडणारे नव्हत. तथापि **पंडितजींचा** व त्यांचा यापूर्वी बरेच दिवसांचा परिचय आहे. वाईची गोशाळा आज पुष्कळ दिवस बांधून राहिली होती. पण **पंडितजींच्या** शिवाय इतर कोणाच्या हातून ती उघडावयाचीच नाहीं असा धर्मवीर **भागुजीबुवा कीर** यांचा निश्चय होता, व तो पुरा करण्याकरितांच **पंडितजी** वांईला गेले. तेथील समारंभ फार प्रेक्षणीय झाला. **पंडितजींचें** गाईवर फार प्रेम. यामुळें हा समारंभाचा दिवस त्यांनीं मोठ्या आनंदांत काढला. वांईचीं सुंदर देवळें व घाट पाहून तर **पंडितजी** डोलूं लागले.

वाईनंतर सातारा, कऱ्हाड हीं गांवें ओघानेंच आलीं. तेथलि निमंत्रणांना त्यांना नाहीं म्हणवेना. साताऱ्यास त्यांना दाखविण्यासारखें कांहीं स्थळ नव्हतें. जुना राजवाडा, नवा राजवाडा म्हणतांच त्यांनीं तिकडे आस्थेनें नजर फेकली. पण एकांत सरकारी हायस्कूल व दुसऱ्यांत सेशन कोर्ट आहे असें सांगतांच त्यांनीं चटदिशा दुसरीकडे मान वळविली. फक्त माहुलीस जाऊन त्यांनीं संगमक्षेत्र पाहिलें. साताऱ्यास कन्याशाळा, राष्ट्रीयशाळा व **भाऊ पाटलांचें** अस्पृश्य वसतिगृह येवढ्याच संस्था त्यांनीं पाहिल्या. कऱ्हाडास वेळांत वेळ काढून त्यांनीं ओगलेवाडीस जाऊन कांचकारखाना पाहिला. तो पाहून त्यांच्या मनावर फारच चांगला परिणाम झाला.

कऱ्हाडच्या वाटेवर मसूर चार मैल बाजूला राहतें, व तेवढ्यांतच कृष्णा नदीचें रेताड व चिखली पात्र ओलांडावयाचें असतें. भर मध्यान्हहि झाली होती. तरी **पंडितजींनीं** मसूरास जाण्याचा आग्रह सोडला नाहीं. येथील आश्रमांत **विनायकबुवा** व **पंडितजी** समोरासमोर बसलेले पाहून प्रेक्षकांच्या मनांत उदात्तभावना आल्याशिवाय राहिली नसेल. एका बाजूस **पंडितजी** म्हणजे ते असे प्रवासाकरितां हजारों रुपये किंमतीच्या मोटारी, अंगावर उवदार काश्मिरी वस्त्रांचा पोषाख पाय चेपण्यापासून बोललेल्या शब्दागणिक मान हलविणारे सहचर व नोकर, प्रत्येक ठिकाणीं आगाऊ जाऊन चौका बनवून स्वयंपाक सिद्ध करणारे परिजन व साधनसंभार. दीडशें लक्ष रुपये जमवून राजवाड्यासारख्या प्रचंड इमारती उभारून त्यांत हजारों विद्यार्थी पढविणाऱ्या विद्यापीठाच्या जनकत्वाचा मान लाभलेले **पंडितजी** ! आणि दुसऱ्या बाजूस **विनायकबुवा** ब्रह्मचारी ! पादत्राणाशिवाय रात्रीं अंधारांतून व काट्याकुट्यांतून प्रवास होतो आहे, उन्हानें सूर्य व पाण्यानें पर्जन्य नखशिखांत रोमरंध्राचा ठाव घेत आहे, अंगावर एकाशिवाय दुसरें वस्त्र नाहीं, डोक्यावर राठ केसाच्या जटांचे दोर वळलेले, दाढी हवी तशी वाढलेली, काठी व लोटा याशिवाय सामान नाहीं, तोंडीं रामाशिवाय नाम नाहीं, ब्रह्मचाऱ्याशिवाय सहचर नाहीं ! आश्रमाची ती उखरलेली जमीन, खालीवर नुसत्या लोखंडी पत्र्यांचें वेष्टन, आंत छापखान्याचीं लोखंडीं यंत्रें, आणि दारांत पाहाऱ्यास बसलेला जागता रागीट मारुती. अशा या दोन मूर्ती पाहून त्यांच्या

परिस्थितींतल्या विरोधाचें आश्चर्यच वाटे. पण दोघांचेंहि अंतरंग एक. भावना एक व उद्दिष्ट कार्य एक. यामुळें समरस होऊन परस्पर आदरबुद्धीनें परस्पराचें कौतुक करणारे ते दोघे पाहून असेंच वाटलें कीं, राष्ट्रकार्यांतहि देहाव्यतिरिक्त किंबहुना देहाला अवगणून राहणारा एकच अंतरात्मा या देशांत आज वावरत आहे ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. **पंडितजींचा** राजयोग आणि **विनायकबुवांचा** वैराग्ययोग दोन्ही या देशाला आज सारखेच उपयोगी पडत आहेत.

**पंडितजी** हे पूर्वी नेमस्त पेशांतले, व १९२० सालापासून पुढें कांहीं वर्षें त्यांनीं असहकारितेच्या चळवळीला विरोध केला. लाहोरासहि त्यांनीं मुख्य ठरावाला विरोध केला, असें असून ते मुंबईस आले असतां चळवळींत दाखल झाले याबद्दल त्यांचें कौतुक व अभिनंदन सर्वत्र होत आहे हें योग्यच आहे. पण त्यांचें म्हणणें असें आहे कीं, " या चळवळींत प्रथमपासूनच मीं पडलों असें नाहीं व कदाचित पडणार नव्हतोंहि. पण राष्ट्रीयसभेच्या कांहीं कमिट्या बेकायदा ठरविण्याचा सपाटा सरकारानें चालविला तेव्हां मला राग आला व मी चळवळींत पडलों. " महाराष्ट्रांत या चळवळींत काय काय घडलें हें समजून घेण्याची इच्छा त्यांनीं वांई, कऱ्हाड वगैरे ठिकाणीं दर्शविली आणि इकडील हकीकती–विशेषतः कऱ्हाडच्या व बिळाशीच्या हकीकती त्यांना कळल्या, तेव्हां ते हंसून म्हणाले " हें तर बाहेरच्या प्रांतांत कांहींच माहीत नाहीं! तुम्हां महाराष्ट्रीयांना आपला डांगोरा पिटण्याची, डंका वाजविण्याची, जाहिराती फडकविण्याची विद्या चांगली माहीत नाहीं असें दिसतें. महाराष्ट्राचें एखादें चांगलें दैनिकपत्र इंग्रजींत अवश्य पाहिजे. "

**पंडितजी** या चळवळींत पडले तरी त्यांना राष्ट्रीयसभेच्या गाभाऱ्यांत कितपत मान्यता आहे म्हणाल तर ' विष्णवे नमः ! ' त्याचीं कारणेंहि तशींच आहेत. उ० खादीचा उपदेश करण्याचें पुण्य करीत असतां बहिष्काराला पूर्णता आणण्याच्या दृष्टीनें ते गिरण्यांचा स्वदेशी माल घेण्यास सांगण्याचें पापहि करितात! मग त्यांना रा. स. च्या गाभाऱ्यांत कोण मान्यता देणार? तेथें आज सगळेच विजेचे दिवे प्रकाशत असून त्यांच्या मागें **गांधींच्या** शिष्यत्वाचे उत्प्रकाश ( रिफ्लेक्टर ) लाविलेले आहेत. पंडितजी हे आज चाळीसपंचे-

## पंडित मदनमोहन मालवीय

चाळीस वर्षें सतत राष्ट्रकार्य करीत असल्यानें ते गांधींचे शिष्य होऊं शकत नाहींत, म्हणून रा. स. च्या गाभाऱ्यांत त्यांना वरील कारणामुळें स्थान नसलें तरी त्यांचें एकंदर हिंदुस्थानांतलें-हिंदुस्थानच्या देवस्थानाच्या गाभाऱ्यांतील स्थान अढळ आहे. इतर कोणाला विजेच्या दिव्याची उपमा साजली तर ती अनेकार्थानेंहि लागतें. पंडितजींना देवाजवळच्या मंद नंदादीपाची उपमा लावण्यांत येते ती मात्र यथार्थ आहे. देवाचें अखंड सान्निध्य. इतरत्र विजेचे दिवे मालवले गेले तरी हा आपला मिणमिण कां होईना पण सतत तेवत राहून देवाचें दर्शना उभ्या रात्रींहि घडविणारा. कोणाचा हात लागला तरी फार भाजावयाचा नाहीं, आणि उलट तो मालवावा असेंहि कोणाच्या मनांत यावयाचें नाहीं.

( केसरी ता. ३० जून १९३१ )

REFBK-0004384